CMYK

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४। युगाब्द ५१२५ । वर्ष ४० वे अंक ३५९ । पाने ८+८ । किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

आज जागतिक आयुर्वेद दिन
धनत्रयोदशी

शुभंकरोति कल्याणं आरोग्यं धनसंपदा ।
शत्रुबुद्धी विनाशाय दीपज्योती नमोऽस्तु ते ।।

धन्वंतरी आपणांवर सदैव प्रसन्न असू देत...
निरामय आरोग्यदायी जीवन आपणांस लाभो!
धनवर्षाव आपणाकडे अखंडित होवो!

१०८ वर्षापासून आयुर्वेद क्षेत्रात कार्यरत असलेली परंपरा...

बागेवाडीकर आयुर्वेद रसशाळा

१२८, इंडस्ट्रियल इस्टेट, होटगी रोड, सोलापूर. फोन नं.०२१७-२६०२७६१

वैद्य प्रशांत नृसिंह बागेवाडीकर । वैद्य समीर प्रशांत बागेवाडीकर

क्लिनीक शाखा

- सोलापूर : १४०, गोल्डफिंच पेठ, सोलापूर मो. ९८२२०२३६११, ९७६३७११९९९
- पुणे : फ्लॅट नं.२, शिव अपार्टमेंट, डी.एस.के टोयाटो शोरुमसमोर, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे
- मुंबई : सपालेस पी. क्लिनिक, मलिक बिल्डींग, डि.व्ही. देशपांडे मार्ग, (शिवाजी पार्क रोड नं.४)
  मुंबई ४०००२८. फोन नं. ०२२-२४४५११५५

भव्य रॅली काढून मुनगंटीवार यांनी केले नामांकन दाखल

बल्लारपूर विधानसभा क्षेत्राची सर्वशक्तिनिशी सेवा करेन : मुनगंटीवार

◆ **मूल, २८ ऑक्टोबर**

बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील मूल, बल्लारपूर व पोंभुर्णा तालुक्यांतील विविध गावांमध्ये विकासकामे केली आहेत, यापुढेही करीत राहील. मतदारसंघाची सर्वशक्तिनिशी सेवा करेन. जनताजनार्दन नक्कीच मला आशीर्वाद देतील, असा विश्वास आहे. मला निवडून आणण्यासाठी भाजपा व महायुतीच्या घटक पक्षातील कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घ्यावी, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

सोमवारी हजारोंच्या उपस्थितीत रॅली काढून मुनगंटीवार यांनी आपले नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केले. त्याआधी त्यांनी कन्यका माता मंदिर येथे सपत्नीक पूजा केली. विजय रथावर त्यांची जंगी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाक्याच्या आतषबाजीत व ढोल ताशाच्या गजरात त्यांना प्रोत्साहित केले.

'सुधीर भाऊ आगे बढो, हम तुम्हारे साथ है' असा एकच जल्लोष रॅलीत होता. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी त्यांच्यासोबत माजी केंद्रीय मंत्री व आदिवासी नेते, खासदार फग्गनसिन्ह कुलस्ते, वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष संध्या गुरनुले, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, भाजपा नेता राजेंद्र गांधी, भाजपा अध्यक्ष प्रभाकर भोयर, माजी अध्यक्ष रत्नमाला भोयर, नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष नंदकिशोर रणदिवे, महिला आघाडीच्या प्रदेश सचिव अल्का आत्राम, जिल्हाध्यक्ष वंदना शेंडे यांच्यासह भाजपा व महायुती घटक पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. ◀*(तभा वृत्तसेवा)*

मविआत जागा वाटपात 'टायपिंग मिस्टेक'

संजय राऊत-नाना पटोले यांच्यात पुन्हा खडाजंगी

◆ **मुंबई, २८ ऑक्टोबर**

महाविकास आघाडीकडून उमेदवार जाहीर केले जात आहेत. आतापर्यंत काँग्रेसने ९९ ते १०० उमेदवार जाहीर केले. तर, उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने ८४ उमेदवारांची नावे जाहीर केली. यात दक्षिण सोलापूरमधून दोन्ही पक्षांनी उमेदवार जाहीर केल्याने वाद निर्माण झाला आहे. या वादातून पुन्हा एकदा संजय राऊत आणि नाना पटोले यांच्यात ठिणगी पडली आहे. यावर प्रतिक्रिया देताना नाना पटोले यांनी संजय राऊतांना प्रेमाचा सल्लाही दिला आहे.

दक्षिण सोलापूर येथून उद्धव ठाकरे गटाने अमर पाटील यांना उमेदवारी देऊ केली आहे. २४ ऑक्टोबर रोजी उद्धव ठाकरे यांनी त्यांना एबी फॉर्महीही दिला. काँग्रेसने रविवारी जाहीर केलेल्या यादीत दक्षिण सोलापूरमधून दिलीप माने यांच्या नावाची घोषणा केली. याबाबत संजय राऊत म्हणाले, आम्ही सगळे एकत्र लढत आहोत. सोलापूर दक्षिण या जागेवर शिवसेनेने उमेदवार दिला आहे. काँग्रेसच्या यादीतही उमेदवार जाहीर केला. आता मी असे मानतो, ही टायपिंग मिस्टेक आहे. पण, अशा टायपिंग मिस्टेक आमच्याकडूनही होऊ शकतात.

नागपूरमध्ये उद्धव ठाकरे गटाला फक्त एक जागा देण्यात आली. यावरूनही संजय राऊतांनी नाराजी व्यक्त केली. या नाराजीनाट्यावर प्रतिक्रिया देताना नाना पटोले म्हणाले, कोकणात आम्हाला जागा मिळाली नाही. संजय राऊतांनी हा विषय संपवला पाहिजे. विरोधकांच्या विरोधात आपल्याला लढायचे आहे. मला असे वाटते की, राऊतांनी आपली भूमिका विरोधकांच्या विरोधात टाकली पाहिजे, असा प्रेमाचा सल्ला आहे.

सोलापूर दक्षिणच्या कथित टायपिंग मिस्टेकबाबत नाना पटोले म्हणाले, आमच्या हायकमांडने घेतलेला निर्णय आहे. त्या पातळीवर ती चर्चा होईल, असे मला वाटते, राज्य म्हणून प्रतिक्रिया देणार आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

इति-उवाच...

बारामतीच्या मतदारांना आता वाटत आहे की, आपण गेल्यावेळेस थोडी चूक केली. ही चूक आता त्यांना सुधारायची आहे. त्यांना २४ तास झटणारा माणूस हवा आहे. गेली ३५ वर्षे दादांनी बारामतीच्या मतदारांची सेवा केली आहे. ही गोष्ट बारामतीकरांच्या मनात आहे.

सुनेत्रा पवार, राज्यसभा खासदार

मी पुन्हा निवडून आल्यास मुख्यमंत्री नाही पण, उपमुख्यमंत्री नक्की होऊ शकतो. मी अल्पसंख्यक असल्याने मला चांगली संधी मिळू शकते. मला एक लाखाचे मताधिक्य आवश्यक आहे. हाडाची काडं करा, पै पाहुण्यांच्या काळजी घ्या, मात्र गाफील राहू नका. आपण गाफील राहिलो तर, घरात जास्त उंदीर फिरतात.

हसन मुश्रीफ, राकाँ नेते

जेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस अतिशय अडचणीच्या काळात होती, तेव्हा आमच्यासारखे छोटे कार्यकर्ते खिशात दमडी नसतानाही शरद पवारांसाठी झटले.अजितदादांसोबत ३०-४० आमदार गेले तरी, आम्ही डगमगलो नाही. आता एका सपा नेत्याने पक्षात प्रवेश करताच त्याला तिकीट जाहीर झाले. आमची बायको हिरोईन नसल्याने कदाचित आम्हाला तिकीट मिळाले नसावे.

नीलेश भोसले, राकाँशप युवक आघाडी कार्याध्यक्ष

पैशांचे बळ विरुद्ध माणसांचे बळ अशी लढाई आम्ही लढणार आहोत. लोकांनी आता ठरवायचे आहे की, त्यांना पैसे हवेत की, काम करणारा माणूस हवा आहे.

शर्मिला ठाकरे, मनसे नेत्या

शिंदे गट शिवसेना म्हणून मिरवत आहे. परंतु, ते स्वतःचा निर्णय स्वतः घेऊ शकत नाहीत. त्यांच्या पक्षाचे निर्णय दिल्लीतून ठरतात. अमित ठाकरेंनी निवडणूक लढवावी, हा निर्णयदेखील दिल्लीतच झाला, अशी माझी माहिती आहे.

संजय राऊत, खासदार शिवसेना उबाठा

लातूरमध्ये देशमुख विरुद्ध चाकूरकर

◆ **मुंबई , २८ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाची तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. २५ उमेदवारांची ही यादी असून, यात अनेक विद्यमान आमदारांना त्याच मतदारसंघातून पुन्हा संधी देण्यात आली आहे. लातूरमधून अर्चना चाकूरकर यांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे येथे देशमुख विरुद्ध चाकूरकर अशी लढाई होणार आहे.

ज्या मतदारसंघातून भाजपाचे विद्यमान आमदार आहेत, त्यांना भाजपाने पुन्हा तिकीट दिले आहे तसेच काँग्रेसमधून जे भाजपात दाखल झाले, त्यांनाही संधी देण्यात आली आहे.

काही महत्त्वाच्या उमेदवारांमध्ये लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून अर्चना शैलेश पाटील चाकूरकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. याच मतदारसंघातून यापूर्वी काँग्रेसने अमित देशमुख यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे या मतदारसंघात देशमुख विरुद्ध चाकूरकर असा थेट सामना रंगणार आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

वडिलांचा पराभव झाला, ती जागा परत मिळवणार

अर्ज भरताना नीलेश राणेंनी सांगितल्या वेदना

◆ **सिंधुदुर्ग, २८ ऑक्टोबर**

जिल्ह्यातील कुडाळ विधानसभा मतदारसंघातून माजी मुख्यमंत्री व खासदार नारायण राणेंचे पुत्र नीलेश राणे यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याच पृष्ठभूमीवर बोलताना त्यांनी वडिलांच्या म्हणजे नारायण राणेंच्या पराभवाची आठवण करून दिली तसेच वडिलांच्या पराभवाची जागा मला परत मिळवायची आहे, असे सांगितले.

उद्धव ठाकरे गटाकडून कुडाळ जागेवर वैभव नाईक यांना उमेदवारी देण्यात आली आहे. ज्या चिन्हावर माझ्या वडिलांची राजकीय सुरुवात झाली, त्याच चिन्हावर माझ्या राजकारणाची दुसरी इनिंग सुरू होत आहे, असे म्हणत नीलेश राणेंनी

शिवसेनेतील पक्षप्रवेशावर भाष्य केले. शिवसेनेतील पक्षप्रवेशाबद्दल मला सर्वांचे आभार मानावे लागतील. एकनाथ शिंदे यांचे तर विशेष आभार मानावे लागतील. कारण, दोनदा पराभव झाल्यानंतरही माझ्यावर विश्वास टाकून मला संधी दिली, असे नीलेश राणे म्हणाले.

यापूर्वी काय घडले, त्यापेक्षा उद्यासाठी काय योजना करू शकतो, हे विचार करणारा मी आहे. राणे यांच्या नेतृत्वात मी तयार झालो आहे. म्हणून पूर्वी जे झाले, ते झाले, त्यात सुधारणा कशी करायची, उद्यासाठी चांगले कसे करायचे, त्याचे नियोजन गरजेचे असते.

मला जिंकण्यासाठी काय करावे लागेल, तेवढेच मी मागच्या दहा वर्षांत लक्षात ठेवले आहे. आता देवाच्या कृपेने उमेदवारी मिळाली आहे. निकाल २३ तारखेला लागेल, मला एवढी खात्री आहे की, आमच्या सर्व उमेदवारांचा विजय होईल, मोठ्या मताधिक्यात निवडून येईल, असे नीलेश राणे यांनी सांगितले. ◀*(वृत्तसंस्था)*

विधानसभा निवडणुकीकरिता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी ठाणे जिल्ह्यातील कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत शिवसेनेचे पदाधिकारीही उपस्थित होते

मराठवाड्यात चव्हाण, दानवे, मुंडे बहीण-भावाची प्रतिष्ठा पणाला

◆ **छ. संभाजीनगर, २८ ऑक्टोबर**

मराठवाड्यात लोकसभेचे आठ मतदारसंघ आहेत. एका मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघ येतात. त्यामुळे एकूण विधानसभेचे ४८ मतदारसंघ हवेत. पण, हिंगोलीला उमरखेड (जि. यवतमाळ) आणि धाराशिवला बार्शी (जि. सोलापूर) हे अन्य जिल्ह्यांतील दोन मतदारसंघ जोडले गेल्याने मराठवाड्यात ४६ मतदारसंघ येतात.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस, शेकाप, समाजवादीला कौल देणारा मराठवाडा आणिबाणीपर्यंत काँग्रेसचा बालेकिल्ला होता. जनता पार्टीच्या काळात संमिश्र चित्र होते. पण, १९८९ नंतर राजकारणात हिंदुत्वाची लाट आली आणि पाहता पाहता भाजपा, शिवसेनेचे सर्वसामान्य कार्यकर्ते त्यानंतरच्या निवडणुकांत खासदार, आमदार झाले. मागील ३४-३५ वर्षांत बरेच पाणी वाहून गेले आहे.

मतदारसंघनिहायविचार केला तर, छत्रपती संभाजीनगरात असणाऱ्या कन्नड, संभाजीनगर (पश्चिम), गंगापूर या चार विधानसभा क्षेत्रात महायुतीचे संदीपान भुमरे यांना, तर संभाजीनगर पूर्व आणि मध्य या ठिकाणी एमआयएमचे इम्तियाज जलील यांना आघाडी मिळाली होती.

जालन्यात जालना, बदनापूर, फुलंब्री, भोकरदन, पैठण, सिल्लोड या सहाही ठिकाणी रावसाहेब दानवे पिछाडीवर, तर काँग्रेसचे डॉ. कल्याण काळे आघाडीवर होते. बीड मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना केज, गेवराई, बीडमध्ये आघाडी होती, भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांना परळी, आष्टी, माजलगावात सोनवणेंपेक्षा जास्त मताधिक्य होते. बीड विधानसभेने ७४ हजारांची मोठी आघाडी सोनवणे यांना दिली होती.

लढतीचे चित्र असे...

- छत्रपती संभाजीनगर पूर्वची लढत तिरंगी होणार असून, भाजपाचे अतुल सावे, एमआयएमचे इम्तियाज जलील, काँग्रेसचे एम. के. देशमुख रिंगणात राहणार आहेत. हिंदू व मुस्लिम मतांच्या ध्रुवीकरणाची किनार त्यास आहे.
- नांदेड जिल्ह्यात भोकर मतदारसंघातून अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण या प्रथमच निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत.
- जालन्यात अर्जुन खोतकर आणि कैलास गोरंट्याल, छत्रपती संभाजीनगर मध्यमध्ये शिवसेनेचे प्रदीप जैस्वाल, उबाठाचे किशनचंद तनवाणी, एमआयएमचे नासेर सिद्दिकी, परतुरात माजी मंत्री व भाजपा नेते बबनराव लोणीकर व उबाठाचे ए. जे. बोराडे या काही लढती लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. ■

धाराशिवमधील धाराशिव, औसा, उमरगा, तुळजापूर, परंडा या पाचही क्षेत्रांत उबाठाचे ओमराजे निंबाळकर आघाडीवर होते. नांदेड लोकसभेत नांदेड उत्तर, दक्षिण, देगलूर, नायगाव, मुखेड या पाच मतदारसंघांत काँग्रेसचे वसंतराव चव्हाण, तर केवळ भोकरमध्ये भाजपाचे प्रतापराव पाटील चिखलीकर यांना आठशे मतांची आघाडी होती. लातुरात काँग्रेस उमेदवार शिवाजी काळगे हे लातूर शहर, लातूर ग्रामीण, निलंगा, लोहा-कंधारमध्ये आघाडीवर होते, तर भाजपाचे डॉ. सुधाकर शृंगारे यांना अहमदपूर, उदगीरला मताधिक्य होते. परभणीत उबाठाचे जाधव यांना परभणी, जिंतूर, पाथरी, घनसावंगी, परतूर या पाच ठिकाणी आघाडी होती, तर रासपचे महादेव जानकर यांना फक्त गंगाखेडात जाधव यांच्यापेक्षा जास्त मते पडली. हिंगोलीत उबाठाचे नागेश आष्टीकर यांनाही वसमत, हिंगोली, कळमनुरी, किनवट, हदगाव या पाच ठिकाणी शिवसेना उमेदवार बाबुराव कदम यांच्यापेक्षा मताधिक्य आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

रावसाहेब दानवेंच्या मुलीचा शिवसेनेत प्रवेश

◆ **मुंबई, २८ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणुकीच्या सुरू झालेल्या धामधुमीत माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते रावसाहेब दानवे यांची मुलगी संजना जाधव यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

छ. संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड येथून त्यांना उमेदवारी जाहीर केली जाण्याची शक्यता आहे. जाधव यांनी रविवारी शिवसेनेत प्रवेश केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी काही तासांचा वेळ शिल्लक राहिला असताना माजी खासजार राजेंद्र गावित आणि विलास तरे यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. एकनाथ शिंदे आणि विधान परिषदेचे माजी सदस्य रवींद्र फाटक यांनी त्यांचे स्वागत केले. ◀*(वृत्तसंस्था)*

सिद्दिकींना वांद्रे पूर्वमध्ये 'भाईजान'चा पाठिंबा

ठाकरे गटाच्या वरुण सरदेसाईंचे टेन्शन वाढले

◆ **मुंबई, २८ ऑक्टोबर**

दसऱ्याच्या दिवशी वांद्रेमध्ये भर रस्त्यात बाबा सिद्दिकी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. त्याच मतदारसंघातून अजित पवार यांनी बाबा सिद्दिकी यांचे पुत्र आणि विद्यमान आमदार झिशान सिद्दिकी यांना उमेदवारी दिली. ठाकरे गटाकडून वरुण सरदेसाई निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यामुळे तिथे झिशान सिद्दिकी विरुद्ध वरुण सरदेसाई यांच्यात लढत पाहायला मिळणार आहे. त्यातच अभिनेता सलमान खानचा आपल्याला पाठिंबा असल्याचे झिशान सिद्दिकींनी सांगितले.

अभिनेता सलमान खानने झिशान यांना पाठिंबा दिल्याने ठाकरे गटाच्या वरुण सरदेसाई यांचे टेन्शन वाढण्याची शक्यता आहे. सलमान खानचा मोठा चाहतावर्ग पाहता याचा निवडणुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. झिशान सिद्दिकी यांनी म्हटले आहे की, वांद्रे पूर्वची जनता माझ्यासोबत आहे. सलमान खानसोबत रात्री बोलणे झाले, त्याने शुभेच्छा दिल्या आहेत. वरुण सरदेसाई त्यांचे काम करीत आहेत, मी माझे काम करीत आहे. कुणाला निवडून द्यायचे, हा निर्णय जनता घेईल. शिवसेनेने सत्ता असताना खूप त्रास दिला. त्यांना कधीच वाटत नव्हते की, इथली कामे व्हावी. मात्र, आमच्यासारखे लोक येथे आहेत. ◀*(वृत्तसंस्था)*

वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकरांचे वडील रिंगणात

◆ **मुंबई, २८ ऑक्टोबर**

वादग्रस्त माजी प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचे वडील दिलीप खेडकर यांनी विधानसभा निवडणुकीसाठी अहमदनगर दक्षिण मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यांनी २०२४ ची लोकसभा निवडणूक वंचित बहूजन आघाडीकडून लढविली होती.

पूजा खेडकर यांना खोटे अपंग प्रमाणपत्र दाखल करणे, खोटी माहिती सादर करणे, प्रशिक्षणार्थी म्हणून पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असताना आपल्या खाजगी वाहनावर लाल दिवा लावणे अशा विविध तक्रारींवरून सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. दरम्यान, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणादरम्यान त्यांचे वडील दिलीप खेडकर जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन मुलगी पूजासाठी स्वतंत्र केबिन असावी, यासाठी अधिकाऱ्यांवर दबाव आणला होता तसेच तहसीलदार व इतर कर्मचाऱ्यांना धमकावल्याच्या आरोपाखाली त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मनोरमा खेडकर यांच्यावर आर्म्स ॲक्टसह अनेक कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मनोरमाचा यांचा हातात बंदूक घेऊन शेतकऱ्याची भांडत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली. त्यानंतर पुणे न्यायालयाने त्यांची जामिनावर सुटका केली. दिलीप खेडकर हे राज्य सरकारच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संचालक पदावरून निवृत्त झाले असून, ते आता राजकारणात नशीब आजमावत आहेत. ◀*(तभा वृत्तसेवा)*

वसंतराव नाईक यांनी सर्वाधिक काळ भूषविले मुख्यमंत्रिपद

विलासराव देशमुख दुसऱ्या, शरद पवार तिसऱ्या स्थानावर

श्यामकांत जहागीरदार

◆ **नवी दिल्ली, २८ ऑक्टोबर**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद सर्वाधिक काळ भूषवण्याचा विक्रम वैदर्भीय वसंतराव नाईक यांच्या नावावर आहे. दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेसचे नेते विलासराव देशमुख तर, तिसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार आहेत.

वसंतराव नाईक तीन कार्यकाळात ११ वर्षे ७८ दिवस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. विलासराव देशमुख दोन कार्यकाळ मिळून ७ वर्षे १२९ दिवस मुख्यमंत्री होते. यातील त्यांचा पहिला आणि मोठा कार्यकाळ ४ वर्षे ३७ दिवसांचा होता. शरद पवार महाराष्ट्रातील सर्वांत मोठे नेते मानले जातात. पंतप्रधानपदासाठीही त्यांच्या नावाची अनेक वेळा चर्चा झाली. पण, तीन कार्यकाळ मिळून त्यांचा



मुख्यमंत्रिपदाचा कालावधी ६ वर्षे २२१ दिवसांचा आहे. मुख्यमंत्री म्हणून त्यांचा सर्वाधिक कार्यकाळ २ वर्षे ३६४ दिवसांचा आहे.

चौथ्या क्रमांकावर नागपूरकर देवेंद्र फडणवीस आहेत. मुख्यमंत्री म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे फडणवीस हे वसंतराव नाईक यांच्यानंतरचे राज्याचे दुसरे मुख्यमंत्री आहेत. फडणवीस ५ वर्षे १२ दिवस मुख्यमंत्री होते. दुसऱ्यांदा त्यांनी अल्पकाळासाठी मुख्यमंत्रिपद भूषवले.

शंकरराव चव्हाण यांनी दोन कार्यकाळात ४ वर्षे १९१ दिवस मुख्यमंत्रिपद भूषवले. मुख्यमंत्री म्हणून त्यांचा मोठा कार्यकाळ हा २ वर्षे १०६ दिवसांचा होता.

शिवसेनेचे मनोहर जोशी ३ वर्षे ३२४ दिवस मुख्यमंत्री होते. एक महिना त्यांना मिळाला असता, तर चार वर्षे ते मुख्यमंत्रिपदावर राहिले असते. पृथ्वीराज चव्हाण ३ वर्षे ३२१ दिवस मुख्यमंत्री होते. म्हणजे, त्यांचा कार्यकाळ मनोहर जोशींपेक्षा फक्त ३ दिवसांनी कमी होता. वसंतदादा पाटील यांनी दोन कार्यकाळात ३ वर्षे १८३ दिवस मुख्यमंत्रिपद सांभाळले. दादांचा मुख्यमंत्री म्हणून मोठा कार्यकाळ २ वर्षे १२१ दिवस होता.

अन्य कोणत्याही बाबतीत नसली तरी, शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांना एका बाबतीत महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यावर मात करता आली. ठाकरे चव्हाणांपेक्षा ११ दिवस जास्त मुख्यमंत्री होते. उद्धव ठाकरे २ वर्षे २१४ दिवस मुख्यमंत्री होते, तर यशवंतराव चव्हाण २ वर्षे २०३ दिवस. काँग्रेसचे अशोक चव्हाण १ वर्ष ३३८ दिवस, सुशीलकुमार शिंदे १ वर्ष २८८ दिवस, सुधाकरराव नाईक १ वर्ष २५४ दिवस, तर बॅ. अब्दुल रहमान अंतुले १ वर्ष २२६ दिवस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले.

बाबासाहेब भोसले १ वर्ष १२ दिवस, मारोतराव कन्नमवार १ वर्ष ४ दिवस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. १ वर्षापेक्षा कमी काळ मुख्यमंत्री असणारे तीन नेतेही राज्यात होऊन गेले. काँग्रेसचे शिवाजीराव पाटील निलंगेकर २८२ दिवस, नारायण राणे २५९ दिवस तर पी. के. सावंत फक्त १० दिवस मुख्यमंत्री होते. सावंत तसे पूर्णवेळ नाही, तर काळजीवाहू मुख्यमंत्री होते. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मुख्यमंत्री म्हणून कार्यकाळ जवळपास अडीच वर्षांचा आहे. ■

आज धन्वंतरी जयंती

SOLAPUR TARUN BHARAT

तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

प्रारंभ १९२६

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर

मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४। युगाब्द ५१२५ । वर्ष ४० वे अंक ३५९ । पाने १२ । किंमत रु. ६/-

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

महत्त्वाचे

पाच सत्रांतील घसरणीनंतर शेअर बाजारांत तेजी



मुंबई : पाच सत्रांतील घसरणीनंतर सोमवारी शेअर बाजारांत तेजी परतली. दुपारपर्यंतच्या सत्रात मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक १,१०० अंकांनी उसळला, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीने २४,४५० वर व्यवहार केला. त्यानंतर सेन्सेक्स ६०२ अंकांनी वाढून ८०,००५ अंकांवर स्थिरावला. निफ्टी १५८ अंकांच्या तेजीसह २४,३३९ या पातळीवर बंद झाला. खरेदीदारांनी कमी मूल्यांकनाचा घेतलेला फायदा, कच्च्या तेलाच्या दरातील घसरण आणि आशिया बाजारातील तेजीचा मागोवा घेत आज भारतीय शेअर बाजाराने घसरणीतून जोरदार रिकव्हरी केल्याचे दिसून आले. मुंबई शेअर बाजारातील सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आज ४.५६ लाख कोटींनी वाढून ४४१.५४ लाख कोटींवर पोहोचले. बाजारातील तेजीत फायनान्शियल, मेटल आणि आयटी शेअर्स आघाडीवर राहिले. निफ्टी ऑटो, बँक, फार्मा, मेटल, पीएसयू बँक, हेल्थकेअर, रियल्टी आणि मीडिया हे क्षेत्रीय निर्देशांक १ ते ४ टक्क्यांपर्यंत वाढले. विशेष म्हणजे, निफ्टी ऑटोच्या पाच दिवसांच्या घसरणीला आज ब्रेक लागला. ■

जेईई मेन्ससाठी नोंदणी प्रक्रिया सुरू

नवी दिल्ली : राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (एनटीए)ने अभियांत्रिकी संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई) मेन्स २०२५ च्या सत्र १ आणि २ साठी अधिसूचना जारी झाली आहे. ही अधिसूचना अधिकृत संकेतस्थळावर पाहता येणार आहे. निर्धारित वेळापत्रकानुसार सोमवार २८ ऑक्टोबरपासून नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. यासाठीची अंतिम तारीख २२ नोव्हेंबर आहे. परीक्षा २२ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान होणार आहे. विद्यार्थ्यांना याचे प्रवेशपत्र परीक्षेच्या तीन दिवसांपूर्वी उपलब्ध करून दिले जातील. परीक्षेच्या शहराविषयीची माहिती जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात जारी केली जाईल.

भारत-चीन सीमेवरील बहुतांश जवान माघारी

नवी दिल्ली : भारत आणि चिनी लष्करादरम्यान लडाख क्षेत्रातील डेपसांग मैदान आणि डेमचोक येथे दोन्ही देशांचे सैनिक माघारी येण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. याला डिसएंगेजमेंट असे म्हटले जाते. दोन्ही सैन्याच्या माघारीची ८० ते ९० टक्के प्रक्रिया सोमवारपर्यंत पूर्ण झाली. यात सीमेवरील सर्व प्रकारचे मूलभूत ढांचे हटवणे आणि दोन्हीकडील सैन्य मागे घेणे याचा समावेश आहे. आगामी २४ तासांत ही प्रक्रिया पूर्ण होणार असल्याचे समजते. या दोन्ही भागांत भारत आणि चीनने एप्रिल २०२० च्या पूर्वीची स्थिती बहाल करणे आणि पेट्रोलिंग सुरू करण्यासाठी एक करार केला आहे. गलवान घाटीसह चार बफर झोनवर मात्र अद्याप दोन्ही देशांमध्ये कोणतीही चर्चा झालेली नाही. पुढील चर्चेसाठी कोणतीही तारीखदेखील निश्चित करण्यात आलेली नाही.

अमित ठाकरेंविरोधात लढण्यास सरवणकर ठाम

मुंबई - माहिम विधानसभा मतदारसंघातून यंदा तिहेरी लढत पाहायला मिळणार आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे सदा सरवणकर, मनसेचे अमित ठाकरे अन् शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे महेश सावंत निवडणुकीच्या रिंगणात आहे. दरम्यान, लोकसभेला राज ठाकरेंनी भाजपाला बिनशर्त पाठिंबा दिला होता. त्यामुळे राज्यातील काही मतदारसंघात भाजपा आणि मनसेत मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता वर्तवली जातेय. त्यामुळे माहिममधून सदा सरवणकर यांचा अर्ज मागे घेण्याची मागणी जोर धरू लागली. परंतु, सदा सरवणकर निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत.

मोहोळमधून रिद्धी कदम ऐवजी राजू खरे उमेदवार?

सोलापूर - मोहोळ राखीव मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून रिद्धी रमेश कदम यांना उमेदवारी जाहीर झाली होती. दरम्यान सोमवारी रात्री उशिरा सोशल मिडीयावर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या स्वाक्षरीचे पत्र फिरत असून त्यामध्ये असे नमूद आहे की, रिद्धी कदम यांना दिलेला एबी फॉर्म रद्द करण्यात येत आहे. राजू खरे हे नवे उमेदवार आहेत.

शक्ती प्रदर्शनात शिंदे, अजितदादांचे अर्ज

सोलापुरातही भाजपासह विविध पक्ष आणि अपक्षांकडून वाजत गाजत उमेदवारी अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ ऑक्टोबर -

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघा एक दिवस उरला आहे. आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार यांच्यासह दिग्गज उमेदवारांनी अर्ज भरला आहे. ढोल ताशांच्या गजरात, जेसीबीने फुले उधळत उमेदवारांनी मोठं शक्तिप्रदर्शन केले. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातही भाजपा, शिवसेना, शरद राष्ट्रवादी, काँग्रेस यांच्यासह इतर पक्ष आणि अपक्ष उमेदवारांनीही वाजत गाजत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातून अर्ज दाखल केला. त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, खासदार श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक उपस्थित होते. शिंदे विरोधात ठाकरेंच्या शिवसेनेतर्फे केदार दिघे यांनी देखील आज अर्ज दाखल केला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना बारामतीत मोठं शक्तीप्रदर्शन केले. अर्ज भरताच त्यांनी प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी जनतेला संबोधित करताना अजित पवार भावनिक झाल्याचं पाहायला मिळाले. कण्हेरी गावतील ग्रामदैवत मारुतीचे दर्शन घेऊन त्यांनी आपल्या प्रचाराला सुरुवात केली.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सातारा जिल्ह्यातील कराड दक्षिण मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी ब्रम्हपुरी मतदारसंघातून अर्ज दाखल केला. छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल हे त्यांच्यासोबत बैलगाडीतून अर्ज भरण्यासाठी उपस्थित होते. कुर्ला मतदारसंघातून मंगेश कुडाळकर यांनी अर्ज दाखल केला. माहिम मतदारसंघातून राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित ठाकरे यांनी मनसेतर्फे अर्ज दाखल केला. त्यावेळी मनसे प्रमुख राज ठाकरे उपस्थित होते. पुण्यातील बारामती मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवारांनी अर्ज भरला. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी शरद पवार गटातर्फे त्यांचे पुतणे युगेंद्र पवार यांनी अर्ज दाखल केला. युगेंद्र पवारांचा अर्ज दाखल करताना शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांची उपस्थिती होती. ठाणे शहर मतदारसंघातून भाजपाचे संजय केळकर यांनी अर्ज दाखल केला. त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. समाजवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अबू आसिम आझमी यांनी मानखुर्द शिवाजीनगर मतदारसंघातून अर्ज दाखल केला. मुंब्रा कळवा मतदारसंघातून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे नजीब मुल्ला यांनी शक्तिप्रदर्शन करत अर्ज दाखल केला. विद्यमान आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात त्यांचा सामना आहे.

अणुशक्तीनगर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सना मलिक शेख यांनी अर्ज दाखल केला. त्यावेळी त्यांचे वडील नवाब मलिक उपस्थित होते. अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार राजकुमार बडोले यांनी अर्ज भरला. त्यावेळी खासदार प्रफुल्ल पटेल उपस्थित होते. माजी मंत्री आरिफ नसीम खान यांनी चांदिवली मतदारसंघातून काँग्रेस पक्षातर्फे अर्ज दाखल केला. यावेळी आमदार अनिल परब, खासदार चंद्रकांत हंडोरे, खासदार वर्षा गायकवाड, आमदार भाई जगताप उपस्थित होते.

वांद्रे पूर्व मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे झिशान सिद्दीकी यांनी अर्ज दाखल केला. बेलापूर मतदारसंघातून भाजपाचे माजी मंत्री गणेश नाईक यांनी आपला अर्ज दाखल केला. नाशिक जिल्ह्यातील नांदगाव मतदारसंघातून माजी खासदार समीर भुजबळ यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. शिवसेनेचे विद्यमान आमदार सुहास कांदे यांच्याविरोधात त्यांचा सामना होणार आहे.

एकनाश शिंदेंच्या शिवसेनेतर्फे कोल्हापुर उत्तर मतदारसंघातून राजेश क्षीरसागर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. मागाठाणे मतदारसंघातून आमदार प्रकाश सुर्वे यांनी अर्ज भरला. कोरेगाव मतदारसंघातून महेश शिंदेंनी अर्ज भरला. मालेगाव बाह्य मतदारसंघातून मंत्री दादा भुसे यांनी अर्ज दाखल केला. आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातून महेबूब शेख यांनी अर्ज दाखल केला. यावेळी खासदार बजरंग सोनवणे उपस्थित होते.



उत्तरप्रदेशच्या अयोध्येतील 'रा मकी पौडी' घाटावर दिवाळीचा उत्सव भव्य प्रमाणात साजरा करण्यासाठी जय्यत तयारी सुरु झाली आहे. या परिसराला पोलिसांनी कडेकोड सुरक्षा उपलब्ध करुन दिली आहे. रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेनंतर आलेली ही पहिलीची दिवाळी अयोध्यावासीयांसाठी विशेष अशी असणार आहे.

शहर मध्यमधून चेतन नरोटेंना काँग्रेसची उमदेवारी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२७ ऑक्टोबर -

शहर मध्य विधानसभा मतदारसंघासाठी काँग्रेसकडून चेतन नरोटे यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे. सोमवारी रात्री उशीरा काँग्रेसकडून यादी जाहीर झाली.

चेतन नरोटे शहर मध्यमधून विधानसभा लढवण्यासाठी इच्छुक होते. त्यासाठी त्यांनी जोरदार तयारी केली होती. कार्यकर्त्यांचा मोठा जमाव घेऊन फॉर्म सादर केला होता. काँग्रेस पक्षाकडून बाबा मिस्त्री यांचे नाव अगोदर पुढे आले. त्यामुळे नरोटे आणि त्यांची समर्थक पक्षश्रेष्ठींवर नाराज झाले. अखेर नरोटे यांचे नाव जाहीर झाले आहे. शहर मध्यमध्ये आता भाजपाकडून देवेंद्र कोठे, माकपचे नरसय्या आडम, एमआयएमचे फारूक शाब्दी आणि काँग्रेसचे चेतन नरोटे यांच्यात चौरंगी लढत होणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील काही विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाल्याचे चित्र आहे. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात ठाकरे सेनेचे अमर पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर काँग्रेसने माजी आमदार दिलीप माने यांची उमेदवारी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे हा काँग्रेसचाच मतदारसंघ आहे. शहर मध्यमध्ये मित्रपक्ष माकपचे उमेदवार नरसय्या आडम यांना काँग्रेसकडून जागा सुटेल अशी चर्चा असताना माजी नगरसेवक चेतन नरोटे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याची चर्चा रंगली आहे.

१०० देशांना २१ हजार कोटींच्या शस्त्रास्त्रांची निर्यात

आर्मेनिया सर्वांत मोठा ग्राहक

◆ **नवी दिल्ली, २८ ऑक्टोबर**

भारताच्या संरक्षण क्षेत्राचा दबदबा वाढत आहे. पूर्वी जगातील सर्वांत मोठा आयातदार असलेला देश आता मोठा निर्यातदार झाला आहे. आयातीपेक्षा निर्यात वाढवण्यावर भर दिला जात आहे. २०२३-२४ मध्ये भारताने २१ हजार कोटी रुपयांच्या शस्त्रास्त्रांची निर्यात केली.

काही वर्षांपर्यंत अमेरिका आणि फ्रान्समधून मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्र निर्यात केली जायची. आता याच देशांना भारत मोठ्या प्रमाणात निर्यात करीत आहे. आर्मेनिया हा सर्वांत मोठा ग्राहक ठरला आहे. आर्मेनियाने आकाश हवाई संरक्षण क्षेपणास्त्र यंत्रणा, पिनाका मल्टिरॉकेट सिस्टिम आणि १५५ मिमी व्यासाच्या तोफांची खरेदी भारताकडून केली आहे.

आर्मेनिया मागील चार वर्षांपासून क्षेपणास्त्रे, तोफा, रॉकेट यंत्रणा, शस्त्रांचा माग घेणारे रडार, बुलेटप्रुफ जॅकेट्स, नाईट व्हिजन आणि तोफांचे गोळे आयात करते. मागील काही सौदे नागोर्नो-करखाबच्या मुद्यावरून अझरबैजानसोबत झालेल्या संघर्षवेळी आर्मेनियाने भारतासोबत केले.

भारत विमान आणि हेलिकॉप्टरमधील पंख आणि इतर भागांचा समावेश असलेल्या भागांची आयात करतो. (वृत्तसंस्था)

'आकाश'चा पहिला ग्राहक आर्मेनिया

स्वदेशी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकसित केलेली हवाई संरक्षण क्षेपणास्त्र यंत्रणा आकाशचा पहिला ग्राहक हा आर्मेनिया आहे. ही यंत्रणा घेण्यासाठी ब्राझीलनेही उत्सुकता दाखवली आहे. भारताने २०२२ मध्ये फिलिपाईन्सला युद्धनौकाविरोधी ब्रह्मोस क्षेपणास्त्राची निर्यात केली होती. हा सौदा ३१०० कोटींपेक्षा जास्त रुपयांचा आहे. ■

'या' शस्त्रास्त्रांची सर्वाधिक मागणी

- ☞ ब्रह्मोस सुपरसॉनिक
- ☞ डॉर्नियर-२२८ विमान
- ☞ तोफा
- ☞ रडार
- ☞ आकाश क्षेपणास्त्र
- ☞ पिनाका क्षेपणास्त्र

मोदी-सांचेझ यांनी केले सी-२९५ विमान प्रकल्पाचे उद्घाटन

लष्करी विमानाचा देशातील पहिला खाजगी प्रकल्प

◆ **बडोदा, २८ ऑक्टोबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी सोमवारी भारतात सी-२९५ लष्करी विमानांच्या उत्पादनासाठी टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम लिमिटेड (टीएएसएल) एअरबस सुविधेचे उद्घाटन केले. टाटा-एअरबस सुविधा ही भारतातील लष्करी विमानांसाठी खाजगी क्षेत्रातील पहिला जुळवणी प्रकल्प आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी सोमवारी गुजरातच्या बडोदा येथील टाटा एअरक्राफ्ट संकुलाचे उद्घाटन केल्यानंतर तेथील सुविधांची पाहणी केली

या प्रकल्पामुळे केवळ भारत-स्पेन संबंध बळकट होणार नाहीत, तर आपल्या 'मेक इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड' या मोहिमेला बळ मिळाले आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. या प्रकल्पातून उत्पादित केलेली विमाने भविष्यात निर्यातही केली जातील. या उत्पादन सुविधेमुळे निर्माण झालेली परिसंस्था भविष्यात भारताला नागरी विमाने तयार करण्यास मदत करेल, अशी आशा मोदींनी व्यक्त केली.

या सुविधेतून २०२६ मध्ये पहिले विमान तयार होईल, असे सांचेझ यांनी सांगितले. सप्टेंबर २०२१ मध्ये भारताने लष्करी विमानांच्या उत्पादनाचा समावेश असलेल्या एका प्रकल्पांतर्गत भारतीय वायुदलाच्या ॲव्हरो-७४८ विमानांची जागा घेण्यासाठी ५६ सी-२९५ वाहतूक विमाने खरेदी करण्यासाठी एअरबस डिफेन्स ॲण्ड स्पेससोबत सुमारे २१ हजार कोटी रुपयांचा करार केला.

या कराराप्रमाणे एअरबस उड्डाणासाठी सज्ज असलेल्या पहिल्या १६ विमानांचा पुरवठा स्पेनमधून पुढील चार वर्षांच्या कालावधीत करणार आहे. उर्वरित ४० विमानांची निर्मिती टीएएसएल येथे दोन कंपन्यांच्या भागीदारीत केली जाईल.

येथील सुविधेत परिसंस्थेचा संपूर्ण विकास, निर्मितीपासून ते जुळवणी, चाचणी आणि पात्रता तसेच विमानांची शेवटपर्यंत देखभालही होणार आहे. टाटा व्यतिरिक्त भारत डायनॅमिक्ससारख्या आघाडीच्या संरक्षण सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्स तसेच खाजगी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग या कार्यक्रमात योगदान देतील, असे निवेदनात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

खलाशाने तांडेलाचे डोके कापून बोट पेटवली

रत्नागिरी, दि. २८ ऑक्टोबर

मानसिक संतुलन बिघडलेल्या खलाशाने चक्क तांडेलचे डोके कापून बोट पेटवून दिली. देवगड समुद्रात ही घटना सोमवारी सकाळी घडल्याने खळबळ उडाली. कोस्टगार्ड च्या मदतीने बाकीच्या खलाशांना वाचविण्यात यश आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देवगड येथील समुद्रात रत्नागिरी व आजूबाजूच्या परिसरातील मोठ्या प्रमाणावर बोटी मच्छीमारीसाठी गेलेल्या होत्या. त्यामध्ये रत्नागिरी राजीवडा येथील रफिक फणसोपकर यांची बोट मच्छीमारीसाठी देवगड बंदरात गेलेली होती. मच्छीमारी करत असतानाच मानसिक संतुलन बिघडलेल्या खलाशाने चक्क तांडेलाचे डोके कापले आणि ते डोकं बोटीवर ठेवून दिले. त्यानंतर संपूर्ण बोटीला आग लावली. या आगीमध्ये बोट मालकाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले. यावेळी आजूबाजुला असलेल्या रत्नागिरीतील काही मच्छीमार बोटीवरील लोकांनी जळणा-या बोटीवरच्या तीस ते पस्तीस लोकांना वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यानंतर कोस्टगार्डला पाचारण करण्यात येऊन बोटीवरच्या इतर खलाशांचे प्राण वाचविण्यात आले. या घटनेतील मृत तांडेल हा जयगड येथील असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र तांडेलचे डोके कापणा-या खलाशाचे अद्याप नाव समजू शकले नाही. या घटनेमुळे रत्नागिरीतील मच्छिमार व्यवसायिकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

'साहेबां'नी पाडली कुटुंबात फूट

काकांवर बरसले अजित पवार

◆ **बारामती, २८ ऑक्टोबर**

साहेबांनी कुटुंबात फूट पाडली, असा घणाघात उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी सोमवारी बारामती विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर सभेला संबोधित करताना काका शरद पवारांवर केला. शरद पवार यांनी बारामतीत माझ्या विरोधात उमेदवार दिला, असे भावुक झालेल्या अजित पवार यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्या विरोधात पत्नी सुनेत्राला उतरवून मी चूक केली आणि ती स्वीकारली होती. आता इतर लोकंही चुका करीत असल्याचे वाटत आहे. बारामतीतून मी उमेदवारी अर्ज दाखल करण्याबाबत माझे कुटुंब सहमत झाले होते. मात्र, प्रत्यक्षात असे झाले नाही. आईचे मला खूप सहकार्य मिळाले. शरद पवार गटाने अजित पवारांच्या विरोधात उमेदवार देऊ नये, असा सल्ला तिने दिला. मात्र, माझ्या विरोधात कुणाला तरी उमेदवारी दाखल करण्याचा आदेश शरद पवारांनी दिला असल्याचे मला कुणी तरी सांगितले, असे ते म्हणाले.

साहेबांनी कुटुंबात फूट पाडली. राजकारण इतक्या खालच्या पातळीवर न्यायची गरज नव्हती, इतकेच मला सांगायचे आहे. कारण, कुटुंबाला जोडण्यात कित्येक पिढ्या जातात आणि तोडायला काहीच वेळ लागत नाही. मागच्या वेळी तुम्ही मतदार भावूक झाले होते. यावेळी भावूक होऊ नका. बारामतीच्या जनतेने ताईला लोकसभेसाठी निवडले, आमदारकीसाठी आता दादाला निवडले पाहिजे. अजित पवारांच्या विरोधात शरद पवारांनी युगेंद्र पवारांना उमेदवारी दिली आहे. युगेंद्र त्यांचे नातू आहेत. (वृत्तसंस्था)

ईडीची मुडा प्रकरणी कर्नाटकात छापेमारी

◆ **बंगळुरू, २८ ऑक्टोबर**

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर गुन्हे दाखल असलेल्या म्हैसूर शहरी विकास प्राधिकरण अर्थात् मुडाशी संबंधित 'मनी लाँड्रिंग' प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) सोमवारी नव्याने छापेमारी केली.

म्हैसूर आणि बंगळुरूतील जवळपास सात ते आठ ठिकाणांवर छापेमारी करण्यात आली. या प्रकरणी ईडीने १८ ऑक्टोबर रोजी पहिल्यांदा छापेमारी केली होती. ही छापेमारी म्हैसूर येथील मुडाच्या कार्यालयावर तसेच इतर काही ठिकाणांवर करण्यात आली होती. मुडाच्या बंगळुरूतील क्षेत्रीय कार्यालयातील काही कनिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी मागील आठवड्यात ईडीने केली होती. लोकायुक्ताने दाखल केलेल्या एफआयआरची दखल घेत ईडीने बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि इतरांच्या विरोधात ईसीआयआर दाखल केला होता. (वृत्तसंस्था)

खा. ओमराजे यांच्या घरातूनच बंडखोरी?

धाराशिव, दि. २८ ऑक्टोबर

उद्धव ठाकरे यांचे निष्ठावंत अशी ख्याती असलेल्या खासदार ओम राजेनिंबाळकर यांना त्यांच्या घरातूनच धक्का बसला आहे. त्यांचे चुलत बंधू तथा धाराशिवचे माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर यांनी बंडाचे निशाण हाती घेण्याचे ठरविले आहे.

ठाकरे सेनेला पहिल्याच घासाला खडा लागल्याची चर्चा सध्या धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघात सुरू आहे. निष्ठावंत शिवसैनिक हे बिरुद घेऊन दुसऱ्यांदा विधानसभा निवडणुकीला सामोरे जात असलेल्या आमदार कैलास पाटील यांनी सोमवारी शक्ती प्रदर्शन केले. त्याचवेळी मकरंद राजेनिंबाळकर यांच्या अपक्ष उमेदवाराची वार्ता येऊन धडकली. उमेदवारीवरून निर्माण झालेला हा संघर्ष आटोक्यात आणण्यासाठी खासदार राजेनिंबाळकर काय उपाय शोधतात? याकडे ठाकरे सेनेतील हताश पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या नजारा लागल्या आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये एकमेकांचे पारंपारिक प्रतिस्पर्धी असलेल्या खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांच्यात दुरंगी लढत झाली. मोठ्या मताधिक्क्याने राजेनिंबाळकर यशस्वी झाले. धाराशिव शहरात खासदार राजेनिंबाळकर यांना १६ हजाराहून अधिक मतांची आघाडी लाभली. यात माजी नगराध्यक्ष तथा खासदार राजेनिंबाळकर यांचे चुलत बंधू मकरंद राजेनिंबाळकर यांचेही योगदान मोठे आहे. मागील विधानसभा निवडणुकीवेळी मकरंद राजेनिंबाळकर विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून इच्छुक होते. ऐनवेळी तत्कालीन जिल्हा परिषद सदस्य तथा ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख असलेले कैलास पाटील यांच्या गळ्यात ओम राजेनिंबाळकर यांच्या पुढाकारामुळे उमेदवारीची माळ पडली. त्याच वेळी मकरंद राजेनिंबाळकर नाराज असल्याची चर्चा सर्वत्र पसरली होती. मात्र माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर यांनी त्यावेळी माघार घेतली. कैलास पाटील पहिल्यांदा विधानसभा सदस्य म्हणून विजयी झाले.

६0 विमानांना पुन्हा बॉम्बची धमकी

नवी दिल्ली : देशातील देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर बॉम्बच्या धमक्या सलग १५व्या दिवशीही कायम आहेत. सोमवारी इंडियन एअरलाइन्सच्या ६0 हून अधिक विमानांना बॉम्बस्फोटाच्या धमक्या मिळाल्या.

धोक्यामुळे एअर इंडियाच्या दिल्ली-कोलंबो एआय २८१ फ्लाइटचे कोलंबो आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. विमानात १०८ प्रवासी आणि ८ कर्मचारी होते. फ्लाइटची तपासणी करण्यात आली, पण ही बातमी खोटी निघाली.गेल्या १५ दिवसांत ४00 हून अधिक विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. सर्व बनावट असल्याच्या आढळून आले. आज मिळालेल्या धमक्यांमध्ये एअर इंडिया-इंडिगोच्या प्रत्येकी २१ आणि विस्ताराच्या २0 फ्लाइटचा समावेश आहे.

अग्रलेख...

स्वसंरक्षणार्थ लढण्याचा इस्रायलचा अधिकार मान्यच!

गाझामध्ये सुरू असलेल्या संघर्षात आणखी एक मोठा विजय मिळवत इस्रायली सैन्याने हमास नेता याह्या सिनवारला अलिकडेच ठार केले. गेल्या वर्षभरात, विशेषतः ३० जुलैपासून हमास आणि हिजबुल्लाहच्या वरिष्ठ नेत्यांना मारणे ही शत्रूला कमकुवत करण्याच्या रणनीतीमध्ये एक सामान्य रणनीती बनली आहे. याआधी लेबनॉनमधील 'हिजबुल्लाह'वर झालेले हल्ले आणि त्याचा म्होरक्या हसन नसराल्लाहची हत्या हे या युद्धाचे महत्त्वाचे वळण होते. हमास आणि 'हिजबुल्लाह'च्या मोठ्या नेत्यांवर इस्रायल नेहमीच लक्ष ठेवतो आणि योग्य वेळी संपवतो. गेल्या वर्षी २५ डिसेंबर रोजी तीन महिन्यांच्या प्रदीर्घ युद्धानंतर, दमास्कस (सीरिया) येथे प्रमुख इराणी लष्करी कमांडर सय्यद रझी मौसावी मारला गेला. तो 'कुडस् फोर्स'चा जनरल होता आणि कासिम सुलेमानीनंतरचा सर्वात मोठा नेता मानला जात होता. २ जानेवारी रोजी 'हमास'चा वेस्ट बँकमधील लष्करी शाखेचा म्होरक्या सालेह अल-अरौरी बैरूत येथे इस्रायली हल्ल्यात मारला गेला. त्यानंतर ४ जानेवारीला 'हरकत अल-नुजाबा'चा डेप्युटी कमांडर मुश्ताक तालिब अल-सैदी इराकची राजधानी बगदादमध्ये अमेरिकन ड्रोन हल्ल्यात मारला गेला. त्यानंतर १ एप्रिल रोजी इराणचा वरिष्ठ कमांडर मोहम्मद रजा झहेदी दमास्कसमधील इराणी वाणिज्य दूतावासावर इस्रायलने केलेल्या हल्ल्यामध्ये ठार झाला. सर्वात मोठा हल्ला ३० जुलै रोजी झाला. इराणच्या नवीन राष्ट्राध्यक्षांच्या शपथविधीच्या दिवशी 'हमास'चा राजकीय म्होरक्या इस्माइल हनीये याची राहत्या घरी हत्या करण्यात आली. त्याच रात्री 'हिजबुल्लाह'चा एक वरिष्ठ लष्करी नेता फुआद शुकरही मारला गेला. यानंतर सप्टेंबरमध्ये 'हिजबुल्लाह'च्या अनेक मोठ्या नेत्यांचा खात्मा करण्यात आला. बड्या म्होरक्यांच्या हत्येमुळे संघटनेतील लोकांचे मनोधैर्य खचते, यात शंका नाही. 'हिजबुल्लाह'चे संपूर्ण नेतृत्व आणि संपर्क यंत्रणा नष्ट करणे हा एक मोठा धक्का होता. या संधीचा फायदा घेत इस्रायली सैन्याने लेबनॉनमध्ये जमिनीवर हल्ला केला; जेणेकरून लोक उत्तर इस्रायलमध्ये परत जाऊ शकतील. 'हिजबुल्लाह' पुन्हा उभी राहू नये म्हणून काळजी घेत संपूर्ण संघटना नेस्तनाबूत करण्याची व्यूहनीती इस्रायलने आखली; परंतु इस्रायली सैन्याला रोखण्यात दहशतवादी संघटनांना यश आले आणि इस्रायलचेही मोठे नुकसान झाले. मध्येच 'हिजबुल्लाह'च्या रॉकेट आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांची तीव्रता वाढल्याने इस्रायलच्या हैफा, किरियत शमोना, अकारी आणि तेल अवीवमध्ये नुकसान झाले आहे. गाझामध्ये प्रमुख म्होरक्यांची हत्या झाल्याने आता 'हमास'चा प्रतिकार थंड पडला आहे, हे बरे झाले. 'हमास'ला संपवण्याचे इस्रायलचे स्वप्न अजून दूर आहे. इस्रायल हमास आणि इराणशी युद्ध करीत आहे. इस्रायल एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लढतो आहे. गाझा, लेबनॉन आणि बैरुतमध्ये इस्रायली लष्कराचे हल्ले सुरू आहेत. या हल्ल्यांमध्ये 'हमास'च्या म्होरक्यांसह इराणमधील अनेक बड्या नेत्यांचा मृत्यू झाला आहे. छोटेसे राष्ट्र असूनही इस्रायल ज्याप्रकारे लढत आहेत, त्याला दाद द्यायलाच हवी. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी पुन्हा एकदा आपला इरादा स्पष्ट केला आहे. शत्रूंविरुद्ध सुरू असलेल्या युद्धात कोणत्याही परिस्थितीत मागे हटणार नाही आणि विजय मिळेपर्यंत ते सुरूच राहील, असा पवित्रा त्यांनी घेतला आहे. अर्थात, इस्रायलच्या पंतप्रधानांनी असे बोलण्याची ही पहिलीच वेळ नाही. इराण आणि त्याचे समर्थक संधीचा फायदा घेत इस्रायलविरुद्ध लढवय्ये तयार करत आहेत. युद्धातील नागरिकांच्या मृत्यूबाबत इस्रायलवर आधीच आंतरराष्ट्रीय दबाव आहे. या हत्यांमुळे अनेक देश आता याविरोधात उघडपणे बोलत असून इराणला पाठिंबा देत आहेत. हत्या, सूड, बदला यांनी कधीच विजय मिळत नसतो; उलट संघर्ष आणखी वाढत असतो. ओसामा बिन लादेनला मारून अमेरिकेला 'अल-कायदा' आणि तालिबान अफगाणिस्तानातून संपवता आले नाही. उलट, तिथून काढता पाय घ्यावा लागला. तिथे पुन्हा तालिबानी राजवट आली. परिस्थिती पूर्वीपेक्षा वाईट झाली. इराकमध्ये सद्दाम हुसेनच्या हत्येचाही हाच परिणाम होता. सद्दामला मारून अमेरिकेला इराकमध्ये शांतता आणि स्थिरता आणता आली नाही, हे वास्तव जगाने लक्षात घेतले पाहिजे. असे असले, तरी इस्रायल काही चुकीचे करत आहे, असे म्हणता येणार नाही. गेल्या दोन दशकांत इराक अधिकाधिक अस्थिर होत असून अमेरिका आणि इस्रायलची नाराजी असलेल्या इराणशी त्याची जवळीक वाढली आहे. कर्नल गडाफीच्या हत्येनंतर लिबियामध्ये शांतता निर्माण झाली नाही. लिबिया अजूनही अस्थिर असून या देशात कोणतेही स्थिर नेतृत्व नाही. पारंपरिक सैन्य असो की मिलिशिया आणि प्रॉक्सी गट; स्पष्ट आणि साध्य करण्यायोग्य उद्दिष्टे असतात, तेव्हाच युद्धे जिंकता येतात. हमासला संपवणे हे इस्रायलचे उद्दिष्ट आहे. पण, लोकांच्या दडपशाहीवर आधारित विचारसरणीतून जन्माला आलेल्या 'हिजबुल्लाह' आणि 'हमास'सारख्या संघटनांच्या ठायी अशा हत्यांमुळे अधिक संताप आणि द्वेष निर्माण होतो आणि लढण्याचा निश्चय बळकट होतो. या संघटना त्यांच्या अस्तित्वासाठी लढत आहेत. त्यांच्याकडे गमावण्यासारखे काही नाही. अशा हल्ल्यांमुळे त्यांच्या इराणसारख्या समर्थकांना संघर्ष आणखी वाढवता येतो. त्यामुळे संघर्ष सोडवणे अधिक कठीण होते. इस्रायलसाठी आता धीर धरणे अवघड आहे. कारण या हल्ल्यात थेट पंतप्रधान नेतान्याहू यांना लक्ष्य करण्यात आले आहे. नेतान्याहू यांच्यावरील हल्ला एखाद्या ठिणगीसारखा आहे. त्यामुळे युद्धाचा उद्रेक निश्चित मानला जात आहे. सिनवार आणि नसरल्लाह यांना ठार मारल्यानंतर इस्रायलला कळून चुकले आहे की, 'हिजबुल्लाह' आणि 'हमास'सारख्या संघटना इस्रायलवर हल्ला करून त्यांच्या प्रमुखांना संपवून टाकतील. त्यामुळे आता इराणवर थेट हल्ला केला जाईल; जेणेकरून इस्रायलला आपली सुरक्षा सुनिश्चित करता येईल. दुसऱ्या बाजूने पाहता नेतान्याहू यांच्या घरावर झालेला हल्ला हा इस्रायलसाठी धडा आहे. नसरल्लाह मारला गेला; पण 'हिजबुल्लाह'चे हल्ले थांबले नाहीत. 'हिजबुल्लाह'चे अनेक म्होरके मारले गेले; पण लेबनॉनमधून इस्रायलवर होणारे रॉकेट हल्ले थांबले नाहीत. सिनवार मारला गेल्यानंतर हल्ला थेट नेतान्याहूंच्या घरावर झाला. हा इस्रायलसाठी मोठा धडा आहे. 'प्रॉक्सी' संघटनांचे म्होरके ही फक्त प्यादी असतात. म्होरक्यांना मारल्याने 'प्रॉक्सी' संघटनांवर विशेष परिणाम होत नाही आणि सर्वात मोठा धडा हा आहे की, 'प्रॉक्सी' संघटनांचा रिमोट कंट्रोल एकट्या इराणकडे आहे. 'प्रॉक्सी' संघटनांचा सर्वात मोठा मास्टर असलेला इराण संपवला जाईल, तेव्हाच इस्रायल सुरक्षित राहू शकेल. इस्रायलसाठी हमास, हिजबुल्लाह, इस्लामिक प्रतिकार आणि हुथी यांसारख्या संघटना मोठे आव्हान आहेत. या संघटनांमध्ये अनेक ज्येष्ठ म्होरके आहेत. ते सर्व इराणी जनरलच्या आदेशांचे पालन करतात. त्यामुळे आता इस्रायलला इराणशी युद्ध करणे आवश्यक झाले आहे. हनीयेच्या अंताने 'हमास' संपली नाही. सिनवारच्या हत्येनेही संपणार नाही. नसरल्लाहच्या हत्येने 'हिजबुल्लाह' शांत होणार नाही आणि हुथीच्या बाबतीतही असेच होईल. इस्रायल सीरियावर बॉम्बफेक करत आहे; पण इस्रायलवरील हल्ल्याचा वेग थांबलेला नाही. कारण इराण हे होऊ देणार नाही. इराण कोणत्याही संस्थेला निधीची कमतरता भासू देणार नाही. वर्षभर हल्ले केल्यानंतरही 'हमास'चा नायनाट झालेला नाही. 'प्रॉक्सी' संघटना आत्मसमर्पण करणार नाहीत. लेबनॉन आणि सीरियामध्ये बॉम्ब, दारूगोळा आणि वेळेचा असाच अपव्यय सुरू राहणार, हे नेतान्याहूंना समजले आहे. यामुळेच आता इस्रायलचे पहिले लक्ष्य इराण आहे. अमेरिकाही या युद्धाच्या बाजूने आहे. हमास, हिजबुल्लाह किंवा आयआरजीसी नेत्याची हत्या हा नेतान्याहू यांचा राजकीय विजय मानला जाऊ शकतो. कुणी काहीही म्हणोत, इस्रायल स्वसंरक्षणार्थ लढतो आहे आणि त्याला त्याचा अधिकार आहे.

आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

अमेरिकेत सात राज्यांत अटीतटीची लढत

डोनाल्ड ट्रम्प हे रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षपदाचे उमेदवार आहेत. १५ जुलै २०२४ ला सुरू झालेल्या रिपब्लिकन पक्षाच्या अधिवेशनप्रसंगी ट्रम्प यांचे एकेकाळचे अतिप्रखर टीकाकार, कट्टर प्रतिस्पर्धी, त्यांना सतत पाण्यात पाहणारे, ओहिओ राज्याचे ३९ वर्षीय सिनेटर असलेले जे. डी. व्हॅन्स यांनी यू टर्न घेत ट्रम्प यांची प्रशंसा केली. त्यांनी पूर्वी ट्रम्प यांना हिटलरची उपमा दिली होती. रात्रीतून हृदयपरिवर्तन झालेल्या व्हॅन्स यांना ट्रम्प यांनीही आपले उपाध्यक्षपदाचे साथीदार उमेदवार म्हणून स्वीकारले आहे. २०२८ च्या निवडणुकीतील अध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून व्हॅन्स यांच्याकडे पाहिले जाते, एवढा मान त्यांना रिपब्लिकन पक्षात आहे. एक आक्रस्ताळी लढवय्या अध्यक्ष (डोनाल्ड ट्रम्प) तर साथीदार संयमी (जे. डी. व्हॅन्स) ही जोडी परस्परपूरकच मानायला हवी. कायदेतज्ज्ञ उषा चिलुकुरी या तेलगू भाषक विदुषी व्हॅन्स यांच्या पत्नी होत. उषा आपल्या पतीला कासवाची उपमा देतात. 'संकटाची थोडीशीही चाहूल लागताच कासव जसे आपले अंग चोरून कवचाखाली घेते, तसे 'ह्यांचे' वागणे असते', असे त्या विनोदाने म्हणत असतात. असो. व्हॅन्स यांनी परराष्ट्र व्यवहार, मंदी आणि अर्थकारण, शिवाय रोजगार क्षेत्राच्या समस्या यावर ट्रम्प यांची येती राजवट लक्ष केंद्रित करील, असे घोषित केले आहे. रिपब्लिकन पक्षाचे जेम्स व्हॅन्स हे उपाध्यक्षांच्या डिबेटमध्ये डेमोक्रॅट पक्षाचे प्रतिस्पर्धी उमेदवार टीम वाल्झ यांच्यापेक्षा सरस ठरल्याचे वृत्त आहे. 'एक्स'चे मालक ॲलन मस्क यांनी आपला पाठिंबा डोनाल्ड ट्रम्प यांना जाहीर केला आहे. डेमोक्रॅट पक्ष स्विंग स्टेटसमध्ये बेकायदेशीररीतीने स्थलांतरितांना आणून बसवीत असून आपली मतदार संख्या वाढवीत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

ज्यो बायडेन यांनी प्रकृतीच्या कारणास्तव निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे. उपाध्यक्षपदाच्या उमेदवार कमला हॅरिस यावेळची अध्यक्षपदाची निवडणूक लढविणार आहेत. मिनेसोटा प्रांताचे गव्हर्नर टीम वाल्झ हे डेमोक्रॅट पक्षाच्या अध्यक्षपदाच्या उमेदवार कमला हॅरिस यांचे उपाध्यक्षपदाचे जोडीदार असणार आहेत. ते २०१८ आणि २०२२ मध्ये मिनेसोटाचे गव्हर्नर म्हणून निवडून आले आहेत. त्यांनी कर सुधारणा, मोफत शालेय जेवण, पायाभूत सुविधांना चालना, युनिव्हर्सल गन बॅकग्राऊंड चेक, गर्भपात अधिकार 'कोडीफाय' करणे आणि कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी मोफत महाविद्यालयीन शिक्षण यासह विविध विषय हाताळले आहेत. कमला हॅरिस यांनी २०२४ च्या अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत वाल्झ यांची रनिंग मेट (जोडीदार) म्हणून घोषणा केली आहे.

कमला हॅरिस | डोनाल्ड ट्रम्प | जे. डी. व्हॅन्स

अमेरिकेच्या 'स्विंग स्टेट्स' (म्हणजे निकाल बदलवू शकणारी राज्ये) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सात राज्यांत अरब आणि पश्चिम आशियातून आलेले नागरिक मोठ्या प्रमाणावर नागरिक म्हणून स्थायिक झाले आहेत. इस्रायलची अरब आणि पश्चिम आशियायी लोकांबद्दलची वैर आणि द्वेष भावना यांना मुळीच आवडत नाही. इस्रायलला आवरण्याचे बाबतीत बायडेन यांनी काहीही केलेले नाही, ही या लोकांची भावना झालेली आहे. त्यामुळे येत्या निवडणुकीत अशा विचारांचे नागरिक डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांच्या विरोधात मतदान करण्याची भीती डेमोक्रॅट पक्षाला वाटते आहे. कमला हॅरिस यांनी त्यांना चुचकारण्याचा प्रयत्न सुरू केला आहे खरा; पण इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांच्याविरोधात चांगलीच कडक भूमिका घेतली आहे, हेही खरे. तरीही मुळात अरब आणि पॅलेस्टिनियनचे समर्थक असलेल्या या मतदारांचा रोष मावळेलच, असे सांगता येत नाही. तसेच अमेरिकेने आजवर कधीही अध्यक्षपदी महिलेची निवड केलेली नाही. मतदारांची पुरुषप्रधानता लक्षात ठेवून कमला हॅरिस यांनी आपल्या वागण्या-बोलण्यात यथोचित बदल केले आहेत. त्याचाही मतदारांवर किती परिणाम होतो ते पहावे लागेल.

निवडणुकीच्या निकालावर परिणाम करणारी सात राज्ये अशी आहेत.

१) नॉर्थ कॅरोलिनाच्या वाट्याला १६ इलेक्टर्स आहेत. बराक ओबामा यांचा २००८ या वर्षाचा अपवाद वगळला तर या राज्याने रिपब्लिकन पक्षालाच आजपर्यंत साथ दिली आहे.

२) ॲरिझोना - ग्रँड कॅनियियन असलेल्या या राज्यात ११ इलेक्टर्स स्थलांतरितांमुळे मूळ लोकसंख्येवर होणारा परिणाम हा यांच्यासाठी महत्त्वाचा मुद्दा आहे. हे स्थलांतरित डेमोक्रॅट पक्ष चाहते असतात. पण त्यामुळेच या राज्यातील मूळ रहिवाश्यांचा कल रिपब्लिकन पक्षाकडे असतो. अपवाद २०२०.

३) जॉर्जिया - १६ इलेक्टर्स. २०२० मध्ये डेमोक्रॅट पक्ष ४९.५ टक्के तर रिपब्लिकन पक्ष ४९.३ टक्के अशी अटीतटीची लढत झाली होती. स्पॅनिश नसलेले गोरे ५० टक्के, कृष्णवर्णी ३३ टक्के, स्पॅनिश १०.५ टक्के आणि काही एशियन अशी लोकसंख्येची फोड आहे. रिपब्लिकन पक्षाकडे कल असलेले हे राज्य आहे. अपवाद २०२०.

४) मिशिगन - १५ इलेक्टर्स. हे सरोवरे असलेले आणि अर्थकारणावर भर देणारे राज्य आहे. इथे कामगार वर्गाची मते महत्त्वाची ठरतात. डेमोक्रॅट पक्षाकडे कल असलेले राज्य आहे. अपवाद २०१६; पण २०२० मध्ये डेमोक्रॅट पक्षाकडे परत आले होते.

५) नेवाडा - फक्त ६ इलेक्टर्स. स्थलांतरितांच्या आगमनाच्या तुलनेत अर्थकारणावर अधिक भर देणारे राज्य, डेमोक्रॅट पक्षाकडे कल. २००४ चा अपवाद वगळता कायम डेमोक्रॅट पक्षाकडे कल असलेले हे राज्य.

६) पेन्सिलव्हॅनिया - १९ इलेक्टर्स. डेमोक्रॅट पक्षाकडे कल असलेले राज्य. २०१६ मध्ये हे राज्य रिपब्लिकन पक्षाकडे गेले होते खरे; पण तसे हे डेमोक्रॅट पक्षाकडे कल असलेले राज्य मानले जाते. २०१६ चा अपवाद वगळला तर डेमोक्रॅट पक्षाकडे कल.

७) व्हिस्कॉनसिन - १० इलेक्टर्स. या राज्यात २०१६ मध्ये रिपब्लिकन पक्षाने बाजी मारली होती. पण २०२० मध्ये डेमोक्रॅट पक्षाने हे राज्य पुन्हा आपल्याकडे वळविले होते. इतर राज्यांचे कल बरेचसे निश्चित असतात. सध्या कमला हॅरिस यांना मिशिगन, नेवाडा, पेन्सिल्व्हॅनिया या राज्यात थोडीशी बढत दिसते आहे तर व्हिसकॉन्सिन या राज्यात बऱ्यापैकी वाढ आहे.

जॉर्जिया व नॉर्थ कॅरोलिना या राज्यात डोनाल्ड ट्रम्प यांना किंचित बढत दिसते आहे तर ॲरिझोना या राज्यात बऱ्यापैकी बढत वाटते आहे. अमेरिकेतील अरब आणि मुस्लिम मतदार गाझा हल्लाप्रकरणी अमेरिकेने इस्रायलला दिलेल्या पाठिंब्यामुळे डेमोक्रॅट पक्षावर नाराज आहे. ते तिसरी ज्यू उमेदवार जिल स्टीन यांना मते देण्याच्या विचारात आहेत. यामुळे कमला हॅरिस यांचीच मते कमी होतील.

सात राज्यात याचा परिणाम जाणवेल, असा निरीक्षकांचा अंदाज आहे. जिल एलेन स्टीन एक अमेरिकन चिकित्सक आणि कार्यकर्ती आहे. ती अध्यक्षपदासाठी ग्रीन पार्टीची उमेदवार आहे. एक ज्यू महिला आणि इतिहास व राजकारण या विषयांचे प्राध्यापक कृष्णवर्णी रुडॉल्फ बुच-टी. बिलाल वेअर (तिसरे) अशी ही जोडी आहे. स्थलांतरित व्यक्ती पाळीव प्राणी मारून खातात, हे वाक्य डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा उच्चारले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर हल्ला करण्याचा तिसरा प्रयत्न उघडकीला येतो आहे. तरुण तुर्क हॅरिसकडे तर म्हातारे अर्क ट्रम्प यांच्या बाजूने या परिस्थितीत नक्की काय होईल, ते सांगणे कठीण आहे. म्हणून प्रतीक्षा आहे ५ नोव्हेंबर २०२४ ची!

९४२२८०४४३०

दखल

विजय पांढरीपांडे

पुनश्च नामुष्की

गोखले इन्स्टिट्यूट पुणेचे कुलगुरू रानडे यांना न्यायालयाच्या आदेशाने का होईना परत मूळ पदावर रुजू करून घेण्यात आले आहे. ही एक प्रकारची आधीचा निर्णय घेणाऱ्या प्रशासनाची नामुष्कीच म्हटली पाहिजे. आता कोण चूक, कोण बरोबर हे कालांतराने कायद्याचा कीस काढून ठरेल देखील. पण अशा घटना उच्च शिक्षण क्षेत्रात किती अनागोंदी, बेशिस्त आहे याचाच पुरावा देतात. काही महिन्यांपूर्वी नागपूर विद्यीठातील कुलगुरू विरोधात देखील असाच प्रकार घडला. तिथेही दोष कुणाचा हे तारीख पे तारीख पडल्यानंतर न्यायालयाने ठरवले असते. अशा घटना एकाच नव्हे सर्व राज्यात घडताना दिसतात. याचा अप्रत्यक्ष परिणाम विद्यापीठ प्रशासनावर होतो. त्या काळात दोन तट पडतात. निर्णय प्रक्रियेवर, चांगल्या योजना पुढे नेण्याच्या विविध प्राधिकरणाच्या प्रयत्नावर विपरीत परिणाम होतो. एरवी प्रत्येक बाबतीत पाश्चात्य देशाची कॉपी करण्यात तत्पर असलेले आपण उच्च शिक्षण क्षेत्रात परदेशी विद्यापीठातील सुशासन व्यवस्थेची कॉपी का करीत नाही. जागतिक क्रमवारीत हॉर्वर्ड, स्टॅनफोर्ड, केंब्रिज, सिंगापूरसारखी विद्यापीठे अव्वल आहेत. त्यामागे तेथील प्रेसिडेंट, कुलगुरू, वरिष्ठ प्राध्यापक यांच्या निवड प्रक्रियेतील पारदर्शी काटेकोर नियम पद्धत देखील आहे हे विसरता कामा नये.

याउलट आपल्याकडे खोक्याची देवघेव, जाती धर्माचे राजकारण, विविध राजकीय पक्षांचे दबावतंत्र अशा गोष्टी जास्त प्रभावी ठरत असल्याचे बातम्यांवरून दिसते. प्रत्यक्षात वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या प्रकरणांत नेमके काय घडते देव जाणे! शैक्षणिक क्षेत्रातील नेमणुका तरी राजकारणाने प्रेरित नसाव्या, संपूर्ण पारदर्शी असाव्या अशी अपेक्षा आहे. एक निवड चुकीची ठरली तर पाच वर्षे त्या विद्यापीठाला त्याचे परिणाम भोगावे लागतात. ही अनागोंदी, निष्क्रियता नंतर येणाऱ्या चांगल्या कुलगुरूला देखील छळत बसते!

रानडे यांना परत घेतले. पण केस संपलेली नाही. मुळात ज्यांनी ही निवड केली त्यांची तपासणी का होत नाही? निर्णय चुकीचा म्हटले तर तर निर्णय घेणारे जास्त दोषी ठरतात. त्यांनी बायोडेटा नीट तपासला नाही का? निर्णय घेण्यापूर्वी सर्वांगाने चौकशी केली नाही का? खरे तर अशा उच्च पदावर नेमणूक करण्याआधी केवळ बायोडेटा नव्हे तर चारित्र्य देखील तपासले पाहिजे. भूतकाळ तपासला पाहिजे. या पदावरील व्यक्तीची निर्णय क्षमता, इंटीग्रिटी, नैतिकता, पारदर्शिता, एम्पथी, नेतृत्व क्षमता, हे गुण जास्त महत्त्वाचे असतात. पण आपल्याकडील निर्णय प्रक्रियेत याकडे पार दुर्लक्ष केले जाते. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर शोध समितीने दिलेल्या अंतिम पाच नावांची तरी मुलाखतीला बोलावण्यापूर्वी राज्यपाल कार्यालयाकडून वर उल्लेखिलेल्या गुणांची छाननी व्हायला हवी. कारण राज्यपाल कार्यालय हे पक्ष, राजकारण यापासून दूर असते असे समजले जाते. (हा समज चुकीचा ठरवला जातो, असतो हा भाग वेगळा!). पण राज्यपाल कार्यालय हे काम नीट करत नाही असेच अनेक अंतिम निवडीवरून दिसते. शंकरनारायणन् यांच्यासारखे राज्यपाल अर्थातच नियमाला अपवाद!

सरकार कोणतेही असो, पक्ष नेते कोणीही असोत, उच्च शिक्षण या क्षेत्राकडे ज्या गांभीर्याने लक्ष द्यायला हवे त्या पद्धतीने लक्ष दिले जात नाही. कुलगुरू निवड, प्राध्यापकाच्या नेमणुका, सर्वांगीण वाढीसाठी, संशोधन, प्रयोगशाळासाठीचे अनुदान अशा सर्वच बाबींकडे पार दुर्लक्ष केले जाते. मतदारांना आकर्षित करावयाच्या अजेंडात शालेय, उच्च शिक्षण याला प्राधान्य असते!

त्यातही सर्वच विद्यापीठ प्राधिकरणासाठी होणाऱ्या निवडणुका, मतदान यामुळे विद्यापीठ परिसराला राजकीय आखाड्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे आपल्या राज्यात. कुलगुरूंची खरी दमछाक होते ती या निवडून आलेल्या किंवा राजकारणी नेत्याच्या शिफारशीमुळे, राजभवनातील शिफारशीमुळे नियुक्त झालेल्या सभासदांशी जुळवून घेताना. यांचे शैक्षणिक गुणवत्तेशी फारसे देणेघेणे नसते. योग्यातही फारशी नसते. फक्त राजकीय दबाव टाकून आपली पोळी भाजून घ्यायची, आपले महत्त्व प्रदर्शित करायचे एवढाच अजेंडा. काही कुलगुरू अशा वातावरणाला शरण जातात अन् चुकीचे निर्णय घेतात. एकाची बाजू घेतली की दुसरी बाजू डोके वर काढते. आरोप-प्रत्यारोप सुरू होतात. चौकशीचा ससेमिरा मागे लागतो. हे चौकशीचे गुऱ्हाळ थांबता थांबत नाही. कुलगुरूंची टर्म संपली तरी खरे खोटे याचा निकाल लागत नाही. फाईल केव्हा, कशी बंद होते कुणालाच कळत नाही! या अशा गढूळ वातावरणात सच्चा प्रामाणिक कोण, दोषी कोण हे ठरवणे सोपे नसते. कुणी दोषी आढळले तरी शिक्षा होत नाही. भ्रष्टाचार करताना रेड हॅण्डेड पकडली गेलेली मंडळी उजळ माथ्याने समाजात वावरताना आपण बघतो.

या पृष्ठभूमीवर एकूणच उच्च शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल गरजेचे आहेत. कुलगुरू निवड पद्धत राजकारणविरहित करणे, त्यात पूर्ण पारदर्शकता असणे, विद्यापीठ परिसर राजकारणविरहित असणे, तिथले वातावरण केवळ अध्ययन, अध्यापन, संशोधन यासाठीच प्रेरक असणे, विद्यार्थिहिताला सर्वोच्च प्राधान्य मिळणे, सर्वांनीच शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. एरवी जग पुढे जाईल, आपण आहे तिथेच राहू. हे भारतासारख्या देशाला परवडणारे नाही. त्यामुळे वेळीच जागे झालेले बरे!

७६५९०८४५५५

वेध

नीलेश अ. डाखोरे

सरकारी नियम अन् सरकारी सोय

सध्या महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. सर्वत्र राजकीय वातावरण पाहायला मिळत आहे. कोण कोणत्या पक्षातील आमदार तर कोण तिकिटासाठी वेळेवर पक्ष सोडणार अशा अनेक चर्चांना उधाण आले आहे. निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदान व्हावे यासाठी जनजागृतीही केली जात आहे. मतदानासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त १२ ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे जाहीर केले आहे. दुसरीकडे विचार केला तर कोणत्याही महत्त्वाच्या कामासाठी 'आधार कार्ड'चाच आग्रह धरला जातो. आधार्ड कार्डशिवाय अन्य कोणत्याही कागदाला पुरावा म्हणून मान्यता नसते किंवा अधिकारी त्याला महत्त्व देत नाही. यामुळेच सरकारी नियम अन् सरकारी सोय... असा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही. आपल्या देशात दर पाच वर्षांनी निवडणूक घेतली जाते. मग ती लोकसभेची असो, विधानसभा, नगरपालिका, नगर पंचायत, ग्राम पंचायत किंवा अन्य कोणतीही असो ती न चुकता पार पडते. यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्चही केला जातो. मतदारांना जागृत करण्यासाठी वेगवेगळे प्रयोग केले जातात. पथनाट्यापासून घरोघरी जाऊन नागरिकांना मतदान करणे व त्याचे महत्त्व पटवून देण्याचे काम सरकारच काय नेत्यांकडूनही केले जाते. इतकेच काय तर वृद्ध, दिव्यांग, बाहेरगावी राहणारे, सैनिक आदींनी कोणत्याही परिस्थितीत मतदान करावे यासाठी सोय केली जाते. वेळेवर उमेदवारांकडून केली जाणारी सोय वेगळी... यातून कोणताही पक्ष, कोणताही उमेदवार आपल्या विजयाचे गणित आखतो, हे मात्र खरे. इतकेच काय तर मतदानाच्या दिवशी शासकीय सुटी केंद्र व त्या त्या राज्याच्या निवडणुका पाहून जाहीर केली जाते. प्रत्येकाने मतदान करावे हा त्यामागील उद्देश असला तरी कोण या सुटीचा कसा वापर करतो हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदान व्हावे यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त १२ ओळखीचे पुरावे ग्राह्य धरणार असल्याचे म्हटले आहे. यामध्ये आधार कार्ड, मनरेगांतर्गत निर्गमित केलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित केलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्टकार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवहीअंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्टकार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तिवेतनाचे दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधान परिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाच्या वतीने दिव्यांगांना वितरित केलेले विशेष ओळखपत्र यांचा यात समावेश आहे. दुसऱ्या बाजूने विचार केला तर यातील किती पुरावे एखाद्या शासकीय योजनेचा लाभ घेताना गरिबांच्या कामी येतात? किंवा त्याला महत्त्व दिले जाते? साधे बँकेत खाते उघडायचे असेल तर आधार्ड कार्डशिवाय गोष्टच पुढे जात नाही. अन्य कोणत्याही कागदाला तिळमात्रही महत्त्व दिले जात नाही. शासकीय योजनेचा लाभ घेतानाही आधार कार्डचाच आग्रह धरला जातो. इतकेच काय तर आधार्ड आणि पॅन कार्ड लिंक करण्याचे आवाहन वेळोवेळी केले जाते. राज्य सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेताना अनेक लाभार्थींना हे लक्षात आले. एकंदरीत आधार कार्ड नाही तर कोणत्याही योजनेचा लाभ नाही अन् बँकेत खातेही नाही, असेच म्हणावे लागले. मग प्रश्न उद्भवतो निवडणुकीतच या नियमात का शिथिलता आणली जाते? आधार्ड कार्ड व्यतिरिक्त अन्य पुराव्यांना का मान्यता दिली जाते? ज्या आधार्ड कार्डशिवाय देशातील नागरिक साधा सिमकार्ड खरेदी करू शकत नाही, गरीब नागरिक शासकीय योजनेचा लाभ घेऊ शकत नाही. मग तीच व्यक्ती देशातील खासदार व आमदार निवडण्यासाठी इतका महत्त्वाचा कसा काय होऊ शकतो? तो मतदान करण्यासाठी आधार कार्डशिवाय कसा काय पात्र ठरू शकतो? याचे एकच कारण म्हणजे आपल्या राजकीय फायद्यासाठी देशातील प्रत्येक कोपऱ्यातील नागरिकाचा उपयोग करून घेणे हा आहे. देशातील नागरिकाने लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करणे गरजेचे असले तरी हाच यामागील एकमेव उद्देश नेत्यांचा नाही, हेही तितकेच खरे आहे. आपला लाभ बघणारे, आपला विचार करणारे, लाभ देताना असा विचार का करीत नाही? तेव्हाच का अमुक-अमुक कागदाची किंवा पुराव्याची मागणी केली जाते? देतानाच का हात राखून वाटप केले जाते? तेव्हा का नाही देशातील प्रत्येक नागरिकाचा विचार केला जात? याचाही विचार स्वतःला उच्च शिक्षित, उच्चभ्रू समजणाऱ्यांसह गरिबांनी करायला हवा.

९०२१०५५११५

प्रदूषणमुक्त दिवाळी

दिवाळीनिमित्त बाजारात पणत्या, आकाशकंदील, रंगीबेरंगी विद्युतमाळा दाखल झाल्या आहेत. सोबतच फटाक्यांची दुकानेही गजबजली आहेत. अनेकांना तर दिवाळी फटाक्यांशिवाय अपूर्ण वाटते. पण हे खरंच आहे का? फटाके नसतील तर दिवाळी साजरी होणारच नाही का? पूर्वी कुठे असायचे एवढे फटाके? पण तरीही दिवाळी साजरी व्हायचीच ना? उलटपक्षी ते सण सणासारखे वाटायचे. हल्ली पैसा भरपूर असतो. हौसेच्या नावाखाली तो उधळला जातो, पण तरीही पूर्वीसारखे चैतन्य आता जाणवत नाही. फटाक्यांचे म्हणाल तर याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आपल्याला माहितीच आहे. फटाक्यांमुळे निर्माण होणाऱ्या धुरामुळे डोळ्यांची आग होणे, डोळे चुरचुरणे, फटाक्यांमुळे बऱ्याच जणांना अंधत्व आल्याच्या घटना घडलेल्या आहेत. या काळात श्वसन विकार वाढलेले असतात. फटाक्यांच्या प्रचंड आवाजामुळे रक्तदाब वाढणे, बहिरेपणा येणे हे त्रास होतातच; पण लहान बालके आणि वयोवृद्धांनादेखील अतोनात त्रास सहन करावा लागतो. आजच्या घडीचा ज्वलंत मुद्दा असलेल्या प्रदूषणाला हे फटाके हातभार लावत असतात. जागतिक स्तरावर प्रदूषणाचा हा मुद्दा भारताने वारंवार उपस्थित केला आहे. आपल्या देशात फटाके फक्त दिवाळीतच फोडले जातात असे नाही. पण दिवाळीत फटाके फोडून आपणच आपल्या सणांची सात्त्विकता का नष्ट करायची? कारण फटाक्यांमुळे वातावरण केवळ प्रदूषितच होत नाही तर आध्यात्मिकदृष्ट्या ते तामसी बनत असते; फटाक्यांमुळे जीवित आणि वित्तहानी होत असते. दुसरी गोष्ट म्हणजे देश कर्जबाजारी असताना दहा मिनिटांच्या क्षणिक सुखासाठी पैशाची उधळण करणे मनाला पटत नाही. शारीरिक, आर्थिक, आध्यात्मिक आणि आरोग्याच्या स्तरावर फटाक्यांमुळे हानीच होत असेल तर फटाके न फोडलेलेच बरे! पहा पटतंय का? कारण आरोग्याशिवाय दुसरं काही महत्त्वपूर्ण आहे, असे मला तरी नाही वाटत. म्हटलेच आहे 'हेल्थ इज वेल्थ!' त्यामुळे सुंदर पणत्या, सुरेख रांगोळ्या, रंगीबेरंगी दीपमाळा आणि चविष्ट फराळ यांच्यासह दिवाळी साजरी करून बघा! तुम्हाला फटाक्यांची उणीवच भासणार नाही.

डॉ. स्वाती देशमुख/नागपूर

वाचक पत्रे

ज्योत से ज्योत जगाते चलो

दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव आहे. दिवाळीमध्ये दाही दिशा प्रकाशाने, झगमगटाने आणि लखलखाटाने उजळून जातात. प्रकाश अंधकार नष्ट करण्याचे कार्य करतो. दिवाळीमध्ये एका रांगेमध्ये अनेक पणत्या लावल्या जातात. या पणत्या मातीच्या असतात. परंतु सध्याच्या काळात या पणत्यांना बरेच पर्याय निघाल्यामुळे मेणाच्या पणत्या, प्लॅस्टिकचे दिवे, विद्युत दिव्यांच्या पणत्या याकडे लोकांचा कल आहे. भारतीय संस्कृतीप्रमाणे तिळाचं तेल व कापसाची वात घालून पणत्या लावतात. हे मेणाच्या पणत्या, प्लॅस्टिकचे दिवे, विद्युत दिवे यांच्यात सात्त्विकता नसते. त्यामुळे त्यातून निर्माण होणाऱ्या प्रकाशामध्ये चैतन्य नसते. चिनी बनावटीचे दिवे आरोग्यासाठी घातक असतात. मातीच्या पणत्या खरेदी करण्यामुळे त्या विक्रेत्यांना त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नामधून त्यांची दिवाळी साजरी करता येते, असा इतरांना सहाय्य करण्याचा भाव पण मनात हवा. आपल्या अंगणात आपण प्रचलित केलेल्या पणतीचा प्रकाश शेजाऱ्यांच्या अंगणात पडावा असा व्यापक दृष्टिकोन मनामध्ये ठेवून ज्योतीने ज्योत लावूया आणि सगळीकडेच प्रकाश पसरवूयात.

शंकर पवार/नागपूर

● ● ● ●

चिखलफेक निषेधार्हच!

न्यायव्यवस्था ही लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. न्यायदान करत असताना संबंधित प्रकरण कायद्याच्या कसोटीवर तपासले जाऊन निर्णय होतात. बरेचसे निर्णय सर्वोच्च न्यायालयापर्यंत जातात आणि तेथील निर्णय अंतिम असतो. राज्यस्तरीय न्यायालयातील किंवा उच्च न्यायालयातील काही निर्णय वादग्रस्तही दिसतात. तरीही आपल्या देशात सर्वोच्च न्यायालयाची विश्वासार्हता उच्च दर्जाची आहे. राज्यकर्त्यांनाही त्याची जाण आणि वचकही आहे. दाखल झालेल्या प्रकरणात निवाडा आपल्याला अनुकूल नसेल तर मात्र सर्वोच्च न्यायालय किंवा न्यायमूर्ती हित कसे पाहतात यावर समाजमाध्यमांद्वारे किंवा वृत्तपत्रातील संपादकीयांद्वारे ताशेरे ओढण्याची एक नवीन पद्धत सद्यकाळात वाढीस लागली आहे. नुकतेच सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यावर मुंबईतील एका वृत्तपत्रातील २२ ऑक्टोबरचा वैयक्तिक टीकाटिप्पणी करणारा अग्रलेख वाचण्यात आला. पक्षचिन्ह, आमदार अपात्रता प्रकरण प्रलंबित ठेवण्यावरून वृत्तपत्राने चंद्रचूड यांच्यावर रोष व्यक्त केल्याचे दिसते. आपल्या लोकशाहीत मुक्त विचार स्वातंत्र्य आहे, हे सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांत स्पष्ट करून सरकारचे कानही टोचले आहेत. प्रत्येकाचे व्यक्त होण्यासाठी असणारे लेखन स्वातंत्र्य सर्वोच्च न्यायालयामुळेच टिकून आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून सर्वोच्च न्यायालय किंवा न्यायमूर्तींवर समाजमाध्यमांद्वारे अथवा संपादकीयांद्वारे अनुचित टीकाटिप्पणी करणे निषेधार्हच आहे. सर्वसामान्यांच्या न्याय श्रद्धेला वृत्तपत्रांनी तरी तडा जाऊ देऊ नये, असे कळकळीने वाटते. या बाबतीत 'तरुण भारत' मात्र आपल्या लिखाणात सुसंस्कृत आणि समतोलपणाला महत्त्व देते, हे प्रकर्षाने जाणवते.

राम राजे/९४२१७७९९४५

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

महायुतीकडून प्रा. डॉ. तानाजीराव सावंत आज दाखल करणार उमेदवारी अर्ज

तभा वृत्तसेवा
परंडा, दि. २८ ऑक्टोबर-

भूम-परांडा-वाशी विधानसभा मतदारसंघाचे महायुती तथा शिवसेनेचे अधिकृत उमेदवार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत हे मंगळवारी, दि. २९ ऑक्टोबर २०२४ रोजी तहसील कार्यालय भूम येथे आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. सकाळी ११ वाजता परांडा रोडवरून शासकीय दूध डेअरी, ओंकार चौक, गोलाई ते लक्ष्मी रोडमर्गे पदयात्रा निघणार असून, उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर नगरपरिषद भूमसमोर जाहीर सभा होणार आहे.

या जाहीरसभेला प्रा. डॉ. तानाजीराव सावंत हे संबोधित करणार असून, याप्रसंगी शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), रिपाइं (आठवले) आदी महायुतीतील सर्व घटक पक्षांचे सर्व पदाधिकारी, नेते व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. यानिमित्ताने जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात येणार असून, या पदयात्रा व जाहीर सभेसाठीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. या पदयात्रा व जाहीर सभेला सर्व नागरिकांनी उत्स्फुर्तपणे यावे, असे जाहीर आवाहन करण्यात आलेले आहे.

तरी याप्रसंगी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), जनसुराज्य शक्ती पक्ष, पीपल्स रिपब्लिकन पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, रयत क्रांती संघटना यासह महायुतीमधील सर्वच पक्षांचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महायुतीच्यावतीने करण्यात आले आहे.

भाजपाच्या तिसऱ्या यादीत तीन आमदारांचा पत्ता कट

फडणवीस यांच्या पीएसह २० जणांना उमेदवारी जाहीर

तभा वृत्तसेवा /विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि .२८ ऑक्टोबर:

राज्यातील सर्वात मोठा पक्ष असलेल्या सत्ताधारी भाजपाने विधानसभा निवडणुकीसाठी २५ उमेदवारांची तिसरी यादी जारी केली असून त्यामध्ये तीन विद्यमान आमदारांचा पत्ता कट केला आहे. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक सुमित वानखेडे, सुरेश धस यांच्यासह आशिष देशमुख आदींचा या यादीत समावेश आहे . बोरिवली मतदारसंघातून इच्छुक असलेले माजी खासदार गोपाळशेट्टी यांना उमेदवारी नाकारल्याने त्यांच्या समर्थकांनी निवासस्थानी समोर जमून घोषणाबाजी केली नाराज शेट्टी कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

भाजपाने आतापर्यंत तीन यादीतून एकूण १४६ उमेदवार जाहीर केले आहेत.

आज जाहीर केलेल्या २५ जणाच्या यादीमध्ये आर्वीतील फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक वानखेडेयांना तिकीट देताना

विद्यमान आमदार दादाराव केचे यांना घरी बसविण्यात आले. तर आर्णी विधानसभा मतदारसंघातून संदीप दुर्वे यांच्या ऐवजी राजू तोडसाम यांना तर नागर मध्य मधून विकास कुंभारे यांच्या ऐवजी प्रवीण दटके यांना संधी दिली आहे .तर आष्टी मधून सुरेश धस यांना उमेदवारी दिली आहे.

तर लातूर शहर विधानसभा मतदारसंघात अमित देशमुख यांच्या विरोधात माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील -चाकूरकर यांच्या सून अर्चना चाकूरकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी काँग्रेस मधून भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

भाजपाने पहिल्या यादीत ९९ आणि दुसऱ्या यादी २२ उमेदवारांची घोषणा केली होती. आता आणखी २५ उमेदवारांची घोषणा केल्याने त्यांच्या उमेदवारांची संख्या १४६ झाली आहे.

बोरिवली मतदार संघ धर्मशाळा नाही: गोपाळ शेट्टी

बोरिवलीतून माजी खासदार गोपाळ शेट्टी विधानसभा लढवण्यासाठी इच्छुक होते मात्र पक्षाने त्यांना डावलून संजय उपाध्याय यांना तिकीट दिले आहे त्यामुळे नाराज झालेल्या शेट्टी यांनी बोरिवली म्हणजे काही धर्मशाळा नाही कोणी येऊन निवडणूक लढवावी अशी उद्विग्न प्रतिक्रिया दिली आहे उमेदवारी यादी जाहीर झाल्यानंतर संतप झालेल्या त्यांच्या समर्थकांनी त्यांच्यासमोर त्यांच्या निवासस्थानासमोर बसून घोषणाबाजी केली, त्यामुळे गोपाळ शेट्टी आता बंडखोरी करतात का? हे उद्या स्पष्ट होणार आहे

भाजपा उमेदवारांची तिसरी यादी

आर्वी - सुमित वानखेडे, माळशिरस - राम सातपुते, आष्टी - सुरेश धस, सावनेर - आशिष देशमुख, लातूर शहर - अर्चना चाकूरकर, वर्सोवा - भारती लव्हेकर, बोरीवली - संजय उपाध्याय, देगलूर - जितेश अंतापूरकर, मुर्तीजापूर - हरिश पिंपळे, कारंजा - सई प्रकाश डहाके, तेओसा - राजेश वानखेडे, मोर्शी - उमेश यावलकर, नागपूर मध्य - प्रवीण दटके, नागपूर पश्चिम - सुधाकर कोहळे, नागपूर उत्तर - डॉ. मिलिंद माने, साकोली - डॉ. आशिष ब्राह्मणकर, कटोळ -चरणसिंग ठाकूर, चंद्रपूर - किशोर जोरगेवार, अर्णी - राजू तोडसाम, उमरखेड - किशन वानखेडे, डहाणू - विनोद मेढा, वसई - स्नेहा दुबे, घाटकोपर पूर्व - पराग शाह, कराड उत्तर - मनोज घोरपडे, पलूस कडेगाव - संग्राम देशमुख

डॉ. गुरुस्वामी कलकेरी महाराजांची श्री धानम्मादेवी पुराण कथा १ नोव्हेंबरपासून

संभाजीनगरच्या न्यायाधीश सुप्रिया बिराजदार यांच्या हस्ते उद्घाटन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

हिरेमठ परिवारातर्फे दहा दिवस डॉ.गुरुस्वामी कलकेरी महाराजांची श्री धानम्मादेवी पुराण कथा १ ते १० नोव्हेंबर या दरम्यान सायंकाळी ७ ते ९ श्री गुड्डापूर धानम्मादेवी पुराण- कथा कन्नड भाषेत आयोजित केली आहे.

याच्या उदघाटनास न्यायाधीश सुप्रिया बिराजदार येणार असून अक्कलकोट रोड, सूत मिल कंपाउंडमधील हेरिटेज मनिधारी एमपायर सोसायटीत दानशूर उद्योजक व शेतकरी विश्वनाथजी हिरेमठ-स्वामी यांनी सत्यम-शिवम-सुंदरम हे तीन बंगले स्वतंत्र बांधले आहेत. त्याची वास्तुशांतीनिमित्त ते येणार आहे. त्याचे उदघाटन दि.१ रोजी संभाजीनगरचे न्यायाधीश सुप्रिया बिराजदार यांच्या हस्ते होणार आहे. न्यायाधीश सुप्रिया या मीनाक्षीताई व काशिनाथजी बिराजदार यांच्या कन्या आहेत.

या कार्यक्रमात दररोजची प्रस्तावना प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार करणार आहेत. गदग येथील डॉ.राजगुरु गुरुस्वामी कलकेरी महाराज यांच्या रसाळवाणीत ही कथा ऐकण्याचा लाभ सर्वांना मिळणार आहे.

या संगीतमय कथेस गायक बेंगलोर येथील नागलींगय्या वस्त्रदमठ यांचे सुमधूर गायन होणार आहे. श्री.बसवराज होनिगनूर हे तबल्यावर साथ देणार आहेत. या पुराण-कथेस सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विश्वनाथजी हिरेमठ परिवाराने केले आहे.

भाजपाकडून छोट्या मित्र पक्षांना चार जागा

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि.२८ ऑक्टोंबर:

सत्ताधारी महायुतीतील सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपाने आपल्या वाटातील चार जागा युतीतील चार पक्षांना सोडले पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाकडून आज यादी जाहीर करून त्याची घोषणा केली. महादेव जानकर यांची रासप ,रिपाई आठवले गट जनसुराज्य शक्ती व युवा स्वाभिमानी पार्टी यांना प्रत्येकी एक जागा सोडण्यात आली आहे.

भाजपाने तीन यादीतून एकूण १४६ उमेदवार घोषित केले आहेत तर त्यांचे मित्र पक्ष असलेल्या केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या रिपाई गटाला कलीना येथून तर वडनेरा येथे रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानी पक्षाला तसेच गंगाखेड मतदार संघ रासपला आणि शाहुवाडी मतदारसंघ विनय कोरे यांच्या जनसुराज्य शक्ती पक्षासाठी जागा सोडली आहे. भाजपाचे १४६ व चार मित्र पक्ष असे एकुण १५० जागी महायुतीमध्ये भाजपाचे उमेदवार रिंगणात आहेत . तर उर्वरित जागी एकनाथ शिंदे यांची शिवसेना व अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार असणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेच पुन्हा मुख्यमंत्री होणे गरजेचे : शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२८ ऑक्टोंबर -

आमदार होण्यापेक्षा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेच पुन्हा मुख्यमंत्री होणे गरजेचे आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी संयम ठेवावा असे आवाहन शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केले. आम्ही महाविकास आघाडीचा धर्म पळतोय त्यामुळे महाविकास आघाडीतील ईतर मित्र पक्षांनी देखील आघाडीचा धर्म पळावा अन्यथा त्याचे परिणाम सर्वांना भोगावे लागतील असा इशारा त्यांनी दिला.

दक्षिण सोलापूर मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने अमर पाटील यांना अधिकृत उमेदवारी दिली असता काँग्रेसने उशिराने दिलीप माने यांची उमेदवारी जाहीर करून घोळ घातला आहे. त्यावेळी संतप्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड यांना शहर मध्य मधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उमेदवारी द्यावी अशी जोरदार मागणी केली. अनेकांनी आपल्या भावनाही व्यक्त केल्या, आपण किती वर्षे तपश्चर्या करायची असा सवालही केला.

यावेळी अ‍ॅड .सुरेश गायकवाड, प्रा. कृष्णात देवकर, कर्णिक नगर गृहनिर्माण संस्थेचे सचिव छत्रपती केने, उपशहर प्रमुख शिवाजी कोळी, जयंत कदम सुनील भोसले ,गजेंद्र माशाळ,संजय अलकुंटे, महिला उपजिल्हा संघटिका ज्योती माळावतकर उपशहर संघटिका दिपाली पवार, रमा सरोदे, मीना लेंडवे , संतोषी भोळे,संजय अलकुंठे, उमेश कलशेट्टी, महावीर परदेशी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनसेचा शिवसेना शिंदे गटाला दहा जागांचा प्रस्ताव!

...तर राज घेणार महायुतीसाठी प्रचार सभा

तभा वृत्तसेवा । जमीर काझी
मुंबई दि.२८ ऑक्टोबर-

विधानसभा निवडणुकीसाठीची रणधुमाळी रंगात येत असतानाच मनसेने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला समोर एक नवा प्रस्ताव ठेवल्याची खात्रीशीर माहिती आहे. मुंबई महानगरातील दहा जागावर शिंदे गटाने उमेदवार मागे घेतल्यास मनसे राज्यातील उर्वरित मतदारसंघातील उमेदवारी मागे घेणार आहे तसेच लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही मनसे प्रमुख राज ठाकरे हे शिंदे गटांच्या उमेदवारासाठी काही प्रचार सभा घेतील ,असा प्रस्ताव शिंदे यांच्याकडे मनसेकडून पाठवण्यात आला असल्याचे समजते त्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येत असल्याचेही शिंदे गटाकडून सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुती व विरोधी महाविकास आघाडी यांच्या सोमवेतच तिसरी आघाडी व मनसे हे रिंगणात उतरले आहेत मुख्य सामना प्रामुख्याने महायुती व महाविकास आघाडी यांच्यातच होणार आहे मात्र अन्य उमेदवारांना मिळणाऱ्या मतांचा फटका हा युती व आघाडीच्या उमेदवारांना बसण्याची शक्यता आहे. मनसेने लोकसभेवेळी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. मात्र आता विधानसभेसाठी राज ठाकरे यांनी स्वबळाचा नारा दिला आहे. व आतापर्यंत ११२ विधानसभा मतदारसंघात उमेदवार जाहीर केलेआहेत.त्यामुळेच मनसेमुळे मराठी मते फुटू नयेत, यासाठी माहीम येथे ठाकरे यांचे राजांचे पुत्र अमित ठाकरे यांच्या विरुद्ध माहितीचा उमेदवार मागे घेण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे प्रयत्नशील आहेत त्यासाठी विद्यमान आमदार सदा सर्वांकर यांची समजूत काढली जात आहे मात्र हाच फॉर्मुला गृहीत धरून मनसेने आणखी नऊ जागी आपल्या उमेदवारांना पाठिंबा द्यावा असा प्रस्ताव बनविलेला आहे जेणेकरून मनसेच्या उमेदवाराची महाविकास आघाडीच्या उमेदवाराबरोबर समोरासमोर लढत होईल व अन्य उर्वरित मतदारसंघात ही मनसे महायुतीच्या उमेदवारांना समर्थन करील असा प्रस्ताव मनसेकडून शिंदे गटाकडे देण्यात आला आहे त्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येत असल्याचेही शिंदे गटातील सूत्रांकडून सांगण्यात आले अर्ज माघार घेण्यासाठी चार नोव्हेंबरपर्यंत मुदत असून मंगळवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. त्यानंतर दिवाळी झाल्यानंतर याबाबत चर्चा करून तोडगा काढण्याचीही त्यांनी तयारी दर्शवली असल्याचे सांगण्यात आले.

मनसेकडून या जागांचा प्रस्ताव

शिंदे यांच्या शिवसेनेकडे मनसेने मुंबईतील वरळी, शिवडी, माहिम, अंधेरी, जोगेश्वरी आणि ठाणे जिल्ह्यातील दिंडोशी या ६ जागांसाठी तसेच भांडूप, विक्रोळी, कल्याण व कल्याण ग्रामीण या जागांसाठीही प्रस्ताव देण्यात आला असल्याची माहिती आहे.

मध्य रेल्वे
मुंबई विभाग
शुद्धिपत्रक क्र. १ ते ८
निविदा क्रमांक
CR-SUR-SNT-P-KVCH-2024

निविदा क्रमांक CR-SUR-SNT-P-KVCH-2024 साठी शुद्धीपत्र क्रमांक १ ते ८ जारी केला आहे आणि तपशील www.ireps.gov.in या वेबसाइटवर पाहता येईल. ही निविदा सार्वजनिक खरेदी धोरण (मेक इन इंडिया) ऑर्डर 2017, दिनांक 15/06/2017 चे पालन करते. बाकी सर्व अटी व शर्ती तशाच राहतील. इतर सर्व तपशील www.ireps.gov.in या वेबसाइटवर पाहता येतील.

DRM(ST) CSTM

SUN 501

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

CHANGE IN NAME

I HAVE DECLAIRED THAT MY OLD NAME IS **Janabai Suresh Gadhave** HAS BEEN CHANGED TO ***Seema Suresh Gadhave***
Resi. - At.Post. Chikharde
Tal. Barshi, Dist. Solapur

KINDLY NOTE THE SAME.

AFFIDAVIT NO. 162

बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

आज़ादी का अमृत महोत्सव

आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

नियम - 8 (1)
ताबा सूचना

तर,

अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, २००२ आणि कलमाच्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह १३ वाचले गेले, ३०/०१/२०२४ रोजी डिमांड नोटिस जारी केल्या आणि खालील गोष्टींना आवाहन केले.

नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे. कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे २५.१०.२०२४ रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम १३ च्या उप कलम (४) अंतर्गत. विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये.

वर नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे. सुरक्षित मालमत्ता

अ.क्र.	शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील	मागणीची तारीख नोटीस आणि एकूण देय
1	शाखा- जुळे सोलापूर कर्जदार - १.श्री. पांडुरंग पुंडलिक वसेकर पत्ता: फ्लॅट क्र. ०४, शुभम कॅम्पलेक्स ४३ विष्णुपुरी जुळे सोलापूर ४१३००४ २.कै.पूजा पांडुरंग वसेकर कायदेशीर वारस, श्री. पांडुरंग पुंडलिक वसेकर पत्ता: फ्लॅट क्र. ०४, शुभम कॅम्पलेक्स , ४३ विष्णुपुरी जुळे सोलापूर ४१३००४	चे वर्णन मालमत्ता गहाण फ्लॅट क्रमांक ९७, नववा मजला वैष्णवी हाइट्स नवीन सर्व्हे क्र 31/3B/1B, 31/3B/2 बळे, पुणे रोड सोलापूर ४१३००१ यांच्या मालकीचे: श्री.पांडुरंग पुंडलिक वसेकर याप्रमाणे बांधलेले:-पूर्व: खुली जागा पश्चिम: फ्लॅट क्र. ९८ दक्षिण: ओपन स्पेस आणि एस ३३ उत्तर: पॅसेज	मागणी सूचना: दि.३०/०१/२०२४ रू. ४१,०३,८७७.००/- अधिक ऐकेचाळीस लाख, तीन हजार आठशे सत्याहत्तर फक्त लागू न केलेले व्याज ३०.०१.२०२४ पासून च्या प्राप्तीपर्यंत कर्ज भौतिक ताबा तारीख: २५.१०.२०२४

ठिकाण - सोलापूर
दिनांक - 25/10/2024

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.

जाहिर समन्स

मा.
उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा),
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप असोसिएशन लि., सोलापूर
११३ (अ) सिध्देश्वर पेठ बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखाशेजारी सोलापूर ०१

शंकरराव मोहिते-पाटील सहकारी बँक लि. अकलुज ... अर्जदार
सहकार मंदिर महावीर पथ अकलुज
विरुध्द
(खालिल तपशिलवार नमूद केलेले थकबाकीदार सभासद) .... जाब देणार

अ. क्र.	केस नंबर	दावा रक्कम	जाब देणार नं	जाब देणार यांचे नांव व पत्ता
१	४२१/२०२४-२५	६७,१७६.००	३	सिद्धेश्वर पंचाक्षरी स्वामी रा अकलूज ता. माळशिरस जि सोलापूर
२	४२२/२०२४-२५	८४,०७४.००	१	शमाबी अब्दुल देशमुख रा विजयवाडी ता. माळशिरस जि सोलापूर
३	२७४/२०२४-२५	६,९१,८८१.००	१	हॉटेल महाराष्ट्र प्रो. प्रा. जाकीर महंमद काझी रा अकलूज ता, माळशिरस जि सोलापूर
४	२७५/२०२४-२५	८६.६८६.००	३	सिद्धेश्वर पंचाक्षरी स्वामी रा अकलूज ता, माळशिरस जि सोलापूर
५	२७६/२०२४-२५	१.२६.३५२.००	३	विक्रम सुरेंद्र पुंज रा अकलूज ता, माळशिरस जि सोलापूर

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहिर समन्स देत आहोत.

उपनिर्दीष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वार मंगळवार दि १२.११.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

या नोटीसीव्दारे जाब देणार यांना असेही कळवण्यात येते की वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २८/१०/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्देसह हे जाहिर समन्स दिले आहे.

शिक्का

सही/-
उपनिबंधक,
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स्
को-ऑप असोसिएशन लि., सोलापूर

मा. अ‍ॅड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापुर यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, श्री. भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को. ऑप. सोसायटी लि. बार्शी, के. टी. ट्रॅक्टर्स शोरूम, (कुबाटा), दुसरा मजला, लातुर रोड, बार्शी ता बार्शी जि. सोलापुर
(मल्टीस्टेट को. ऑप, सोसायटीज अ‍ॅक्ट २००२ आणि अब्रिटेशन अ‍ॅन्ड कन्सिलेशन अ‍ॅक्ट अन्वये)

जाहीर नोटीस / समन्स दि. ०७/१०/२०२४

अर्जदार : श्री भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर

विरूद्ध - गैरअर्जदार

१. लवाद अर्ज क. ६५/२०२४ १) धनाजी अंकुश घावटे २) नामदेव वसंत घावटे रा. चिंचोली ता. बार्शी जि. सोलापुर ३) नंदलाल अप्पाराव शिंदे पांढरी ता. बार्शी जि. सोलापुर
२. लवाद अर्ज क. ६६/२०२४ १) कुंदन रामदास कांबळे २) शामल कुंदन कांबळे ३) सिद्धार्थ कुंदन कांबळे (४) सुबोध तात्या ओव्हाळ ५) भाऊसाहेब रावसाहेब कांबळे सर्व रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव
३. लवाद.अर्ज क. ६९/२०२४ १) अभिजीत अभिमन्यु लोमटे २) समाधान बबन मते ३) रितेशकुमार विलास लोमटे रा. मलकापुर ता. कळंब
४. लवाद अर्ज क. ७०/२०२४ १) सुप्रिया विष्णु काशिद २) विष्णु अनंत काशिद ३) प्रकाश गंगाधर बोभले ४) जयवंत माणिक साखरे रा. सर्व. चारे ता. बार्शी जि. सोलापुर
५. लवाद अर्ज क. ७३/२०२४ १) राहुल अंकुश जाधवर २) उमराव जालिंदर जाधवर रा. रत्नापुर ता. कळंब जि. धाराशिव ३) कृष्णकुमार विक्रम घोळवे रा. पिंपळगव्हाण ता. केज जि. बीड
६. ल. अर्ज क. ७९/२०२४ १) आदित्य धन्यकुमार लोमटे २) रितेशकुमार विलास लोमटे ३) अजित अभिमन्यु लोमटे रा. मलकापुर ता. कळंब
७. ल. अर्ज क. ९८/२०२४ १) अशोक भगवान गुरव २) चेतन अशोक गुरव ३) योगेश हरि बेद्रे ४) महेश विलास कांबळे रा. येरमाळा ता. कळंब
८. लवाद अर्ज क. ९९/२०२४ १) विशाल भारत पौळ २) भारत निवृती पौळ ३) महादेव अंकुश वाघ ४) नानासाहेब रोहिदास चांदणे सर्व रा. धोत्रे ता. बार्शी जि. सोलापुर
९. ल. अर्ज क. ११०/२०२४ १) संतोष रणजीत बारकुल २) आबासाहेब एकनाथ बारकुल ३) ज्ञानेश्वर दत्तात्रय बारकुल रा. येरमाळा ता. कळंब
१०. लवाद अर्ज क. १११/२०२४ १) नरहरी सुरेश बारकुल २) सुरेश साहेबराव बारकुल ३) विशाल विश्वनाथ बारसकर ४) कृष्णाथ सोमनाथ बारकुल सर्व रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव
११. लवाद अर्ज क. ११४/२०२४ १) विशाल विश्वास कसबे २) विश्वास संभाजी कसबे ३) प्रितेश पंडित बारकुल ४) चंद्रशेखर सुदाम चाळक सर्व रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव
१२. ल. अर्ज क. ११५/२०२४ १) काकासाहेब रावसाहेब कांबळे २) अमर दत्तात्रय कुदळे ३) संतोष मच्छिंद्र आगलावे रा. येरमाळा ता. कळंब
१३. ल. अर्ज क. ११८/२०२४ १) परशुराम अशोक बेदरे २) विकास शंकर बेदरे ३) आमर दत्तात्रय कुदळे रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. १ हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

सदर नोटीसव्दारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूध्द वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेवन गैरहजर राहिलात काहींनी नोटीस घेण्यास नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहींच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशीकामे आपण दि. ०७/११/२०२४ रोजी सकाळी ११ वा. तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, त्या बाबतीत तुमचे काहींही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूध्द लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम / आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे.

सही/-
अ‍ॅड. अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बार्शी

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णनः- डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर महानगरपालिका सोलापूर शहर हद्दवाढ मधील ता. उत्तर सोलापूर पैकी कसबे सोलापूर हद्दीतील जुना सर्व्हे नंबर १८८/१ यांसी नवीन सर्व्हे नंबर १७९/१ यापैकी नियोजित आशा नगर या नावाने ओळखले जाणारे प्लॉट नंबर ६१३ या प्लॉटचे हद्द पूर्वपश्चिम २० फुट व दक्षिणोत्तर ३० फुट असे एकूण क्षेत्रफळ ६०० चौ. फुट अथवा ५५.७६ चौ. मीटर इतके जागा-यांसी चतुः सिमाः पूर्वेस :- प्लॉट नं.६१२, पश्चिमेस :- प्लॉट नं.६२०, दक्षिणेस प्लॉट नं.६१४ व ६१९, उत्तरेसः रस्ता.

येणेप्रमाणे चतुः सिमेतील घरजागा आतील बांधकाम व इतर तद्नभूत वस्तूसह इजमेंटच्या सर्व हक्कासह व वहिवाटीच्या सर्व हक्कासहची मिळकत १) भौरम्मा बसवराज तट्टी, २) मंगला सोमनाथ जवळकोटे, ३) शरणप्पा बसवराज तट्टे, ४) दिपिका सोमनाथ झुंजा, ५) लक्ष्मण बसवराज तटी, ६) कादंबरी बसवराज तट्टी सर्व रा. सोलापूर यांच्या मालकीची असून सदर मिळकत ही त्यांनी आमचे अशिलांना कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून रितसर इसारा पावती लिहून देऊन आमचे अशिलांकडून इसारा रक्कम स्विकारलेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व विश्वास त्यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. वर नमूद प्लॉट जागेची नोंदणीकृत खरेदीखत ही सध्या बंद असल्याने ज्यावेळेस नोंदणीकृत खरेदीखत चालू होईल त्यावेळी खरेदी देणार यांनी वर नमुद मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत आमचे अशिलांच्या नावे अथवा ते सांगेल त्या व्यक्तीचे नावे विनामोबदला, विनातक्रार, विनाहरकत करुन देण्याची हमी व खात्री इसारा पावतीच्या दस्ताने दिलेली आहे.

तरी, वर नमूद मिळकतीवर इतर कोणाचाही अग्रहक्क, मालकी, साठेखत, लीज, जप्ती, टांच, गहाण, कर्ज, दान, खरेदीखत, बक्षिस, पोटगी, बोजा, कब्जा व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत आमच्या अशिलांवर अथवा वर नमूद घरजागेवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये, म्हणूत ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे. ता.२८/१०/२०२४.

सही/-
अशिल
गुरनाथ नागेंद्रप्पा बंडे

सही/-
नाईकवाडी ए.डी. अ‍ॅडव्होकेट
१८८६/४, विणकर वसाहत मु.पो. मैंदर्गी
ता. अक्कलकोट जि. सोलापूर.
मो.नं. ९८८१५२२९०७/८४२१०९८१७७.
अशिला तर्फे अ‍ॅडव्होकेट

जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व मैंदर्गी येथील सर्व रहिवासीयांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णनः- जिल्हा व जिल्हा परिषद सोलापूर सब जिल्हा परिषद अक्कलकोट पैकी मैंदर्गी तालुका अक्कलकोट येथील म्युन्सिपल हद्दीतील घरजागा त्यांसी जुना वार्ड नंबर- ४, यांसी नवीन वार्ड नंबर-३ यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर १८४२ त्यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर २६७ यांसी हद्द पूर्वपश्चिम ४३ फुट दक्षिणोत्तर ३३ फुट असे एकूण क्षेत्रफळ १३२.०० चौ.मी. असून यात आर.सी.सी. बांधकामाची एक खोली व पत्र्याचे दोन खोल्या व उर्वरीत खुली जागा यात उत्तरेकडील भिंत सामाईक आहे. यांसी चतुसिमाः पूर्वेसः बोळ, पश्चिमेसः-

रस्ता, दक्षिणेसः मल्लिनाथ हुलमनी यांची घरजागा, उत्तरेसः शरणप्पा हुंचळगी यांची घरजागा. सदर प्रमाणे वर वर्णन केलेली घरजागा ही १) रेवणसिध्द गोविंदप्पा शहापुरे इतर-३ यांचे कब्जेवहिवाटीची होती त्यांनी दिनांक २८/१०/२०२४ रोजी कब्जा पावती करारपत्राने तसेच संमतीपत्र व प्रतिज्ञापत्राद्वारे मे. पब्लिक नोटरी सो, यांचे समोर दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरी घरजागा ही आमचे अशिल १) शरणप्पा बसवराज तट्टे, व २) लक्ष्मण बसवराज तटी यांच्या कब्जेवहिवाटीची झालेली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल हे सदर घरजागेवर नगर परिषद मैंदर्गी यांचे कडे कर आकारणीला नाव लावण्यासाठी अर्ज दिलेले आहे. तसेच आमचे अशिल वर नमुद मिळकतीच्या सिटी सर्व्हे उताऱ्यावर लिहून देणार यांचे नावाची नोंद दुरुस्त झाल्यानंतर नोंदणीकृत खरेदीखत आमचे अशिलांच्या हक्कात लिहून देण्याचे ठरलेले आहे. तरी या नोटीसीद्वारे कळविण्यता येते की, जुना वार्ड नंबर-४, यांसी नवीन वार्ड नंबर-३

यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर १८४२ त्यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर २६७ या जागेवर आमच्या अशिल १) शरणप्पा बसवराज तट्टे, व २) लक्ष्मण बसवराज तटी यांचे कर आकारणी दप्तरी नाव लावणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांच्या नावाची नोंद मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी येथील कर आकारणी दप्तरी करुन घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारची तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर प्रकटन दिले ता.२८/१०/२०२४.

सही/-
नाईकवाडी ए.डी. अ‍ॅडव्होकेट
१८८६/४, विणकर वसाहत मु.पो. मैंदर्गी
ता. अक्कलकोट जि. सोलापूर.
मो.नं. ९८८१५२२९०७/८४२१०९८१७७.
अशिला तर्फे अ‍ॅडव्होकेट

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

महत्त्वाचे

द. आफ्रिका दौऱ्यासाठी संघाचे प्रशिक्षक लक्ष्मण

नवी दिल्ली : पुढील महिन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू होणाऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांसाठी व्ही. व्ही. एस. लक्ष्मण हे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून पदभार स्वीकारतील. बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे प्रमुख असलेले लक्ष्मण भारतीय संघासोबत दक्षिण आफ्रिकेचा दौरा करणार आहे. चार सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना ८ नोव्हेंबरपासून डर्बनमध्ये होणार आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील या भारतीय संघासोबत लक्ष्मण प्रवास करणार आहे. भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अनुक्रमे १०, १३ आणि १५ नोव्हेंबर रोजी गकेबरहा, सेंच्युरियन आणि जोहान्सबर्ग येथे इतर तीन टी-२० सामने खेळणार आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर १० नोव्हेंबर रोजी रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील कसोटी संघासह ऑस्ट्रेलियाला जाणार असल्यामुळे १५ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या मालिकेसाठी ते टी-२० संघाच्या प्रशिक्षकासाठी उपलब्ध असणार नाहीत. पुढच्या महिन्यात, ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेत चार सामन्यांची टी-२० मालिका होणार आहे. पुढील महिन्यात 'अ' संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार आहे. ■

विदर्भाची सामन्यावर मजबूत पकड

रणजी करंडक क्रिकेट

ध्रुव शोरी व यश राठोडची अर्धशतके

२९२ धावांनी आघाडीवर

ध्रुव शोरी
५९ धावा, ११४ चेंडू, ५ चौकार

यश राठोड
५६ धावा, ७५ चेंडू, ३ चौकार

◆ **डेहराडून, २८ ऑक्टोबर**

प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत येथे सुरु असललेल्या एलिट ब गटातील उत्तराखंडविरुद्धच्या सामन्यात विदर्भाच्या संघाने जबरदस्त फलंदाजी करत सामन्यावर आपली पकड मजबूत केली. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी उत्तराखंडला २८९ धावांवर रोखून विदर्भाने पहिल्या डावात ३७ धावांची निसटती आघाडी मिळविली. ध्रुव शोरी व यश राठोडने झळकावलेल्या दमदार अर्धशतकाच्या बळावर विदर्भाने दिवस अखेर दुसऱ्या डावात ६७ षटकांत ६ बाद २५५ धावा उभारल्या.

उत्तराखंडने ७ बाद २४२ धावांवरून पुढे खेळण्यास सुरुवात केल्यानंतर केवळ ४७ धावांची भर घातली व त्यांचा पहिला डाव १०७.२ षटकांत २८९ धावांवर आटोपला. तळाच्या फळीतील अभय नेगीने २२, मयंक मिश्राने १४, तर दीपक ढापोलाने ११, धावांचे योगदान दिले. देवेंद्र सिंग बोरा २ धावांवर नाबाद राहिला.

विदर्भाच्या अक्षय वखरेने ४ बळी, आदित्य ठाकरे व हर्ष दुबेने प्रत्येकी २ बळी, तर अक्षय कर्णेवारने एक बळी टिपला.

पहिल्या डावात ३७ धावांची आघाडी मिळवणाऱ्या विदर्भ संघाच्या दुसऱ्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली, मत्र त्यानंतर ध्रुव शोरी, यश राठोडसह इतर फलंदाजांनी दमदार फलंदाजी करत संघाची धावसंख्या वाढविली. सलामीवीर अथर्व तायडे (१०) व तिसऱ्या क्रमांकावरील फलंदाज अमन मोखाडे (६) लवकरच बाद झालेत. विदर्भाने ६.५ षठकांत २४ धावांत दोन महत्त्वपूर्ण मोहरे गमावले. मात्र त्यानंतर ध्रुव शोरी व दानिश मालेवारने उत्तराखंडच्या गोलंदाजांचा समाचार घेत तिसऱ्या गड्यासाठी ५६ धावांची भागीदारी केली व संघाला नव्वद धावसंख्या गाठून दिली. मयंक मिश्राच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी दानिशने ६८ चेंडूंत ७ चौकारांच्या मदतीने ४२ धावा केल्या. त्यानंतर ध्रुव व यश राठोड या जोडीनेही कमालीची फलंदाजी केली. ध्रुवने यश राठोडसोबत चौथ्या गड्यासाठी ६८ धावांची भागीदारी केली आणि संघाला दीडशे धावांचा टप्पा ओलांडून दिला. स्वप्निल सिंगने ध्रुव शोरीला बाद केले, ध्रुवने ११४ चेंडूंत ५ चौकारांच्या मदतीने ५९ धावांची अर्धशतकी खेळी केली. पुढे यश राठोडने अर्धशतकी खेळी करत संघाची धावसंख्या २०५ वर पोहोचवली, मात्र याचवेळी स्वप्निल सिंगने यश राठोडची घोडदौड रोखली. यश राठोडने अवघ्या ७५ चेंडूंत ३ चौकारांच्या मदतीने ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली. हर्ष दुबे २६ धावा काढून बाद झाला. अक्षय कर्णेवार व कर्णधार अक्षय वाडकरने दिवस अखेरपर्यंत अनुक्रमे नाबाद ३० व १६ धावांची खेळी करत विदर्भाला दुसऱ्या डावात ६७ षटकांत ६ बाद २५५ धावा रचून दिल्या. उत्तराखंडकडून दीपक धापोला व स्वप्निल सिंगने प्रत्येकी २ बळी, तर मयंक मिश्रा व अवनीश सुधाने प्रत्येकी १ बळी टिपला. ◀*(वृत्तसंस्था)*

मालविका बनसोडकडून विजेतेपदाची आशा

हायलो ओपन बॅडमिंटन

◆ **सारब्रुकेन, २८ ऑक्टोबर**

मंगळवारपासून जर्मनीत होणाऱ्या हायलो ओपन बीडब्ल्यूएफ सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत भारताचा युवा संघ उतरणार आहे. महिला एकेरीत देशातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च मानांकित खेळाडू नागपूरच्या मालविका बन्सोड हिच्याकडून विजेतेपदाची आशा बाळगली जात आहे.

या स्पर्धेत मालविकासह एकूण ११ भारतीय बॅडमिंटनपटू खेळणार आहेत. मालविका बीडब्ल्यूएफ जागतिक क्रमवारीत ३५ व्या क्रमांकावर आहे व भारतीय खेळाडूंमध्ये ती सर्वोच्च स्थानी आहे.

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू, पॅरिस ऑलिम्पिकच्या उपांत्य फेरीतील लक्ष्य सेन, थॉमस चषक स्टार एच. एस. प्रणॉय आणि २०२१ विश्व स्पर्धेतील रौप्यपदक विजेता किदाम्बी श्रीकांत यांसारख्या अव्वल भारतीय बॅडमिंटनपटूंच्या अनुपस्थितीत, सारलंहाले इनडोअर स्टेडियमच्या बॅडमिंटन कोर्टवर भारतीय युवा खेळाडूंना अधिकाधिक फायदा घेण्याची संधी आहे. महिला एकेरीत मालविका बनसोडची पहिली लढत बल्गेरियाच्या हिस्टोमिरा पोपोव्स्काविरुद्ध होणार असून सर्वांचे लक्ष तिच्या सलामी लढतीकडे लागलेले असेल. गतवर्षी येथे मालविकाने उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली होती. पहिल्या फेरीचा सामना जिंकल्यास, या स्पर्धेतील सहाव्या मानांकित २३ वर्षीय मालविकाचा पुढील सामना अमेरिकेच्या दिशा गुप्ता किंवा जर्मनीच्या यव्होन लीशी होईल. महिला एकेरीत रक्षिता संतोष रामराज अन्य भारतीय खेळाडू असून तिचा पहिला सामना चीन तैपेईच्या यू चिएन हुईविरुद्ध होईल. हायलो ओपनमध्ये महिला एकेरीत भारताला कधीही विजेतेपद मिळालेले नाही. पुरुष एकेरीत, जागतिक क्रमवारीत ४४ व्या क्रमांकावर असलेला सतीश कुमार करुणाकरनची पहिल्या फेरीत सातव्या मानांकित चिराग सेनशी लढत होणार आहे. या सामन्यातील विजेत्याची लढत देशबांधव एस शंकर मुथुसामी सुब्रमण्यम आणि फ्रान्सच्या अरनॉड मर्क्ले यांच्यातील विजेत्याशी होईल. चौथा भारतीय थरुन मान्नेपल्ली फ्रान्सच्या एनोगट रॉयशी खेळेल. ◀*(वृत्तसंस्था)*

महिला आशियाई चॅम्पियन्स चषकासाठी भारतीय संघाच्या कर्णधारपदी सलीमा टेटे

◆ **नवी दिल्ली, २८ ऑक्टोबर**

बिहारमधील नव्याने विकसित झालेल्या राजगीर हॉकी स्टेडियमवर ११ ते २० नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या महिला आशियाई चॅम्पियन्स चषक हॉकी स्पर्धेसाठी सोमवारी १८ सदस्यीय भारतीय महिला हॉकी संघ जाहीर करण्यात आला असून संघाच्या कर्णधारपदी सलीमा टेटे हिची, तर उपकर्णधारपदी नवनीत कौर हिची निवड करण्यात आली आहे.

रांची येथे गेल्या वर्षीच्या आवृत्तीत विजेतेपद मिळवणारा भारतीय संघ यंदा मोठ्या अपेक्षांसह स्पर्धेत उतरणार आहे. आशियाई स्तरावर वर्चस्वाच्या लढाईत भारतीय महिला संघाला ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता चीन, जपान, कोरिया, मलेशिया आणि थायलंडसह इतर पाच राष्ट्रांकडून कठोर स्पर्धेला सामोरे जावे लागणार आहे. भारत ११ नोव्हेंबरला मलेशियाविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे.

भारतीय संघाला गतविजेता म्हणून स्पर्धेत उतरविणे ही एक अविश्वसनीय भावना आहे, असे सलीमा टेटे म्हणाली.

आम्ही कठोर प्रशिक्षण घेतले आहे. आमच्याकडे अनुभवी खेळाडू व तरुण प्रतिभा या दोन्हींसह एक मजबूत संघ आहे. आमचे ध्येय आमच्या विजेतेपदाचे रक्षण करणे आहे, आम्ही गत वर्षी दाखवलेल्या उत्कटतेने व निर्धाराने खेळणे हे आमचे ध्येय आहे, असेती ती म्हणाली.

अनुभवी सविता आणि उदयोन्मुख प्रतिभावान गोलरक्षक बिचू देवी खरीबम यांच्यात गोलरक्षणाची जबाबदारी सामायिक केली जाईल. उदिता, ज्योती, ईशिका चौधरी, सुशीला चानू पुक्रंबम व वैष्णवी विठ्ठल फाळके या बचावाची धुरा सांभाळतील. मध्य क्षेत्रात कर्णधार टेटेला नेहा, शर्मिला मनीषा चौहान, सुनेलिता टोप्पो आणि लालरेमसियामी यांची साथ असेल. नवनीत कौर, संगिता कुमारी, दीपिका, प्रीती दुबे आणि ब्युटी डुंगडुंग यांच्या नेतृत्वाखालील आतक्रमक फळी सज्ज आहे.

भारतीय महिला हॉकी संघः- गोलरक्षक- सविता, बिचू देवी खरीबम. बचावपटू- उदिता, ज्योती, वैष्णवी विठ्ठल फाळके, सुशीला चानू पुक्रंबम, इशिका चौधरी. मध्य फळी - नेहा, सलीमा टेटे, शर्मिला देवी, मनीषा चौहान, सुनीलिता टोप्पो, लालरेमसियामी, आक्रमक फळी- नवनीत कौर, प्रीती दुबे, संगिता कुमारी, दीपिका, ब्युटी डुंगडुंग. ◀*(वृत्तसंस्था)*

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व द उस्मानाबाद जिल्हा खो-खो असोसिएशन
यांच्या संयुक्त विद्यमाने
सुवर्ण महोत्सवी ५० वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद
व निवड चाचणी खो-खो स्पर्धा

धाराशिव : राज्य कुमार खो-खो स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे, प्रा. डॉ. चंद्रजित जाधव, ॲड. गोविंद शर्मा, जे.पी. शेळके.

मुलींच्या गटात रायगड, नंदुरबारचे शानदार विजय

सुवर्ण महोत्सवी राज्य कुमार व मुली खो-खो स्पर्धा : नंदुरबारच्या रोहिणी गावितची नाबाद नऊ मिनिटे खेळी

धाराशिव : राज्य अजिंक्यपद कुमार खो-खो स्पर्धेतील परभणी विरुद्ध बीड या सामन्यात पोलवर गडी बाद करताना टिपलेला क्षण. (छाया : सागर काळे, धाराशिव.)

धाराशिव, दि. २८ ऑक्टोबर-

सुवर्ण महोत्सवी ५० वी कुमार व मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेत मुलींच्या गटात नंदुरबारने छत्रपती संभाजीनगरचा ६-१ असा पाच गुणांनी पराभव केला.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत रोहिणी गावित हिने सलामीचा सायंकाळचा दिवस गाजविला. तिने पहिल्या डावात ८.४० व दुसऱ्या डावात नाबाद नऊ मिनिटे संरक्षण केले. छत्रपती संभाजी नगरच्या दिशा इंगळे हिनेही २.४० व ७.१० मि. पळती करीत लढत दिली. अन्य एका सामन्यात रायगडने लातूरला १६-१४ असे २ गुणांनी नमविले. मध्यंतराची सहा पाच ही एका गुणाची आघाडीच रायगडला विजय मिळवून दिली. संजीवनी जगदाळे हिने २. ३० मिनिटे नाबाद पळती करीत आक्रमणात सहा गडी बाद केले. लातूरच्या पायल माने हिची लढत अपुरी पडली. तिने आपल्या धारदार आक्रमणात सात गडी बाद करीत १.१० मिनिटे संरक्षण केले. अन्य सर्व सामने एकतर्फी झाले.

नाबाद ९ मिनिटे संरक्षण केलेली नंदुरबारची रोहिणी गावीत

उप उपांत्यपुर्व फेरीत पोहोचलेले संघ व त्यांचे होणारे सामने

कुमार : सोलापूर- बीड, धुळे-अहमदनगर, नाशिक-रत्नागिरी, रायगड-सांगली, धाराशिव- सातारा, नंदुरबार-मुंबई, ठाणे-मुंबई उपनगर, जालना-पुणे.

मुली : धाराशिव-नंदुरबार, अहमदनगर- रत्नागिरी, मुंबई उपनगर-पालघर, धुळे-ठाणे, सांगली-जालना, रायगड-पुणे, सोलापूर-मुंबई सातारा-नाशिक.

जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे यांनी केले स्पर्धेचे उद्घाटन

या स्पर्धेचे उद्घाटन धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे यांनी केले. अध्यक्षस्थानी लातूर विभागाचे शिक्षण उपसंचालक गणपतराव मोरे होते. सुरुवातीस ध्वजारोहण आणि त्यानंतर क्रीडा ज्योतीचे आगमन झाले. ती ज्योत प्रमुख पाहुण्यांनी प्रज्वलित केली. त्यानंतर राणी लक्ष्मी आणि जानकी पुरस्कार प्राप्त आश्विनी शिंदे हिने खेळाडूंना शपथ दिली. यावेळी द्वापेट कॉलेजचे प्राचार्य डॉ. दयानंद जटमुरे, शि. प्र. मंडळ प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील, अर्जुन पुरस्कार विजेते सारिका काळे, महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे खजिनदार ॲड. गोविंद शर्मा, उपाध्यक्ष अश्विनी पाटील, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त जे. पी. शेळके, सुजाता शानमे, रोहिणी आवारे, सुप्रिया गाढवे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुभाष वाघ, शिवतेज प्रतिष्ठान रेहमान काझी आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांनी प्रास्ताविक केले.

उपस्थितांचे स्वागत उस्मानाबाद खो खो असोसिएशनचे सचिव प्रवीण बागल, अभय इंगळे, प्रदीप होले, प्रभाकर काले, शोभना वाकुरे, विवेक कापसे, वर्षा जचव, निकिता पवार, गौरी शिंदे, संपदा मोरे,आकाश लोखंडे, अभिजित पाटील, रितेश जाधव, सुजित साळुंखे यांनी केले. असोसिएशनच्या स्पर्धा समितीचे अध्यक्ष संदीप तावडे यांनी आभार मानले.

मुलांमध्ये धुळ्याने छत्रपती संभाजीनगरला नमविले

मुलांच्या गटात धुळ्याने छत्रपती संभाजीनगरला २१-१८ असे तीन गुणांनी नमविले. मध्यंतराची ११-९ ही ३ गुणांची आघाडीच त्यांना विजय मिळवून दिली. त्यांच्या कुणाल शेटे याने दोन, एक व एक मिनिटे नाबाद पळती करत दोन गडी बाद केले. अभिषेक गावित याने १.५०, १.२० मिनिटे संरक्षण करीत तीन गडी बाद केले. अन्य एका सामन्यात रायगडने सिंधुदुर्ग १७-१३ अशी चार गुणांनी मात केली. भावेश गोवलीकर त्यांच्या विजयाचा शिल्पकार ठरला. त्याने पाच गडी बाद करीत एक व १.२० मिनिटे पळती केली. सिंधुदुर्गच्या अथर्व शिंदे (१.५०,१.०० मि. व ४ गुण) याची खेळी अपुरी पडली. अन्य सर्व सामने डावाने झाले.

गॅरी कर्स्टन यांचा पाकिस्तान संघाच्या प्रशिक्षकपदाचा राजीनामा

◆ **कराची, २८ ऑक्टोबर**

पाकिस्तान वन-डे क्रिकेट संघाचे प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यांच्या नियुक्तीनंतर सहा महिन्यांतच पाकिस्तान क्रिकेट मंडळाशी मतभेद निर्माण झाल्यामुळे त्यांनी राजीनामा दिला आहे.

दक्षिण आफ्रिकेचे ५६ वर्षीय गॅरी कर्स्टन यांनी २०११ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारताला विश्वविजेतेपद मिळवून दिले होते. पाकिस्तान क्रिकेट मंडळाने यावर्षी एप्रिलमध्ये त्यांची आपल्या संघाच्या प्रशिक्षकपदी नियुक्ती केली होती.

ईएसपीएनक्रिकइन्फोच्या मते, पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) त्यांच्या निवडीचे अधिकार काढून घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर लाल चेंडूचे प्रशिक्षक जेसन गिलेस्पी व पीसीबी यांच्याशी झालेल्या मतभेदामुळे त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानात भूमिका घेण्यापूर्वी गॅरी कर्स्टन इंडियन प्रीमियर लीग फ्रॅन्चायझी गुजरात टायटन्ससोबत फलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम करत होते.◀*(वृत्तसंस्था)*

बॅलन डी'ओरच्या शर्यतीत नवीन पिढीचे खेळाडू

पॅरिस : फुटबॉलचा सर्वात प्रतिष्ठित वैयक्तिक पुरस्कार बॅलन डी'ओरच्या शर्यतीत दिग्गज ख्रिस्तियानो रोनाल्डो, लियोनेल मेस्सी नव्हे, तर नवीन पिढीचे खेळाडू आहेत. या पुरस्काराच्या शर्यतीत रिअल माद्रिदचा विंगर व्हिनिसियस ज्युनियर हा आघाडीवर असून तोच पुरस्काराचा प्रबळ दावेदार आहे. मेस्सी आणि रोनाल्डो यांनी अभूतपूर्व असलेल्या १६ वर्षांच्या कालावधीत एकत्रितपणे १३ वेळा हा पुरस्कार जिंकला. यावर्षी दोघांनाही नामांकन मिळालेले नाही. रिअल माद्रिदचा व्हिनिसियस ज्युनियर हा जगातील सर्वोत्तम खेळाडूचा मुकुट पटकावणारा खेळाडू आहे. ■

चिराग चिक्काराने जिंकले सुवर्ण

● २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धा ● भारताने जिंकलीत ९ पदके

◆ **तिराना, २८ ऑक्टोबर**

येथे आयोजित २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत भारताच्या चिराग चिक्काराने सुवर्णपदक जिंकले. चिराग चिक्कारा हा २३ वर्षांखालील विश्वविजेता होणारा केवळ तिसरा भारतीय ठरला आहे. भारताने या स्पर्धेत एक सुवर्ण आणि रौप्यपदकांसह ९ पदके जिंकलीत.

५७ किलो वजनी गटात पुरुषांच्या फ्रीस्टाइलमध्ये चिराग चिक्काराने किर्गिस्तानच्या अब्दिमालिक काराचोव्हवर शेवटच्या सेकंदात ४-३ अशी मात केली. पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता अमन सेहरावत याच्यानंतर चिराग चिक्कारा हा २३ वर्षांखालील जागतिक स्पर्धेत सुवर्ण जिंकणारा तो दुसरा भारतीय खेळाडू ठरला आहे. सेहरावतने २०२२ च्या २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत हा पराक्रम गाजवला होता, तर गतवर्षी ७६ किलो वजनी गटात जिंकून स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी रितिका हुड्डा ही पहिली भारतीय महिला खेळाडू होती. रवी कुमार दहियानेही २०१८ मध्ये २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते.

चिराग चिक्काराला विजयी घोषित करताना पंच

चिक्काराने उप-उपांत्यपूर्व फेरीत गौकोटो ओझावाचा ६-१, उपांत्यपूर्व फेरीत इयुनस इवबतिरोव्हचा १२-२ व उपांत्य फेरीत ॲलन ओरलबेकचा ८-० असा पराभव करत अंतिम फेरी गाठली.

पुरुषांच्या फ्री स्टाईल प्रकारात भारताच्या पदकांमध्ये दोन कांस्यपदकांचाही समावेश आहे. भारताने ८२ गुणांसह गुणतालिकेत चौथे स्थान मिळविले आहे. इराण (१५८) आघाडीवर असून त्यापाठोपाठ जपान (१०२) व अझरबैजानचा (१००) क्रम लागतो. विकीने माजी २० वर्षांखालील विश्व स्पर्धेतील रौप्यपदक विजेता व युक्रेनच्या युरोपियन ज्युनियर विजेता इव्हान प्राइमाचेन्कोचा ७-२ अशा फरकाने पराभव करून पुरुषांच्या ९७ किलो फ्रीस्टाइल स्पर्धेत कांस्यपदक जिंकले.

भारतीय महिला कुस्ती संघाने यापूर्वीही उत्कृष्ट कामगिरी करत एक रौप्य आणि तीन कांस्यपदके जिंकलीत. अंजलीने ५९ किलो गटात रौप्यपदक, तर नेहा शर्मा (५७ किलो), शिक्षा (६५ किलो) व मोनिकाने (६८ किलो) प्रत्येकी कांस्यपदक मिळवले. याशिवाय विश्वजित मोरेने पुरुषांच्या ५५ किलो गटात कांस्यपदक मिळवले. ◀*(वृत्तसंस्था)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

क्राईम वृत्त

सेटलमेंट कॉलनीत तरूणास मारहाणप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

शहरातील सेटलमेंट कॉलनीत तरूणास मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी कुर्डूवाडीच्या तिघांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राजेश भालचंद्र काळे (वय ३६, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. १, पारधी कॅम्प, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन कृष्णा शिंदे, अक्षय पवार, समाधान पवार (सर्व रा. परांडा रोड, कुर्डूवाडी) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ ऑक्टोबर रोजी रात्री राजेश काळे यास त्याच्या घरामागे त्याच्या ओळखीच्या कृष्णा शिंदे व इतरांनी लाकडी बांबूने डोक्यावर, पाठीवर, कमरेवर, पोटावर, हातावर मारून जबर जखमी केले. तसेच दमदाटी केली. म्हूणन सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक जाधव पुढील तपास करीत आहेत.

दुचाकीच्या धडकेने वृध्द महिला जखमी

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

दुचाकीच्या धडकेने वृध्द महिला जखमी झाली. याबाबत कस्तुराबाई चिमाजी गाडेकर (रा. भिमा सोसायटी, आरटीओ जवळ) या महिलेच्या फिर्यादीवरुन अज्ञात व्यक्तीविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी आयटीआय कॉलेजसमोर कस्तुराबाई या भाजी खरेदी करून घराकडे पायी जाण्यासाठी रस्ता क्रॉस करीत होत्या. त्यावेळी भरधाव आलेल्या एमएच १३ डीयू ४५०२ क्रमांकाच्या दुचाकीस्वाराने कस्तुराबाई यांना जोरदार धडक दिली. यामध्ये कस्तुराबाई यांच्या डोक्यास, पायास, गंभीर दुखापत झाल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार सोनार तपास करीत आहेत.

अचानक ब्रेक लावल्याने लोखंडी पाईप लागून एसटीतील वृध्द प्रवासी जखमी

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

अचानक ब्रेक लावल्याने लोखंडी पाईप लागून एस टी तील वृध्द प्रवासी जखमी झाला. रेवणसिध्द मल्लेशअप्पा कोरे (वय ७५, रा. शिवगंगा नगर भाग ५, कुमठा नाका, सोलापूर) असे जखमी प्रवाशाचे नाव आहे. रेवणसिध्द कोरे २८ ऑक्टोबर रोजी ११ वाजता अक्कलकोट ते सोलापूर या एस टी बसने जात असताना रंगभवन जवळ अचानक एस टी समोर रिक्षा आल्याने चालकाने ब्रेक लावला. त्यामुळे एस टी बस जागीच थांबल्याने एस टी मध्ये उभे असलेले प्रवासी रेवणसिध्द कोरे यांच्या डोक्यास एस टी तील लोखंडी पाईप डोक्यास लागून ते जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

दारूच्या नशेत स्वत:च्या छातीवर वार करून घेऊन तरूण जखमी

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

दारूच्या नशेत स्वतःच्या छातीवर वार करून घेऊन तरूण जखमी झाला. अनिल श्रीशैल कानडे (वय ३४, रा. गणेश नगर, भवानी पेठ, सोलापूर) असे जखमीचे नाव असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. २७ ऑक्टोबर रोजी रात्री दहाच्या सुमारास मंगळवार पेठेतील करजगी ज्वेलर्स येथे अज्ञात कारणावरून दारूच्या नशेत स्वतः छातीलवर काहीतरी धारदार वस्तुने मारून घेतल्याने जखमी झाल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

बायको माहेरी गेल्याने रागाच्या भरात पतीचा आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

दिवाळीसाठी बायको माहेरी गेल्याने रागाच्या भरात पतीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. आनंद व्हनप्पा व्हसमने (वय २४, रा. निंबर्गी, ता. दक्षिण सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. आनंद यांची पत्नी २८ ऑक्टोबर रोजी दिवाळीसाठी माहेरी गेली असून त्या रागाच्या भरात आनंदने सकाळी साडेआकराच्या सुमारास राहत्या घरात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. आनंदला त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी मित्र जगदेव बालगाव याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

कर्देहळ्ळी येथील तरूणीची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

कर्देहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे तरूणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. अंजली अर्जुन राऊत (वय १८, रा. कर्देहळ्ळी) असे आत्महत्या केलेल्या तरूणीचे नाव आहे. २७ ऑक्टोबर रोजी रात्री कर्देहळ्ळी गावातील विजय विठोबा पवार यांच्या राहत्या घरी त्यांची भाची अंजली राऊत हिने घरात साडीच्या सहाय्याने दारच्या अँगलला गळफास घेतला. त्यामुळे वळसंग पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक सागर पाटील यांनी अंजलीस खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु, अंजलीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. शितलकुमार यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

आंतरराज्य गुन्हेगारांकडून १ पिस्टल व २ काडतूस जप्त

●दोघांना अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आंतरराज्य गुन्हेगारास अटक करून त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्टल व २ जिवंत काडतूस असा १ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी पिस्टल विकत घेणाऱ्यासदेखील पोलिसांनी अटक केली. ही कारवाई पाकणी फाटा येथे करण्यात आली.

करीम हमीदसाब मुरली (वय ४८, रा. खजुरी, ता. आळंद, जि. कलबुर्गी, कर्नाटक) आणि चंद्रकांत उर्फ चंदू विश्वनाथ लांडगे (वय ३८, रा. बसवेश्वर नगर, सिध्देश्वर सहकारी साखर कारखानाजवळ, होटगी रोड, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना ४ दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ खुणे व पोलिस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर यांना कर्नाटकातील एकजण देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतूस विकण्यासाठी पाकणी फाट्यावरील संभाजी हॉटेल येथे येणार असल्याची माहिती मिळाली होती.

त्यावरून या ठिकाणी पिस्टलचा व्यवहार करत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा लावून दोघांना ताब्यात घेतले. त्यावेळी कर्नाटकातील करीम मुरली हा पिस्टल विकण्यासाठी आला होता तर चंद्रकांत लांडगे हा पिस्टल विकत घेण्यासाठी आल्याचे तपासात निष्पन्न झाले. या कारवाईत पोलिसांनी चंद्रकांत लांडगे याने खरेदी केलेले देशी बनावटीचे पिस्टल व २ जिवंत काडतूस, मोबाईल, रोख रक्कम असा १ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ खुणे, पोलिस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, सहायक फौजदार नारायण गोलेकर, विजयकुमार पावले, पोलिस अमंलदार धनाजी गाडे, मोहन मनसावाले, सलीम बागवान, अक्षय डोंगरे, सागर ढोरे-पाटील, समीर शेख यांनी केली.

करीम व चंदू हे सराईत गुन्हेगार

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केलेले करीम मुरली व चंदू लांडगे हे दोघेही अवैध शस्त्र खरेदी-विक्रि करणारे सराईत गुन्हेगार आहेत. करीम मुरली याच्याविरुध्द यापूर्वी उमरगा पोलिस ठाणे येथे खूनाचा तर सोलापूर शहर येथे अवैध शस्त्र विक्रिचा आणि आळंद पोलिस ठाण्यात अवैध शस्त्र विक्रिचे २ गुन्हे दाखल आहेत. तर चंदू लांडगे याच्याविरुध्द सोलापूर शहरातील विजापूर नाका पोलिस ठाण्यात अवैध शस्त्रप्रकरणी एक तर जेलरोड पोलिस ठाणे आणि वळसंग पोलिस ठाण्यात प्रत्येकी एक गुन्हा दाखल असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

आ. राजेंद्र राऊत, माजी मंत्री सोपल यांचे अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २८ ऑक्टोबर-

बार्शी विधानसभा निवडणुकीसाठी बार्शीचे अपक्ष आमदार यांनी शिवसेना (शिंदे गट) कडून उमेदवारी अर्ज दाखल केला तर माजी मंत्री दिलीप सोपल यांनी शिवसेना (उबाठा) गटाकडुन अर्ज दाखल केला आहे.

यावेळी आमदार राऊत यांच्या अर्ज दाखल करतेवेळी आसिफ तांबोळी, रमेश पाटील, रावसाहेब मनगिरे,संतोष निंबाळकर, भाजपाचे महावीर कदम रिपाईचे अविनाश गायकवाड,माजी उपसभापती केशव घोगरे आदी उपस्थित होते तर माजी मंत्री सोपल यांचे अर्ज दाखल करते वेळी घटक पक्षातील (राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विश्वास बारबोले,कॉंग्रेसचे जीवनदत्त आरगडे , वसीम पठाण प्रवीण काकडे आदी उपस्थित होते. सोमवार पर्यत १२८ इच्छुकांनी उमदेवारी अर्ज खरेदी केला असुन दि २८ रोजीही अर्ज घेणाऱ्या मध्ये प्रशांत घोडके यांनी दिलीप सोपल यांचेसाठी दोन अर्ज घेतले. अरबाज पठाण यांनी इस्माइल मुसा पठाण यांचेसाठी एक, रमजान काशीम पठाण रा. बार्शी स्वतः साठी दोन अर्ज.महावीर कदम यांनी राजेंद्र विठ्ठल राऊत यांचेसाठी एक अर्ज घेतला.आनंद यादव यांनी स्वतः साठ एक .सागर बीडकर यांनी एक अर्ज.धिरज साबळे चार अर्ज.प्रशांत रनझुंजारे यांनी दिलीप साठे चार अर्ज .किशोर मांजरे यांनी किरण मांजरे यांचेसाठी एक अर्ज.आकिब पठाण यांनी इस्माईल पटेल यांचेसाठी चार अर्ज.रणजित कल्याण पाटील यांनी आनंद रामचंद्र काशीद यांचेसाठी दोन अर्ज. जगदीश दगडे यांनी एक अर्ज अमोल भुमकर यांनी चार अर्ज घेतले. तर सोमवारी दि २८ रोजी १७ नामनिर्देशन अर्ज दाखल केले असुन एकुण २४ जणांनी नामनिर्देशन दाखल झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड यांनी दिली.

यांनी दाखल केले अर्ज

यासह भाऊसाहेब आंधळकर (अपक्ष), युवराज काटे (अपक्ष), धनंजय जगदाळे (वंचित बहुजन आघाडी), साहेबराव देशमुख (अपक्ष), मोहसिन तांबोळी (अपक्ष), इस्माईल पठाण (भारतीय कॉंग्रेस), साबिर तांबोळी (अपक्ष), किशोर गाडेकर (राष्ट्रीय समाज पक्ष), मनोज कांबळे (बहुजन समाज पक्ष), विनोद जाधव (अपक्ष), विजय साळुके (अपक्ष), आनंद यादव (अपक्ष), मधुकर काळे (अपक्ष), आकाश दळवी (अपक्ष) यांनीही अर्ज दाखल केले आहेत.

सोलापूर शहर गुन्हे शाखेकडून चोरीचे ५ गुन्हे उघडकीस

दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन महिलांसह पाचजणांना अटक करून त्यांच्याकडून विविध पोलिस ठाण्यातील चोरीचे ५ गुन्हे उघडकीस आणून १ लाख ४५ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिळालेल्या माहितीवरून दिपक राजेश आनगले (वय २३, रा. कुंभार गल्ली, दत्त मंदीराजवळ, घाण नाल्याच्या शेजारी, सोलापूर) आणि राहुल बंडू गुजले (वय २०, रा. रफिक शेख दाल चावलच्या बोळात, कुंभार गल्ली, मौलाली चौकाजवळ, सोलापूर) रोहित उर्फ कान्या लक्ष्मण झंपले (वय २५, रा. दत्त मंदीराजवळील बोळात, मौलाली चौकाजवळ, सोलापूर) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले.

तसेच सोनाली नागनाथ मोची (वय ३५), अनु देवा जाधव (वय ३८, दोघी रा. मधुकर उपलप वस्ती, रामवाडी गोडाऊनजवळ, सोलापूर) या दोघींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील दोन व फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील एक चोरीचा गुन्हा उघडकीस आणला.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक श्रीनाथ महाडीक, पोलिस उपनिरीक्षक अल्फाज शेख, पोलिस हवालदार अंकुश भोसले, शैलेश बुगड, राजकुमार वाघमारे, अभिजित धायगुडे, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, सतिश काटे, बापू साठे, भारत पाटील, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, महिला कर्मचारी शिलावती काळे, ज्योती लंगोटे, निलोफर तांबोळी, रत्ना सोनवणे यांनी केली.

उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

किडवाई चौक व खंडाळी येथे कारवाई

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने शहरातील किडवाई चौक व खंडाळी (ता. मोहोळ) येथे हातभट्टीची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करीत ३ लाख १४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

२८ ऑक्टोबर रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने खंडाळी येथे एक चारचाकी वाहन पकडून त्यातून सहा बॉक्स अवैध देशी मद्य जप्त करण्यात आले असून वाहनचालक परमेश्वर विष्णू पवार (रा. पंढरपूर) यास ताब्यात घेऊन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसऱ्या कारवाईत शहरातील किडवाई चौकात एक दुचाकी पकडून त्यावरील सहा रबरी ट्यूबमधील ३६० लिटर हातभट्टी दारू जप्त केली. या कारवाईत सुरजित मनोज चव्हाण (रा. मुळेगाव तांडा, ता. दक्षिण सोलापूर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई अधिक्षक भाग्यश्री जाधव, उपअधिक्षक एस आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक आर एम चवरे, जे एन पाटील, ए व्ही घाटगे, डी एम बामणे, पंकज कुंभार, भवड, दुय्यम निरीक्षक एस डी कांबळे, आर एम कोलते, धनाजी पोवार, समाधान शेळके, सुखदेव सिद, अंजली सरवदे, सचिन गुठे, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, विजय पवार, गुरुदत्त भंडारी, आनंद जोशी, जवान आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएब बेगमपूरे, वसंत राठोड, चेतन व्हनगुंटी, इस्माईल गोडीकट, कपील स्वामी, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, विकास वडमिले, विजय शेळके, योगीराज तोग्गी, तानाजी जाधव, रशीद शेख, दिपक वाघमारे यांनी केली.

करमाळा विधानसभेसाठी शिवसेना शिंदे गटाकडून दिग्विजय बागल यांना उमेदवारी

करमाळा विधानसभा मतदारसंघात रंगणार तिहेरी लढत

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि. २८ ऑक्टोबर-

करमाळा-माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार कोण असणार म्हणून रोज नवनवीन चेहरे पुढे येत होते. अजितदादा पवार यांचे समर्थक आ. संजयमामा शिंदे यांनी अपक्ष लढणार असल्याचे जाहीर केल्याने करमाळ्यामध्ये महायुतीचा उमेदवार कोण अशी चर्चा रंगत होती.

आज या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. दिग्विजय बागल यांना शिवसेना शिंदे गटाची अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. आजच दिग्विजय बागल यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी बागल यांनी वरिष्ठांचा आदेश आल्यानंतर आपण उद्या आणखी एक महायुतीतून उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले. मात्र दुपारनंतर शिवसेना शिंदे गटाची उमेदवारी दिग्विजय बागल यांना मिळाली. आता महायुतीच्या उमेदवारीबाबत आग्रही असणारे सोलापूर जिल्हा शिवसेनेचे महेश चिवटे यांची प्रतिक्रिया जाणून घेतली असता एकनाथ शिंदे यांचा आदेश आमच्यासाठी सर्वस्व आहे. आम्ही दिग्विजय बागल यांचा प्रचार करणार असल्याचे त्यांनी सांगितले. दिग्विजय बागल यांना शिवसेना शिंदे गटाकडून एबी फॉर्म घेण्यासाठी मुंबईला बोलवण्यात आले आहे. ही उमेदवारी जाहीर झाल्याने करमाळ्याच्या राजकीय पटलावर करमाळा विधानसभेमध्ये रंगत वाढली असून महायुतीच्या उमेदवारीबाबतचा संभ्रम दूर झाला आहे.

जिल्हा प्रशासनाने नरक चतुर्दशीची सुटी केली रद्द

या बदल्यात वेळ अमावस्येला मिळणार सर्वांना सुट्टी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

सोलापूर जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांना दिवाळीच्या यंदा ३ सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या होत्या मात्र गुरूवार, दि. ३१ ऑक्टोंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा अर्ज माघारी घेण्याचा दिवस असल्याने या दिवशीची सुटी रद्द करून ती वेळा अमावस्येला देण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काढले आहेत.

सध्या विधानसभा निवडणुकीचे वारे राज्यभर वाहू लागले आहेत. तर याच काळात दिवाळीचा मोठा सणही असल्याने जिल्हा प्रशासनाने दिलेली सुटी रद्द केल्याने काही कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. दरम्यान, याच दिवशी विधानसभा निवडणुकीत अर्ज भरलेले काही लोक अर्ज काढून घेणार असल्याने ही सुटी रद्द केली आहे. यामुळे दिवाळीसाठी परगावी जावून येणारे जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी मात्र काही अंशी नाराज झाल्याचे चित्र आज दिसून आले. ही रद्द केलेल्या सुटीच्या बदल्यात वेळा अमावस्या सणाला सुटी दिली असून, या दिवशी दिवसभर शेतात भटकंती करीत वनभोजनाचाही या शासकीय कर्मचाऱ्यांना लाभ घेता येणार आहे.

दिवाळी करिता हॉलीडे स्पेशल ट्रेन सुरु करण्याची मागणी

●पुणे, मुंबई, हैदराबाद दक्षिणेकडे जाणाऱ्या रेल्वे प्रवाशांची संख्या अधिक

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

रेल्वे ही सर्वांची जीवनवाहिनी आहे. दिवाळीच्या मोठ्या सणाची सुरुवात म्हणजे आपल्या गावाकडे जाणे, सहलीचे नियोजन करणे, तीर्थयात्रा जाणे, हे सर्वच प्रवाशांच्या अनिर्वाय बाब होऊन बसलेली आहे. एकीकडे सोलापूर रेल्वे स्थानकाचा कायापालट होत आहे. हे खूप आनंदाची बाब आहे.

अशावेळी सोलापुरातून पुणे, मुंबई, हैदराबाद व तिरुपती सह दक्षिण भारतात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात आहे. सध्या या शहराकडे जाण्यासाठी रेल्वे प्रशासनाने स्पेशल हॉलीडे ट्रेन सोडण्याची मागणी सोलापूर रेल्वे प्रवाशी संघटनेच्या वतीने करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष राजाभाऊ जाधव यांनी निवेदनाव्दारे केली आहे.

यामुळे प्रवाशांची तर सोय होईलच आणि रेल्वे चा महसूल देखील वाढण्यास मदत होईल.तसेच कोरोना काळापासून विजापूर मुंबई फास्ट पॅसेंजर ,हैदराबाद विजापूर फलकनामा, सोलापूर पुणे हुतात्मा एक्सप्रेस ला जनरल बोगी जोडावी सोलापूर हैदराबाद इंटरसिटी नव्याने सुरू करावी.सोलापूर ते पुणे, मुंबई हैदराबाद दक्षिणेकडे जाणाऱ्या रेल्वे प्रशांची संख्या बारमाही भरपूर आहे. अशातच दिवाळीसारख्या मोठ्या सणाची सुरुवात झालेली आहे. रेल्वेचे वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील व सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक देशपांडे यांना निवेदन देताना सोलापूर रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष राजाभाऊ जाधव ,राजेंद्र कांबळे, नितीन नवगिरे, अस्लम शेख, रविंद्र महेंद्रकर, शंकर बोबळेकर आदीची उपस्थित होती.

सर्वच गाडया जुन्याच वेळापत्रकानुसार धावतात...

या शहरात दळणवळण, यंत्रणा ,शिक्षण, व्यापार ,उद्योजक, उद्योग, रोजगार, पर्यटन, तीर्थक्षेत्र या कारणाने वाढलेली आहे याचबरोबर सोलापूर विभागातील वाडी ते भिगवन दुहेरीकरण व विद्युतीकरण होऊन दोन वर्षे लोटून गेली तरी सर्वच गाडी या जुन्याच वेळापत्रकानुसार धावतात त्यात लवकरात लवकर बदल करावा अशी मागणी आम्ही आज रेल्वे प्रशासनाकडे केली.

- राजाभाऊ जाधव,
अध्यक्ष सोलापूर रेल्वे प्रवाशी संघटना

सराईत गुन्हेगार विकास दोरकर दोन वर्षासाठी तडीपार

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

शहरातील सराईत गुन्हेगार विकास दोरकर यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीनंतर दोरकर यास पुणे येथे सोडण्यात आले.

विकास उर्फ पप्पू सुरेश दोरकर (वय ४१, रा. गणेश नगर, जोशी गल्ली, बाळे, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. विकास दोरकर याच्याविरुध्द सन २०१८, २०२०, २०२२, २०२३ व २०२४ या कालावधीमध्ये सामान्य नागरीकांना दमदाटी, शिवीगाळ करून मारहाण करणे, घातक शस्त्रांसह गंभीर दुखापत करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कारवाया रोखण्यासाठी फौजदार चावडी पोलिसांकडून तडीपार करण्याबाबत पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता. त्यास प्रस्तावास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजूरी देत विकास दोरकर यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार करण्याचे आदेश दिले. दोरकर यास तडीपारीच्या आदेशानंतर पोलिसांनी ताब्यात घेऊन पुणे येथे सोडले आहे.

राष्ट्रहिताचा विचार केल्याने 'तो' सर्वश्रेष्ठ तेजस्वी शिक्षक ठरला : निरुपणकार घळसासी

सोलापूर दि.२८ ऑक्टोबर-

आर्य चाणक्याने राष्ट्रहिताचा विचार केला, म्हणून तो राजनीती मध्ये सर्वश्रेष्ठ तेजस्वी शिक्षक ठरला. असं निरुपणकार विवेक घळसासी यांनी सांगितले. कारण आर्य चाणक्य यांनी चंद्रगुप्ताला कसे घडविले.? हे सांगून कौटिलिय अर्थशास्त्रातील काही उदाहरणे घळसासी यांनी यावेळी दिली.

हॉटेल सूर्या एक्झिक्यूटिव्ह, सुरवसे चॅरिटेबल ट्रस्ट, सुरवसे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आयोजित ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांच्या मधुर वाणीतून अखंड भारत साकार करणारा तेजस्वी शिक्षक-आर्य चाणक्य या विषयावर झालेल्या तीन दिवसीय व्याख्यान- मालेचा समारोप संपन्न झाला.

अखंड भारत साकार करणारा तेजस्वी शिक्षक
॥ आर्य चाणक्य ॥
व्याख्यानमाला
शिक्षक कभी साधारण नही

याप्रसंगी सुरवसे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे, पृथ्वीराज सुरवसे, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी, मनोरमा फाउंडेशनच्या अध्यक्षा शोभा मोरे, माजी मुख्याध्यापक शेखर लक्ष्मेश्वर, महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, क्रीडा संघटक रवींद्र नाशिककर, रा.स्व.संघाचे संतोष कुलकर्णी, विकास नगर संत सेवा मंडळाचे अध्यक्ष सुधाकर देशमुख, प्रशांत बडवे, माजी नगरसेवक जगदीश पाटील, सोलापूर आकाशवाणीचे माजी अभियांत्रिकी प्रमुख गजानन सुरवसे, गुरुशांत धुत्तरगावकर, चैतन्य टेक्नो स्कूलचे आदिनारायन पडाल, सुरवसे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या उज्वलाताई साळुंखे यांच्यासह रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी आरती कुलकर्णी-काटीकर यांनी गायलेल्या पसायदानाने व्याख्यानमालेची सांगता झाली.

सोलापूर : शहरात सोमवारी सायंकाळी मार्कंडेय उद्यानात संतोषी माता गोशाळेच्या वतीने वसुबारस साजरी करण्यात आली. (छायाचित्र : केवल तिवारी)

क्रीडा

प्रौढ गट राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत सोलापूरची १० पदकांची कमाई

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

प्रौढ गटाच्या तिसऱ्या राष्ट्रीय जलतरम स्पर्धेत येथील जलतरणपटून ५ सुवर्ण, ३ रौप्य व २ कांस्य अशी १० पदकांची कमाई केली आहे.नाशिक येथे झालेल्या खेल महाकुंभ स्पर्धेत सुरेश मिठ्ठाकोल (३ सुवर्ण), शंकर करजगी (१ सुवर्ण, २ रौप्य), सुदेश देशमुख (१ सुवर्ण, १ रौप्य), मोहन श्रीगांधी (१ कांस्य) तर प्रविण सोमा यांनी (१ कांस्य) ही कामगिरी केली आहे. त्यांचे सोलापूर जिल्हा हौशी जलतरण संघटना आणि सोलापूरकरांनी अभिनंदन केले.

कामगिरी : सुरेश मिठ्ठाकोल (१०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक, १०० मीटर बॅकस्ट्रोक व ५० मीटर बटरफ्लायमध्ये सुवर्ण), शंकर करजगी (१०० मीटर फ्रीस्टाईल सुवर्ण, १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक व ५० मीटर बटरफ्लायमध्ये रौप्य). सुदेश देशमुख (५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक सुवर्ण, १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक रौप्य), मोहन श्रीगांधी (५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये कांस्य), प्रविण सोमा (५० मीटर बॅकस्ट्रोक कांस्य)

आशियाई क्रॉस कंट्री पदक विजेता अरुण राठोडचा सत्कार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

हाँगकाँग, चीन येथे झालेल्या आशियाई क्रॉस कंट्री स्पर्धेत येथील आंतरराष्ट्रीय खेळाडू अरुण राठोड याने भारतीय संघाचे प्रतिनिधित्व सांघिक सुवर्ण व १० किमी धावण्याच्या शर्यतीतल वैयक्तिक क्रीडा प्रकारात कांस्य पदक पटकावले.

या कामगिरीबद्दल त्याच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन, समर्थ करिअर अकॅडमीच्या वतीने नेहरूनगर येथील शासकीय मैदान येथे सत्कार करण्यात आला. यावेळी मैदानावरील सर्व स्पोर्ट्स अकॅडमी व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे खेळाडू, विद्यार्थी, प्रशिक्षक व नागरिक उपस्थित होते,

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे,
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ॲथलेटिक्स असोसिएशन सोलापूर.
समर्थ करिअर अकॅडमी, सोलापूर.
नगर, सोलापूर.

जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, ॲथलेटिक्स असोसिएशन राज्य उपाध्यक्ष राजू प्याटी, कबड्डी राज्य पंच सुभाष माने, शारीरिक शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव, तालुका क्रीडा अधिकारी गणेश पवार व अण्णप्पा काडादी प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल पाटील यांच्या उपस्थितीत त्याचा सत्कार करण्यात आला.

याचवेळी समर्थ करिअर अकॅडमी प्रशिक्षणार्थी चिरंजीव तावरे याची महाराष्ट्र राज्य शुल्क उत्पादन विभागाच्या जवानपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच अरुणला घडवणाऱ्या शाळेतील क्रीडा शिक्षक गोविंद महाबोले व समर्थ अकॅडमीचे संचालक व प्रशिक्षक रवी राठोड यांचाही फेटा सत्कार करण्यात आला.

यावेळी खो-खो असोसिएशनचे सहसचिव राजाराम शितोळे, जॉगर्स असोसिएशनचे सुहास साळुंखे, समर्थ स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालिका भारती लिंगडे, रेल्वे अधिकारी निलेश वरवडकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष माने यांनी केले. गणेश पवार यांनी आभार मानले.

सुवर्ण मिळवून देण्याचा निर्धार

अरुण ने आपल्या मनोगतात आपल्या शिक्षकांचे तसेच उपस्थित सर्व मान्यवर आणि खेळाडूंचे आभार व्यक्त केले व पुढील काळात भारताला या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला.

इंडियन मॉडेल स्कूलच्या देवांश पटेल उपविजेता

सोलापूर, दि. २७ ऑक्टोबर-

जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथे झालेल्या शालेय शहर तायक्कांदो स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या इंडियन मॉडेल स्कूल (सी.बी.एस.ई) च्या देवांश पटेल याने २९ ते ३२ किलो वजन गटात रौप्य पदक मिळवले.त्याला क्रीडा शिक्षक सचिन ढवाण, राजकुमार माने यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सौ. सायली जोशी मॅडम, मुख्याध्यापिका सौ. अपर्णा कुलकर्णी मॅडम, सौ. अचला राचर्ला मॅडम, सौ.ममता बसवंती मॅडम यांनी अभिनंदन केले.

उमाबाई श्राविकाची जयश्री कौडकी अजिंक्य, हर्षवर्धन उपविजयी

शालेय तायक्कांदो स्पर्धेतील कामगिरी

सोलापूर, दि, २८ ऑक्टोबर-

शालेय शहर तायक्कांदो स्पर्धेमध्ये उमाबाई श्राविका मधील १४ वर्षांखालील गटात ३७ किलो वजनी गटात जयश्री कौडकी हिने अजिंक्यपद पटकविले. या कामगिरीवर तिची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच १४ वर्षांखालील गटांमध्ये ३८ किलो वजनी गटांमध्ये हर्षवर्धन कौडकी यांने उपविजेतेपद संपादिले. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे व प्रशिक्षक शिवशरण वाणिपरीट यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल श्राविका संस्थेचे सचिव हर्षवर्धन शहा, विश्वस्त अंजली शहा, डॉ.रोहिणी शहा, अतुल शहा, अनिल जमगे, सीईओ देवई शहा, वरिष्ठ दिप्ती शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ आदींनी अभिनंदन केले.

चेतक रोलर स्केटिंग क्लबचे दिवाळी सुटीतील शिबीर

सोलापूर दि.२८ ऑक्टोबर-

चेतक रोलर स्केटींग क्लबचे ३२ व्या वर्षातील ८१ वे स्केटिंग शिबीर होम मैदानालगत पासपोर्ट ऑफीसच्या समोर घेण्यात येईल. हे शिबीर दिवाळी सुट्टी दरम्यान सकाळी ७.१५ ते ८.३० या वेळेत होईल. स्पीड स्केटींग शिक्षण दिव्यकांत गांधी देणार आहेत. शिबीरामध्ये स्केटिंग शिक्षण विनामुल्य देण्यात येणार आहे, स्केट व सामान जागेवरच उपलब्ध असतील. या शिबिरामध्ये साडे तीन वर्षावरील मुला-मुलींना प्रवेश घेता येणार आहे. दिवाळी सुट्टीचा आनंद घ्यावा व स्पर्धेसाठी सराव करावा, असे क्लबने आवाहन केले आहे.

तेरणा अभियांत्रिकी व ऑर्किड अभियांत्रिकीची विजयी सलामी

विभागीय फुटबॉल स्पर्धा

सोलापूर, दि.२७ ऑक्टोबर-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत सोलापूर विभागीय फुटबॉल स्पर्धेत सलामीच्या सामन्यात तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाने व्ही.व्ही.पी. महाविद्यालयाचा २-० असा पराभव केला. दुसऱ्या सामन्यात ऑर्किड महाविद्यालयाने ए. जी. पाटील महाविद्यालयावर २-० ने विजय मिळविला.

एन. के. ऑर्किड महाविद्यालय सोलापूर येथे टर्फच्या मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या धनश्री देशपांडे, मध्य रेल्वे टाईम स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटचे माजी सचिव सुदेश मालप यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास एस. मेतन, उपप्राचार्य व्ही. के. पत्की, रजिस्ट्रार सुहास शेळके, सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. सचिन गायकवाड, विभागीय स्पर्धा सचिव प्रा. शिवशरण कोरे हे प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. यु. के. जाधव यांनी केले.

शहरस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा

एन. पी. तायक्कान्दो अकॅडमीची २९ पदकांची कमाई

शालेय तायक्कान्दो स्पर्धेतील कामगिरी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

शालेय शहर तायक्कान्दो स्पर्धेत एन. पी. तायक्कान्दो अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी १४,१७ व १९ वर्षांखालील गटात १७ सुवर्ण, ९ रौप्य व ३ कांस्य अशी २९ पदकांची कमाई केली.

सुवर्णपदक विजेत्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना मुख्य प्रशिक्षक नेताजी पवार, प्रशिक्षक विश्वजीत मरबे यांचे मार्गदर्शन लाभले. जिल्हा तायक्कान्दो असोसिएशनचे अध्यक्ष आमदार शहाजी पाटील, तायक्कान्दो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओम्बासे, सचिव गफार पठाण, खजिनदार प्रसाद कुलकर्णी, व्यवस्थापन परिषद सदस्य सचिन गायकवाड, प्रमोद दौंडे, शिवराज मुंगळे, गुरुलिंग गगनहळली, प्राध्यापक संतोष गवळी, एन. पी. तायक्कान्दो अकॅडमीचे उपाध्यक्ष महादेव होमकर, सचिवा अरुणा राठोड, महिला प्रशिक्षिका वैष्णवी सुरवसे, लक्ष्मी पवार यांनी अभिनंदन केले.

कामगिरी केलेले खेळाडू

१४ वर्षे - मुले : सुवर्णः सार्थक खंदारे. मुली : अमृता कुंभार, पूर्वा घोडके, नंदिनी मगजी. कांस्य : स्वली भोसले.

१७ वर्षे- मुले : सुवर्ण : ऋषभ कोथिंबिरे, रुद्र शेलार. रौप्यः प्रसाद चाबुकस्वार. कांस्य : मुरली मेर्गु, साईनाथ धोत्रे. मुली : सुवर्ण : स्नेहा घोडके, निकिता डोके. रौप्य : खुशी माने, जानवी साठे, सोम्या कुंभार, लेखना कोला.

१९ वर्षे- मुले : सुवर्ण : समर्थ पवार, रुद्र इंगळे, पियुष कांबळे. रौप्य : विराज जाधव, अक्षय कुसळकर, जगदीश हिरकुरे. मुली : सुवर्ण : वैष्णवी कोरे, विद्या काळे, गायत्री मोठे, समीक्षा बंडा, आकांक्षा काकी, प्रज्ञा बिराजदार. रौप्य : मेधा नाईक.

तिसऱ्या फेरी अखेर मानांकित खेळाडू आघाडीवर

जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धेत स्वराली हातवळणे, साईराज घोडके, लिमकर वरद, सागर पवार, सार्थक उंबरे, ओम निरंजन, वेदांत मुसळे, वेदांत पांडेकर, वेदांत विहान, कोंगारी विहान, रंगरेज नयन, पाटील अभिराज, सानिध्य जमादार, तन्मय कदम, संस्कार अमृतकर, सक्षम गायकवाड हे मानांकित खेळाडू तिसऱ्या फेरी अखेर तीन पैकी तीन गुण मिळवून विजयाकडे घोडदौड करीत आहेत.

श्री रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत उस्मानाबाद बीड लातूर तुळजापूर सोलापूर ग्रामीण व शहर येथील खेळाडूंचा दीपावली चा सण असताना देखील उत्स्फूर्त प्रतिसाद लाभून दोन्ही गटात ३११ पेक्षा जास्त खेळाडूंनी अभूतपूर्व असा प्रतिसाद देऊन सहभाग नोंदवला आहे सकाळच्या सत्रात ७,९,११,१३,१७ व दुपारच्या सत्रात ८,१०,१२,१४,२४ या वयोगटात दोन बुद्धिबळ स्पर्धा संपन्न होत आहेत. यामध्ये एकूण प्रत्येक वयोगटातील खेळाडूंना प्रत्येकी १५ बक्षिसे देण्यात येणार आहेत अश्या १० गटात १५१ पेक्षा जास्त खेळाडूंना ट्रॉफी मेडल तसेच अठरा हजार रुपयाची रोख बक्षीसे देण्यात येणार आहेत. यापूर्वी अश्या प्रकार ची एवढ्या मोठ्या संख्येने भरपूर बक्षिसे असलेली बुद्धिबळाची स्पर्धा कधीही संपन्न झाली नाही या बुद्धिबळ स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून प्रशांत पिसे, इरांन्ना जमादार,सम्मेद हूल्ले, बिलानीसिद्ध बिराजदार, रोहित केशपाग,सौ.मंगल हूल्ले व हरिओम नाईक हे पंच मंडळ ही स्पर्धा उत्कृष्ट होण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

बुध.३० ऑक्टो. सायं.७वा., हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
आरती दीक्षित प्रस्तुत
दिवाळी पूर्वसंध्या
नक्षत्रांचे गाणे
मराठी चित्रपट गीत, भाव भक्ति गीते
गायक : आरती दीक्षित
धनंजय पवार, मोहिनी पवार
निवेदन : आकाश सोळंकी
वाद्यवृंद : विजय पाटणकर आणि टिम
देणगी प्रवेशिका ₹ 100/200
शो साठी संपर्क : आरती दीक्षित-९८२२७०९७३०, शिवाजी उपरे-९६२३००४२९९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

No.1 Mithai & Namkin Shop in Solapur
शर्मा स्विट्स
सात रस्ता
०२१७-२७४९६०२
सण कोणताही असो मिठाई फक्त शर्मा स्विटसचीच खास दिपावली सणासाठी शर्मा स्विटस् व बृजवासी नमकिन मिठाई घेवून येत आहे
बृजवासी नमकिन व मिठाई
९७ मुरारजी पेठ, प्रभात टाकिज शेजारी
- ड्रायफ्रूड गिफ्ट बॉक्स
- सर्व प्रकारची मिठाई गिफ्ट बॉक्स
- मिक्स मिठाई
- दिपावलीसाठी सर्व फराळ पदार्थ

शुध्दता जपणारी, सौंदर्य वाढविणारी कलाकुसर
साजरी करु आनंदाची दिवाळी,
त्याला शुध्दोहमूच्या दागिन्यांची झळाळी
धनत्रयोदशीनिमित्त सर्व ग्राहकांना हार्दिक शुभेच्छा..!
१९९५ पासून शुध्दोहम् ज्वेलर्स
कुबेर गल्ली, टिळक चौक, सोलापूर
फोन - २७२५३५०

बार्शी अन् सांगोल्यात दोन्ही 'शिवसेने'त फाईट

● राजा राऊत विरुध्द दिलीप सोपल, शहाजीबापू विरुध्द दिपकआबा मैदानात; तिसऱ्यामुळेही चुरस

तभा वृत्तसेवा

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

महाराष्ट्राचे राजकारणात सातत्याने वेगळ्या वळणावर जात असताना सोलापूर देखील याला कसा अपवाद असणार आहे. बार्शी विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे सहयोगी कार्यसम्राट आमदार राजा राऊत यांनी रात्रीतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश करत हाती धनुष्यबाण घेतल्याने आता या मतदारसंघात त्यांचा मुकाबला ठाकरे सेनेचे दिलीप सोपल यांच्यात होणार आहे. तसेच सांगोल्यात देखील राष्ट्रवादीचे दिपकआबा साळुंखे यांनी ठाकरे सेनेत प्रवेश केल्याने त्यांचा सामना आता शिंदे सेनेचे पाणीदार आमदार शहाजीबापू साळुंखे यांच्याबरोबर होणार आहे. सांगोल्यात शेकापचे बाबासाहेब देशमुख देखील मैदानात उतरणार असल्याने निवडणुकीत चुरस असणार आहे. तर बार्शीत अद्याप तिसरा कोण हे समोर आलेले नाही. कारण जरांगे आणि छत्रपती संभाजीराजेंच्या तिसऱ्या आघाडीने अद्याप आपले पत्ते ओपन केलेले नाहीत.

राजकारणातील वारंवार बदलत्या घटनांमुळे जिल्ह्याच्या राजकारणातही सातत्याने उलटफेर पहावयास मिळत असून कोण, कधी कोणत्या पक्षात असेल आणि कोण कोणत्या पक्षाच्या चिन्हावर निवडणुकीच्या मैदानात उतरणार हा राजकीय खेळ स्पष्ट होण्यासाठी सत्ता कोणाची ठरविण्याचा अधिकार असलेल्या मतदारांना उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या तारखेची म्हणजेच ४ नोव्हेंबरची वाट पहावी लागणार आहे.

जिल्हयातील राजाकारणात गेल्या काही वर्षात झालेल्या राजकीय वाताहतीमुळे तसेच सोलापूरला कोणतेही सक्षम राजकीय नेतृत्व न राहिल्यामुळे सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या राजकारणातून दूर फेकला गेल्याचे चित्र आहे. लोकसभा निवडणुकीत सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने महायुतीला पराभूत केल्यानंतर महाविकास आघाडीतील घटक पक्षांचा आत्मविश्वास काहीसा वाढला आहे. पण महाविकास आघाडीतील नेत्यांच्या हेकेखोरपणा मुळे आघाडीतील उमेदवारांच्या या निवडणुकीत अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कारण मतभेद मिटल्याचे वातावरण असले तरी मनभेद मिटल्यासारखे वाटत नसल्याचे चित्र आहे.

प्रशांत माने
मो. ९८८११९१४४३

बार्शी विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार राजेंद्र राऊत यांनी प्रचंड विकासकामे केल्यामुळे बार्शीकर खुष आहेत. राऊत यांच्यासमोर



ठाकरे सेनेचे सोपल मैदानात असून यंदा शिवसेनेच्या दोन गटातच सामना रंगणार आहे. बार्शीकर धनुष्यबाण हातात घेतात का मशाल पेटवतात याची उत्सुकता सर्वांनाच आहे.

सांगोल्याला पाण्याची गंगा आणणारे पाणीदार आमदार म्हणून शिंदे शिवसेनेचे उमेदवार शहाजी पाटील यांच्यासमोर राष्ट्रवादीतून ठाकरे सेनेते आलेले माजी आमदार दिपकआबा साळुंखे यांच्या हाती मशाल देत ठाकरेंनी त्यांना मैदानात उतरवले आहे. शिवसेनेच्या दोन्ही गटात येथे लढत असली तरी शरद पवार आणि विजयसिंह मोहिते-पाटील यांचा पाठिंबा असणारे शेकापचे बाबासाहेब देशमुख यांचेही सांगोल्यात आवाहन असणार आहे. सांगोल्यात तिहेरी लढत पहावयास मिळणार असल्याचे सामना चुरशीचा होणार आहे. अक्कलकोटमध्ये आ. सचिन कल्याणशेट्टींना यंदा काँग्रेसचे माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे यांचे तगडे आवाहन आहे. शहर उत्तरमध्ये आ. विजयकुमार देशमुख आणि महेश कोठे यांच्यात सामना रंगणार आहे. मनसेचे प्रशांत इंगळेही येथे नशिब आजमावत आहेत. दक्षिण सोलापूरमध्ये भाजपाचे सुभाष देशमुख यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे चित्र आहे. तर महाविकास आघाडीतील घटक पक्ष काँग्रेसचे दिलीप माने आणि ठाकरे सेनेचे अमर पाटील यांच्यात मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता आहे. मनसेचे महादेव कोगनुरे, मार्ग फाऊंडेशनचे संतोष पवार, ओबीसीचे युवा नेतृत्व सोमेश वैद्य यांनी देखील दक्षिणमध्ये दंड थोपटले असल्याने यंदा या मतदारसंघात रंगतदार लढत पहावयास मिळणार आहे.

मोहोळमध्ये अजित राष्ट्रवादीच्या यशवंत माने यांच्यासमोर शरद राष्ट्रवादीने माजी आमदार रमेश कदम यांची कन्या रिध्दी या युवतीला उमेदवारी दिल्याने प्रत्यक्षात मोहोळमध्ये पवार काका-पुतण्या अशीच लढत असल्याचे चित्र आहे. पंढरपूर-मंगळवेढ्यात भाजपाचे विद्यमान आमदार समाधान आवताडे यांच्यासमोर काँग्रेसने भगीरथ भालके यांना मैदानात उतरवले आहे. तर मनसेचे दिलीप धोत्रेही रिंगणार आहेत. माळशिरसमध्ये शरद राष्ट्रवादीकडून उत्तम जानकर तर भाजपाने पुन्हा आमदार राम सातपुते यांनाच मैदानात उतरवले आहे. करमाळ्यात शरद राष्ट्रवादीने नारायणआबा पाटील यांच्या हाती तुतारी दिली तर विद्यमान अपक्ष आमदार संजयमामा शिंदे हे कोणत्या चिन्हावर लढणार ते अद्याप स्पष्ट नाही. तर महायुतीकडून शिंदे सेनेने दिग्विजय बागल यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

माढ्याचा तिढा आता सुटणे क्रमप्राप्त असून महायुती आणि महाविकास आघाडीकडून कोण हे समोर येणार आहे. दरम्यान विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांनी पुन्हा घड्याळाची उमेदवारी घेण्याचे नाकारले असून त्यांचा ओढा तुतारीकडे आहे. पण पवार काका काही बबनदादांच्या हाती तुतारी देण्यास तयार नाहीत कारण यासाठी बबनदाद शिंदेंना मोहिते-पाटील यांची नाहरकत मिळणे गरजेचे आहे. अभिजित पाटील यांची भूमिका काय ते देखील महत्वाचे ठरणार आहे. सात टर्म आमदार राहिलेल्या बबन शिंदे यांना मुलगा रणजितभैय्या शिंदे याच्या हाती तुतारी देण्यासाठी पायपीट करावी लागत असून ते मुलाला अपक्ष लढविण्यावर देखील ठाम आहेत. माढ्यात कोणत्या उमदेवारांमध्ये लढत होणार याकडे संपूर्ण माढा वासियांचे लक्ष तर लागले पण जिल्ह्याचेही लक्ष लागलेले आहे.

दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860

दिवाळी आली दिवाळी आली
फराळ आणा घरी
दिवाळी फराळ पॅक
गृहिणीसाठी खास
- किफायतशीर
- निर्जंतुक
- निर्भेळ घटक पदार्थ
- उत्कृष्ट पारंपारिक चव
- आरोग्याची योग्य दक्षता
2 किलो छोटा फॅमिली पॅक
4 किलो मोठा फॅमिली पॅक
मिठाई बुकिंग ची ...करा घाई
दिवाळी गिफ्ट पॅक
Standard Gift
- ड्रायफ्रुट गिफ्ट
- ड्रायफ्रुट मिठाई गिफ्ट
- स्पे.मिठाई गिफ्ट
- इकानॉमी मिठाई गिफ्ट
- रेग्युलर मिठाई गिफ्ट
- काजू कतली स्पे.गिफ्ट
Corporate Gift
- कॉर्पोरेट गिफ्ट
- Exclusive Gift
- Executive Gift
- International Gift
दिवाळी 2024 भव्य बक्षिसांची मालिका
दुबई टूर बक्षिसे 2 रु.50 000 वरील खरेदीवर 1 कुपन
सोन्याची नाणी बक्षिसे 2 रु. 20000 वरील खरेदीवर 1 कुपन
चांदीची नाणी बक्षिसे 100 रु. 5000 वरील खरेदीवर 1 कुपन
रक्षाबंधन ते दिवाळी भाऊबीज दरम्यान च्या खरेदीवर
लकी ड्रॉ पध्दतीने सोडत दिनाक 1 डिसेंबर 2024
- नियम व अटी लागू
- तिवाडी अन्नपूर्णा चा निर्णय अंतिम असेल.
- त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही
Dubai
* ही योजना फक्त सोलापूर जिल्हापुरतीच मर्यादित आहे
घरोघरी अन्नपूर्णा मिठाई
Choice of New Generation
धनत्रयोदशी
धन्वंतरी पूजनाने आरोग्योत्सवास प्रारंभ
॥ आमची संस्कृती आमचा अभिमान ॥
सन्माननीय ग्राहकांना लक्ष लक्ष्य शुभेच्छा
100% Premium Quality आरोग्यसंपन्न मिठाई
सततचे संशाधन आणि कठोर परिश्रम यामुळे स्पर्धात्मक गुणवत्तेबाबत सतर्क आहोत.
म्हणूनच १९८१ पासून कायम आघाडीवर आहोत.
सोलापुरात ७१.४ % ग्राहक आमचा
तिवाडी अन्नपूर्णा हा ब्रान्ड श्री.नंदकिशोर तिवाडी यांनी शुन्यातून विकसित केला.
सोलापूर येथे ९ आउटलेट्स व पुण्यात १ आउटलेट, तसेच सोलापूर व पुणे येथील २ अद्ययावत कारखाने.
ग्राहकांचे आरोग्य, काळजीपूर्वक स्वच्छता आणि ताजेपणा याबाबत आग्रही आहोत.
समर्थ ॲडस्
तिवाडी यांची
Since 1981
वर्षानुवर्षांचे टेस्ट रेकॉर्ड
अन्नपूर्णा Mithai ®
सोलापूर ◆ पुणे
जगात कोठेही पार्सल डिलिव्हरी साठी DTDC ची सोय
AVAILABLE AT OUR FACTORY OUTLETS
SOLAPUR FACTORY OUTLET 999 6032 999 | PARK STADIUM 969798 7541 | CHATI GALLI 969798 7543 | SAAT RASTA 969798 7542 | VIJAPURRD 969798 7538 | ASARA BHAJI MANDAI 969798 7539 | PUNE NAKA 969798 7540 | SAIFUL 969798 9095 | KARNIK NAGAR 9623230895
PUNE KOTHRUD 969798 5539
SUGGESTIONS BAJAJ 94 058 42 031

संक्षिप्त वृत्त

दक्षिण सोलापूरमधून मीनाक्षी टेळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

मंद्रुप, दि. २८ ऑक्टोबर-

राष्ट्रटवादी अजित पवार गटाच्या महिला जिल्हा कार्याध्यक्षा मिनाक्षी टेळे यांनी सोलापूर दक्षिण विधानसभेसाठी उमेदवारी दाखल केली. यावेळी त्यांच्यासमवेत मोठया प्रमाणात महिला उपस्थित होत्या. दक्षिणमधून टेळे या इच्छुक असणार्या एकमेव महिला आहेत. यावेळी मीनाक्षी टेळे म्हणाल्या की, दक्षिणमध्ये महिला असुरक्षित आहेत. महिलांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे म्हणून महिलांना स्वावलंबी बनविण्याला प्राधान्य देणार आहे. रस्त्यांची दयनीय अवस्था असून आमदारांचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे. शेतकऱ्यांचे विविध समस्या आहेत. तरूण बेरोजगार असून लोकप्रतिनिधींचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे. मतदारांच्या सहकार्याने निवडणूक जिंकणार असल्याचे टेळे म्हणाल्या.

चंद्रकांत ख्याडे यांची उमेदवारी दाखल

मंद्रुप, दि. २८ ऑक्टोबर-

मंद्रुपचे भाजीपाला व्यापारी चंद्रकांत दौला ख्याडे यांनी सोलापूर दक्षिण विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारी दाखल केला. चंद्रकांत ख्याडे मतदारांच्या सहकार्यामुळे विधानसभा व लोकसभा निवडणुकीत ११ वेळा निवडणुक लढविली आहे. दक्षिण सोलापूर व मंद्रूपच्या विकास डोळ्यासमोर ठेवून काम करणार असून मतदारसंघाच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे ख्याडे म्हणाले.

सांगोल्यात पाचव्या दिवशी १३ नामनिर्देशन पत्रांची विक्री

सांगोला, दि.२८ ऑक्टोबर-

सांगोला विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्याच्या सलग पाचव्या दिवशी सोमवारी दि.२८ ऑक्टोबर रोजी ९ उमेदवारांनी १३ अर्जाची खरेदी केली.तसेच २० उमेदवारांनी अर्ज दाखल केले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी भैराप्पा माळी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांनी दिली. संजय पाटील, किरण साठे, हरिश्चंद्र चौगुले, मोहन राऊत, एकनाथ शेंबडे, धरती पवार, अतुल पवार, सुदर्शन घेरडे, रणसिंह देशमुख यांनी अपक्ष तर बाबासाहेब देशमुख शेकाप-२, अनिकेत देशमुख शेकाप-१, अपक्ष-१, दीपक साळुंखे शिवसेना-१, अपक्ष-२, धनाजी पारेकर स्वराज्य निर्माण सेना, शहाजी पाटील शिवसेना-२, रेखाबाई पाटील शिवसेना याप्रमाणे नामनिर्देशन पत्र दाखल झालेचे मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी सांगितले.

माळशिरस शहर परिसरामध्ये वसुबारस मोठ्या उत्साहात साजरी

सदाशिवनगर, दि. २८ ऑक्टोबर-

माळशिरस परिसरात वसुबारस मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.आश्विन वद्य द्वादशी ही गोवत्स द्वादशी म्हणजे वसुबारस म्हणून प्रसिद्ध आहे. गाई वासराची पूजा करून खरीप पिकाचा घास खायला देण्यात आला. प्राचीन काळापासून हिंदू लोक गाईला पवित्र मानतात. तिला गोमाता ही म्हणतात. तिच्या मध्ये ३३ कोटी देव असल्याची भावना आहे. घरात लक्ष्मीचे आगमन व्हावे या हेतूने सवत्स धेनूची पूजा करण्याची परंपरा आहे.

शहीद मेजर कुणाल गोसावी प्रतिष्ठानतर्फे वसुबारस साजरी

पंढरपूर, दि.२८ ऑक्टोबर-

शहीद मेजर कुणाल गोसावी प्रतिष्ठान पंढरपूर यांच्या वतीने यावर्षी दीपावली सणाच्या औचित्य साधून दीपावलीच्या प्रथम दिवस वसुबारस या दिवशी श्री केशव गोशाळा , शेगाव दुमाला येथील गोशाळा येथे गौमातेची पूजन व त्यास चारा देऊन साजरा करण्यात आला. दरम्यान वसुबारस कार्यक्रमास गोशाळेचे अध्यक्ष नंदकिशोर मर्दा, सदस्य किसगोपालजी भट्टड तसेच तेथील व्यवस्थापक श्याम जी कुदाळ आदींसह शहीद मेजर कुणाल गिरगोसावी प्रतिष्ठान अध्यक्ष मुन्नागिरी गोसावी, उपाध्यक्षा वृंदादेवी गोसावी, अनिष गोसावी, अंशुल गोसावी, अनमित्रा गोसावी आदींसह प्रतिष्ठानचे अन्य सदस्य उपस्थित होते.

मोहोळच्या महाविकास आघाडीत बिघाडीचे चिन्ह

समविचारी नेत्यांनी घेतली बारामतीत शरद पवारांची भेट; सिद्धी कदमांच्या उमेदवारीला विरोध

तभा वृत्तसेवा,
मोहोळ, दि. २८ ऑक्टोबर-

जवळजवळ तीन आठवड्यांचा सस्पेन्स संपवत महाविकास आघाडीचे तिकीट सिद्धी रमेश कदम यांना घोषित झाल्यानंतर महाविकास आघाडीमध्ये बंडाळीचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिक शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार गट) आणि इतर सर्व समविचारी नेते मंडळींनी मिळून सोमवारी सकाळी शरद पवार यांची भेट घेण्यासाठी थेट बारामतीत गोविंदबाग गाठली आणि सिद्धी कदम यांच्या उमेदवारीला जोरदार विरोध दर्शवला.

महायुतीकडून विद्यमान आ. यशवंत माने यांना यापूर्वीच उमेदवारी घोषित

झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर विरोधी महाविकास आघाडीची उमेदवारी कोणाला मिळते याकडे सर्वांचे लक्ष होते. यासाठी भाजपमधून राष्ट्रवादीत गेलेले लोकसेवक संजय क्षीरसागर, राजाभाऊ खरे यांच्या नावाची चर्चा सुरू असतानाच अचानकपणे याच मतदारसंघाचे माजी आमदार रमेश कदम यांच्या कन्येला शरदचंद्र पवार गटाचे तिकीट जाहीर झाले आणि सगळ्यांना आश्चर्याचा धक्का बसला. वास्तविक अनगर येथे अप्पर तहसील कार्यालय झाल्याच्या निर्णयापासून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी आमदार राजन पाटील आणि विद्यमान आमदार यशवंत माने यांच्या विरोधात तालुक्यात वातावरण प्रचंड तापले आहे. मोहोळ तालुका संघर्ष बचाव समिती स्थापन करून या दोघांच्या विरोधातील सर्व पक्षाची प्रमुख नेतेमंडळी एकत्र आली आहेत. काही काळ बंद पाळला, बरीच गावे बंद ठेवली आणि चार जणांनी आमरण उपोषण केले. यामुळे विद्यमान आ. यशवंत माने यांना ही निवडणूक जड जाईल. फक्त विरोधातला उमेदवार स्ट्राँग असावा अशी अपेक्षा सर्वसामान्य मोहोळकरांमध्ये होती. तथापि अचानक सिद्धी कदम यांचे नाव पुढे आले आणि मग संतापलेल्या राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार गटा)चे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, उबाठा शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख दीपक गायकवाड, महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका सीमा पाटील, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी मुख्य प्रवक्ते उमेश पाटील, जि. प. बांधकाम व अर्थ समितीचे माजी सभापती विजयराज डोंगरे या आघाडीकडून तिकिटाचे प्रबळ दावेदार असलेले संजय क्षीरसागर यांचे थोरले बंधू २०१९ मध्ये विधानसभा निवडणूक लढवली, ते नागनाथ क्षीरसागर, सोमेश क्षीरसागर, उबाठा शिवसेनेचे युवा सेना जिल्हाप्रमुख महेश देशमुख, माजी उपसभापती मानाजीबापू माने आणि बाळासाहेब गायकवाड, मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर या सर्वांनी सोमवारी सकाळी बारामती येथे जाऊन शरदचंद्र पवार यांची भेट घेतली आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये सिद्धी कदम यांना दिलेले तिकीट बदलण्याची जोरदार मागणी केली. सोमवारी आनंद नरसिंह आखाडे, वैशाली अरविद बनसोडे, सिद्धी रमेश कदम, माजी आ. रमेश नागनाथ कदम, अमोल राजाराम नाईकनवरे (अपक्ष), ॲड. देवेंद्र बळीराम वाळके यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे सोमवार अखेर ९ उमेदवारांनी आणि ११ अर्ज दाखल केल्याचे माहिति मिळाली. उद्या मंगळवार हा अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. या दिवशी संजय क्षीरसागर हे पण अर्ज दाखल करणार आहेत असे समजते.

पवार म्हणाले, जयवंतरावांशी चर्चा करा

शरद पवारांकडे संजय क्षीरसागर, त्यांचे पुतणे सोमेश क्षीरसागर आणि राजू खरे यांना तिकीट देण्याची आग्रही मागणी करण्यात आल्याचे समजते. मात्र शरद पवार यांनी याविषयी वेळ थोडा आहे. प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्याशी चर्चा करा, असे सांगितल्याचे समजले. तथापि रात्री उशिरापर्यंत याविषयी काहीही तोडगा निघाला नव्हता असे समजले. दरम्यान

सिद्धी कदमांचा अर्ज भरण्यासाठी खा. सुप्रिया सुळे येणार

मंगळवारी विद्यमान आमदार यशवंत माने हे महायुतीचे उमेदवार म्हणून अर्ज दाखल करणार आहेत. यापूर्वी त्यांनी यापूर्वी त्यांनी गुरुपुष्यामृतचा मुहूर्त साधून आ. माने यांनी अर्ज दाखल केला आहे, तर सिद्धी कदम यांचा अर्ज भरण्यासाठी राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार गटा) च्या खा. सुप्रिया सुळे या मोहोळमध्ये येणार असल्याचे चर्चा सुरू आहे. एकीकडे त्यांच्या उमेदवारीला विरोध आणि दुसरीकडे सुप्रियाताईंचे आगमन यामुळे उद्यापर्यंत काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आ. शहाजीबापू पाटील यांनी शक्तिप्रदर्शन करत महायुतीचा उमेदवारी अर्ज केला दाखल

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.२८ ऑक्टोबर-

सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आ.शहाजीबापू पाटील यांनी शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज सोमवारी दाखल केला.

यावेळी ॲड. उदयबापू घोंगडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, माजी नगराध्यक्ष रफिकभाई नदाफ, शिवसेनेचे तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी सांगोला शहरात मोटारसायकल रॅली काढण्यात आली. रॅलीनंतर शिवतीर्थ येथे सभा घेण्यात आली. यावेळी सुभाष इंगवले, राणी माने, दादासाहेब लवटे, शंकर दुधाळ, श्रीकांत देशमुख, डॉ.विजय बाबर, नवनाथ पवार, ड.बंडू काशीद, धोंडीराम घोलप, दीपक ऐवळे, शिवाजी पवार, शिवाजी गायकवाड, धनाजी पवार, धनंजय चव्हाण, विकास वलेकर, श्रीकांत पाटील यांनी मनोगतात राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्रीपदाची संधी देण्यासाठी आ. शहाजीबापू पाटील यांना विजयी करून नामदार करण्यासाठी ही विधानसभा निवडणूक चुरशीची ठरणार आहे. यामध्ये गाफिल न राहता बापूंच्या कार्यकर्तृत्वावर व केलेल्या कामावर खुश होऊन मोठ्या मनाने बापूंना भरघोस मतांची आघाडी देऊया असे मत व्यक्त केले.

या सभेसाठी सागर पाटील, दिग्विजय पाटील, चेतनसिंह केदार सावंत, आनंदा माने, माऊली तेली, अस्मिर तांबोळी, कीर्तीपाल बनसोडे, आनंद घोंगडे, अरुण बिले, अच्युत फुले, विजय शिंदे, समीर पाटील, जगदीश पाटील, गुंडादादा खटकाळे, धनंजय काळे, अभिजीत नलवडे, रविराज शिंदे, बाळासाहेब आसबे, भारत चव्हाण, अजिंक्य शिंदे, समाधान सावंत, सोमेश्वर यावलकर, आयुब मुलाणी, दीपक दिघे उपस्थित होते.यावेळी आ.शहाजीबापू पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून फिरोज खाटीक, भाऊसाहेब नवले, अल्ताफ मुलाणी, सद्दाम मुलाणी, बशीर मुलाणी, हणमंत येलपले, विनायक पवार यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला.

> उद्याची विधानसभा निवडणूक ही सर्वसामान्यांच्या विकासासाठी आहे. तालुक्यातील प्रत्येक घरातील व्यक्ती समृद्ध करण्याचे माझे ध्येय आहे.सांगोला तालुका हिरवागार होईपर्यंत हा शहाजीबापू पाटील स्वस्त बसणार नाही.उद्याच्या विधानसभा निवडणुकीत प्रचंड मतांनी मला विजयी करावे मी तालुक्यात नामदार म्हणूनच परत येईन. **-आ. शहाजीबापू पाटील**

किशोर पवार यांच्या उमेदवारीसाठी मोहोळ काँग्रेसच्या बैठकीत आग्रह

तभा वृत्तसेवा,
मोहोळ, दि.२८ ऑक्टोबर-

मोहोळ काँग्रेसच्या बैठकीमध्ये किशोर पवार यांच्या उमेदवारीबाबत चर्चा करण्यात आली. यासाठी पदाधिकाऱ्यांनी आग्रहही धरला.

लोकसभेमध्ये चांगली मते मिळाल्यामुळे काँग्रेसला ही जागा सुटावी अशी ही मागणी करण्यात आली होती. मोहोळमधून काँग्रेस शहराध्यक्ष किशोर पवार यांनी अर्ज भरावा, असा ठराव मांडण्यात आला. त्याचे अधिकार माजी सभापती बाबासाहेब क्षीरसागर, सिद्धेश्वर कारखान्याचे माजी संचालक सुभाष पाटील, भीमा कारखान्याचे माजी संचालक सुरेश शिवपुजे, सिद्राम पवार यांना देण्यात आले. बैठकीमध्ये अनेक ठराव मांडण्यात आले. वरिष्ठांशी चर्चा झाल्याशिवाय कुठलाही निर्णय घ्यायचा नाही तसेच मोहोळ तालुक्यात सर्वांनी केलेल्या कामामुळे लोकसभेत चांगला लीड मिळाला म्हणून सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष रियाज शेख, शिवसेनेच्या माजी तालुकाध्यक्ष उषा कोकाटे यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश त्याचप्रमाणे तसेच अभिजीत नेटके, सोशल मीडिया अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अविनाश कांबळे यांची सत्कार करण्यात आला. महिला जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शाहीन शेख, जिल्हा काँग्रेस उपाध्यश मुन्ना हरणमारे, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष बिलाल शेख, महिला कार्याध्यक्ष रतन कसबे, शहराध्यक्ष किशोर पवार, अंजली वस्त्रे, बिराजसाहेब खरात, नानासाहेब मोरे, अभिजीत नेटके, रामचंद्र पाटील, महादेव शिंदे बाबासाहेब मुजावर, ज्ञानदेव कदम, दमन चव्हाण, युवराज रणदिवे, सुनील टिळेकर, अमोल मोरे, हरिभाऊ गायकवाड, आकाश कांबळे, रमेश भोसले, नवनाथ मोरे, अतुल मोरे, तुकाराम पाटील, सदाशिव पवार, महेश काटे आदी उपस्थित होते.

शिवसेनेकडून अमर पाटील यांचा शक्तीप्रदर्शनाने उमेदवारी अर्ज

तभा वृत्तसेवा,
मंद्रुप, दि. २८ ऑक्टोबर-

शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी सोमवारी मतदारसंघातील कार्यकर्त्यांसह रॅली काढून व शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

शहर आणि मतदारसंघाच्या ग्रामीण भागातील समर्थकासह सोरेगावचे एजी पाटील तांत्रिक महाविद्यालय येथून शिवसेना उपनेते शरद कोळी यांच्या कार्यालयापर्यंत मोटरसायकल रॅली काढण्यात आली. यावेळी उमेदवार अमर पाटील यांच्यासह माजी आमदार रतिकांत पाटील, माजी मंत्री उत्तम प्रकाश खंदारे, उपनेते शरद कोळी, जिल्हा संपर्क प्रमुख पुरूषोत्तम बरडे, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख प्रिया बसवंती, अस्मिता गायकवाड आदी उपस्थित होते. सात रस्ता, रंगभवनमार्गे दक्षिण सोलापूर तहसीलदार कार्यालयापर्यंत उघड्या रथातुन शक्तीप्रदर्शन करण्यात आला. याप्रसंगी रविकांत कांबळे, धर्मराज बगले, योगीराज पाटील, सोमनिंग विरदे, महानिंगप्पा बिराजदार, भीमाशंकर म्हेत्रे, राजू बिराजदार, संतोष पाटील, बालाजी चौगुले, शरणराज केंगनाळकर, राहुल गंदूरे, संदिप मेंडगुदले, संतोष बरूरे, सिध्दाराम काळे आदि उपस्थित होते.

सहकार्य करण्याचे आवाहन

महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार म्हणून शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी पक्षाची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे जनतेच्या आशीर्वादावर विधानभवनावर मशाल पेटविण्यासाठी जिवाचे रान करून व रात्रीचे दिवस करणार आहे. दक्षिणच्या विकासासाठी मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन अमर पाटील यांनी केले.

श्रीशैल हत्तुरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा,
मंद्रुप, २८ ऑक्टोबर-

महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे यांनी सोलापूर दक्षिणसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.

हत्तुरे भाजपाकडून विधानसभेसाठी इच्छुक होते. मात्र त्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी कार्यकर्त्यांसह उमेदवारी अर्ज दाखल केला. हत्तुरे यांनी भाजपामध्ये बंडखोरी करू नये म्हणून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. मात्र २०१९ मधील निवडणुकीचा अनुभव पाहता माघार घेणार नसल्याचे सांगत भाजपमध्ये बंडखोरी करून उमेदवारी दाखल केला आहे. यावेळी नगरसेवक वैभव हत्तुरे, रेवणसिध्द सिंदखेडे, बसवराज पनशेट्टी, कामशेट्टी, महेश हत्तुरे, संजय हत्तुरे, सिद्धाराम चिवडशेट्टी, नागेश पाटील, अप्पासाहेब शिळे, सचिन कोठाणे, विरेश हत्तुरे, परमेश्वर मलाड, रितेश हत्तुरे, निंगय्या स्वामी, प्रतीक विजापुरे, शिवराज कोठाणे, रवी पारशेट्टी, कार्यकर्ते उपस्थित होते.

जनतेच्या आशीर्वादामुळे विधानभवनात जाणार

हद्दवाढ भागातील समस्या सोडविण्यासह शेतकऱ्यांचे पाणी व वीज प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. दक्षिणमध्ये मोठ्या प्रमाणात समस्या असून त्या सोडविण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा करणार असून मतदारांच्या आशीर्वादावर विधानसभेत पोहोचणार असल्याचे श्रीशैल हत्तुरे यांनी सांगितले.

अक्कलकोट विधानसभेसाठी काँग्रेस, रासपा, वंचितसह १० अर्ज दाखल

भाजपाचे आ. सचिन कल्याणशेट्टी आज दाखल करणार अर्ज

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. २८ ऑक्टोबर-

अक्कलकोट विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीमध्ये आता अधिक रंगत येत चाललेली आहे. अर्ज भरण्याच्या अंतिम दिवस मंगळवार आहे. सोमवारी काँग्रेस, रासपा, वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टीसह दहा उमेदवारांनी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत बनसोडे यांच्याकडे सादर केला. दक्षिण सोलापूर मतदारसंघात आघाडीमध्ये बिघाडीची चिन्हे दिसत असल्याने अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात याचे पडसाद उमटणार या चर्चेवर मंगळवारी दुपारी ३ नंतर पडदा पडणार का? हे स्पष्ट होणार आहे. आज आ. सचिन कल्याणशेट्टी हे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

काँग्रेसच्या वतीने माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांचा उमेदवारी अर्ज भरतेवेळी काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये बँजो, पारंपरिक वाद्य हालगी, युवकांचा प्रचंड उत्साह दिसून आला. या रॅलीत कार्यकर्त्यांनी हातामध्ये झेंडे घेऊन सहभाग नोंदवला. उमेदवार माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केले.

प्रमिला पार्क येथील काँग्रेस भवन या ठिकाणाहून ही रॅली एस. टी स्टॅन्ड, विजय कामगार चौक, कारंजा चौक, सावरकर चौक, मेन रोड, फतेसिंह चौक, कमलाराजे चौक, ए-वन चौकमार्गे काँग्रेस कार्यालय येथे सभा झाली.

सोमवारी अक्कलकेट शहरात अक्षरक्षः जत्रा भरल्यागत लोकांची गर्दी होती. मंगरुळे चौक ते कांदा बाजार, प्रमिला पार्क, कमलाराजे चौक, बसस्थानक परिसर, स्टेशन रोड या परिसरात वाहनांच्या रांगा होत्या. शहरातील वागदरी रस्ता, मैंदर्गी रस्ता, बासलेगाव रस्ता, निमगाव रस्ता, हसापूर रस्ता, जेऊर-स्टेशन रोड या ग्रामीण भागाकडे जाणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर, अक्कलकोट शहराबाहेर कार्यकर्ते वाहने थांबवून होती. येथून हालगी वाजत गाजत येत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये सहभागी होत होते.

यांनी दाखल केले अर्ज

सोमवारी वंचित बहुजन आघाडीचे संतोषकुमार इंगळे, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून सिद्धाराम म्हेत्रे, शितल सिद्धाराम म्हेत्रे, पूजा पाटील (अपक्ष), लक्ष्मी गंगधर चव्हाण (अपक्ष), शिवनिंगप्पा वंगे (अपक्ष), प्रसाद बाबानगरे (अपक्षा), राष्ट्रीय समाज पक्षाकडून सुनिल बंडगर, विठ्ठल आरेनवरू (बहुजन समाज पार्टी), बहुजन समाज पार्टीकडून इकरार अहमद हसनसाहेब शेख आदी दहा उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. मंगळवार २९ रोजी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

दक्षिणमध्ये विविध पक्षांसह ११ उमेदवारी अर्ज दाखल

तभा वृतसेवा,
मंद्रुप, दि. २८ ऑक्टोबर-

सोलापूर दक्षिण विधानसभेसाठी शिवसेना उबाठा, वंचित बहुजन आघाडी व मनसेकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महायुतीतील मित्रपक्षाच्या राष्ट्रवादी पक्षाच्या इच्छुकांनीही उमेदवारी दाखल केला.

यावेळी शिवसेना उबाठाकडून अमर पाटील, मनसेकडून महादेव कोगनूरे, वंचितकडून संतोष पवार, एमआयएम अझहर हूंडेकरी, रासपकडून उमेश काळे, अपक्ष म्हणून श्रीशैल हत्तुरे, मिनाक्षी टेळे, शेखर बंगाळे, सोमेश वैद्य, बाळासाहेब बंडगर, चंद्रकांत ख्याडे आदिंनी उमेदवारी दाखल केला. यावेळी शिवसेना उबाठा पक्षाकडून मोठया प्रमाणात शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मनसेचे महादेव कोगनुरे व वंचितचे संतोष पवार यांनीही दुचाकी रॅली व कार्यकर्त्यांच्या फौजफाटयासह उमेदवारी अर्ज दाखल केला. तर अपक्ष श्रीशैल हत्तुरे, सोमेश वैद्य, बाळासाहेब बंडगर, मिनाक्षी टेळे व शेखर बंगाळे आदिंनी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

महिलेचा एकच अर्ज

अजित पवार गटाच्या महिला राष्ट्रवादीच्या मिनाक्षी टेळे यांनी सोलापूर दक्षिणसाठी एकमेव अर्ज दाखल केला. दक्षिणमध्ये एकमेव महिला इच्छुक आहेत. मतदारसंघाच्या विकासासाठी विधानसभा लढवित असल्याचे टेळे यांनी सांगितले.

वैद्यांचे तीन अर्ज

अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या सोमेश वैद्य यांनी तीन अपक्ष अर्ज दाखल केला आहे. तर भाजपकडून इच्छुक असल्याने मंगळवार २९ ऑक्टोबरपर्यंत दुपारी ३ वाजेपर्यंत पक्षाच्या एबी फॉर्मची प्रतीक्षा करीत असल्याचे वैद्य यांनी सांगितले.

मोहिते-पाटलांनी दिलेला शब्द पाळला

- जयसिंह मोहिते-पाटील यांचे प्रतिपादन
- मोटरसायकल रॅली काढून उत्तम जानकरांचा अर्ज दाखल
- खा. सुप्रिया सुळे, खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची उपस्थिती

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि. २८ ऑक्टोबर-

माळशिरस विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा खा. सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीचे उमेदवार उत्तमराव जानकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. जानकर यांच्या उमेदवारीसाठी मोहिते-पाटील यांनी दिलेला शब्द पाळला असे सांगून आता जनतेने एक लाख एक हजार मतांचे मताधिक्य देऊन विजयी करावे, असे आवाहन सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी केले.

अर्ज दाखल केल्यानंतर विजय चौक येथे रॅलीचे भव्य सभेत रूपांतर झाले, यावेळी ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातून उत्तमराव जानकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी वेळापूर येथे श्री अर्धनारी नटेश्वराचे तर अकलूज येथे ग्रामदैवत अकलाई देवीचे दर्शन घेतले. महापुरुषांबरोबरच शिवरत्न बंगल्यावर सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या समाधीचे दर्शन घेतले. वेळापूर येथे पत्नी व माजी सरपंच विमल जानकर यांनी तर शिवरत्नवर नंदिनीदेवी मोहिते-पाटील यांनी जानकर यांचे औक्षण केले.

माळेवाडी-अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालय ते प्रांत कार्यालय अशी भव्य मोटरसायकल रॅली काढून शक्ती प्रदर्शन करीत जानकर यांनी जयसिंह मोहिते-पाटील, खा. सुप्रिया सुळे, खा. धैर्यशील मोहिते-पाटील व माजी जि. प. उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. विजय चौक येथे प्रचाराची सभा झाली. त्यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी आर. जी. रुपनवर, माणिकबापू वाघमोडे, माळशिरसच्या नगराध्यक्षा ताई वावरे, माजी सभापती मच्छिंद्र ठवरे, उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील, मामासाहेब पांढरे, स्वप्निल वाघमारे, विकास धाईंजे, ॲड. प्रकाश पाटील उपस्थित होते.

चला विजयाचा फॉर्म भरुया

गेल्या ३३ वर्षे निवडणुका लढल्या. गेल्या दहा वर्षांमध्ये पक्षात या, अन्यथा जेल मध्ये जावा, असाच कारभार भाजपाने केला. मोहिते-पाटील व आपण रणजितसिंह निंबाळकरांना निवडून दिले. मागच्या निवडणुकीत सातपुतेंना आमदार केले. मोहिते-पाटील व आपले राजकीय वैर होते. पण आपल्याच तालुक्यातला खासदार, आमदार व्हावा या हेतूने एकत्र आलो. अनेक शंका होत्या. पण निवडून दिले. बाळदादांनी शब्द दिला होता. जीव गेला तर शब्दाला जागणारे मोहिते-पाटील कुटुंब आहे. मी तरुण आहे. आम्ही चुकीच वागू तिथे न्यायनिवाडा करण्याच काम बाळदादा करतात.हा तालुका वैचारिक आहे.

- उत्तमराव जानकर

सत्य परेशान हो सकता है। पराजित नही...

चांगल्या वातावरणात उत्साहात फॉर्म भरला. नेते गेले कार्यकर्ते राहिले म्हणून जिंकले. विजयदादा व बाळदादांचा आशीर्वाद मिळवा व जिंका. माझ्या मुलीचा वाढदिवस कोर्टात साजरा केला. मन मोठ असावं लागतं. संविधानाने देश चालतो. विजयदादा, बाळदादा, पवार लढले म्हणून यश प्राप्त झाले. शुभ कार्यालाच तुतारी वाजते. शिवाजी महाराजांनी युद्ध पुकारले, त्यावेळी तुतारीच वाजली. आताही तुतारीच वाजणार

- खा. सुप्रिया सुळे,
खासदार, बारामती

नीरा-देवधरच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावू

वैचारिक बदल घडविण्याचा निर्णय बाळदादांनी घेतला. एकमेकात भांडून शक्ती वाया घालवण्यापेक्षा एकत्र येण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. मी आणि उत्तमराव नीरा-देवधरच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावू. एमआयडीसी मंजूर करुन आणली. उद्योग लवकरच आणू. पिलीव जिल्हा परिषद गटासाठी पाण्याचा प्रश्न आहे तो पण सोडवू. गाफिल राहू नका.

- धैर्यशील मोहिते-पाटील, खासदार, माढा

आपलाच आमदार, खासदार...

पाच वर्षात भयंकर त्रास दिला. तरीही तालुक्याच्या विकासासाठी काम करत राहिलो. आपलाच आमदार, खासदार व्हावा म्हणून एकत्र आलो. एक लाख एक हजारांचे मताधिक्य द्यायचं आहे. आपलं ठरलंय आता तुतारी घेतलेला माणूस हवा. जनतेने एक लाख एक हजार मतांचे मताधिक्य देऊन विजयी करावे, त्याला निवडून द्या.

- जयसिंह मोहिते-पाटील

राज्यावर ९ लाख कोटी कर्ज

आपापसातील भांडणे विसरुन तालुक्यातील जनतेने विकासासाठी एकत्र येण्याचा विचार बाळदादांनी मांडला. त्याचे शिल्पकार बाळदादा आहेत. राज्यावर ९ लाख कोटी कर्ज आहे. शिंदेंची शिवसेना व अजितदादांच्या राष्ट्रवादीचा एकही उमेदवार निवडून येणार नाही.

- आर. जी. रुपनवर, माजी आमदार

जनतेचा विश्वासू उमेदवार म्हणजे जानकर

राजकारण विकासासाठी करणे अपेक्षित आहे. सध्या राजकारणाची पातळी खालावली आहे. स्वार्थासाठी काहीही केले जात आहे. अशा परिस्थितीत उत्तमराव जानकर आणि मोहिते-पाटील एकत्र आल्याने माळशिरसचा विकास गतीने होणार आहे. ते जनतेचे विश्वासू उमेदवार आहेत.

-बाबाराजे देशमुख, माजी उपाध्यक्ष, जिल्हा परिषद

संक्षिप्त वृत्त

घोटी येथील कार्यकर्त्यांचा आ. संजयमामा शिंदे गटात प्रवेश

करमाळा, दि. २८ ऑक्टोबर-

घोटी येथील असंख्य कार्यकर्त्यांनी निमगाव येथील आ. संजयमामा शिंदे यांच्या निवासस्थानी आ. संजयमामा शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी विष्णू ननवरे, धनाजी ननवरे, सोमनाथ ननवरे, प्रदीप वाघमारे, दत्तात्रय क्षीरसागर, सागर ननवरे, अनिल राऊत, कुंडलिक ननवरे, आजिनाथ ननवरे, नवनाथ यादव, शिवाजी कानडे, रमेश ननवरे, उमेश ननवरे, श्री संतोष कानडे, गजेंद्र शेंडे, महेश राऊत, श्री भालचंद्र राऊत यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी आ. संजयमामा शिंदे यांच्या गटात प्रवेश केला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य उध्दव माळी, घोटीचे सरपंच विलास राऊत, कुर्डूचे सरपंच बाळासाहेब जगताप, सरपंच रविंद्र वळेकर, बारलोणी चे माजी सरपंच संजय लोंढे, बारलोणीचे ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ आतकर, ग्रामपंचायत सदस्य संतोष नवले, सुभाष अभंग, बाळराजे माळी, धनंजय मोरे, विनायक राऊत, कांतीलाल राऊत, घोटी, अमोल भोसले, प्रशांत शेंडे, राजेंद्र भोसले, अक्षय खरात उपस्थित होते.

प्रा. रामदास झोळ यांचा करमाळा विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल

करमाळा, दि.२८ ऑक्टोबर-

मराठा संघर्ष योध्दा मनोजदादा जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ करमाळा विधानसभेची निवडणूक लढवणार असून, यासाठी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी त्यांच्या धर्मपत्नी दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिवा मायाताई झोळ, शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ कांबळे, काँग्रेसचे आयचे जेष्ठ नेते जिल्हा संघटक हरीभाऊ मंगवडे, लालासाहेब जगताप, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र गोडगे, चंद्रशेखर जगताप, तालुकाध्यक्ष सुदर्शन शेळके, सत्यवान गायकवाड, आजिनाथ परब, संतोष बागल, संतोष परबत, शिंदे, माजी सरपंच अनुरथ झोळ, भगवान डोंबाळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका उपाध्यक्ष सुहास काळे-पाटील, भीमराव ननवरे, प्रा. राजेश गायकवाड, डॉ. विशाल बाबर, संजय जगताप उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी अंजली मरोड यांनी हा अर्ज स्वीकारला. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पाताई ठोकडे देखील उपस्थित होते.

शेवटच्या क्षणापर्यंत भाजपाच्या उमेदवारीची प्रतीक्षा : सोमेश वैद्य

मंद्रपू, दि.२८ ऑक्टोबर-

मी सोलापूर दक्षिणच्या विधानसभेसाठी भाजपकडून इच्छुक होतो. पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार विविध समाजोपयोगी कार्यक्रमांमधून जनसंपर्क वाढविला . उमेदवारी दाखल करण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत भाजपाच्या उमेदवारीची आशा आहे. अशी माहीती अपक्ष उमेदवार सोमेश वैद्य यांनी दिली. वैद्य उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर तरूण भारतशी बोलत होते. यावेळी वैद्य म्हणाले की, प्रत्येक उमेदवाराला चार अर्ज दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार मी तीन अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सुरूवातीला मी भाजपाचा उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र आमदार सुभाष देशमुख यांना उमेदवारी जाहीर झाल्याने तो अर्ज परत घेऊन तीन अपक्ष अर्ज दाखल केला आहे. भाजपाचा दाखल केलेल्या अर्जाला पक्षाचे अधिकृत एबी फॉर्म मिळण्याची प्रतीक्षा असून मंगळवारी दुपारी तीन वाजेपर्यंत प्रतीक्षा करीत असल्याचे वैद्य यांनी सांगितले.

शक्तीप्रदर्शन करत दीपकआबांचा उमेदवारी अर्ज दाखल

- प्रचंड जल्लोष, ढोल-ताशांच्या कडकडाटात काढण्यात आली भव्य रॅली

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.२८ ऑक्टोबर-

सांगोला विधानसभा मतदारसंघात माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी शक्तीप्रदर्शन करत महाविकास आघाडीकडून आपला उमेदवारी अर्ज सोमवारी निवडणूक निर्णय अधिकारी भैराप्पा माळी यांच्याकडे दाखल केला.

यावेळी काँग्रेसचे प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, शिवसेनेचे संभाजीराजे शिंदे, महिला आघाडीच्या सुरेखा सलगर, घेरडीचे बिरा पुकळे उपस्थित होते. प्रचंड जल्लोष, ढोल ताशांचा कडकडाट आणि उत्साहात महात्मा फुले चौक येथून माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांची उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी रॅली सुरू झाली. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर जयभवानी चौक येथे या रॅलीचे जाहीर सभेत रुपांतर झाले. यावेळी साईनाथ अभंगराव, संभाजीराजे शिंदे, प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, शिवाजीराव बनकर, अभिषेक कांबळे, संभाजी हरिहर, तुषार इंगळे, अक्षय चोरमुले, अजित देवकते, संतोष पाटील, नवनाथ मोरे, अनिल नवत्रे, सखुबाई वाघमारे यांनी आपल्या मनोगतात सांगोला तालुक्याच्या सर्वांगीण आणि सर्वसमावेशक विकासासाठी दि.२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीत माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील या वारकरी सांप्रदायाचा आणि निस्सीम निस्वार्थी सेवेचा वारसा लाभलेल्या उमेदवाराला विजयी करून राज्यातील सत्ताधाऱ्यांना हद्दपार करण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

विश्वासाला तडा जाऊ देणार नाही : यंदाची विधानसभा निवडणूक सांगोला विधानसभा मतदारसंघातील जनतेनेच हातात घेतली आहे.फक्त एका हाकेवर ८ ते १० हजार महिला आणि हजारोंच्या संख्येने माझ्यावर आणि शिवसेनेवर तसेच महाविकास आघाडीवर प्रेम करणाऱ्या ३० ते ३५ हजार कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली.आजवर केलेल्या प्रामाणिक कामाची हीच खरी पोहोच पावती म्हणावी लागेल. सांगोलकरांचे प्रेम आणि विश्वास पाहून खरोखर मी भारावून गेलो आहे. सांगोलकरांच्या प्रेमाला आणि विश्वासाला शेवटच्या श्वासापर्यंत तडा जाऊ देणार नाही.

- दीपकआबा साळुंखे-पाटील, उमेदवार, महाविकास आघाडी

मनसेचे महादेव कोगनुरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

तभा वृतसेवा,
मंद्रुप, दि. २८ ऑक्टोबर-

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे महादेव कोगनुरे यांनी मनसैनिकांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

पनाश अपार्टमेंट विजापूर रोड मार्गावरून रेवणसिध्देश्वर महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन दक्षिण तहसील कार्यालय येथे महादेव कोगनुरे यांनी अर्ज दाखल केला. यावेळी एमके फाउंडेशन आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. कोगनुरे म्हणाले की, सर्वसामान्य माणसांची भक्कम साथ माझ्या पाठिशी असल्यामुळे कोणतीही शक्ती आली तरी माझा पराभव करू शकत नाही. मनसेची पहिल्याच यादीत उमेदवारी जाहीर झाली आणि लगेचच उमेदवारी दाखल केली. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील गावांगावातून राज ठाकरे यांच्यावर प्रेम करणारे कार्यकर्ते, सामान्य नागरिकांतून उत्साह संचारला आहे. जनसमुदायसमोर विचार व्यक्त करीत शक्तिप्रदर्शन न करता सर्वसामान्य माणसांच्या समवेत जाऊन महादेव कोगनुरे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज भरण्यासाठी भव्य अशा रॅलीचे आयोजन करण्यात आल्याचे पाहायला मिळाले.

शक्तीप्रदर्शन करत वंचित बहुजन आघाडीचे संतोष पवार यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

तभा वृतसेवा,
मंद्रुप, दि. २८ ऑक्टोबर-

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातुन वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार संतोष पवार यांनी वंचित बहुजन आघाडी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मार्ग फाऊंडेशनच्या पदाधिकारी व सदस्यांसमवेत जोरदार शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला.

मार्ग फाऊंडेशनच्या 'व्हाईट हाऊस' मुख्य कार्यालयापासून रॅलीला सुरुवात झाली. या रॅलीमध्ये हजारो समर्थकांनी उपस्थिती देऊन संतोष पवार यांना पाठिंबा दिला. संतोष पवार यांनी जनतेच्या पाठींब्यावर या निवडणुकीत परिवर्तन घडवून प्रस्थापित नेते व त्यांच्या घराणेशाहीला शह देणार आहे. दक्षिण सोलापूरमध्ये प्रगतीचा नवा अध्याय लिहिण्यासाठी, जनतेचे कल्याण, वंचितांचे हक्क, शैक्षणिक, सामाजिक, आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये विकास काम करून दक्षिण सोलापूरसाठी एक आदर्श विकासाचा मार्ग निर्माण करण्यासाठी ही निवडणूक जिंकणारचं असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

उमेदवारी भरताना शेकापचे उमेदवार डॉ. बाबासाहेब देशमुखांचा जाणवला साधेपणा

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.२८ ऑक्टोबर-

शेकापकडून सांगोला विधानसभेसाठी डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी ना गाजावाजा, ना शक्तीप्रदर्शन, अतिशय साध्या पध्दतीने शेतकरी कामगार पक्षाच्या प्रमुख पदाधिकार्यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज सोमवारी दाखल केला.

यावेळी डॉ. अनिकेत देशमुख, चिटणीस दादाशेठ बाबर, प्रा.विठठलराव शिंदे, डॉ. प्रभाकर माळी, बाळासाहेब एरंडे, मारुतीआबा बनकर, प्रभाकर चांदणे, संजय इंगोले, प्रशांत धनवजीर, ॲड. विशालदिप बाबर, नितीन गव्हाणे, नंदकुमार शिंदे, समाधान पाटील, इंजि. रमेश जाधव, अरुण पाटील, शोभाताई पाटील, डॉ. निकीता देशमुख उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी श्रीमती रतनबाई गणपतराव देशमुख यांचे आशिर्वाद घेतले.त्यानंतर सूतगिरणी येथील स्व. आबासाहेबांच्या स्मृती स्थळावर जाऊन दर्शन घेतल्यानंतर सांगोल्याचे ग्रामदैवत अंबिकादेवीचे दर्शन घेत अत्यंत साधेपणाने तहसील कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

पंढरपुरात ११४ जणांनी खरेदी केले १४८ उमेदवारी अर्ज

- आतापर्यंत १६ जणांचेच दाखल; आज शेवटच्या दिवशी होणार शक्तीप्रदर्शन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. २८ ऑक्टोबर-

पंढरपूर विधानसभा मतदार संघात आतापर्यंत तब्बल ११४ जणांनी १४८ उमेदवारी अर्ज खरेदी केलेले आहेत. सोमवारपर्यंत केवळ १६ उमेदवारांनीच अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मंगळवारी शेवटचा दिवस आहे.

२२ ऑक्टोबर रोजी ४१ जणांनी अर्ज खरेदी केलेले होते. २३ ऑक्टोबर रोजी २४ जणांनी ३८ अर्ज खरेदी केले. २४ ऑक्टोबर रोजी १३ जणांनी २० उमेदवारी अर्ज खरेदी केलेले होते. दरम्यान २२ ते २४ ऑक्टोबर पर्यंत एकुण ७६ जणांनी ९९ उमेदवारी अर्जांची खरेदी केलेली होती. गुरुपुष्कामृत योग असल्यामुळे २४ रोजी तीन उमेदवारांनी पाच उमेदवारी अर्ज दाखल केले. यामध्ये भगीरथ भालके यांचा (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष आणि अपक्ष असे दोन अर्ज), संजय हनुमंत वाघमारे यांनी (अपक्ष) आणि भालचंद्र यल्लाप्पा कांबळे यांचा (बहुजन समाज पार्टीकडून आणि अपक्ष असे दोन अर्ज) समावेश आहे. दरम्यान २५ ऑक्टोबर २०२४ रोजी १७ जणांनी २१ उमेदवारी अर्जाची खरेदी केली. त्यामुळे २२ ते २५ ऑक्टोबर पर्यंत ९३ जणांकडून १२० उमेदवारी अर्जाची खरेदी झाली होती. या मध्ये २५ ऑक्टोबर रोजी तीन उमेदवारांनी चार उमेदवारी अर्ज दाखल केले. या मध्ये वसंतराव दौलतराव देशमुख यांनी (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष आणि अपक्ष असे दोन अर्ज), अमोल सुरेश गायकवाड यांचा (अपक्ष) तर भगीरथ भारत भालके यांचा (काँग्रेस पक्षातर्फे) सुचक संदीप पाटील यांच्यामार्फत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. दरम्यान शनिवारी (ता. २६) आणि रविवारी (ता.२७) शासकीय सुटी होती. त्या नंतर सोमवारी (ता.२८) १३ उमेदवारांनी १७ उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहेत. या मध्ये युसुफ राजमहंमद मुजावर यांनी (अपक्ष), निशिकांत बंडू पाटील (अपक्ष), अब्दुलरोफ उर्फ रज्जाक जाफर मुलाणी (अपक्ष), डॉ. संजयकुमार भोसले यांनी प्रस्तावक दामोदर धोंडीबा देशमुख यांच्या मार्फत (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातर्फे आणि अपक्ष असे दोन) अर्ज दाखल केले.

माधुरी धोत्रे यांचाही अर्ज दाखल

मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांच्या पत्नी माधुरी दिलीप धोत्रे (मनसे), पंकज हरिशचंद्र देवकते (राष्ट्रीय समाज पक्ष), विठ्ठल भीमराव भोरकडे (अपक्ष) युवराज दिनकर गायकवाड (अपक्ष), आदित्य चंद्रकलेश्वर फत्तेपूरकर (अपक्ष), अनिल सुभाष सावंत (राष्ट्रवादी शरदचंद्र पक्ष आणि अपक्ष असे दोन अर्ज), संग्राम पांडुरंग ढाणे (अपक्ष) यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

क्राईम वृत्त

घरात घुसून महिलेच्या विनयभंग प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

घरात घुसून महिलेचा विनयभंग करणाऱ्या दोघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हरिश उपाध्याय आणि ध्रुव थोटकर (रा. अवंती नगर, जुना पूना नाका, सोलापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत पिडीत महिलेने फिर्याद दाखल केली आहे. यातील पिडीत महिला व तिचा पती हे २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घरी असताना हरिश उपाध्याय व ध्रुव थोटकर या दोघांनी त्यांच्या घराचा दरवाजा जोरात ढकलून जबरदस्तीने घरात आले. पिडीत महिलेच्या पतीला अश्लिल शिवीगाळ करण्यास सुरुवात केल्यानंतर पिडीतेच्या पतीने आपले जे काही लेन देन आहे, ते घराच्या बाहेर बघू, तुम्ही पहिला घराच्या बाहेर जावा असे सांगितले असता त्या दोघांनी पिडीतेच्या पतीस तुला सोलापूरात राहू देणार नाही, तुझा खून करून टाकेन अशी धमकी दिली. त्यावेळी ध्रुव थोटकर याने पिडीतेच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरदस्तीने हिसकावून घेऊन हरिश उपाध्याय याच्याकडे दिली. त्यानंतर त्या दोघांनी पिडीतेला मारहाण करून तिच्याशी अश्लिल कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच पिडीतेच्या पतीच्या हिशोबाची डायरी कपाटातून काढून दुसरीकडे ठेवली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील तपास करीत आहेत.

दुचाकीवरून पडून महिलेचा मृत्यू

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

कारच्या धक्क्याने दुचाकीवरून पडून गंभीर जखमी झालेल्या महिलेच्या मृत्यूप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लक्ष्मी रमेश कुंभारीकर (वय ३४, रा. जंगम वस्ती, सोलापूर) असे मरण पावलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत रमेश विजयकुमार कुंभारीकर (वय ३४, रा. जंगम वस्ती, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास रमेश कुंभारीकर, त्यांचा मुलगा वरद व पत्नी लक्ष्मी असे तिघे एमएच १३ बीजे ३०२१ क्रमांकाच्या दुचाकीवरून बांधकाम बघण्यासाठी अक्कलकोट रोडवर गेले होते. त्यानंतर परत घराकडे येताना अक्कलकोट रोडवरील टेलिफोन टॉवर येथे आल्यानंतर एमएच १४ सीके ९२४७ क्रमांकाच्या कारचालकाने त्याच्या ताब्यातील कार ही कसल्याही प्रकारचे नियम न पाळता रस्त्यावर वाहन उभे करून मागे पुढे न पाहता कारच्या उजव्या बाजूने कुंभारीकर यांच्या दुचाकीला धक्का दिला. त्यामुळे कुंभारीकर यांच्या दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई या रस्त्याच्या मधोमध पडून त्यांच्या डोक्यास जबर मार लागून त्या गंभीर जखमी झाल्या व मरण पावल्या. त्यामुळे त्यांच्या मरणास कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात कारचालकाविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस हवालदार वाघमोडे पुढील तपास करीत आहेत.

महिलेच्या मृत्यूप्रकरणी चालकावर गुन्हा

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

निष्काळजीपणे दुचाकी चालवून पाठीमागे बसलेल्या महिलेला खाली पाडून तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मैनाबाई दिंगबर पवार (वय ५९, रा. कासेगाव, ता. दक्षिण सोलापूर) असे मरण पावलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत संदीप दिंगबर पवार (वय ३०, रा. कासेगाव) यांच्या फिर्यादीवरुन अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ ऑक्टोबर रोजी दुपारी कासेगाव गावातील श्रीपाद यादव याच्या मालकीच्या एमएच १३ ईएच २२८७ क्रमांकाच्या दुचाकीवरून मैनाबाई पवार या पाठीमागे बसून जुना विडी घरकुल येथे गॅस केवायसी करण्यासाठी जात होत्या. त्यावेळी दहिटणे येथे दुचाकीस्वाराने दुचाकी भरधाव व निष्काळजीपणे चालवून स्पीड ब्रेकरवर जोरात चालविली. त्यामुळे मैनाबाई पवार या खाली पडून त्याच्या डोक्यास गंभीर मार लागून त्या गंभीर जखमी होऊन मरण पावल्या. जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

निधन वृत्त...

बसवणप्पा जमशेट्टी

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

मैंदर्गी येथील निवृत्त मुख्याध्यापक बसवणप्पा सिद्रामप्पा जमशेट्टी(पाटील) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मंगळवारी दि.२९ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता हिंदू स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. भाजप अध्यक्ष अनिल पाटील यांचे वडील होते. त्यांच्या पाश्चात दोन मुली, दोन मुलगा व नातवंडे असे परिवार होता

रहिमतबी मुजावर

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

थोरला मंगळवेढा तालीम येथील प्रसिद्ध पीर बडा मंगलबेडा सवारीच्या मुजावर घराण्यातील रहिमतबी अल्लाबक्ष मुजावर (वय ८६) यांचे आज दुपारी तीन वाजता राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन पुत्र, दोन कन्या, सुना, नातवंडे, पणतू, खापर पणतू असा मोठा परिवार आहे. खापर पणतुंना पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले होते. 'लोकसत्ता 'चे वरिष्ठ प्रतिनिधी एजाजहुसेन मुजावर यांच्या त्या मातोश्री होत. दिवंगत रहिमतबी मुजावर यांच्या पार्थिवाचा दफनविधी रात्री नऊ वाजता अक्कलकोट रस्त्यावरील जडेसाहेब मुस्लीम कब्रस्तान येथे झाला.

कुमार वाले

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

शहर युवक काँग्रेसचे माजी शहर अध्यक्ष व सोलापूर महानगर पालिकेचे माजी नगरसेवक कुमार जगदेवप्पा वाले (वय ५८) यांचे दि. २७ आक्टोबरला हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून व नातवंडे असा परिवार आहे.

सुमन होनराव

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

सुमन इरण्णा होनराव (वय ८४) यांचे सोमवारी सकाळी ७च्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, ३ विवाहीत मुले, १ विवाहीत मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दुपारी रुपाभवानी रुद्र भुमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आमदार विजयकुमार देशमुख, आमदार समाधान अवताडे यांचे स्वीय सहाय्यक सिद्धेश्वर होनराव यांचे त्या मातोश्री होत.

शक्तीप्रदर्शन

आ. देशमुख, कोठे काका-पुतणे, आडम, शाब्दी, पवार, इंगळे यांच्यासह काही अपक्षांनी दाखल केले अर्ज

- अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस
- ऐन दिवाळी सणात शहरातील रस्ते जाम
- वाहतूक पोलिस यंत्रणेवर ताण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २७ ऑक्टोबर-

सध्या विधानसभा निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापत आहे. सोलापूर शहर उत्तर, शहर मध्य आणि दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघासाठी आ. विजयकुमार देशमुख, महेश कोठे, देवेंद्र कोठे, नरसय्या आडम मास्तर, फारूक शाब्दी, संतोष पवार, प्रशांत इंगळे यांच्यासह शहरातील काही अपक्ष उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. दरम्यान, या सर्वांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केल्याने ऐन दिवाळी सणात शहराच्या मुख्य मार्गावरील वाहतूक पूर्णत: विस्कळीत झाली होती. यामुळे शहर वाहतूक पोलिसांना दुपारी चांगलाच ताण आला होता. जेव्हा अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण पार पडली तेव्हाच पोलिसांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

आज सकाळपासूनच महायुती, महाविकास आघाडी आणि अपक्ष उमेदवारांची फॉर्म भरण्यासाठीची तयारी त्यांच्या संपर्क कार्यालयात दिसून आली. गेल्या २ दिवसांपासून अर्ज भरण्यासाठी कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांना मेसेज, फोनद्वारे अर्ज भरण्याची माहिती देण्यात येत होती. सकाळी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. प्रत्येकाचा हाती पक्षाचा ध्वज आणि घोषणाबाजी सुरू होती.

पक्षाचे वरिष्ठ नेते जरी आले नसले तरी शहर उत्तर, शहर मध्य आणि शहर दक्षिण मतदारसंघासाठी महायुती, महाविकास आघाडी आणि अपक्षांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. आता अर्ज माघारी घेण्याची मुदत ४ तारखेपर्यंत असून, यानंतर प्रचाराचे वातावरण चांगलेच तापणार आहे. आजतागायत जिल्ह्यात १ हजार ३७१ अर्जांची विक्री झाली तर जवळपास सव्वासेपर्यंत अर्ज दाखल आहेत. दरम्यान, आता अर्ज भरायला एकच दिवस बाकी असल्याने मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी महायुती आणि महाविकास आघाडीतील मातब्बर उमेदवार आणि अपक्ष उमेदवारांची अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी होण्याचे संकेत मिळत आहेत. मंगळवार हा दिवस अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने या एका दिवशी तर अर्ज भरण्यासाठी हाऊसफुल्ल गर्दी पडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. शेवटच्या दिवशी फॉर्म दाखल करण्यासाठी उमेदवारांची आणि त्यांच्या समर्थकांची मोठी गर्दी पडण्याची शक्यता आहे. यासाठी पोलिस फौजफाटा कार्यरत आहे मात्र अनेकजण अर्ज भरण्यासाठी आल्यास हे काम वेळेत पूर्ण होईल की नाही? याबाबत संबंधित अधिकारी वर्गातून चिंता व्यक्त होत आहे. मंगळवार, दि. २९ ऑक्टोबरपर्यंत अर्ज घेणे आणि भरून देण्याची प्रक्रिया राहणार आहे. दि. ३० ऑक्टोबरला अर्जाची छाननी होणार असून, ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे काढून घेता येणार आहे. यानंतर २० तारखेला मतदान प्रक्रिया पार पडणार असून, मतमोजणी २३ तारखेला होणार आहे. या अर्जाची विक्री सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत करण्यात येत आहे.

माळशिरसमध्ये सर्वाधिक ८१ अर्जांची विक्री

आज सकाळी ११ पासून प्रत्येक मतदारसंघातील निवडणूक कार्यालयातून अर्ज विक्री सुरू झाली आणि त्यामध्ये करमाळा १५, माढा २६, बार्शी .., मोहोळ १३, सोलापूर शहर उत्तर १४, सोलापूर शहर मध्य १८, अक्कलकोट ९, दक्षिण सोलापूर २१, पंढरपूर २८, सांगोला १३, माळशिरस ८१ अशा ११ तालुक्यातील निवडणूक कार्यालयातून १७१ जण २७६ अर्ज घेवून गेले आहेत. दरम्यान, माळशिरस तालुक्यात आज एकाच दिवसांत ८१ अर्ज विक्रीस गेले असून, खालोखाल मोहोळ तालुक्याचा नंबर लागतो.

चन्नवीर चिट्टे मित्र परिवारातर्फे फराळ वाटप

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

आपुलकीचं नात आणि सामाजिक बांधिलकी जपत प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या वतीने गरीब व गरजूंना दिवाळी फराळ वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना श्रीराम जन्मभूमी न्यासाचे ऑडीटर व विकास सहकारी बॅंकेचे संस्थापक सदस्य राज मिणियार म्हणाले दिवाळी म्हणजे अंधारावर प्रकाशाचा विजय. केवळ स्वत: प्रकाशमान व्हायचे नाही तर इतरांनाही प्रकाशमान करायचे हा संकल्प करून चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराने वंचितांना दिवाळी फराळाचे वाटप केले आणि हा अत्यंत स्तुत असा कार्यक्रम आहे. चन्नवीर चिट्टे यांनी पैशापेक्षा माणसं कमविण्यातच आनंद मानला आणि हे खुप कौतुकास्पद आहे.

आज भारतीय संस्कृतीचे दर्शन घडल. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या वतीने दिवाळी फराळ वाटपाच्या या कौटुंबिक कार्यक्रमाचा एक भाग होता आलं आणि आशीर्वाद देण्यासाठी जमलेल्या मंडळीना पाहून आनंद वाटला, हे मी माझं सौभाग्य समजते. असंख्य हजारो आशीर्वादाचे हात तुमच्या पाठीशी असताना असेच पुढे चालत रहा. तुमची वाट प्रकाशाची आहे. मित्रपरिवार ही तुमची श्रीमंती आहे. देणं ही तुमची संस्कृती या दातृत्व भावनेत अशीच भर पडत राहो आणि समाजाची ही सेवा घडत राहो असे उदगार प्रदेश महिला आघाडीच्या चिटणिस सौ. वैशाली गुंड यांनी काढले. प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी कारखानदार रवि रापेल्ली व दिनेश गुंड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईनाथ सज्जे, प्रास्ताविक श्रीनिवास दासरी तर आभार प्रदर्शन कल्याण करजगी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश हलसगी, रवि शहापूरकर, सद्दाम कोसगीकर, रवि कोळी, परमेश्वर (पप्पू) क्षीरसाग, लक्ष्मीकांत बिराजदार, किरण वल्लाल, सोमनाथ कलशेट्टी, विश्वनाथ कट्टा, रेवणसिद्ध बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

खंडणीखोर योगेश कोळेकर एमपीडीएअंतर्गत कारागृहात स्थानबध्द

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

शहरातील सराईत गुन्हेगार खंडणीखोर योगेश कोळेकर यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी एमपीडीए कायद्याअंतर्गत कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार जोडभावी पेठ पोलिस ठाण्याचे एक पथक कोळेकर यास घेऊन येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे.

योगेश रामचंद्र कोळेकर (वय २५, रा. घर नं. ४१/७५, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) असे स्थानबध्द करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. कोळेकर याच्याविरुध्द शहरातील जोडभावी पेठ पोलिस ठाणे व जेलरोड पोलिस ठाण्यात अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. मागील काही वर्षापासून सातत्याने घातक शस्त्राचा वापर करून खुनाचा प्रयत्न करणे. घातक शस्त्रांनी इच्छापूर्वक दुखापत करणे, शस्त्रानिशी फिरून धमकी देणे, खंडणी मागणी, दगडफेक करणे असे गंभीर स्वरूपाचे ३ गुन्हे दाखल असून २ अदखलपात्र गुन्हे दाखल आहेत. कोळेकर याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे शहरातील नागरीकांचे जीवन विस्कळीत होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

कोळेकर याच्या गुन्हेगारी कारवाया कमी करण्यासाठी पोलिसांनी २०२१ मध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतरही त्याच्या गुन्हेगारी वर्तनात बदल झाला नव्हता. त्यामुळे कोळेकर यास एमपीडएअंतर्गत कारागृहात स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस आयुक्तांनी मंजूरी देत कोळेकरला स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांचे एक पथक कोळेकर यास घेऊन येरवड्याकडे रवाना झाले आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, सहायक आयुक्त राजन माने, यशवंत गवारी, प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, सुहास चव्हाण, सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, हवालदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.

विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेबाबतची भीती दूर करणे आवश्यक : प्रा. कोंडी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२५ ऑक्टोबर-

सध्याच्या युगात विद्यार्थी समाज माध्यमांच्या विळख्यात अडकला आहे. त्यामधून त्यांना बाहेर काढणे व अभ्यास करायला लावणे हे मोठे आव्हान आहे. या आव्हानाला सामोरे जाताना शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेबाबतची भीती दूर करणे आवश्यक आहे तरच तो परीक्षेत यश मिळून उत्तुंग भरारी घेऊ शकेल' असे प्रतिपादन पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. प्रा. श्रीनिवास कोंडी यांनी केले.

ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात आयक्यूऐसी व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने बी. ए. व बी. कॉम. भाग - ३ च्या विद्यार्थीनींसाठी 'परीक्षा पे चर्चा' या विषयावर दोन दिवशीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या समारोप समारंभाप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. अशोक यक्कलदेवी, डॉ. ॲनी जॉन, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. शंकर राजे, डॉ. पंचप्पा वाघमारे उपस्थित होते.

यावेळी बागवान रिजवाना,बागवान सानिया, मंजरीन मासूलदार या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. कार्यशाळेत प्रा. डॉ. सतीश घोरपडे, डॉ. सूर्यवंशी, डॉ. मोठे, डॉ. शिवानंद भांजे, डॉ. आरिफ जमादार, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. पी. आर. वाघमारे, प्रा.डॉ. कविता मुरूमकर, प्रा. एन. एम. गव्हाणे, प्रा. विकास शिंगे, प्रा. एम. एस. गायकवाड, प्रा. भंगारेव्वा कोरे, प्रा.अमोल बोबडे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ. शिवानंद भांजे यांनी केले. या कार्यक्रमप्रसंगी सोशल महाविद्यालय, युनियन महिला महाविद्यालय, माऊली महाविद्यालय वडाळा, या महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

मारहाणीत तरूण जखमी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२८ ऑक्टोबर -

वडीलांकडे राहायचे नाही म्हणून तरूणास मारहाण करून जखमी करण्यात आले.

युवराज हुसनप्पा बंडे (वय २१, रा. दिपाली नगर, एम आयडीसी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २७ ऑक्टोबर रोजी रात्री दहाच्या सुमारास युवराज बंडे यास राहत्या घराबाहेर पिंटू धर्मण्णा बंडे, महेश धर्मण्णा बंडे व इतरांनी तु वडीलांकडे राहायचे नाही या कारणावरून मारहाण करून जखमी केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

अमोल शिंदेसह चौघे आज स्वराज्य पक्षाकडून भरणार अर्ज

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२८ ऑक्टोबर -

विधानसभा निवडणुकीचे वातावरण आता चांगलेच तापले आहेत. सोलापूर शहर जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला दुय्यम दर्जाचे स्थान देत, एक ही जागा वाटाघाटीत दिली नसल्याने स्थानिक शिवसेना जिल्हाप्रमुख, शहरप्रमुख, तालुका प्रमुख पदाधिकारी व शिवसैनिकांनी भाजपाच्या विरोधात रनशिंग फुंकत पाच जागा लढवण्याचा निर्धार केला होता.

दरम्यान विधानसभा निवडणुकीत शिवसेनेची जागा काढून घेतल्याने शिवसेनेच्या या पदाधिकाऱ्यांनी शहर व जिल्ह्यातील पाच विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी महाराष्ट्र स्वराज्य पक्षात छत्रपती संभाजीराजे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला आहे. या पक्षाच्यावतीने शहर उत्तर विधानसभा मतदारसंघासाठी अमोल शिंदे, शहर मध्य विधानसभा मतदारसंघासाठी मनीष काळजे, मनोज शेजवाल तर दक्षिण विधानसभा मतदारसंघासाठी उमेश गायकवाड आपला उमेदवारी अर्ज भरतील. त्याच पद्धतीने अक्कलकोट व पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातही उमेदवार देण्यात आले आहेत. त्यामुळे महायुतीमध्ये चलबिचल वातावरण निर्माण झाले आहे.

हवालदार अमृत खेडकर ठरले ग्रामीण पोलीस दलातील आर्यनमॅन

तभा वृत्तसेवा,
टेंभुर्णी, दि. २८ ऑक्टोबर-

गोवा येथील आर्यनमॅन स्पर्धेत सोलापूर ग्रामीण पोलीस दलात टेंभुर्णी पोलीस ठाणे कार्यरत असणारे पोलीस हवालदार अमृत खेडकर यांनी मिळवला.

IRONMAN
IRONMAN 70.3 INDIA
FINISHER 2024

सोलापूर ग्रामीण पोलीस दलात प्रथम खौपारप होण्याचा बहुमान इंटरनॅशनल ट्रायथलॉन खौपारप स्पर्धा २७ डिसेंबर रोजी गोवा येथे झाली असून, ५० देशातील विविध भागातील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. थरार गोवा येथे अनुभवायला मिळाला. या स्पर्धेत सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील अमृत खेडकर यांनी सहभाग नोंदविला होता. सर्वात अवघड मानल्या जाणाऱ्या स्पर्धे पैकी एक असलेली ही स्पर्धा . गोवा येथील मिरामार बीच मधील समुद्रात स्पर्धेचा प्रारंभ झाला असून, यात १.९ किमी पोहणे, ९० किमी सायकल चालवणे आणि २१.१ किमी धावणे यांचा समावेश होता. आर्यनमॅन स्पर्धा जगातील एक प्रसिद्ध स्पर्धा असून, स्पर्धक या स्पर्धेसाठी तयारी करत असतात. खौपारप ट्रायथलॉन स्पर्धेचे ११३ किमी अंतर ८ तास आणि ३० मिनिटात पूर्ण करण्याचे आवाहन स्पर्धकांसमोर होते. ही स्पर्धा यशस्वी करून सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील कर्मचारी म्हणून इतिहासात प्रथम खौपारप होण्याचा किताब अमृत खेडकर यांनी मिळविला आहे. ही स्पर्धा त्यांनी ७ तास ३७ मिनिटात पूर्ण केली आहे. यापूर्वी त्यांनी मागील वर्षी इशीसारप ही स्पर्धा पूर्ण केली होती.

श्री राजराजेश्वर सहस्त्रार्जुन भगवान जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

- आठ नोव्हेंबरला जयंती उत्सव मिरवणूक

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-



श्री राजराजेश्वर सहस्त्रार्जुन भगवान जन्मोत्सवानिमित्त श्री सहस्त्रार्जुन युवा प्रतिष्ठानच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अक्षय बिद्री यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज विठ्ठल मंदिर येथे शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता पाळणा, गुलालाचा व होमहवन महापूजा कार्यक्रम होणार आहे. मोरेश्वर काटवे आणि सुनील कोल्हापुरे यांच्या हस्ते ही पूजा होणार आहे. दि. ३ ते ८ नोव्हेंबर २०२४ दरम्यान विविध स्पर्धा, होम मिनिस्टर, रक्तदान शिबिर आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

गुरुवार दि. ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता श्री सहस्त्रार्जुन पटांगण येथे बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अरविंद कलबुर्गी हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सखाराम श्रीनिवासलू हे राहणार आहेत. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष संजीव बिद्री , ट्रस्टचे सेक्रेटरी जयकुमार कोल्हापुरे, सेवा मंडळाचे अध्यक्ष शिवप्रकाश चव्हाण, सेक्रेटरी सुनील पवार, श्री सहस्त्रार्जुन पतपेढीचे चेअरमन सुनील बुरबुरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता चार हुतात्मा पुतळा चौक येथून श्री राजराजेश्वर सहस्त्रार्जुन भगवान मूर्तीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. लकी चौक, दत्त चौक, सोन्या मारुती, माणिक चौक, मधला मारुती, मंगळवार पेठ पोलीस चौकी मार्गे कुंभार वेस, विठ्ठल मंदिर क्षत्रिय गल्ली येथे या मिरवणुकीची सांगता होणार आहे. या पत्रकार परिषदेस गजेंद्र काटवे, मुकेश त्रिमल, ज्ञानेश्वर पवार, माणिक शालगर, विजेंद्र बंकापूर आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजितदादांना संविधानाची प्रत देऊन चंदनशिवेंनी दिल्या शुभेच्छा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

बारामती विधानसभा मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी जाताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांना संविधानाची प्रत देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी शुभेच्छा दिल्या. सोमवारी सकाळी बारामती आमराई येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादनप्रसंगी अजित पवार यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

भारतीय संविधान पुस्तिका, पुष्पगुच्छ, शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पार्थ पवार, महाराष्ट्र रिपब्लिकन पार्टी अध्यक्ष संजय सोनवणे, माजी नगरसेवक गणेश पुजारी, युवा नेते प्रतिक चंदनशिवे, समाधान सकट व कार्यकर्ते उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

ज्ञानामृत आनंदलहरी - ९२९

वांटिलें तें धन । केली अहंता जतन ।।
तुका म्हणे चुकलें वर्म । केला अवघाचि अधर्म ।।

आपल्यातील दुर्गूण झाकून ठेवून दुसऱ्याला सद्‌गुण सांगण्यात अर्थ नसतो. स्वत:च्या दुर्गूणावर पांघरुन घालून सद्गुणी असल्याचा दिखावा करणे अर्थहिन असते. काम-क्रोध, माया-मोह, द्वेष-मत्सर इत्यादी मानवी शत्रूंना आपल्यात बाळगून ग्रंथाचे पाठांतर करण्यात किंवा तीर्थयात्रा करण्यातही अर्थ नसतो. स्वत:ला मोठेपण मिळावे म्हणून यज्ञ-दान-तप करणे म्हणजे अहंकाराला पुष्टी देणे होय. समाजात असे अनेक लोक पहायला मिळतात की जे मोठ्या प्रमाणावर दान करतात. त्यामुळे अशा दानी लोकांना लोक दानशुर म्हणतात. दान करणे हे अत्यंत उत्कृष्ट कार्य असले तरीही त्या कार्यात जेव्हा मी किंवा अहंकार प्रवेश करतो तेव्हा ते दान व्यर्थ ठरते. इतरांनी दाता म्हणणे आणि स्वत:च दाता म्हणून घेणे यात फरक आहे. माणूस जेव्हा मी दानी आहे, असे म्हणतो तेव्हा त्याच्यात अहंकार जोपासतो. अहंकाराच्या वाढीसाठी म्हणजे स्वत:चे मोठेपण होण्यासाठी केलेले दान सात्वीक दान होत नाही. मीपणाच्या वाढीसाठी केलेले दान हे तामसदान असल्याचे ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीत दानाच्या प्रकाराच्या अनुषंगाने बोलतांना म्हटले आहे. दान करायचे आणि अहंतेचे, अहंकाराचेही रक्षण करायचे म्हणजे एकप्रकारे अधर्मच करणे होय. अशा अहंकाराच्या मार्गावरुन जाणारे लोक मूळात योग्य मार्ग चुकतात आणि आत्मप्राप्तीच्या मार्गास मुकतात. यांच्या अशा अधर्मी वर्तनाबद्दल बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

वांटिलें तें धन । केली अहंता जतन ।।
तुका म्हणे चुकलें वर्म । केला अवघाचि अधर्म ।।

दान हे मानसिक समाधानासाठी आणि दुसऱ्याच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी तसेच गरज भागविण्यासाठी करायचे असते. स्वत:चा मोठेपणा व्हावा म्हणून केलेल्या दानात व्यवहार येतो. जिथे व्यवहार आहे तिथे मी-माझे याची निर्मिती होते. ही निर्मिती सात्वीकतेला बाधा ठरते. समाजात जसे गुप्त दान करणारे आहेत. तसे केलेल्या दानाचा डांगोरा पिटणारेही आहेत. आज ...यांच्यातर्फे फळाचे, कपडयाचे, अन्नाचे वाटप होत आहे. अशा आशयाचे चौकात फलक लावून किंवा स्पिकरमधून आरडा-ओरडा करुन दान करणारेही आपण पाहतो. दान चार आण्याचे आणि प्रसिध्दी बारा आण्याची केली जाते. मूळात हे दान नसतेच. हे असते ते प्रसिध्दीचे एक साधन. या साधनाचा, माध्यमाचा आज विविध क्षेत्रात वापर केला जात आहे. वाढदिवसाचे निमित्त करुन रुग्णांना फळे वाटप केली जातात. दुसऱ्या दिवशी प्रसार माध्यमातून प्रसिध्दीच प्रसिध्दी असते. हे लोक वस्तूचे दान करतात मात्र अहंकाराचे, मोठेपणाचे रक्षण करतात. अहंकार नष्ट झाल्याशिवाय दान-धर्माला अर्थ नाही. दानातून अहंकार वाढत असेल तर त्या दानाला अर्थ उरेलच कसा? दान हे सत्पात्री असावे असे म्हटले जाते. सत्पात्र ही संज्ञा दान देणाऱ्या व घेणाऱ्या दोन्हींच्या बाबतीत लागू पडते. देणारा सात्वीक वृत्तीचा, नि:स्वार्थ भावनेचा, स्वकष्टातून देणारा असावा. तसेच घेणारा गरजू असावा. गरज नसतांना किंवा समोरच्याकडे उपलब्धता असतांना दिलेले दान हे दान नसते. आपणाला वस्तूचे, धन-धान्यांचे नि:स्वार्थ दान करण्याची संधी मिळो अशी संत श्री ज्ञानोबा-तुकोबां चरणी प्रार्थना. चूकभूल क्षमस्व.

जय जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

सुप्रभात

आजचा दिवस

वार : मंगळवार
दि. २९ ऑक्टोबर २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - अश्विन
कृ. द्वादशी (१०.३१)
ऋतु - वसंत
नक्षत्र - उ. फाल्गुनी(१८.३२)
योग - ऐंद्र (०७.४६)
करण - गर (२३.५३)

दिनविशेष - धनत्रयोदशी
धन्वंतरी जयंती

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

राशीभविष्य

मेष : अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे-घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ-लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख-शांती मिळेल.

वृषभ : मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका.

मिथुन: व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

कर्क: अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

सिंह : व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद.

कन्या : कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

तुळ : आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा.

वृश्चिक : अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

धनु : योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल.

मकर : फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल.

कुंभ : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

मीन: कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

वळसंगजवळ अल्पसंख्याक विद्यापीठाची उभारणी

३ नोव्हेंबरला पायाभरणी सोहळा, राष्ट्रीय शिक्षण समन्वय परिषदही होणार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

ग्लोबल एज्युकेशनल अँड हेल्थ ऑर्गनायझेशनच्यावतीने दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंगजवळ अल्पसंख्याक विद्यापीठाची उभारणी करण्यात येत आहे. या विद्यापीठाचा पायाभरणी सोहळा तीन नोव्हेंबरला आयोजिला आहे. या निमित्ताने अल्पसंख्यांक समाजातील शैक्षणिक समस्यांचा उहापोह करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण समन्वय परिषद घेण्यात येणार असल्याची माहिती या विद्यापीठाचे मुख्य प्रवर्तक आसिफ इकबाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मागील अनेक वर्षांपासून अल्पसंख्यांक समाजातील शिक्षणाची स्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. बालमजूर, शाळाबाह्य मुलांची संख्या वाढत चालली आहे. सुविधा नसल्याने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होत चालले आहे. या सर्व समस्यांना पार्श्वभूमीवर अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक विकासाचे उद्देश नजरेसमोर ठेऊन या विद्यापीठाची स्थापना करण्यात येत आहे. या विद्यापीठाची दिशा व त्याची गरज स्पष्ट करण्यासाठी शहरात तीन नोव्हेंबरला दिवसभर 'अल्पसंख्यांक शैक्षणिक समन्वय परिषद' घेण्यात येत आहे. या परिषदेसाठी उद्घाटक म्हणून यावेळी डॉ. जहीर काझी, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे उमरैन महफूज रहमानी, माझी कुलपती जफर सरेश वाला, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु एस. एन. पठाण, सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु एन. एन. मालदार, अजमेर दर्गाह ट्रस्टचे चेअरमन सय्यद सरवर चिश्ती, समीर सिद्दीकी, मुबारक कापडी, डॉ. ऐनुल हसन, डॉ. अफसर आलम, मुहम्मद अतिक अहमद, डॉ. अब्दुल कदीर, हसन चौगले, अमीर अली खान, प्रो डॉ. ग़ज़नफ़र अली, अली एम शम्सी, शाह आलम रसूल, एस. एन पठान , मुश्ताक अंतुले, इक्बाल मेमन, मुहम्मद अली पाटनकर, मेहबूब कासार, डॉ. शहीद खोत, आमिर इद्रिसि, इक्बाल शेख, अमीर अंसारी, डॉ. अंजुम कादरी, मुफ़्ती ज़ैनुलआबेदीन, खालिद सैफउद्दीन उपस्थित राहणार आहेत.

विद्यापीठाचा पायाभरणी समारंभ तीन नोव्हेंबर सकाळी आठ वाजता होईल. त्यानंतर सोलापूरातील हेरिटेज लॉन येथे १० वाजता परिषेदेस सुरुवात होईल. आधुनिक शिक्षण गरज व आपली जबाबदारी हे पहिले सत्र सकाळी ११ वाजता सुरु होईल. या सत्रात अलीगड विद्यापीठाचे प्रा. सऊद आलम कास्मी, मेहमूद सिद्दीकी, खालीद सैफुद्दीन मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी २.३० वा. मुस्लिम शिक्षण संस्था समस्या व उपाय या विषयावर परिसंवाद होईल. या सत्रात शाह आलम रसुल,खालीद सैफुद्दीन, हे मार्गदर्शन करतील. संध्याकाळी सहा वाजता जनसभा होईल. मौलाना आझाद विद्यापीठ जोधपूरचे संस्थापक अतिक अहमद हे या जनसभेचे अध्यक्ष असतील. शिक्षणतज्ज्ञ मुबारक कापडी, समीर सिद्दीकी यांची खुली जनसभा होईल. या परिषदेसाठी शिक्षणक्षेत्रात कार्यरत शिक्षक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे, असे आवाहन प्रस्तावित विद्यापीठाचे मुख्य प्रवर्तक आसिफ इक्बाल, फारुक सय्यद, डॉ.कासिम इमाम, सरफराज अहमद, ग्लोबल एज्युकेशनल अँन्ड हेल्थ आर्गनाइजेशन, एशियन सेंटर फॉर सोशल स्टडीज व मासिक गुलबुटे मुंबईच्या वतीने करण्यात आले आहे.

संस्कारित पिढीमुळे समाज समृद्ध बनतो : जयंतसागर महाराज

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२८ ऑक्टोबर-

प्रगती होण्यासाठी, समृद्ध होण्यासाठी चांगली संगत-सोबत पाहिजे. एक चुकीचे काम तुम्ही केलेली शंभर काम संपवते. स्थान महत्त्व खूप महत्त्वाचे आहे. मंदिरात रोज जाऊन आलात तर दर्शनाचे, धर्माचे भाव निर्माण होतात. त्यामुळे मुलांना रोज मंदिरात घेऊन, संतांच्या दर्शनाला जावे. साधू-संतांच्या सन्निध्यामुळे आचार-विचार चांगले येतात व आपली पुढील पिढीसुद्धा संस्कारित होते, असे विचार मुनीश्री जयंतसागर महाराज यांनी मांडले.

जैन कासार मंदिरातील तीन दिवसीय प्रवचनमालेत बोलत होते. ते पुढे म्हणाले, आपण जीवन जगत असताना सर्वांचे ऐकले पाहिजे, पण आपल्याला जे योग्य वाटते तेच आपल्याला करता आले पाहिजे. ज्या लोकांची समाज उपेक्षा करतो अशा लोकांच्याकडे आपण आपुलकीणे विशेष लक्ष दिले पाहिजे . यातच खरा पुरुषार्थ आहे . म्हणजे आपल्याला इतरावर प्रेम करता आले पाहिजे.. मगच आपल्याला आपली जी काही नाती आहेत ती नीटपणे समजतील. त्याचा आपण एकमेकांना आधार देऊ शकु . शेवटी माणसाला आधार असतो तो शब्दाचाच. आपल्या वर्तनातूनच आपल्याला समोरच्या माणसाला जिंकता आले पाहिजे, त्याच्या मनात घर करता आले पाहिजे, असेही मुनीश्री जयंतसागर महाराज म्हणाले. यावेळी मुनीश्री सारस्वतसागर महाराज व सौम्यसागर महाराज यांनी श्रावकांना उद्बोधन केले. सूत्रसंचालन प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी केले. यावेळी जैन कासार समाजाचे सुभाषचंद्र वनकुद्रे, संजय कंदले, बाबुराव तंगा, रविकिरण मैंदर्गे, अरुणकुमार धुमाळ, प्रशांत मोहिरे, चेतन वनकुद्रे तसेच महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

एच. एन. कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना उद्यमदीप अंतर्गत उद्यमशीलतेचे धडे

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२८ ऑक्टोबर-

विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशील गुण अंगीकारण्या बरोबर यशस्वी उद्योजक बनविण्याच्या उद्देशाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स आणि वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्यम दीपच्या (ट्रेड फेअर) विविध वस्तु विक्रीच्या दालनांचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्यमदीप मध्ये साडेतीनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी उद्योजकतेचे धडे गिरविले.

याप्रसंगी सोलापूर वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त श्री.भूषण शहा, वैभव गांधी, ब्रिजेश गांधी, सौ. माया गांधी, प्राचार्य डॉ सत्यजित शहा, वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. विजय आठवले. प्राचार्य संतोष कोटी, एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. ओ. एम. अष्टन्कर, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ अश्विन बोदार्डे, पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत उद्यम फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश गुळनी, पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठ विद्यापरिषद समिती राज्यपाल देवानंद चिलवंत आदी उपस्थित होते.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर या उद्यमदीपचे आयोजन करण्यात आल्याने विविध वस्तूंच्या विक्रीचे ७० दालने विद्यार्थ्यांनी उभी केली आहेत.

श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी प्रशाला द्वितीय

मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा टप्पा २ अभियान

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२८ ऑक्टोबर-

शैक्षणिक वर्ष २०२४- २५ मध्ये राज्य शासनाच्या वतीने ''मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २'' अभियानात सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री. नवलबाई फुलचंद शहा कोठारी प्रशालेस ''दक्षिण सोलापूर तालुक्यातून द्वितीय क्रमांक'' मिळाला आहे.

प्रशालेत विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी स्कॉलरशिप परीक्षा, एम.एम.एन.एस परीक्षा,चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, लेखन स्पर्धा, क्रीडा स्पर्धा घेतले.याशिवाय प्रशालेत विज्ञान प्रयोगशाळा, गणित प्रयोगशाळा, इंग्रजी प्रयोगशाळा, मराठी प्रयोगशाळा,वाचन कोपरा, ग्रंथालय, संगणक कक्ष, सांस्कृतिक भवन, भव्य क्रीडांगण, फिल्टर पाण्याची सोय, हँडवॉश स्टेशन, परसबाग, निवडणूक प्रक्रिया, शिक्षक विद्यार्थी शैक्षणिक साहित्य निर्मिती, कंपोस्ट खत निर्मिती, स्काऊट गाईड पथक, आरोग्य तपासणी,अध्ययन अध्यापनासाठी सर्व वर्ग डिजिटल, संपूर्ण शाळा रंगरंगोटी,बोलक्या भिंती, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, आनंददायी शनिवार,वाचन चळवळ उपक्रम, स्वच्छता मॉनिटर उपक्रमात २०० व्हिडिओची निर्मिती, विध्यांजली पोर्टल, मेरी माटी मेरा देश उपक्रम, तंबाखूमुक्त शाळा प्रमाणपत्र, गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप असे विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. प्रशालेच्या यशाचे संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत शहा, सचिव अजितनाथ उपाध्ये, विश्वस्त देवेंद्र शटगार, बाहुबली उपाध्ये, सुशीला उपाध्ये, मुख्याध्यापीक अनिता हाडोळे, दर्शना उपाध्ये, प्रतिभा शिरसाट या मान्यवरांनी मुख्याध्यापक रमेश यादवाड यांचे अभिनंदन केले. या सत्कार समारंभ प्रसंगी बोलतांना रमेश यादवाड यांनी प्रशालेस मिळालेले यश हे माझे एकट्याचे नसून सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांचे आहे असे म्हणून संस्था पदाधिकारी व उपस्थिती सर्वांचे आभार मानले.

सोशल महाविद्यालयात 'सर सय्यद शनासी' या विषयावर चर्चासत्र

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२८ ऑक्टोबर-

सोलापूर सोशल असोसिएशनस् आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्सच्या उर्दू पीएच.डी. संशोधन केंद्रातर्फे सर सय्यद अहमदखाँ यांच्या शैक्षणिक साहित्यावर विद्यापीठ स्तरावर 'सर सय्यद शानासी' या विषयाचा एक दिवसाचा चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

चर्चासत्राची सुरूवात उर्दू पदव्युत्तर भाग एकची विद्यार्थ्यांनी मिसबाह रंगरेजने कुराण पठणाने केली तर उर्दू विभागप्रमुख प्रा.डॉ.मुहम्मद शफी चोबदार यांनी उर्दू पी.एचडी संशोधन केंद्र आणि उर्दू विभागाचा परिचय करून दिला. डॉ.अब्दुल कदीर विजापुरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. उर्दू विभागचा विद्यार्थी हाफिज मोहसीन शेख यांनी उर्दू विषयात नेट जे.आर.एफ. उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आले. उर्दू विभागाचे प्रा.डॉ. गौसअहमद शेख यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रा. तसनीम वड्डो यांनी मानले. पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापक डॉ. मुहम्मद शफी चोबदार होते. या सत्रात उर्दू विभागाचे विद्यार्थी ख्वाजा मोईनुद्दीन शेख, मस्कान सोमजल, मेराज अकील शेख, प्रा. डॉ.तसनीम वड्डो, डॉ.अब्दुल कादीर विजापुरे, मेराज अकील शेख यांनी विविध विषयांवर शोधनिबंध सादर केले. दुसऱ्या सत्राचे अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गौस अहमद शेख होते. या सत्रात फैजअहमद सय्यद, हाजी अफझल, मिसबाह तांबोळी आणि उजमा यांनी आपले शोधनिबंध सादर केले.

एनएबी निवासी अंध कार्यशाळेमध्ये दिवाळी फराळ वाटप

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२८ ऑक्टोबर-

नॅब संचलित एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेमध्ये आज पालक शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले. पालक सभेचे अध्यक्षस्थानी नॅब संस्थेचे सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार होते. प्रमुख पाहुणे मा.श्री. सुरेश सरगम होते.

रामचंद्र कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले तर आकांक्षा भंडारे यांनी कार्यशाळेतील झालेला पहिल्या सत्रातील कार्यक्रमाचा अहवाल सादर केला. यावेळी पालकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. अध्यक्षांनी संस्था व शाळेविषयी विस्तृतपणे माहिती सांगितली. सिद्धेश्वर केसकर, रफत अंजुम शेख, सुभाष कदम व देवराव पुंडगे या पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. समाज कल्याण विभागाचे वै.सा.का. शशिकांत ढेकळे सरांकडून प्रत्येकी विद्यार्थ्यांना १०० रुपये स्टायफंड देण्यात आले. सोलापूरचे प्रसिद्ध उद्योजक अरुण शर्मा व शालू शर्मा यांच्यातर्फे दिवाळीनिमित्त फराळ वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे सदस्य देवेंद्र भंडारे व इनरव्हील फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रद्धा काबरा यांची उपस्थिती होती व पालकांना व विद्यार्थ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रियाज मुल्ला यांनी केले. आकांक्षा भंडारे यांनी आभार मानले.

पृथ्वीवरी जितुकी शरीरे ती परमेश्वराची घरे

प. पू. महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांच्या २९व्या पुण्यस्मरणाच्यानिमिताने

आपल्या प्रत्येकामध्ये एक विशेष शक्ती सळसळत असते. ही शक्ती म्हणजेच ईश्वराची वास्तव्य असते. या ऊर्जेची जाणीव करून देण्याचे काम महातपस्वी श्रीकुमारस्वामी यांनी केले. ते बुद्धिमान असल्याने विद्यापीठात प्रथम आले. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या विषयात पारंगत असूनही जनकल्याणासाठी त्यांनी योग साधनेचा प्रचार केला.

धारवाडच्या शिवयोगी श्रीगुरुसिद्ध प्रभू देवरू यांच्या नवकल्याण मठाचे पुनरुज्जीवन केले. प्रार्थना योगमंत्र ३९; हे प्रभो प्रसीद ओम्३९; सर्वांपर्यंत पोहचविला. जनजग्रणाचा ध्यास घेतला. मद्रास, अलीगढ, ऋषिकेश येथे प्रवचने दिली. अध्यात्मातील त्याच्या अधिकाराची दखल जगाने घेतली. इंग्लंड, फ्रान्स, स्विझरलँड, बेल्जियम, हॉलंड, इटली, येथील प्रवचने श्रोत्यांना भवली. सन १९७२ मध्ये पॅरिस येथे आयोजित केलेल्या जागतिक धर्मपरिषदेचे ते अध्यक्ष झाले. या कार्याची परिचय साऱ्यांनी व्हावा म्हणून श्री. राजेंद्र मायनाळ यांनी ३९; महातपस्वी श्रीकुमारस्वामी : जीवन व कार्य ३९; हा ग्रंथ लिहून प्रकाशित केला.

श्री. मायनाळ ते बीई झाले. शासकीय सेवेत ३३ वर्षे होते. त्यांना आध्यामाची ओढ आहे. सोलापुरातील कुमारस्वामी योग विहार या संस्थेचे सन२००२ पासून अध्यक्षपदाची धुरा वाहत आहे. योगशास्त्र आणि आध्यात्म या विषयांचे महत्त्व लोकांपर्यंत नेण्याचे महत्वपूर्ण कार्य ते सातत्याने करत आहे.

जीवन समाधानी होण्याचा मार्ग साधकांना दाखवत आहेत. या कार्याचा एक भाग म्हणून हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या ग्रंथ निर्मितीमुळे समाज आधिक संतीप्रिय होणार आहे. सर्वोच्च आनंद आपल्या साऱ्यांनी अनुभावाला मिळणार आहे. श्री. राजेंद्र मायनाळ यांच्या या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

-प्राचार्य श्याम भुर्के
अध्यक्ष,
अ. भा. साहित्य
परिषद, पुणे शाखा

डॉ. गीता जोशी यांच्या कथा, कवितांनी रसिक मंत्रमुग्ध

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२८ ऑक्टोबर-

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेच्या वतीने सुरू असलेल्या रंगवर्धन उपक्रमात नाट्य परिषदेच्या मोदी भागातील स्व.पद्माकर देव सभागृहात अभिवाचनाचा कार्यक्रम संपन्न झाला. डॉ. गीता जोशी यांच्या आहे कसा तो आननी या कथासंग्रहातील 'कन्या कामेष्टी', 'मुठभर माती', 'देखल्या परकरा दंडवत' या कथा व 'बहावा' मधील काही कवितांचे अभिवाचन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ.गीता जोशी, अशोक किल्लेदार, शशिकांत लावणीस, धनंजय गोडबोले, आणि विद्या लिमये यांचा सहभाग होता. सोलापुरातील ज्येष्ठ रंगकर्मी शशिकांत लावणीस यांनी वयाची ८१ वर्ष पूर्ण केल्याबद्दल अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेच्या वतीने सर्व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रा. जोतिबा काटे, सह-कार्यवाह व नियामक मंडळ सदस्य मुंबईचे सुमित फुलमामडी, ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी, ज्येष्ठ नाट्य कलावंत सुनील गुरव, कार्यकारणी सदस्य व्यंकटेश रंगम, अपर्णा जोशी, राजाराजेशचंद्र, किरण फडके, डॉ.नरेंद्र जोशी, प्रा. संतोष पवार, योगेश कुलकर्णी यांच्यासह रसिक श्रोते उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा.जोतिबा काटे यांनी केले. ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी आभार मानले.

क्राईम वृत्त...

दुचाकी अपघातात जखमी झालेल्या महिलेचा अखेर मृत्यू

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

अज्ञात दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या भोसरे गावच्या महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात रविवारी पहाटे मृत्यू झाला. शोभा हरिदास कदम (वय ५८ वर्ष, रा.भोसरे, ता. मोहोळ) असे त्या मयत महिलेचे नाव आहे. त्या १४ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास भोसरे येथील रस्त्यावर बसलेले असताना अज्ञात दुचाकीने त्यांना धडक दिली होती. यात मार लागून त्या जखमी झाल्याने त्यांना एका खाजगी दवाखान्यात आठवडाभर उपचार करून मुलगा काशिनाथ यांनी २१ ऑक्टोबर रोजी दुपारी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान रविवारी पहाटे मृत्यू झाला.

उकळते तेल अंगावर पडल्याने विवाहिता जखमी

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

घरामध्ये दिवाळीचे फराळ करताना कढईतील गरम तेल अंगावर पडल्याने एक विवाहिता भाजून जखमी झाल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील आंधळगाव येथे रविवारी दुपारी घडली. दिपाली शिवाजी स्वामी (वय ३० वर्ष, रा. आंधळगाव) असे त्या विवाहितेचे नाव आहे.

दिवाळी निमित्त ती आज घरामध्ये गॅसवर फराळ तळत असताना अचानक कढईतील गरम तेल तिच्या अंगावर उडाले. यात हात, पाय भाजल्याने तिला पाटकळ येथील एका खाजगी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात सासरे गुरुलिंगप्पा स्वामी यांनी सायंकाळी दाखल केले.

तांदुळवाडी येथे दोन दुचाकींच्या धडकेत एक ठार

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

दोन दुचाकींच्या धडकेत दुचाकी वर मागे बसलेला एक जण जागीच ठार झाल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील तांदूळवाडी येथे रविवारी दुपारी अडीच वाजता घडली. आयुब शेखुंबर शेख (वय ४९ वर्ष, रा. पिंजरवाडी, दक्षिण सोलापूर) असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे.

ते रविवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास मोटरसायकलवर मागे बसून तांदूळवाडी कडून पिंजरवाडी कडे येत असताना तांदुळवाडी गावाजवळ अज्ञात दुचाकीने त्यांच्या मोटरसायकलला पाठीमागून धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी होऊन जागेवर बेशुद्ध पडले. त्यामुळे त्यांना येथील शासकीय रुग्णालयात नातेवाईक अल्ताफ मुजावर यांनी दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

सुशील नगरात साडीने गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

अज्ञात कारणावरून एका तीस वर्षीय तरुणाने राहत्या घरातील छताच्या हुकला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना विजापूर रोडवरील सुशील नगरात शनिवारी रात्री सव्वा दहा वाजेच्या सुमारास उघडकीस आली. योगीराज मल्लिनाथ कुलकर्णी (वय ३० वर्ष, रा. सुशील नगर, विजापूर रोड, सोलापूर) असे त्या गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने शनिवारी रात्री अज्ञात कारणावरून राहत्या घराच्या पहिल्या मजल्यावरील खोलीमध्ये गळफास घेतला असल्याचे रात्री सव्वा दहा वाजता आढळून आले. तेव्हा शेजारी राहणारे विजय मोहोळकर व भाऊ नागराज यांनी गळफासावरून त्याला खाली उतरून बेशुद्ध अवस्थेत येथील शासकीय रुग्णालयात मध्यरात्री साडेअकरा वाजता शेजारी विजय मोहोळकर यांनी दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या सहाजणांवर गुन्हा

सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सहाजणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अंकिता श्रीकांत कंची (वय १९, रा. एफ ग्रुप, लक्ष्मी चौक, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती श्रीकांत कंची, सासू विजयालक्ष्मी, सासरे दयानंद, नणंद शरयू, नणंदेचा नवरा नवीन कोटा (सर्व रा. कोटा नगर, विडी घरकुल, सोलापूर), नणंद निकिता बोल्ली (रा. हैद्राबाद) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ ऑगस्ट २०२३ ते १८ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत अंकिता या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती व इतरांनी मिळून अंकिता हिस अर्धा तोळ्याची सोन्याची चैन, रोख ४० हजार रुपये मागून तसेच व्यवसायाकरीता ५ लाख रुपये आई-वडीलांकडून घेऊन ये म्हणून तिचा शारीरीक व मानसिक छळ केला.

अंकिताला जेवण न देता शिवीगाळ करणे, मारहाण करणे, टोमणे मारून अपमानास्पद वागणूक देत तिचा मानसिक छळ केला. म्हणून पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कटके पुढील तपास करीत आहेत.

आ. विजयकुमार देशमुखांचा शहर उत्तरमधून उमेदवारी अर्ज दाखल

मतदारसंघातून ११ जणांनी दाखल केली उमेदवारी



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

जोरदार घोषणाबाजी, ढोल ताशांचा गजर, गुलालाची मुक्तपणे उधळण करीत आणि फटाक्यांच्या कडकडाटात भारतीय जनता पार्टीकडून विजयकुमार देशमुख व त्यांचे चिरंजीव किरण देशमुख यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज शहर उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक कार्यालयात दाखल केला. या दोघांबरोबर इतरही ९ जणांनी म्हणजेच आज एकाच दिवसात उत्तर मतदारसंघासाठी तब्बल ११ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले.

सोलापूरचे लक्ष लागलेल्या शहर उत्तर या मतदारसंघात जय श्रीरामच्या घोषणा देत आणि भव्य रॅली काढत आ. विजयकुमार देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महायुती मधील नेतेमंडळी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते. आ. देशमुख यांच्या राजवाडे चौकातील कार्यालयापासून त्यांची रॅली निघाली. यावेळी शहराध्यक्ष नरेंद्र काळे, संजय कोळी, अनंत जाधव, किरण देशमुख, अजितदादा गटाचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, सुहास कदम यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मतदारसंघात देशमुख-कोठे अशी थेट लढत होणार असल्याने या दोघांनीच जोरदार शक्तीप्रदर्शन करीत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. महायुतीचे उमेदवार देशमुख यांनी त्यांच्या संपर्क कार्यालयापासून शहर उत्तर कार्यालयापर्यंत जोरदार शक्तीप्रदर्शन केले. उद्या मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर या शेवटच्या दिवशी अर्ज घेणे आणि भरून देण्याची प्रक्रिया राहणार आहे. दि. ३० ऑक्टोबरला अर्जाची छाननी होणार असून, ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे काढून घेता येणार आहे. यानंतर २० तारखेला मतदान प्रक्रिया पार पडणार असून, मतमोजणी २३ तारखेला होणार आहे.

माझे मतदार, माझ्या पाठीशी

उमेदवारी अर्ज भरल्यानंतर देशमुख म्हणाले, मी मागील चार टर्म या मतदारसंघाचा आमदार आहे. मतदारसंघातील प्रत्येक नागरिकांशी माझा थेट संबंध आहे. परंतु विरोधातील उमेदवाराला स्वतःचा पक्ष माहित नाही. ते वर्षातून चार वेळा पक्ष बदलतात. मी आजपर्यंत भाजपचा सभासद आहे आणि राहणार. त्यामुळे अशा लोकांनी काहीही सांगितले तरी जनता त्यावर विश्वास ठेवणार नाही. आज मी अर्ज भरण्याच्या कार्यक्रमात काहीही बोलणार नाही. केवळ आपला आशीर्वाद घेवून आज अर्ज दाखल करीत आहे आणि उद्यापासून प्रचाराला लागणार आहे. गाठीभेटीवर आपला जोर राहणार आहे. माझ्या मतदारसंघातील सर्व मतदार माझ्या पाठीशी असल्याचा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी महापौर शोभा बनशेट्टी यांचाही अर्ज दाखल

उत्तर सोलापूर मतदारसंघात ब्ल्यु इंडिया पार्टीकडून दत्तात्रय थोरात, अपक्ष उमेदवार म्हणून मारूती सावंत, शोभा बनशेट्टी, नागमणी किसन जक्कन, मनसेचे परशुराम इंगळे, राष्ट्रवादीकडून महेश कोठे, कॉंग्रेसकडून सुनील रसाळे, अपक्ष मनोहर कोरे, भाजपाकडून विजय देशमुख, किरण देशमुख, तर अपक्ष म्हणून विजय उगडे यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

ढोल-ताशांच्या अन् तुतारीच्या जयघोषात महेश कोठेंनी दाखल केली उमेदवारी

जोरदार शक्तीप्रदर्शन; जागोजागी झाले स्वागत

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

ढोल-ताशा, गुलालाची मुक्तपणे उधळण, फटाक्यांचा कडकडाट अन् तुतारीच्या जयघोषात राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) तथा महाविकास आघाडीचे उमेदवार महेश कोठे यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज शहर उत्तर मतदारसंघात दाखल केला.

उमेदवारी दाखल करण्यासाठी राष्ट्रवादी आणि मित्रपक्षाचे अनेक कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांनी सकाळपासूनच कोठे यांच्या संपर्क कार्यालयासमोर मोठी गर्दी केली होती. सकाळी बलिदान चौकातील त्यांच्या संपर्क कार्यालयापासून मोठी रॅली काढण्यात आली. ही रॅली मधला मारुती चौक, टिळक चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेकॅनिक चौक, चार पुतळा चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून उत्तर मतदारसंघाच्या निवडणूक कार्यालयाजवळ आली.

या रॅलीमध्ये महेश कोठे यांच्यासोबत त्यांचे चिरंजीव प्रथमेश कोठे, शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, मनोहर सपाटे, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, विठ्ठल वानकर, दशरथ गोप, सुधीर खरटमल, पद्माकर काळे, नलिनी चंदेले, सुनिता रोटे, लता फुटाणे, भारत जाधव, सत्यनारायण बोल्ली, मधुकर आठवले, साबीर कुर्ले, जावेद सिकंदर, राजू कुरेशी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते-पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या रॅलीत उमेदवार महेश कोठे यांनी जागोजागी देव-देवतांना पुष्पहार घालून विजयासाठी साकडे घातले. या रॅलीद्वारे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महामानवांनाही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी दिलेल्या विविध घोषणांनी अवघा परिसर दुमदुमून गेला होता. उमेदवारी अर्ज मनोहर सपाटे, चेतन नरोटे, सुरेश फलमारी, प्रथमेश कोठे, सुधीर खरटमल आदींनी दाखल केला. दरम्यान, हा अर्ज दाखल केल्यानंतर कोठे यांनी मतदार गाठीभेटी घेण्यास आरंभ केला. या मतदारसंघातील कोंडी व इतर एक-दोन गावात जावून त्यांनी ग्रामस्थांशी थेट संवाद साधत गावकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

तुतारी वाजणार अन् मुंबईला जाणार

या शक्तीप्रदर्शनावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार महेश कोठे यांनी आपली प्रतिक्रिया नोंदविताना सांगितले की, आता शहर उत्तरमध्येच नाहीतर अवघ्या राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आणण्याचे जनतेनेच ठरविले आहे. गेल्या २० वर्षांत मालकांनी काय काम केले नसल्याचा आरोप करीत जनता त्यांना आता या टर्मला घरी बसविणार असल्याचे कोठे म्हणाले. दरम्यान, स्मार्ट सिटीत एकही काम नीट केले नसल्याने जनता जाम चिडून असून, आता आमची तुतारी वाजणार अन् मुंबईला जाणार असा आत्मविश्वास कोठे यांनी यावेळी व्यक्त केला. तर यावेळी शिवसेनेच्या काही पदाधिकाऱ्यांवरही त्यांनी सडकून टिका केली.

भाजपा कार्यालयात ढोल ताशांचा एकच जल्लोष; घुमला जय श्रीरामचा नारा...!

शंखनाद करून केला विजयाचा जयघोष : देवेंद्र कोठे

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

विधानसभा निवडणुकीचे वातावरण आता चांगलेच तापले आहे. शहर मध्य विधानसभा मतदारसंघासाठी भाजप पक्षाकडून देवेंद्र कोठे यांना उमेदवारी जाहीर झाली त्यानंतर भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सकाळपासूनच भाजप कार्यालयात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण होते. दरम्यान दुपारी एक वाजता सुमारास भाजप कार्यालयात देवेंद्र कोठे यांनी प्रवेश करताच सर्वप्रथम कोठे यांनी कार्यालयाच्या पायरीला स्पर्श करून आशीर्वाद घेतला. त्यानंतर सर्वांचे आशीर्वाद घेतले.

दरम्यान देवेंद्र कोठे यांचे यावेळी जंगी स्वागत करण्यात आले. देवेंद्र दादा तुम आगे बढो...! हम तुम्हारे साथ...! है

जय श्रीराम... भारत माता की जय...... अशा घोषणांनी कार्यालय दणाणून सोडले. यावेळी देवेंद्र कोठे यांनी सर्वांचे आशीर्वाद घेऊन भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले आपण सर्वांचा आशीर्वाद माझ्या पाठीमागे असू द्या, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला संधी देऊन उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे तुम्ही सर्वांनी देखील माझ्या पाठीमागे खंबीर उभे राहावे. भाजपला सर्वप्रथम सुटलेली शहर मध्य विधानसभा मतदारसंघ आपण नक्कीच जिंकू असा आशावाद व्यक्त केला.

तत्पूर्वी शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी देखील कार्यकर्त्यांना सूचना देताना, सर्व ताकदीनिशी ही निवडणूक लढवायची आहे, आणि जिंकायची आहे. यासाठी सर्वस्व पणाला लावण्याची तयारी ठेवा. आपल्यातील नाराजी बाजूला ठेवून जागा जिंकण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन केले. कधी नव्हे ती भाजपला शहर मध्याची जागा सुटली आहे त्याचे सोने करा असे सांगितले.

तदनंतर मोजक्या कार्यकर्त्यांसह देवेंद्र कोठे यांनी आपला नामनिर्देशन अर्ज भरण्यास रवाना झाले. यावेळी भाजपचे नेष्ठ नेते पांडुरंग दिड्डी,विजया वड्डेपल्ली, इंदिरा कुडक्याल,रोहिणी तडवळकर,अविनाश महागावकर, माजी नगरसेवक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

रखरखत्या उन्हात निघाले लाल वादळ

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघामधून कॉ.आडम मास्तर यांनी दाखल केले नामनिर्देशन पत्र

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर-

सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीचे बिगुल वाजले असून येत्या २० तारखेला मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने सोलापूर शहरमध्य विधानसभा मतदारसंघातून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने अधिकृतरित्या आडम मास्तर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहे.

येत्या २३ नोव्हेंबरला पुरोगामी महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत येईल आणि जनतेच्या विकासाला गती प्राप्त होईल असा विश्वास ज्येष्ठनेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी त्यांचे नामनिर्देशन पत्र दाखल केल्यानंतर माध्यम परिवाराशी बोलताना व्यक्त केले. सोमवार दि. २८ ऑक्टोबर २०२४ रोजी उत्तर तहसील कार्यालय येथे २४९, सोलापूर शहरमध्य विधानसभा मतदार संघ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) च्यावतीने आपले अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केले. याप्रसंगी कॉ. एम.एच.शेख, व्यंकटेश कोंगारी, गजेंद्र दंडी, अनिल वासम, बापू साबळे, सनी शेट्टी, दीपक निकंबे, नरसिंग म्हेत्रे आदी प्रस्तावकासह कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान भारताचा कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी च्या वतीने सोमवार दिनांक २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता २४९, सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघातून आपली उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यासाठी भव्य पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत आबालवृद्ध कार्यकर्ते खाद्यांवर लाल झेंडा, डोक्यावर लाल टोपी, गळ्यात लाल शेले घेऊन ढोल-ताशा आणि हलगीनाद करत रखरखत्या उन्हात आडम मास्तर तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, निवडून निवडून येणार कोण, मास्तर शिवाय दुसरे कोण, आडम मास्तर को लाल सलाम अशा जोशपूर्ण घोषणा देत पदयात्रा निघाली या पदयात्रेत आकर्षक असे प्रचार रथ सजविण्यात आले.

या रथात आडम मास्तर यांच्या पत्नी कामिनी आडम, पक्षाचे राज्य सचिव डॉ. उदय नारकर, पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. एम.एच.शेख, नलिनी कलबुर्गी, युसुफ शेख (मेजर), सामाजिक कार्यकर्ते दिनेश घोडके, मुकरी सालार, प्रा. इरफान शेख, साथी बशीर शेख, श्रीनिवास म्हेत्रे, अकिल शेख (मेंबर) आदी मान्यवर होते.

याप्रसंगी व्यासपीठावर नसीमा शेख, कामिनी आडम, व्यंकटेश कोंगारी, शेवंता देशमुख, सुनंदा बल्ला, रंगप्पा मरेड्डी, प्रा. अब्राहम कुमार, शंकर म्हेत्रे, म.हनीफ सातखेड, प्रहारचे जमीर शेख आदींची उपस्थिती होती. या जाहीर सभेचा सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कॉ. ॲड. अनिल वासम यांनी केले.

'एमआयएम'चे जोरदार शक्ती प्रदर्शन; भाजपला देणार जोरदार टक्कर : फारूक शाब्दी

बॅंजोसह पारंपरिक ढोल पथक माध्यमातून भव्य रॅली काढून भरला उमेदवारी अर्ज

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २८ ऑक्टोबर -

विधानसभा निवडणुकीमध्ये आता अधिक रंगत येत चालली आहे. अर्ज भरण्याच्या अंतिम दिवसापूर्वी प्रमुख पक्ष भाजप, उद्धव ठाकरे गट, आणि एम.आय.एम पक्षाने आपापल्या मतदारसंघात नामनिर्देशन अर्ज दाखल केले. शहर मध्य विधानसभा मतदारसंघासाठी एम.आय.एमकडून अधिकृत उमेदवार फारूक शाब्दी यांनी नामनिर्देशन अर्ज दाखल केला.

दरम्यान नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यापूर्वी काढलेल्या भव्य अशा रॅलीने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. युवकांचा प्रचंड उत्साह या रॅली मध्ये पाहायला मिळाला. या रॅलीत एमआयएमच्या समर्थक कार्यकर्त्यांनी हातामध्ये हिरवे, भगवे, निळे झेंडे घेऊन सहभाग नोंदवला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या उपस्थितीत निघालेल्या यारॅलीतून उमेदवार फारूक शाब्दी यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केले. जिंदा शहा मदार चौक या ठिकाणाहून ही रॅली विजापूर वेस, बारा इमाम चौक मार्गे पुढे सिव्हील चौक या ठिकाणी आली. तिथून आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शाब्दि हे इम्तियाज जलील यांच्यासोबत निवडणूक निर्णय कार्यालयाकडे रवाना झाले.

यावेळी उमेदवार फारूक शाब्दी म्हणाले, माझी खरी लढत भाजप सोबत आहे, लोकसभा निवडणुकीत संविधान वाचविण्यासाठी महाविकास आघाडीला पाठिंबा दिला, भाजपला थांबवले. आज आलेली ही गर्दी आम्हाला आशीर्वाद देण्यासाठी आणि प्रेम व्यक्त करण्यासाठी आलीय. आणि निश्चितच यावेळी एम आय एम बाजी मारेल.

जलील म्हणाले, हा जनसमुदाय आहे तो विजयाची नांदी आहे, सर्वसमाजाच्या मतांवर फारूक शाब्दी हे यावेळी निश्चित विजयी होतील असा विश्वास केला.लोकसभा निवडणुकीत मुस्लिम समाजाने महाविकास आघाडीला मतदान केले, मत विभाजन टाळले, तशाच प्रकारे विधानसभेत होईल अशी अपेक्षा होती, पण समाजाची नाराजी झाली. याप्रसंगी एमआयएमचे पदाधिकारी सदस्य आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

संक्षिप्त वृत्त

पंढरपूर-मंगळवेढ्यातील जनतेचा मनसेला विजयी करण्याचा निर्धार

मंगळवेढा, दि. २८ ऑक्टोबर-

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार दिलीपबापू धोत्रे यांना विजयी करण्याचा मतदार संघातील नागरिकांनी निर्धार केला आहे. मंगळवेढा झंजावत दौरा व सभा आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे दिलीप बापू धोत्रे यांनी मागील अनेक वर्षांपासून मतदार संघातील नागरिकांचे हित डोळ्यासमोर ठेवून काम केले आहे. पंढरपुरातील नागरिकांचा वाढीव कर माफ करणे, हिंदू, मुस्लिम स्मशानभूमी दुरुस्ती, रस्ते खड्डे मुक्त करणे, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मदत करणे, बेरोजगार तरुणांना नोकरी उपलब्ध करून देणे, महिलांना सक्षम बनवण्यासाठी लघुउद्योग उभा करून देणे याचबरोबर कोरोना काळात त्यांनी रुग्णांना बेड उपलब्ध करून देण्यासाठी पल्स कोविड हॉस्पिटलची निर्मिती, तसेच एकही नागरिक उपाशी झोपणार नाही याची काळजी त्यांनी घेतली होती.त्यामुळे दिलीप बापू धोत्रे यांच्याकडे सर्वसामान्यांना मदत करणारे नेतृत्व म्हणून पाहिले जाते.सध्या पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली रस्ते, वीज, पाणी आणि विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी तसेच बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी लवकरात लवकर एमआयडीसी उभा करणे, महिलांना सक्षम बनवण्यासाठी लघुउद्योग निर्माण करणे, शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांना निवडून आणण्याचा निर्धार मतदारसंघातील नागरिकांनी केला आहे.

आ. रामभाऊ सातपुते यांना उमेदवारी जाहीर होताच पिलीवमध्ये जल्लोष

पिलीव, दि. २८ आक्टोबर-

महाराष्ट्रात सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून महायुती व महाविकास आघाडी करुन उमेदवार जाहीर करुन उमेदवारी भरण्याची लगभग सुरु आहे. माळशिरस तालुक्यात महायुतीचे उमेदवार म्हणून विद्यमान आमदार रामभाऊ सातपुते यांना पुन्हा उमेदवारी देण्याचे निश्चित होताच पिलीव येथे आमदार रामभाऊ सातपुते समर्थकांनी फटाके फोडून व एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी भाजपचे नेते राहुल मदने, माजी सरपंच नितीन मोहीते, गणेश देशमुख, निशांत बगाडे, विठ्ठल करांडे, मयुर भैस, प्रमोद भैस, स्वप्नील सावळजकर, सागर बगाडे, सतिश गोंजारी, झेंडे, चोबे यांच्यासह अनेक समर्थक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यंदा माळशिरस तालुक्यात पुन्हा एकदा महायुतीचे रामभाऊ सातपुते व महाविकास आघाडीचे उत्तमराव जानकर यांच्यात लढत होणार आहे.

SWEEP
स्वीप जनजागृती मतदार अभियान २०२४

झाडबुके महाविद्यालयात स्वीपमार्फत मतदार जनजागृती

बार्शी, दि. २८ ऑक्टोबर-

बार्शी विधानसभा मतदारसंघात झाडबुके महाविद्यालय, बार्शी या ठिकाणी स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी सुहास गुरव यांच्या मार्गदशनखाली कक्षाच्या सदस्यांनी मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले. प्राचार्य मनोज गादेकर, उपप्राचार्य करडे, प्रा. रणदिवे यांनी सहकार्य केले. कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मतदानासंदर्भात जागृती करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मतदारांनी घ्यावयाची प्रतिज्ञा घेतली. स्वीप टीमचे सदस्य प्रदीप जाधवर यांनी आभार मानले.

महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबवले; बार्शीत गुन्हा दाखल

बार्शी, दि. २८ ऑक्टोबर-



येथील बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत एक चोरीची घटना घडली आहे. सविता अनुरथ मुकटे (वय ४८ रा. विठ्ठलनगर, बार्शी) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता बार्शी-कळंब मार्गावर असलेल्या बसमध्ये चढत असताना त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसूत्र चोरीस गेले आहे. सविता मुकटे यांच्या म्हणण्यानुसार, त्या आपल्या दोन बहिणींबरोबर घोडकी गावाला जात होत्या. बार्शी बसस्थानकावर बसमध्ये चढताना प्रचंड गर्दीत त्यांच्या गळ्यातील सोन्याचे चार पदरी मनी १० ग्रॅम वजनाचे असे मंगळसूत्र चोरीला गेले. चोरट्याने मुद्दाम लबाडीने त्यांचे मंगळसूत्र लांबवले असावे, असा त्यांचा संशय आहे. सविता मुकटे यांनी घटनास्थळी शोध घेतला, पण मंगळसूत्र सापडले नाही. या प्रकरणी त्यांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

अक्कलकोटमध्ये काँग्रेसच्या म्हेत्रेंचे शक्तीप्रदर्शन

पारंपरिक वाद्यांच्या निनादात काढली रॅली; मतदारसंघातील कार्यत्यांचा जमला मोठा फौजफाटा, सगळीकडे गर्दीच गर्दी

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. २८ ऑक्टोबर-

अक्कलकोट विधानसभा निवडणुकीकरिता अवघे एकच दिवस बाकी असताना सोमवारी काँग्रेसकडून माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी शहरातील प्रमुख मार्गावरून हजारो कार्यकर्त्याच्या उपस्थितीमध्ये भव्य जल्लोषपूर्ण हालगीच्या गजरात मिरवणूक काढून अर्ज भरला. अभी नहीं तो कभी नहीं या इराद्याने प्रचंड शक्ती प्रदर्शन करीत म्हेत्रे यांनी अर्ज भरला. रासपाचे सुनिल बंडगर, वंचितचे संतोष इंगळे यांनीही अर्ज दाखल केला आहे.

रईस टिनवाला, अशपाक बळोरगी, शंकर म्हेत्रे, प्रथमेश म्हेत्रे, शिवराज म्हेत्रे, मल्लिकार्जुन पाटील, मल्लिकार्जुन काटगाव, व्यंकट मोरे, अल्लीबाशा अत्तार, शबाब शेख, आनंदकुमार सोनकांबळे, महादेव चुंगी या प्रमुख मान्यवरांसह तालुक्यातील मोठ्या प्रमाणत काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते. सिध्दाराम म्हेत्रे हे सलग ७ वेळा काँग्रेसकडून उमेदवारी मिळविण्यात यशस्वी ठरले. विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्याची ही सातवी वेळ आहे. १९९८ साली कै आ. बाबासाहेब तानवडे यांच्या निधनामुळे झालेल्या पोटनिवडणुकीत सर्वप्रथम विधानसभा लडविली. युती शासनाच्या काळात ११ मंत्री पोटनिवडणुकीसाठी तळ ठोकून होते. तरीही सिध्दाराम म्हेत्रे विजयी होऊन सर्वप्रथम आमदार झाले. यानंतर सलग २००९ पर्यंत ते आमदार होते. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी शासनात माजी गृह, तुरुंग, फलोत्पादन राज्यमंत्री म्हणून कामकाज पाहिले. प्रशासनातील अधिकारी वर्गावर आजही त्यांचा मोठा दबदबा आहे. सर्व सामान्याच्यां प्रश्नावर, अन्यायावर आजही ते आक्रमतेने तुटून पडतात. याच त्यांच्या खासियतेमुळे अडलेली कामे मार्गी लावण्यासाठी शेवटचा पर्याय म्हणून लोक आवर्जुन म्हेत्रेचे नाव घेतात.

दांडगा लोकसंपर्क अन् दोनवेळा पराभव

२००९ मध्ये शेगाव प्रकरणामुळे त्यांचा सर्वप्रथम माजी आ. सिद्रामप्पा पाटील यांनी पराभव केला. २०१४ विधानसभा निवडणुकीत पुन्हा ते आमदार झाले. २०१९ मध्ये म्हेत्रेंचा विधानसभा निवडणुकीत दुसऱ्यांदा पराभव झाला. प्रचंड अनुभव, दांडगा लोकसंपर्क व पायात भिंगरीप्रमाणे मतदारसंघात त्याचे प्रचार दौरे चालू आहेत. आ. कल्याणशेट्टींबरोबर दोन हात करण्यासाठी ते दुसऱ्यादा सज्ज झाले आहेत.

मधुकरराव चव्हाणांनी निवडणूक लढवावी

अणदूर ग्रामस्थांची मागणी

तभा वृत्तसेवा,
अणदूर, दि. २८ ऑक्टोबर-

काँग्रेसने चव्हाण यांच्यावर अन्याय केला असून, पक्षाने पुनर्विचार करून पुन्हा चव्हाण यांना उमेदवारी द्यावी, नाहीतर त्यांनी अपक्ष फॉर्म भरावा, जनता त्यांच्या पाठीशी उभी राहील असा विश्वास व्यक्त अणदूरमधील नागरिकांनी व्यक्त केला.

तुळजापूर विधानसभा मतदार संघात काँग्रेसने धीरज पाटील यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर अणदूर व परिसरातील जनतेमध्ये नाराजीचा सूर उमटला. आता माघार घ्यायची नाही असा निर्धार जनतेंनी केला. चव्हाण यांनी योग्य निर्णय घेऊ आपण शांत रहावे असे सांगितले. यावेळी ॲड. विशाल शेटे, माजी सरपंच धनराज मुळे, शरणप्पा कबाडे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, डॉ. विवेक बिराजदार यांची भाषणे झाली. काँग्रेसने उमेदवारी बदलून चव्हाणांना द्यावी, अशी मागणी केली. अन्यथा निवडणूक अपक्ष लढवावी अशी मागणी केली. यावेळी, अप्पू धमुरे, संतोष मुळे, संगप्पा हगलगुंडे, बाबुराव मुळे, कारबसपा धमुरे, मधुकर बंदपट्टे, खंडू मुळे, सुधीर ठाकूर, गणेश सूर्यवंशी, बालाजी घुगे, सिद्राम शेटे, सिद्राम नरे आदी उपस्थित होते.

दीपकआबांना आमदार करण्यासाठी तरुणांचे बिरोबाला साकडे

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.२८ ऑक्टोबर-

महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार दीपकआबा साळुंखे पाटील यांना आमदार करण्यासाठी सांगोला तालुक्यातील दोन ते अडीच हजार धनगर समाज बांधवांनी आरेवाडी (ता. कवठेमहांकाळ येथील श्री बिरोबा देवाला साकडे घातले. यावेळी दीपकआबांसह धनगर समाज बांधवांनी बिरोबाच्या नावाने चांगभलंचा गजर करीत आरेवाडीच्या बनात बिरोबाचे दर्शन घेतले. यावेळी धनगर समाज बांधवांनी बिरोबा देवाला नैवेद्य अर्पण करून अभिषेक करून दीपकआबा साळुंखे-पाटील यांना आमदार करण्याची शपथ घेतली. यावेळी धनगर समाज बांधवांच्या वतीने पारंपारिक घोंगडं, काठी, ढोल देऊन दीपकआबांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बिरा पुकळे, शहाजी खरात, सोमा खरात, प्रवीण पाटील, दिलीप मस्के, प्रताप मस्के, शिवाजी कोळेकर, अनिल मेटे, विष्णू सरगर, शाहूराजे मेटकरी, विजय दुधाळ, प्रविण खरात, डॉ. सुधाकर महानवर, नवनाथ मोरे, नागा लवटे, कोंडिबा लवटे, काका बेहरे, पोपट हजारे, बाबा इमडे, तानाजी लवटे, सुनील चोरमले, वस्ताद बंडगर, संजय आलदर, श्रीरंग खांडेकर, पांडुरंग रुपनर, गणेश कोळेकर, धनाजी सरगर, तातोबा सरगर, बापू कोळेकर, सखाराम तंडे, भागवत तंडे, सदाशिव रुपनर, विलास व्हनमाने, योगेश वलेकर, सयाप्पा आलदर, तानाजी आगलावे, विक्रम बुरगे, बसवंत वगरे, शिवाजी बंडगर, अशोक चोरमले, विलास पावणे, रवि चौगुले, राजाराम वलेकर यांच्यासह धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

> गेली ३५ वर्षे ज्या माणसाने राजकारणात कधीच जात-पात किंवा पक्ष, धर्म असा भेदभाव केला नाही.अगदी मध्यरात्री २ वाजता मदतीसाठी त्यांचे दार ठोठावले तरी मदतीसाठी ज्या व्यक्तीने कधीच क्षणाचा विलंब केला नाही, अशा सर्वच समाजाला भरल्या हाताने मदत करणाऱ्या नेत्याच्या उपकरातून उतराई होण्याची ही सर्वांना संधी आली आहे. दीपकआबांना आमदार केल्याशिवाय आता धनगर समाजातील तरुण स्वस्थ बसणार नाही.
>
> **-अजित देवकते, सावे, ता. सांगोला**

बालाजी प्राथमिक शाळेत मेहंदीतून मतदार जनजागृती

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २८ ऑक्टोबर-

बार्शी विधानसभा मतदारसंघात बालाजी प्राथमिक विद्यामंदिर, बार्शी या ठिकाणी स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी सुहास गुरव यांच्या मार्गदशनखाली कक्षाच्या सदस्यांनी मतदार जनजागृती करण्यात आली.

मुख्याध्यापिका भोसले तसेच त्यांचे सहकारी बाळासाहेब आवारे, रमेश तुपसमुद्रे, क्षीरसागर, अल्लाउद्दीन शेख यांनी कार्यक्रम आयोजनासाठी सहकार्य केले.मतदारांनी घ्यावयाची प्रतिज्ञा घेतली.आम्ही भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करु आणि मुक्त निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातीलनिवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता व कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु ही प्रतिज्ञा स्वीप कक्षाचे सदस्य युवराज जगताप यांनी म्हणून घेतली व लोकशाही मजबूत करण्याकरिता प्रत्येकाने मतदान केले पाहिजे मतदानाचा आपला पवित्र हक्क आपण बजावला पाहिजे. तसेच कोणत्याही भूल थापा, प्रलोभनास बळी न पडता योग्य उमेदवारास आपला लोकप्रतिनिधी म्हणून पाठवले पाहिजे. यासाठी मतदान किती महत्वाचे आहे याबद्दल विचार व्यक्त केले. पाचवी ते सातवीमधील विद्यार्थिनींकडून मतदानाविषयी स्लोगन मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो याबाबत हातावर मेहंदी काढून घेण्यात आली. मेहंदी काढणाऱ्या मुलींना गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. मेहंदी घरी आपल्या पालकांना दाखवून त्यांना मतदान करण्यास भाग पाडावे यासंबंधी प्रदीप जाधवर यांनी मार्गदर्शन केले. शाळेच्या सहकार्याबद्दल युवराज जगताप यांनी आभार मानले.

बालाजी प्राथ. विद्यामंदिर
बार्शी

गाडेगाव येथे अवैध दारु निर्मितीचा अड्डा उद्ध्वस्त

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २८ ऑक्टोबर-

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी अवैध दारु धंद्यावर कडक कारवाईचे आदेश दिल्यानंतर, बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे सपोनि ढेरे यांनी गुप्त माहितीच्या आधारे गाडेगाव येथील अड्ड्यावर धाड टाकली.

२७ ऑक्टोबर रोजी सपोनि ढेरे यांच्या नेतृत्वात पोलीस पथकाने गाडेगावमधील गट नंबर ५३ येथील एका शेतात अवैध दारु निर्मिती चालत असल्याची माहिती मिळाली. यावेळी पोलीस पथकाने घटनास्थळी छापा टाकत २८00 लिटर गुळमिश्रीत रसायन व २९0 लिटर बनावट दारुसह एकूण १२७000 रुपयांचे साहित्य जप्त केले. जप्त केलेला साठा जागेवरच नष्ट करण्यात आला. या कारवाईमध्ये सपोनि ढेरे यांच्यासह पोसई बालाजी वळसणे, पोहेकॉ राजेंद्र मंगरुळे, अभय उंदरे, सोमनाथ खांडेकर, गोरख भोसले, महानंदा वाघमारे, सिध्देश्वर लोंढे, राहुल बोंदर व खराडे या पोलीस अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. पुढील तपास सपोनि ढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ सोमनाथ खांडेकर करत आहेत.

आ. राम सातपुते यांच्या उमेदवारीमुळे माळशिरस तालुक्यातील वातावरण बदलले

माळशिरसमधील भाजपा कार्यकर्त्यांकडून पेढे वाटून उमेदवारीचे स्वागत

तभा वृत्तसेवा,
नातेपुते, दि. २७ ऑक्टोबर-

आ. राम सातपुते यांना भाजपने पुनश्च माळशिरस विधानसभेची उमेदवारी दिल्यामुळे माळशिरस तालुक्यात, व्यापारी, उद्योजक, लघु व्यापारी, महिला-पुरुष आदींसह, सर्व स्तरातील नागरिकांनी आनंद उत्सव साजरा केला.

राम सातपुते आमदार म्हणून सर्वसामान्यांच्या भेटीला सातत्याने हजर असायचे. सीमेवरून जवानांनी सांगितलेलं काम त्यांनी केले. अनेक दुर्धर आजाराने पीडित नागरिकांना मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करून, निशुल्कपणे त्यांच्यावर उपचार केले. माळशिरस तालुक्यातील अनेक गावांमध्ये वीज, रस्ता व पिण्याच्या पाण्याची सोय ही कामे त्यांनी प्राधान्याने मार्गी लावली. महिलांसाठी विविध उपक्रम व आरोग्य शिबिरे वेळोवेळी घेतली. बेरोजगारांसाठी औद्योगिक विकास महामंडळासाठीही ते प्रयत्नशील आहेत. विधानसभेची उमेदवारी जाहीर होण्यासाठी उशीर लागत असल्यामुळे जनतेला उत्सुकता लागली होती. अखेर भारतीय जनता पक्षाने त्यांची उमेदवारी जाहीर केल्यामुळे, माळशिरस तालुक्यात सर्व स्तरातील नागरिक, व्यापारी, नव मतदार यांच्यासह सर्व वर्गात नवचैतन्य निर्माण झाले आहे.

पोलिस पाटलांना निवडणूक कामाचा भत्ता मिळावा

ॲड. नानासाहेब शिंदे यांची मागणी

तभा वृत्तसेवा
करकंब, दि. २८ ऑक्टोबर-

निवडणूक कालावधीमध्ये प्रत्येक गावातील पोलीसपाटील संबंधित गावातील मतदान केंद्रावरती दिवसभर निवडणुकीबाबतचे कामकाज करत असतात.आजपर्यंत केलेल्या कामांचा संबंधित पोलीसपाटलांना भत्ता मिळाला नसून तो भत्ता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक पोलीसपाटलांना मिळावा याबाबत जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना पोलीसपाटील संघटनेच्या माध्यमातून पोलीसपाटील संघटनेचे राज्याध्यक्ष दिलीप पाटील व राज्य उपाध्यक्ष प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसपाटील संघटनेचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष ॲड.नानासाहेब शिंदे यांनी निवेदन दिले आहे.

पोलीसपाटील हे पोलीस प्रशासन आणि महसूल प्रशासन यांच्याकडील सर्व कामे वरिष्ठांच्या आदेशानुसार करत असतात.सध्या सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण ९00 पोलीसपाटील कार्यरत असून जिल्ह्यातील ग्रामपंचायत,पंचायत समिती,जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा निवडणुकीच्या वेळेस मतदानापूर्वी १ दिवस व मतदानादिवशी प्रत्येक गावातील पोलीस पाटील निवडणूक बूथवरती इतर निवडणूक कर्मचाऱ्याप्रमाणे २ दिवस निवडणुकीचे काम पहात असतात परंतु शासन निर्णयाप्रमाणे पोलीस पाटलांना भत्ता दिला जात नाही,पोलीस पाटलांना विचारात घेतले जात नाही. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील पोलीसपाटलांना भत्ता मिळावा अशी मागणी पोलीसपाटील संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.

मनसेच्या वतीने दिलीप धोत्रे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

बिरोबा, दामाजी, श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे घेतले दर्शन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२८ ऑक्टोबर-

पंढरपूर विधानसभा मतदारसंघासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार दिलीप धोत्रे यांनी सोमवारी प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार दिलीप बापू धोत्रे यांनी आज हुन्नूर येथील श्री बिरोबा, हुलजंती येथील श्री महालिंगराया, मंगळवेढा येथे संत दामाजी पंत, पंढरपुरात श्री विठ्ठल रुक्मिणी, संत चोखामेळा यांचे दर्शन घेऊन तसेच छत्रपती शिवाजी महाराज, माँसाहेब जिजाऊ, महात्मा जोतिबा फुले,विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,भाई राऊळ यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून, दर्शन घेऊन उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी हुन्नूर येथील बिरोबा देवाचे, मंगळवेढा येथील दामाजी पंथांचे दर्शन घेतले. यानंतर त्यांनी आपला उमेदवारी अर्ज श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या चरणावर ठेवून दर्शन घेतले. याचबरोबर त्यांनी सर्व महापुरुषांना पुष्पहार घालून अभिवादन करून नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी शक्ती प्रदर्शन न करता आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांसह साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना मतदार संघात भेडसावणारे अनेक प्रश्न, बेरोजगारीची समस्या सोडवण्याला प्रथम प्राधान्य दिले जाईल असा विश्वास दिला. या बरोबरच विद्यमान आमदारांनी कोणतेही काम केले नसल्याने मी केलेल्या कामाची पोहोच पावती म्हणून जनता मला भरघोस मतांनी निवडून देईल असा विश्वासदेखील त्यांनी व्यक्त केला.

महापुरुषांना अभिवादन

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघासाठी मनसेचे अधिकृत उमेदवार दिलीप बापू धोत्रे यांनी सोमवारी मंगळवेढा तालुक्यातील हुन्नूर येथील बिरोबा देवाचे दामाजीपंतांचे दर्शन घेऊन श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या चरणावर उमेदवारी अर्ज ठेवून दर्शन घेतले यानंतर सर्व महापुरुषांना अभिवादन करून नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी शक्ती प्रदर्शन न करता साध्या पद्धतीने प्रमुख पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

वसुबारसनिमित्त गोमातेचे पूजन...

मोडनिंब : दीपावलीचा पहिला दिवस वसुबारसनिमित्त मोडनिंब येथील किरण कमलाकर तोडकरी यांनी सहपरिवार गायींची पूजा केली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य वैशाली कैलास तोडकरी, उज्वला किरण तोडकरी आदी.

संक्षिप्त वृत्त...

सांगोला शहरात प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करूया : मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी

सांगोला, दि.२८ ऑक्टोबर-

स्वच्छ सर्वेक्षण २.० व माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी प्रदूषण मुक्त पर्यावरण पूरक दिवाळी साजरे करण्याचे आवाहन सांगोला शहरातील नागरिकांना केले आहे. फटाक्यांमधून विषारी वायू शोभेच्या दारूतून निर्माण होतात व हे वायू मानवी जीवनाला अतिशय घातक असतात. हृदयरोग,रक्तदाब,अस्थमा असणाऱ्यांना हे तर जास्त घातक आहेच परंतु याबरोबर गर्भवती स्त्रिया, वृद्ध माणसे, लहान बालके यांनासुद्धा फटाक्यांपासून निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचा जास्त धोका आहे.फटाके वाजवताना सर्वसाधारण निरोगी व्यक्तींनाही अपचन, सर्दी खोकला,मानसिक अशांती,डोके दुखणे या व्याधी होतात.फटाके लावताना होणारी इजा वा अपघात हा चिंतेचा विषय आहे. शहरात फटाक्यांपासून प्रचंड प्रमाणात ध्वनी प्रदूषण,वायू प्रदूषण निर्माण होते.त्यापासून अनेक जणांना त्रास होतो व सदर बाब ही पर्यावरणाला पूरक नसून प्रदूषण करणारी आहे. त्यामुळे सांगोला शहरातील प्रत्येक नागरिकांनी दिवाळी साजरी करताना प्रदूषण मुक्त व पर्यावरण पूरक दिवाळी कशी होईल यावर भर देऊन आपले सण मोठ्या उत्साहात साजरे करायचे आहेत तसेच सांगोला शहरात प्लास्टिक बंदी मोहीम राबवली जात असून सांगोला शहरातील नागरिकांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन दिवाळी साजरी करावी असे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी सांगितले.

अक्कलकोटमध्ये वंचितचे उमेदवार संतोषकुमार इंगळेंची कार्यकर्त्यांसह रॅली

अक्कलकोट, दि.२८ ऑक्टोबर-

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोषकुमार खंडू इंगळे यांनी सोमवारी निवडणूक निर्णय अधिकारी बनसोडे यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रारंभी अक्कलकोट शहरातील भीमनगर येथून वाजत गाजत रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये चंद्रशेखर मडीखांबे, ज्योतिर्लिंग स्वामी, शीलामणी बनसोडे, रविराज पोटे, सिद्धार्थ बनसोडे, विशाल ठोंबरे, संदीप बाळशंकर, गौतम गायकवाड, नागेश हरवळकर, माणिक गायकवाड, बबन गायकवाड, यशवंत इंगळे, राजू इंगळे, राजू वाघमारे, कृष्णा इंगळे, गोविंद इंगळे, सुभाष इंगळे, गंगाराम वाघमारे, संतोष बाळशंकर, अमृत सोनकांबळे, हनुमंत जाधव, सतीश बनसोडे, महादेव थोरे, शेखर सोनकांबळे, तुकाराम साखरे, प्रकाश शिंदे, खाजाप्पा आयवळे, शिवाजी चौगुले, संजय इंगळे, विजय भालेराव, गंगाराम गायकवाड, श्याम बनसोडे, शंकर शिंदे, बाबुराव गायकवाड, चंदू शिंगे, संजय शिंदे, अजय गंगावणे उपस्थित होते.

रासपाचे सुनिल बंडगर यांचा अक्कलकोटमधून उमेदवारी अर्ज दाखल

अक्कलकोट, दि.२८ ऑक्टोबर-

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर यांनी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत बनसोडे यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, युवक आघाडीचे तालुका उपाध्यक्ष संतोष शिंदे, शिवनिंगप्पा गायकवाड, रामचंद्र बंडगर उपस्थित होते. राजेफत्तेसिंहचौक येथील सोहेल पैलेस येथून राष्ट्रीय समाज पक्षाचे कार्यकर्ते सकाळी १० पासुनच जमायला सुरवात झाली. हलगी, ढोल, हाती पिवळे झेंडे फडकावित कार्यकर्ते मोठ्या उत्साहात घोषणा देत होते.

प्रा. जाकीर शेख यांची करमाळा तालुका भाजपा तालुका कोषाध्यक्षपदी निवड

करमाळा, दि.२८ ऑक्टोबर-

भारतीय जनता पक्षाच्या करमाळा तालुका अल्पसंख्याक सेलच्या करमाळा तालुका कोषाध्यक्ष पदी वाशिंबे ता करमाळा येथील प्रा. जाकीर शेख यांची निवड मकाई सहकारी साखर कारखाना माजी चेअरमन दिग्विजय बागल यांच्या उपस्थितीत भाजप महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली. निवडी नंतर प्रा. शेख यांनी बोलताना सांगितले की भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून सर्व समाज बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करु अशी ग्वाही शेख यांनी बोलताना दिली. त्यांच्या निवडीबद्दल वाशिंबे परिसरासह करमाळा तालुक्यातून शेख यांचे स्वागत केले जात आहे. यावेळी मकाई सहकारी साखर कारखाना संचालक गणेश झोळ, भारत शिंदे, संतोष झोळ, रणजित शिंदे, नाना वगरे उपस्थित होते.



खरेदीची धूम... अकलूज : दिवाळीसाठी आकश कंदील आणि फटाके खरेदी करताना ग्राहक, दुसऱ्या छायाचित्रात छत्रपती शिवराय, मावळे व किल्ल्यांच्या प्रतिकृती ठेवण्यात आल्या आहेत.

बार्शीत धनुष्यबाणविरुद्ध मशालीत थेट सामना

● आ. राजेंद्र राऊत यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २८ ऑक्टोबर-

बार्शीचे अपक्ष आ. राजेंद्र राऊत यांनी अखेर शिवसेना शिंदे गटात प्रवेश करुन आपली राजकीय दिशा स्पष्ट केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा बंगल्यावर झालेल्या एका बैठकीत त्यांनी अधिकृतरित्या शिंदे गटात प्रवेश केला. ज्यात त्यांना 'धनुष्यबाण' हे चिन्ह मिळाले आहे. जे आता त्यांच्या पुढील राजकीय प्रवासाची ओळख ठरणार आहे.

पार्श्वभूमी आणि राजकीय महत्त्व राजेंद्र राऊत हे बार्शीतील प्रभावी नेते असून, महायुतीच्या नेत्यांच्या जवळ राहिल्यामुळे त्यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. ते अपक्ष असतानाही बार्शीमध्ये त्यांची ताकद मोठी होती आणि त्यांनी मतदारांचा चांगला पाठिंबा मिळवला होता. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या पक्ष निवडीबद्दल स्थानिक पातळीवर संभ्रम निर्माण झाला होता. विरोधक आणि समर्थक दोघांमध्येही त्यांच्या पक्षनिष्ठेबद्दल चर्चा रंगत होती.

राजकीय परिणाम आणि स्थानिक राजकारणावर परिणाम राऊत यांच्या शिंदे गटात प्रवेशामुळे बार्शी तालुक्यात आता शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गट यांच्यात थेट सामना होण्याची शक्यता आहे. 'शिवसेना विरुद्ध शिवसेना' अशी बार्शीची निवडणूक रंगणार आहे. यामुळे मतदारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, पुढील निवडणुकीत मतांचे विभाजन होण्याची शक्यता आहे. धनुष्यबाण चिन्ह मिळाल्यामुळे राऊत यांचे शिंदे गटात महत्त्व वाढणार आहे, तर ठाकरे गटाला आव्हान उभे राहिले आहे. स्थानिक राजकारणातील बदल राऊत यांचे शिवसेना शिंदे गटात जाणे बार्शीच्या स्थानिक राजकारणाला मोठी कलाटणी देणारे ठरु शकते. ठाकरे गटातील नेत्यांना आता त्यांच्या जनाधाराचे रक्षण करण्यासाठी अधिक परिश्रम घ्यावे लागतील. शिवाय, आगामी निवडणुकीत राऊत यांची भूमिका आणि त्यांच्या पक्षाच्या धोरणांमध्ये किती सामर्थ्य आहे, हे बार्शीतील जनतेसाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

मतदारांवरील परिणाम या बदलामुळे मतदारांची भूमिका महत्त्वाची ठरेल. आता मतदार कोणत्या गटाला पाठिंबा देतील आणि कोणत्या मुद्द्यांवर निवडणुकीचा फोकस असेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. राऊत यांचा निर्णय मतदारांवर किती परिणाम करेल आणि बार्शीच्या राजकारणात कोणते नवीन समीकरणे निर्माण होतील, हे आगामी काळात स्पष्ट होईल. यावेळी आ. राजेंद्र राऊत यांच्यासोबत माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, काका काटे आणि माजी नगरसेवक विलास रेणके उपस्थित होते.

याचा दिसणार परिणाम

निष्कर्ष राजेंद्र राऊत यांच्या शिंदे गटात प्रवेशामुळे बार्शीतील राजकारणात एक नवी दिशा मिळाली आहे. राऊत आणि त्यांचे विरोधक दिलीप सोपल यांच्यातील पारंपारिक लढतीमुळे बार्शी तालुक्यात राजकीय वातावरण नेहमीच तापलेले असते. दोघांच्या राजकीय प्रवासात अनेक निवडणुका अशा लढल्या गेल्या आहेत, जिथे त्यांच्या पक्ष आणि चिन्हांत बदल होत राहिला आहे. यावेळी, राऊत यांचं शिंदे गटातील स्थान आणि 'धनुष्यबाण' चिन्ह त्यांच्या समर्थकांना अधिक मजबुती देईल, तर सोपल यांच्या समर्थकांसमोर आव्हान उभे राहील. मतदारांचा प्रतिसाद आणि दोन्ही गटांची निवडणूक रणनीती यावरच या पारंपारिक लढतीचे परिणाम ठरणार आहेत.

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून अभिजीत पाटलांचा उमेदवारी अर्ज

तभा वृत्तसेवा,
माढा, दि. २८ ऑक्टोबर-

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी आपल्या मोजक्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

अर्ज दाखल करताना त्यांच्यासोबत त्यांच्या मातोश्री जयश्री पाटील व हभप मधुकर महाराज नाईकनवरे उपस्थित होते. अभिजीत पाटील हे मंगळवारी मोठे शक्ती प्रदर्शन करून आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. दारफळचे ॲड. अडकर यांनी देखील आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. अद्याप महाविकास आघाडी किंवा महायुतीकडून कोणत्याही इच्छुक उमेदवाराला तिकीट जाहीर करण्यात आलेले नसल्याने इच्छुक उमेदवार व नागरिकांमध्ये मोठे संभ्रमाचे वातावरण आहे.

अन् केले चरणस्पर्श

आ. बबनराव शिंदे उमेदवारी अर्ज दाखल करायला गेल्यानंतर त्यांचे राजकीय प्रतिस्पर्धी अभिजीत पाटील उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी आमदार बबनराव शिंदे व माजी आमदार विनायकराव पाटील यांचे चरण स्पर्श करून आशीर्वाद घेतला.

माढ्यात महिलांची रॅली काढत मीनलताई साठे यांचा अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा,
माढा, दि. २८ ऑक्टोबर-

माढा विधानसभा मतदारसंघासाठी सोमवारी माढा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा ॲड. मीनलताई साठे यांनी महिलांची रॅली काढून मोठे शक्ती प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर रॅलीचे रूपांतर जगदाळे मंगल कार्यालय येथे सभा घेण्यात आली.

उमेदवारी अर्ज भरताना त्यांच्या सुचिता रेंगे-पाटील, हर्षदा बागल, उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे, माजी नगरसेविका गीतांजली देशमुख यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर मीनलताई साठे यांनी सांगितले, मला महाविकास आघाडीकडून तिकीट मिळणार आहे व मी माढा विधानसभेची निवडणूक लढवणार आहे. वरिष्ठ पातळीवरून माढा विधानसभा मतदारसंघ काँग्रेस पक्षाला सोडण्यात यावा यासाठी प्रयत्न चालू आहेत. उद्यापर्यंत त्या संदर्भात निर्णय होईल व महाविकास आघाडीचे तिकीट मलाच मिळणार असल्याचेही सांगितले.आतापर्यंत कोणत्याही उमेदवाराला तिकीट जाहीर झाले नसले तरी मीनलताई साठे यांनी महाविकास आघाडीच्या तिकिटाचा हक्क सोडलेला नाही.

शिंदे पिता-पुत्रांनी बाईक रॅली काढून दाखल केला अर्ज

तभा वृत्तसेवा,
माढा, दि. २८ ऑक्टोबर-

आ. बबनराव शिंदे समर्थकांनी बाईक रॅली काढून आ. बबनराव शिंदे व त्यांचे पुत्र रणजीतसिंह शिंदे यांचे जेसीबीच्या साह्याने पुष्पवृष्टी व क्रेनच्या साह्याने हार घालून जंगी स्वागत करून मोठे शक्ती प्रदर्शन केले. त्यांनी आर्या पब्लिक स्कूलच्या मैदानात सभेचे आयोजन केले होते. या आधी २४ ऑक्टोबर रोजी रणजितसिंह शिंदे यांनी एक अपक्ष व दुसरा शरदचंद्र पवार गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

शहराच्या मुख्य रस्त्यावरुन रॅली काढण्यात आली. या रॅलीत समर्थकांनी बबनदादा तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है, अब की बार, रणजितदादा आमदार अशा घोषणा समर्थकांनी दिल्या. हातात पक्षाचे झेंडे, गाड्यांवरही झेंडे मोठमोठ्या घोषणा, जयजयकार आणि प्रचंड उत्साहामध्ये शिंदे पिता-पुत्रांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना आ. बबनराव शिंदे यांच्याबरोबर माजी आमदार विनायकराव पाटील, संजय पाटील-भीमानगरकर यांच्यासह माढा विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपाकडून समाधान अवताडे यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२८ ऑक्टोबर-

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात सोमवारी भाजपकडून समाधान आवताडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मंगळवार हा शेवटचा दिवस आहे

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात भाजपाचे विद्यमान आमदार समाधान आवताडे यांना उमेदवारी जाहीर केली. यामुळे आमदार अवताडे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महायुती मधील भाजपा,शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे पंढरपूर आणि मंगळवेढा भागातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करताना युटोपियन शुगर्सचे चेअरमन उमेश परिचारक, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण पापरकर तसेच परिचारक गटाचे आजीमाजी नगरसेवक तसेच या बरोबरच आवताडे गटाचे खंद्दे समर्थक तथा माजी नगरसेवक सुनील डोंबे, पंचायत समितीचे माजी उपसभापती विजयसिंह देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस अजितपवार गटाचे श्रीकांत देशमुख आदीं प्रमुख उपस्थित होते. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात इच्छुक उमेदवारांची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे.

२५२-पंढरपूर विधानसभा मतदार संघ तथा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पंढरपूर

विकासाच्या जोरावर मतदार आपल्याच पाठीशी : आवताडे

पंढरपूर मंगळवेढ्यात गेल्या तीन वर्षात आपण अनेक विकास कामे मार्गी लावलेली आहेत. मंगळवेढा भागात अनेक रखडलेला विकास योजनांना गती दिलेली आहे. सुमारे तीन हजार कोटी रुपयांचा रखडलेल्या योजनांसाठी निधी आणुन मतदारसंघाचा कायापालट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे विकासाच्या जोरावर मतदार आपल्या पाठीशी असतील. मला विरोधकांचे कुठलेही आव्हान नाही. परिचारक हे माझ्या पोटनिवडणूक पासून माझ्याबरोबरच आहेत. त्यामुळे ते कुठे जायचा प्रश्नच येत नाही अशी प्रतिक्रिया विद्यमान आमदार समाधान आवताडे यांनी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर दिली.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व
बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

धाराशिवमध्ये जेवण करण्यास गेलेल्या दोन तरुणांना मारहाण

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -

धाराशिव येथे दोन तरुणांना मारहाण करून त्यांच्याकडून पैसे जबरीने काढून घेतल्याची घटना घडली आहे. ही घटना २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता तेरणा कॉलेज जवळील वसीम मच्छी सेंटर येथे घडली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मंगेश गजानन मोरे (वय २२, रा. बँक कॉलनी आदिवासी मुलांचे वस्तीगृह, मूळ रा. उमरधरवाडी, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) आणि त्यांचा मित्र व भाऊ गणेश मोरे हे जेवण करण्यासाठी वसीम मच्छी सेंटरमध्ये गेले असताना आयान अली अहमद अली कुरेशी, आजिम सलीम शेख आणि ईम्रान आयुब पठाण (तिघेही रा. शालिमार कॉलनी, धाराशिव) या तिघांनी त्यांना थाबुक्यांनी आणि बेल्टने मारहाण केली. मारहाणी दरम्यान मंगेश मोरे यांच्या पॅन्टच्या खिशातील २ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले.

भांडण सोडवण्यासाठी आलेल्या मंगेश यांच्या मित्रालाही आरोपींनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी मंगेश मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध भादंवि कलम ३०९ (४), ३५२, ३५१(१), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

▶▶संक्षिप्त वृत्त...

आकाशवाणी पिटीसी संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदी देविदास पाठक

धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात काम करणाऱ्या आकाशवाणीच्या पिटीसी जिल्हा वार्ताहर संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी धाराशिव येथील आकाशवाणीचे जिल्हा प्रतिनिधी देवीदास पाठक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. २७ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे आकाशवाणी वार्ताहरांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या दरम्यान झालेल्या संघटनेच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. पिटीसी संघटनेच्या महाराष्ट्र कार्याध्यक्षपदी जळगाव येथील राजेश यावलकर यांची तर वाशिम येथील जिल्हा प्रतिनिधी सुनील कांबळे यांची प्रदेश सचिवपदी निवड करण्यात आली.

'अक्षरवेल' मंडळाच्या अंकुर दिवाळी अंकाचे थाटात प्रकाशन

धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -

अनेक वर्षांपासुन सातत्याने साहित्य चळवळ जोपासत असलेल्या व दिवाळी अंक प्रकाशनाची परंपरा चालवणाऱ्या अक्षरवेल साहित्य मंडळाच्या 'अंकुर' दिवाळी अंकाचे नुकतेच प्रकाशन झाले. अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त अक्षरवेल मंडळाने यावर्षी अहिल्याबाई होळकर यांच्यावर विशेषांक काढला आहे. या अंकाचे प्रकाशन अपूर्वाई प्रकाशन, पुणे यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. मीना जिंतुरकर व आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा प्रेमा पाटील या उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष स्नेहलता झरकर, प्रा. विद्या देशमुख, सचिव अपर्णा चौधरी, कोषाध्यक्ष शिवनंदा माळी तसेच अक्षरवेलच्या सर्व सदस्य व शहरातील रसिक मैत्रिणी उपस्थित होत्या.

प्रभाकर मुळे यांचे निधन

जळकोट, दि.२८ ऑक्टोबर -

येथून जवळच असलेल्या तूगाव (ता. उमरगा) येथील मुळ रहिवासी व मित्रनगर (सोलापूर) येथे वास्तवव्यास असलेले सोलापूर जेलरोड पोलिस स्टेशनचे सेवानिवृत्त पोलिस अधिकारी प्रभाकर विश्वनाथ मुळे (वय ६५) यांचे सोलापूर येथील निवास्थानी शनिवार (दि.२६) रोजी रात्री नऊच्या सुमारास प्रदिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर तुगाव येथील शेतात रविवारी (दि.२७) दुपारी एक वाजता अंत्यसंस्कार आले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ भाऊ, २ बहिणी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. जळकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळेचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भैय्या किलजे यांचे सासरे होत.

आ. कैलास पाटील यांचा शक्तीप्रदर्शनाने उमेदवारी अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -

धाराशिव विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे शिवसेना (उबाठा) पक्षाचे विद्यमान आमदार कैलास पाटील यांनी प्रचंड शक्तीप्रदर्शन करत धाराशिवात रॅली काढली. या रॅलीने संपूर्ण शहरात जोशाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांची मतदारांशी जुळवलेली नाळ आणि त्यांचा प्रभाव पुन्हा एकदा दिसून आला.

आज सकाळी आमदार कैलास पाटील यांनी त्यांच्या प्रचार यात्रेला येरमाळातील येडाई देवीच्या दर्शनाने सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी तेर येथील संत गोरोबा काकांचे दर्शन घेतले आणि तुळजापूरच्या तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. या विविध तीर्थक्षेत्रांवर दर्शन घेऊन, आशीर्वाद घेताना त्यांनी आगामी निवडणुकीतील विजयासाठी देवी-देवतांची कृपा मिळवण्याचा प्रयत्न केला.

धाराशिव शहरात दाखल झाल्यावर, रॅलीची सुरुवात अण्णाभाऊ साठे चौकातून झाली. रॅली मार्गे धारासूर मर्दिनी मंदिर, आणि हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाझी दर्गा या महत्वाच्या स्थळांवरून गेली. धारासूर मर्दिनी देवीच्या दर्शनानंतर, आमदार कैलास पाटील यांनी ख्वाजा शमशोद्दीन गाजी यांच्या दर्ग्यावर चादर चढवली. ही रॅली एक शक्तीप्रदर्शन ठरली,

ज्यामध्ये ठिकठिकाणी फुलांची उधळण केली गेली आणि फटाके

फोडून रॅलीला स्वागत करण्यात आले. समर्थकांच्या गगनभेदी घोषणांनी वातावरणात जोश आणला होता.

या रॅलीने शहरात मोठा उत्साह निर्माण झाला आहे. कैलास पाटील यांची लोकप्रियता, त्यांच्याकडे असलेला जनसमर्थनाचा ओघ आणि प्रचंड जनसमुदाय हे त्यांच्या राजकीय अस्तित्वाची ताकद दर्शवतात. यंदा धाराशिव विधानसभा निवडणुकीसाठी पाटील यांचा हा दुसरा प्रयत्न असून, त्यांनी मतदारांमध्ये प्रचंड विश्वास आणि निष्ठा निर्माण केली आहे.

रॅलीच्या दरम्यान, स्थानिक नागरिक आणि कार्यकर्त्यांनी आ. पाटील यांचे ठिकठिकाणी स्वागत केले.

त्यांच्या समर्थकांनी फुलांच्या उधळणीसह त्यांचे स्वागत केले. फटाक्यांच्या आवाजाने शहर दुमदुमले होते. पाटील यांची ही शक्तीप्रदर्शन रॅली आणि धार्मिक स्थळांवर त्यांनी घेतलेले दर्शन हे निवडणुकीपूर्वीचा महत्वाचा धार्मिक आणि राजकीय संकेत मानला जात आहे.

उमरग्यात प्रतिबंधित गुटखा जप्त; दुकानदारावर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२८ ऑक्टोबर -

उमरगा पोलिसांनी गुरुवारी स्वामी समर्थ एंटरप्रायजेस या दुकानावर छापा टाकून ६ लाख १८ हजार ३८५ रुपये किमतीचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी दुकानदार महादेव बंडप्पा शिवनेचारी (वय ५४, रा. गुंजोटी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या आदेशानुसार उमरगा पोलीस ठाण्याचे पथक गुरुवारी अवैध धंद्यांविरुद्ध कारवाईसाठी गस्त घालत होते. त्यावेळी त्यांना गुप्त माहिती मिळाली की, शिवनेचारी यांच्या दुकानात प्रतिबंधित गुटखा साठवण्यात आला आहे. पोलिसांनी तात्काळ छापा टाकून हा गुटखा जप्त केला. शिवनेचारी यांच्याविरुद्ध भादंवि कलम २७४, २७५, २२३, १२३ आणि अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी शेलार, पोलीस निरीक्षक भोसले, पोउपनि पुंजरवाड आणि इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी केली.

जिल्ह्यात चोऱ्यांचे सत्र सुरूच; गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -

धाराशिव जिल्ह्यात चोऱ्यांचे सत्र सुरूच असून मुरुम, कळंब आणि आनंदनगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत शेळ्या, बुलेट मोटरसायकल आणि टिव्हीएस मॅक्स मोटरसायकल असा एकूण ८३ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याच्या घटना घडल्या आहेत.

याबाबत माहिती अशी की, मुरुम पोलीस ठाण्याच्या हद्दीत अचलेर शिवारातील रोहन जमादार यांच्या शेतातील शेडमधून ८ शेळ्या, एक बोकड आणि चार पिल्ले असा एकूण ६३ हजार रुपये किंमतीचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केला आहे. ही घटना २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत घडली. चोरट्यांनी शेडचे पत्रे उचकटून शेळ्या चोरून नेल्याची माहिती आहे.

तसेच कळंब तालुक्यात पोलीस ठाण्याच्या हद्दीत शशिकांत इंगळे यांची ६० हजार रुपये किमतीची बुलेट मोटरसायकल चोरीला गेली आहे. ही घटना २५ ऑक्टोबर रोजी रात्री ९ ते २६ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ या वेळेत घडली. चोरट्यांनी त्यांच्या घरासमोरूनच मोटरसायकल चोरून नेली आहे. तिसऱ्या घटनेत धाराशिव शहर आनंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनायक शेळके यांची २० हजार रुपये किमतीची टिव्हीएस मॅक्स मोटरसायकल चोरीला गेली आहे. ही घटना २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते १२.३० या वेळेत घडली. पुष्पक मंगल कार्यालय जवळील पॅरा मेडीकल कॉलेज समोरील गेटजवळून त्यांची मोटरसायकल चोरीला गेली आहे.

तिन्ही घटनांप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

सततच्या पावसाचे निकष शिथील करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -

जिल्ह्यातील ५७ पैकी ३३ महसूल मंडळात सततच्या पावसाने झालेल्या पीक आणि शेतीच्या नुकसानीचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्याव्यतिरिक्त अन्य महसूल मंडळातही मोठे नुकसान झाले आहे. भूम, परंडा, तुळजापूर आणि धाराशिव तालुक्यातील वगळण्यात आलेल्या बहुतांश महसूल मंडळातही मोठे नुकसान झाले आहे.

त्यामुळे सततच्या पावसाचे निकष शिथील करावे. पाच दिवसांत ५० मिलीमीटर किंवा त्यापेक्षा अधिकचा पाऊस झाल्यासही पिकांचे नुकसान होते, हे गृहित धरून शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीअंतर्गत मदत देण्यात यावी. आचारसंहिता काळातही नियमानुसार निवडणूक आयोगाच्या परवानगी घेऊन मदत देता येऊ शकते त्यासाठी आपण मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिवांकडे पाठपुरावा करीत असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. जिल्ह्यातील ५७ पैकी ३३ महसूल मंडळात अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे नुकसान झाले असल्याचे अहवालात नमूद केल्याची बाब लक्षात आल्यानंतर आ. पाटील यांनी प्रधान सचिव मदत व पुनर्वसन यांना १८ ऑक्टोबर रोजी पत्र लिहून जिल्ह्यातील अन्य महसूल मंडळातील वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली आहे. धाराशिव, भूम, परंडा आणि तुळजापूर तालुक्यातील २४ महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद नाही. मात्र झालेले नुकसान मोठे आहे. त्यामुळे २०२२ साली ओढवलेल्या आपत्तीवेळी नुकसानीचा वस्तुनिष्ठ अहवाल ज्याप्रमाणे शासनाकडे सादर करण्यात आला होता. तीच प्रक्रिया अनुसरून नुकसानीची व्याप्ती लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार उर्वरित २४ महसूल मंडळात दोन वर्षापूर्वी ज्याप्रमाणे वस्तुनिष्ठ नुकसानीच्या निकषानुसार केलेल्या पाहणीचा अहवाल ग्राह्य धरला होता, अगदी त्याप्रमाणेच २४ महसूल मंडळातील शेतकऱ्यांनाही तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, असेही पाटील यांनी या पत्रात नमुद केले आहे.

निवडणूक निरीक्षक (सामान्य) गोपाल चंद धाराशिव जिल्ह्यात दाखल

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -

२४२- उस्मानाबाद आणि २४३- परंडा विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक (सामान्य) गोपाल चंद, (भा.प्र.से.) यांचे आज जिल्हयात आगमन झाले आहे. तसेच त्यांच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२३४१३६ हा असून त्यांचा भ्रमणध्वनी नंबर ९०२१५५५३४९ हा आहे.

निवडणूक निरीक्षक (सामान्य) यांच्याशी निवडणूक विषयक प्रश्नाबाबत भेटीची वेळ ही सकाळी ९ ते सकाळी ११ वाजताची आहे.

एकलव्य विद्या संकुलात विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त कपडे व फराळाचे वाटप

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२८ ऑक्टोबर -

एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यगरवाडी (ता. तुळजापूर) येथे वस्तीगृहात राहणाऱ्या भटके विमुक्त समाजातील वीस विद्यार्थ्यांना डोंबिवली येथील सीस फाउंडेशनचे संचालक अभिजीत जोशी, अवंती जोशी यांच्यावतीने नवीन कपडे व दिवाळीनिमित्त फराळ देण्यात आला.

गेल्या बारा वर्षापासून अभिजीत जोशी गरीब व वंचित विद्यार्थ्यांना दिवाळीच्या फराळ व नवीन कपडे घेऊन त्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करतात.

याही वर्षी त्यांनी सोनाली गिरी, पायल साळुंके, रूपाली गिरी, नागेश अलमले, अनिता कडगंचे, गणेश शिंदे, वैष्णवी गायकवाड, प्रांजल भोसले, शिनु कलमुळे, यशोदा गानगोळे, शंकर गांगुळे, चरण गानगोळे, लक्ष्मी विभुते, कार्तिक पांचाळ, आरोही चौगुले, धनश्री कदम, शुभांगी, आजापा कोमारे, रेखा कलमुळे, अक्षरा छबिले, आर्यन जाधव या मुला मुलींना नवीन कपडे घेऊन दिले आहेत. तसेच दिवाळीनिमित्त फराळ दिला आहे.

याप्रसंगी अभिजीत जोशी, अवंती जोशी यांच्या दातृत्वाबद्दल व सामाजिक भान ठेवून विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीबद्दल भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुखदेव काळे, उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, कार्यवाह विवेक अयाचीत, वस्तीगृह अधीक्षक फुलाजी ताटी कुंडलवार, संगीता पाचंगे, सुजाता गणवीर,

यशवंत निंबाळकर, मयूर अंतरेड्डी, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर यांनी सीस फाऊंडेशनचे आभार मानले.

स्व-कष्टातून व्यवसाय उभा केलेल्या ३८ महिलांचा सन्मान

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२८ ऑक्टोबर -

कळंब (जि.धाराशिव) येथे दि.२७ ऑक्टोबर रोजी अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस आणि पर्याय सामाजिक संस्थेच्या वतीने उद्योजिका महिला सन्मान व गुंतवणूकदार सोहळा मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. हा सोहळा आर्थिक साक्षरतेसह महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला असून, स्थानिक उद्योजिकांच्या प्रगतीचा सन्मान करण्यासह अनिकच्या गुंतवणूकदारांना कंपनीच्या कार्यप्रणालीबद्दल विश्वास व जागरूकता देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र लोकविकास मंचचे कोंढाळकर होते. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अनिकचे व्यवस्थापकीय संचालक विश्वनाथ तोडकर, तसेच अनिकचे संचालक सुभाष तगारे, हेमंतकुमार वाळवेकर, बालासाहेब सुर्यवंशी, महाराष्ट्र लोकविकास मंचचे रमाकांत कुलकर्णी, रविकांत आदरकर, अनिताई तोडकर, अनिकचे संचालक ऋषीकेश तोडकर, सुरज सुर्यवंशी, विकाराबाद शाखा व्यवस्थापक श्रीरंग वाळवेकर, तसेच सुशांत पाईकराव यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमात अनिक मुख्यालयाचे प्रतिनिधी उमेश टोणपे यांनी अनिकची व्यावसायिक स्थिती सविस्तरपणे उलगडली. ज्यामध्ये अनिकचा २० वर्षांचा यशस्वी प्रवास, कंपनीचे नवीन उपक्रम, आणि भविष्यातील योजना त्यांनी मांडल्या. अनिकचे संचालक ऋषीकेश तोडकर यांनी धाराशिव जिल्ह्यातील अनिकच्या कार्यपद्धतीवर विशेष भाष्य केले.

त्यांनी अनिकच्या कामाची प्रक्रिया, गुंतवणूकदारांचा विश्वास कसा जपला जातो, आणि त्यांच्या गुंतवणुकीचा योग्य विनियोग कसा केला जातो याबद्दल सविस्तर माहिती दिली. यानंतर, कोंढाळकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अनिकच्या समाजोपयोगी कार्याचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर उपस्थित गुंतवणूकदारांना कंपनीकडून स्मृतिचिन्ह भेट देण्यात आली. यानंतर, अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेसतर्फे धाराशिव जिल्ह्यातील ३८ महिला उद्योजिकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भैरवानाथ कानडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिकचे विकास कुदळे, बालाजी शेंडगे, भिकाजी जाधव, अतुल चिलवंत, वैभव शिंदे, वैभव चौंदे, रियाज शेख, प्रकाश तोडकर, दर्शन जोगी, मनोज क्षीरसागर, रहीम शेख, सुशील कुंभार, सुरज भालेराव, दिगंबर लाडके, अशोक शिंदे तसेच सर्व महिला कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

जिल्ह्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी मारहाणीच्या घटना

तभा वृत्तसेवा
धारावि, दि.२८ ऑक्टोबर -

भुम तालुक्यातील वालवड येथे डॉ. वाघमारे हॉस्पिटल समोर योगेश उर्फ अतुल मोहिते यांना चार जणांनी मारहाण केल्याची घटना घडली. पांडुरंग मोहिते, गौतम मोहिते, प्रशांत मोहिते आणि उषाबाई लोमटे अशी आरोपींची नावे आहेत.

याबाबत माहिती अशी की, मागील भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी योगेश यांना शिवीगाळ करून मोटरसायकल आडवी करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच लोखंडी गज, लाकडी काठी, दगड आणि तिखट डोळ्यात टाकून गंभीर दुखापत केली. याप्रकरणी भुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच धाराशिव तालुक्यातील साठेनगर तेर येथे अजिंक्य कांबळे यांना सात जणांनी मारहाण केल्याची घटना घडली. वैभव साळुंके, जयसंग्राम रसाळ, ललीता साळुंके, ओमसंग्राम रसाळ, नितीन रसाळ, बायनाबाई रसाळ आणि मोहरबाई रसाळ अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून अजिंक्य यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी, कोयता आणि चाकूने मारहाण करून जखमी केले. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या अजिंक्य यांच्या आजींनाही आरोपींनी मारहाण केली. याप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही घटनांमध्ये आरोपींनी जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पोलिसांनी गुन्हे दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

नांदेड- विधानसभा निवडणुकीसाठी तिकडून श्रीजया चव्हाण यांनी भोकर मतदारसंघ, आमदार बालाजी कल्याणकर नांदेड उत्तर मतदारसंघ तर माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी लोहा - कंधार मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज भरतेवेळी तिन्ही उमेदवाराकडून रॅली काढून जोरदार शक्ती प्रदर्शन करण्यात आले. यावेळी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधीकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संक्षिप्त वृत्त

'सुगीचे दिवस' आत्मकथनाची दुसरी आवृत्ती प्रकाशित

नांदेड-प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर घोडगे यांनी लिहिलेले 'सुगीचे दिवस' हे आत्मकथन बहुचर्चित ठरले असून या आत्मकथनाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन ४३ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जगदीश कदम यांच्या हस्ते निर्मल प्रकाशनाच्या कार्यालयात करण्यात आले. अध्यक्षस्थानी ॲड. सी.आर. पंडित हे होते. प्राचार्य घोडगे यांनी आपल्या आयुष्यातील घटना आडपडदा न ठेवता सांगितल्या आहेत.बाबासाहेबांना सांगितलेल्या शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या शिकवणीचा खरा सार या आत्मकथनातून आलेला दिसतो.सामाजिक अभिसरणाच्या काळातील लेखकाला आलेले अनुभव अत्यंत प्रांजळपणे मांडलेले आहेत. हे आत्मकथन म्हणजे एक पिढीच्या घडण्याची प्रामाणिक कहाणी होय. भाषा आणि सामाजिक आशय यामुळे या आत्मकथनात कमालीची वाचनीयता आलेली आहे, असे उद्गार डॉ.कदम यांनी काढले. दुसऱ्या आवृत्तीमध्ये काही राहून गेलेल्या महत्त्वाच्या नोंदी समाविष्ट करण्यात आलेल्या असून अनवधानाने आलेले कटू प्रसंग वगळण्यात आले आहेत, असे लेखक डॉ, घोडगे यांनी सांगितले. याप्रसंगी ज्येष्ठ लेखक डॉ. भगवान अंजनीकर, अनुवादक भीमराव राऊत, प्रकाशक निर्मलकुमार सूर्यवंशी यांनी लेखकाला शुभेच्छा दिल्या. ॲड. पंडित यांनी समारोप केला. इंजि. अभिजीत घोडगे कारलेकर यांनी आभार मानले.

दीपावलीनिमित्त स्वारातीम विद्यापीठास सुट्टी

नांदेड-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास दीपावली सणानिमित्त दि. ३१ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर दरम्यान पाच दिवस सुटी जाहीर करण्यात आलेली आहे. या सुट्या विद्यापीठाचे उपपरिसर लातूर, परभणी, हिंगोली येथील न्यू मॉडेल डिग्री कॉलेज तसेच किनवट येथील कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट यांनाही लागू करण्यात आलेल्या आहेत. या दरम्यान विद्यापीठाचे सर्व कामकाज बंद राहणार आहे. तरी संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार यांनी कळविले आहे.

मतदानासाठी विद्यार्थ्यांचे पालकांना साकडे

नांदेड-नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी स्वीप कक्षाच्या वतीने मतदान जनजागृतीचे विविध उपक्रम घेतले जात आहेत. नांदेड-वाघाळा महानगरपालिका वजीराबाद येथील शाळा क्रमांक १ मध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसाठी मतदान संकल्पपत्र लिहिले आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी मतदानाचे महत्त्व समजावून सांगणारे संकल्पपत्र लिहून आपल्या पालकांना दिले. त्यांना मतदान करण्याचे वचन देण्यास प्रवृत्त केले आहे. यामुळे हा उपक्रम प्रभावी ठरला आहे. याशिवाय मतदान जनजागृतीसाठी प्रभात फेरी, रॅली यासारखे उपक्रमही घेतले जात आहेत. यासाठी महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपायुक्त अजितपालसिंग संधू व शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. शाळेचे मुख्याध्यापक परमेश्वर माहुरे, सर्व शिक्षक व पालकांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

अक्षर परिवाराची अभ्यास दिवाळी

नांदेड-दीपोत्सव अर्थात दिवाळी म्हटले की प्रत्येकाच्या आनंदाला उधाण आलेले आपण पाहतो. सर्वत्र विद्युत रोषणाई, मंद, उबदार दिव्यांची आरास घरांची शोभा वाढवत असते. तसेच घराघरात आपापल्या ऐपतीप्रमाणे निरनिराळे रुचकर, चविष्ट खाद्यपदार्थांची मेजवानी असते. दीपावली सुट्ट्यांमध्ये ह्या सर्व आनंदोत्सवात कृतियुक्त, सृजनात्मक घरच्या अभ्यासाची गोड भेट देऊन अक्षर परिवार नावाने राज्यभर सुपरिचित असणाऱ्या वाजेगाव बीट ने अक्षर दिवाळी साजरी करत आपले वेगळेपण जपले आहे. या माध्यमातून बीट मधील तेराही जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पहिली ते नववी पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना मोफत दिवाळी अभ्यासाच्या कृतीपुस्तिकांचे वाटप करण्यात आले आहे.या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या दिवाळी सुट्ट्यांमध्ये अभ्यासाला पडणाऱ्या खंडाला आळा बसणार आहे. अनेकदा दिवाळी सण संपल्यावर उर्वरित सुट्ट्यांमध्ये मुलांनी करावे काय असा प्रश्न त्यांना पडतो. त्यावेळी ह्या कृतीपुस्तिकांच्या माध्यमातून अनेक कृतींचा सराव केल्याने विद्यार्थ्यांच्या सृजन क्षमतेला वाव मिळणार आहे.शिवाय अभ्यासाची गोडी कायम राहून दिवाळी सुट्ट्या संपल्यानंतर शाळा प्रारंभानंतर शाळेच्या अभ्यासाचा कंटाळा देखील विद्यार्थ्यांना येणार नाही.

आमदार केराम आणि सचिन नाईकांचा उमेदवारी अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा
किनवट,दि. २८ ऑक्टोबर

महायुतीकडून आमदार भीमराव केराम आणि सचिन नाईक मित्रमंडळाकडून सचिन नाईकांनी उमेदवारी दाखल केली.मोठ्या उत्साही वातावरणात आणि अदिवासी दंडार ढोल ताशा, डिजे, चित्र रथ , त्याच बरोबर विविध जाती धर्मातील ताल वाद्यांच्या गजरात निघालेल्या या रॅलीत आमदार भिमराव केराम यांचे खंदे समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते पुरुषांपेक्षा महिलांची अलोटगर्दी करुन लक्षवेधी शक्तीप्रदर्शन केले.

महायुतीचे आमदार भिमराव केराम यांनी मोठे शक्ती प्रदर्शन करत २८ ऑंक्टोबर रोजी दुपारी हुतात्मा गोंडराजे शंकरशहा रघूनाथशहा मैदानापासून शहराच्या मुख्य मार्गाने उपविभागीय कार्यालयात महायुतीकडून नामनिर्देशनपत्र दाखल केले असून भाजपा जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या उपस्थितीत आणि आनंद मच्छेवार, अविनाश राठोड, दिनकर चाडावार, बाबूराव केंद्रे, बालाजी आलेवार, सुनिल पाटील, संतोष चनमनवार, स्वागत आयनेनीवार, राधा कांबळे, पद्मा गिर्हे, सागर शिंदे, सुजाता उपलेंचवार, मुसाखान या सुचकांच्या उपस्थितीत नामांकन भरण्यात आले.

तर सचिन नाईक यांनी सचीन नाईक मित्रमंडळाच्या वतीने शहरातील कलावती गार्डन येथुन जोरदार शक्तीप्रदर्शन करुन २९ ऑंक्टोबर रोजी नामांकन भरणाऱ्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या प्रदीप नाईकांना इशारा दिला असल्याची चर्चा दूमदूमतांना ऐकायला मिळाली.

यावेळी माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेमानेवार सुधाकर भोयर अनिल तिरमनवार अशोक नेमानी वार रमेश बद्देवार सुनील आयनिवार लक्ष्मण कासाडीवार शिवा आंधळे बालाजी धोत्रे संजीव रेड्डी पळशी शैलेश गटलेवार गौरव सुनील मच्छेवार विवेक ओंकार अजय चाडावार सतीश बिराजदार श्रीनिवास नेमानिवारा दत्ता आडे आशुतोष बेदरे काशिनाथ शिंदे पत्रकार श्रीनिवास गोपाळराव निमनिवार गोविंद अंकुरवार आदी उपस्थित होते.

मतदान जनजागृती रांगोळी व चित्रकला स्पर्धा

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २८ ऑक्टोबर

आगामी लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा निवडणुकीत मतदारांची संख्या वाढावी यासाठी नांदेड जिल्हा प्रशासनाने जनजागृतीसाठी विशेष उपक्रम हाती घेतले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्विपच्या प्रमुख मीनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी वजीराबाद येथील मल्टीपर्पज हायस्कूलमध्ये नांदेड दक्षिण मतदार संघातील नागरिकांसाठी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत रांगोळी आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

मतदान जनजागृती हा या स्पर्धेचा मुख्य विषय आहे. सहभागी स्पर्धकांनी मतदानाचे महत्त्व आणि लोकशाहीच्या प्रक्रियेत त्याचा मोलाचा वाटा कसा आहे, हे चित्रकला व रांगोळी मधून दाखवून द्यायचे आहे.

निवडणूक निरीक्षक कालु राम रावत यांचे आगमन

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २८ ऑक्टोबर

विधानसभा निवडणुकीसाठी राजस्थान कॅडरचे २००८ तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे वरिष्ठ अधिकारी कालु राम रावत यांचे आज नांदेड येथे आगमन झाले.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी त्यांचे स्वागत केले. श्री. कालुराम रावत शासकीय विश्रामगृहावर निवडणूक काळात कार्यालयीन वेळेमध्ये सामान्य जनतेसाठी उपलब्ध असतील. त्यांचा निवडणूक काळातील स्थानिक संपर्क क्रमांक ८१८०८३०६९९ आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक आशिष बोराडे (८८८८८९२१जज)त्यांच्यासोबत असतील. नागरिकांना नांदेड विश्रामगृहातील व्हीआयपी सूट क्रमांक एक मध्ये त्यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

मोटार सायकल वाहनांसाठी नवीन मालिका सुरु

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २८ ऑक्टोबर

परिवहन्नेत्तर संवर्गातील मोटार सायकल वाहनांसाठी एमएच २६-सीआर ही नवीन मालिका २९ ऑक्टोंबर २०२४ पासून सुरु होत आहे. ज्या अर्जदारांना पसंती क्रमांक घ्यावयाचा आहे त्यांचे आधार कार्ड, पॅनकार्ड, मोबाईल क्रमांक व ईमेलसह अर्ज २९ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी २.३० पर्यत स्विकारण्यात येणार आहे. त्यानंतर पसंती क्रमांकासाठी अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

नांदेड लोकसभेसाठी डॉ.संतुक हंबर्डे यांना भाजपाकडुन उमेदवारी

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २८ ऑक्टोबर



नांदेड नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने उमेदवार जाहीर केला असून डॉ. संतुक हंबर्डे यांना संधी देण्यात आली आहे.

कॉंग्रेसचे खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनामुळे नांदेड लोकसभेची जागा रिक्त झाली होती.विधानसभा निवडणुकीबरोबरच येत्या २० नोव्हेंबर रोजी नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार आहे. कॉंग्रेसकडून स्व. वसंत चव्हाण यांचे सुपुत्र रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली तर भारतीय जनता पार्टी कडून उमेदवार कोण असेल याबाबत अनेक चर्चा रंगू लागल्या होत्या. माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर, खासदार अशोक चव्हाण यांच्याही नावाची चर्चा झाली. दरम्यान भारतीय जनता पार्टीने आज दिनांक २८ ऑक्टोबर रोजी उमेदवार जाहीर केला असून डॉ. संतूक हंबर्डे यांना संधी देण्यात आली आहे. त्यामुळे नांदेड लोकसभेची निवडणूक थेट भाजप आणि कॉंग्रेस विरुद्ध होणार आहे.

नांदेड अड्डा अंतर्गत पर्यावरण प्रेमी शिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २८ ऑक्टोबर

जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक श्रीमती मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून मागील तीन महिन्यापासून जिल्ह्यातील विविध शाळा आणि गावांमधून पर्यावरणाचे महत्त्व व संवर्धन याबाबत गावपातळीवर मोठ्या प्रमाणात मोहीम चालविली जात आहे. त्यासाठी बेंगलोर येथील सामाजिक संस्था रिप बेनीफिट ही पुढाकार घेत आहे. याचाच एक भाग म्हणून शुक्रवारी लोहा तालुक्यातील पारडी येथील सह्याद्री प्राथमिक ते माध्यमिक विद्यालयात लोहा तालुका पर्यावरण अड्डा कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक श्रीमती मीनल करनवाल, शिक्षणाधिकारी (मा.) माधव सलगर, दिलीप बनसोडे, शिक्षण विस्तार अधिकारी हनुमंत पोकले, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक सूदर्शन शिंदे, सह्याद्री प्राथमिक ते माध्यमिक विद्यालयात लोहाचे संचालक दहिवाल, प्राचार्य तसेच लोहा अड्डा अंतर्गतचे सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात श्रीमती मीनल करनवाल पर्यावरणाचे महत्त्व व त्याचे संवर्धन याबाबत सर्व विद्यार्थ्यांना माहिती दिली व सर्व विद्यार्थ्यांनी दिवाळी पर्यावरण पूरक उपक्रम राबवून दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले. मारतळा येथील विद्यार्थिनीने त्यांची शाळा प्लास्टिकमुक्त झाल्याचे सांगितले. तिचे कौतुक करण्यात आले. लोहा तालुक्यातून निवडक शिक्षक व विद्यार्थी यांनी त्यांचे शाळा आणि गावात प्लास्टिकमुक्त गाव व शाळा, पर्यावरणपूरक उपक्रम यशस्वीरित्या राबविल्याबद्दल जिल्हा केंद्रीय प्राथमिक शाळा मारतळा येथील उपक्रमशील शिक्षक रवी ढगे, सोहम सोरटे, वेदिका गिरी, प्र.शा. रामाचीवाडी शिक्षक तुकाराम चव्हाण, अंजली मुंडे, जि.प.हायस्कूल वडेपुरी शिक्षिका दीपा गिरी, राजश्री आठवडे, प्रा.शा. सोनखेड कविता मुदखडे, अर्जुन मोरे, शिक्षक व विद्यार्थ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते सन्मानपत्र देण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सह्याद्री प्राथमिक ते माध्यमिक विद्यालय पारडी यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी ढगे, दीपा गिरी यांनी केले. तर या कार्यशाळेसाठी ऑनलाईन पद्धतीने रिन बेनीफिटचे विकास, शिवानी, भरत, चंद्रिका यांची उपस्थिती होती.

आदमपूर, थडीसावळी, गळेगांव परिसरात रब्बी पेरणीस सुरूवात

तभा वृत्तसेवा
आदमपूर,दि. २८ ऑक्टोबर

खरीप हंगामाची सुरूवात पावसाने दमदार झाली.नंतर उघडीप आणि ऐन बहरात अतिवृष्टीचा फटकाही बसल्याने परिसरातील शेतकरी हवालदिल झाले होते.काही प्रमाणात सोयाबीनचे उत्पादन निघूनही योग्य हमीभाव नसल्याने शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन घरातच राखून ठेवल्याचे चित्र आहे.आदमपूर,थडीसावळी, गळेगांव,अटकळी,टाकळी,खतगांव परिसरात शेत शिवारात रब्बी हंगामाची पेरणी करताना शेतकरी दिसून येत आहेत.काही ठिकाणी अतिवृष्टीत बाधीत झालेल्या शेत शिवाराची अजून पेरणीयोग्य तयारी झालेली नाही.

त्यामुळे कचरा वेचणीची लगबगही रानात आयाबाया मजूर करताना दिसून येत आहेत.गावोगावी कचरा वेचणी मजूरही मिळेनासे झाले आहेत.हे वास्तव चित्र पहावयास मिळत आहे. घरातील सदस्यांची जुळवाजुळव करीत शेतात कचरा वेचावे लागत असल्याचे शेतकरी बोलताना दिसून येत होते.

गावोगावी बैलांची संख्याही ही आता कमी झालेली आहे.बैलजोडी ने औतफाटा बाळगून ठेवताना शेतकरी आता दिसून येत नाहीत.गावात साधारणतः कमीतकमी बैलजोडी अंदाजीत असल्याचे वास्तव चित्र कुणीही नाकारू शकत नाही.कुणबी शेतकऱ्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे.आता दरवर्षी प्रत्येक शेतकरी ट्रॅक्टरद्वारे पेरणी करताना आपण पाहतो आहोत.रब्बी हंगामास सुरूवात झाल्याने शेतकरीवर्गांत आगामी पीक उत्पादन संदर्भात उत्सुकता आहेच.यंदा ज्वारीचा पेरा वाढण्याची शक्यता शेतकरी वर्ग वर्तवताना दिसत आहेत. एकीकडे पेरणीची लगबग सुरू आहे मात्र,हवामान बदलाचे संकेतही मिळत आहेत.

नांदेड-महाविकास आघाडीचे लोकसभा उमेदवार रवींद्र चव्हाण यांच्यासह नादेड दक्षिणसाठी आमदार मोहन हंबर्डे तर नांदेड उत्तरमधुन माजी महापौर अब्दुल सत्तार यांनी रॅली काढून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

नांदेड लोकसभा व विधानसभांची मतमोजणी स्वारातीम विद्यापिठात

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २८ ऑक्टोबर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापाठीच्या ज्ञान स्त्रोत केंद्र इमारतीमध्ये लोकसभा पोटनिवडणूक व सहा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होणार आहे. याठिकाणी लोकसभेसाठी ६ व विधानसभेसाठी ६ अशा १२ मतमोजणी केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच स्ट्रॉंग रूमची निर्मिती करण्यात आली आहे. लोहा, हदगाव, किनवट या तीन विधानसभा क्षेत्राची मतमोजणी त्या-त्या ठिकाणी होणार आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक एकाच वेळेस येत असल्यामुळे यावेळी जिल्ह्यातील सहा विधानसभा क्षेत्राची मतमोजणी देखील नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठात होणार आहे. अन्यवेळी नांदेड दक्षिण व नांदेड उत्तर अशीच विधानसभेची मतमोजणी शहरात होत होती. मात्र यावेळी दोन्ही निवडणुका सोबत असल्यामुळे भोकर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, नायगाव, देगलूर, मुखेड या लोकसभा क्षेत्रातील विधानसभेची मतमोजणी देखील विद्यापिठामध्ये होणार आहे. यासाठी १२ स्ट्रॉंग रूम तयार करण्यात आल्या आहेत. यामध्ये लोकसभेतील ६ मतदारसंघातील मतपेट्या तसेच ६ विधानसभा क्षेत्रातील मतपेट्या ठेवण्यात येणार आहेत.

२० नोव्हेंबरला मतदान व २३ नोव्हेंबरला मतमोजणी असल्यामुळे केवळ २० रोजीच्या रात्री पर्यंत पोलिंग पार्टी नांदेडला पोहचतील. २१ व २२ रोजी मतपेट्या स्ट्रॉंग रूममध्ये असेल. २३ नोव्हेंबरच्या पहाटे निवडणूक विभागाच्या निर्देशानुसार स्ट्रॉंग रूममधून मतपेटीतून उमेदवारांच्या उपस्थितीत ईव्हिएम बाहेर काढल्या जातील. त्यानंतर मतमोजणी होईल. त्यामुळे विद्यापिठाच्या उपलब्ध पायाभूत सुविधांमध्ये काही अंशिक बदल करण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रामकृष्ण गलधर, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता विजय पुसदकर, तहसिलदार संजय वारकड, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, सहायक अभियंता सावन कासलीवाल आदी अधिकारी यासंदर्भात कार्यरत आहेत. आज जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांच्यासह ललीतकुमार वऱ्हाडे, डॉ सचिन खल्लाळ आदींनी या केंद्रांची पाहणी केली.

जिल्ह्यातील लोहा, हदगाव, किनवट या मतदारसंघातील मतमोजणी त्या-त्या ठिकाणी होणार आहे. लोहा विधानसभेसाठी महसूल हॉल तहसिल कार्यालय लोहा येथे तर हदगाव विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी समाज कल्याण भवन येथे अनुसूचित जाती मुलींचे शासकीय वसतिगृह तामसा रोड हदगाव येथे होणार आहे. किनवट विधानसभेसाठी येथील आयटीआय कॉलेज येथे मतमोजणी होणार आहे.

आचारसंहितेत महसूल, पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिचुन वाळू माफियांचा धुमाकूळ

तभा वृत्तसेवा
हदगाव,दि. २८ ऑक्टोबर

ऐन आचारसंहितेत तामसा रोड मार्ग हदगाव शहरासह पूर्णा तालुक्यात अवैध वाळू माफीयांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून महसूल तथा पोलीस प्रशासन यांनी या माफियांपुढे सपशेल नांगी टाकले की यांचे या माफियांसोबत मधुर संबंध आहेत की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तरी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आबिनाश कुमार यांनी राबविलेल्या पूर्ण जिल्ह्यात ऑपरेशन फ्लॅश आऊटच्या पथकामार्फत या मुजोर व शासनाच्या करोडो रुपयांचा महसूल बुडविणाऱ्यावरती कठोरास कठोर कारवाई करावी अशी मागणी या निमित्ताने होत आहे.

महाराष्ट्र राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही दिवसापूर्वीच आदर्श आचारसंहिता लागू झाली असून सगळ्याच विभागाचे कर्मचारी हे आप-आपले कर्तव्याचे पालन करत निवडणुकीच्या कामात व्यस्त असताना ही संधी साधून हदगाव शहरासह पूर्ण तालुक्यात तामसा मार्गाने ट्रॅक्टर, हायवा व टिप्पर च्या साह्याने होणारी अवैध वाळू वाहतूक हे रात्री दहा ते सकाळी नऊच्या सुमारास मोठ्या प्रमाणात चालू असते. विशेष म्हणजे या माफियांना कोणाचाही धाक व जरब नसल्याकारणाने यांचे मनोबल चांगलेच वाढल्याचे दिसून येत आहेत. तरी गोरगरीब जनतेच्या आवाक्यात असणारी वाळू ही आता त्यांच्या आवक्या बाहेर जात असून यामुळे त्यांच्या घर बांधकामांचे स्वप्न भंगल्याशिवाय राहणार नाहीत तरी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी या अवैध वाळूला लगाम लावावी अशी मागणी या निमित्ताने जनतेतून पुढे येत आहे

अर्जुनराव खोतकर यांचा विजय आणि विकासरथ कोणीच रोखू शकणार नाही

बुथप्रमुख, शिवदूत, गटप्रमुख, व प्रमुख पदाधिकारी मेळाव्यात विश्वास व्यक्त

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री. अर्जुनराव पंडितराव खोतकर यांचा विकासरथ आणि विजय कोणीच रोखू शकत नाही असा दुर्दम्य विश्वास बूथ प्रमुख, शिवदूत गटप्रमुख, आणि प्रमुख पदाधिकारी यांच्या महत्त्वपूर्ण मेळाव्यातून व्यक्त करण्यात आला.

दर्शना बंगला भाग्यनगर येथे आयोजित या मेळाव्यास साडेतीनशे बूथप्रमुख, चारशेवर शिवदुत , तीनशे गटप्रमुखासह महत्वाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या मेळाव्यात प्रचार कसा करायचा, मतदान कसे करून घ्यायचे, मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांनी सर्व समाजघटकांसाठी घेतलेले निर्णय लोकांना कोणत्या पद्धतीने सांगायचे, तसेच माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी पदावर नसतानाही मतदारसंघात कोट्यावधी रुपयांची कामे सुरू केली आहे. त्याबाबत माहिती द्यायची. लाडकी बहीण योजना, मेडिकल कॉलेज, पाणीपुरवठा योजना, एक रुपयात शेतकरी पिक विमा योजना, महिलांच्या अनेक योजना, अशा शहर व ग्रामीण

भागात राबवलेल्या योजनांची माहिती देण्यात आली. जनतेची सेवा, सुरक्षा आणि विकास या आधारावर विकासपुरुष अर्जुनराव खोतकर यांच्या पाठीशी जनमत तयार झाले आहे. फेकाफेकी,उर्मट भाषेचा वापर आणि नुसतीच शेरोशायरी करणाऱ्यांना जनतेने ओळखले असून अर्जुनराव खोतकर यांचा विकासरथ आणि विजयरथ कोणीच रोखू शकणार नाही असा दुर्दम्य विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या मेळाव्यास अर्जुनराव खोतकर, पंडितराव भुतेकर, अभिमन्यू खोतकर, भाऊसाहेब घुगे ,कालींदाताई ढगे, भास्करराव मगरे, विष्णू पाचफुले ,आत्मानंद भक्त, श्रीकांत पांगारकर, महेश दुसाने ,विजाताई चौधरी, फिरोज आला तांबोळी, आदींनी देखील मार्गदर्शन केले . यावेळी डॉ.सुयोग कुलकर्णी, गणेश सुपारकर, संतोष मोहिते, दिनेश भगत, योगेश रत्नपारखे ,अमोल ठाकूर, सविता किवंडे, दिनेश भगत, योगेश रत्नपारखे, अमोल ठाकूर, अजय कदम, गणेश मोहिते,दीपक वैद्य, किरण शिरसाठ, शुभम टेकाळे, अंकुश पाचफुले ,जफर खान ,उज्वलाताई फोपलीया, लक्ष्मण आप्पा अवघड, गोपी किशन गोगडे,निखिल पगारे ,किशोर पांगारकर, श्रीकांत पांगारकर ,संतोष जांगडे ,राजू माधववाले, रमेश टेकूर ,संताजी वाघमारे, विशाल बनकर, संजू गायकवाड, राम सत्कार, महेश दुसाने, प्रताप वर्मा ,काशिनाथ मगरे ,नरेश खुदभैय, लक्ष्मण लखन कणसे,मनोज लाखोले ,जगदीश रत्नपारखे, कांतराव रांजणकर, भोला कांबळे, फिटर खंदारे, संजय डुकरे, गणपत धोत्रे, सुशील भावसार ,सागर पाटील, कृष्णा मुळे, शिवसिंग तिलवारवाले, गोविंद सोनवणे ,शिवाजी लाड, भगवानराव अंभोरे ,सचिन देशमुख, बाळासाहेब जाधव राहुल गवारे, रवींद्र ढगे, ब्रह्मा वाघ ,सुधाकर वाडेकर, काशिनाथ जाधव, बंडू राजे ,आप्पा उगले ,आप्पासाहेब घोडके, कडूबा इंदलकर, दत्ता थेटे ,पांडुरंग डोंगरे, गणेश भुतेकर ,वैजनाथ कावळे, सोपान कावळे, विश्वजीत कापसे ,महादेव वाघ, संजय वाघ ,बाबासाहेब जराड ,भाऊसाहेब गोरे, बाबा गोरे ,भागवत भोरे ,जगन चौरे ,गोविंद चौरे , नारायण तात्या ढगे ,जनार्दनराव चौधरी ,बाबा मोरे ,बाळू देवडे, प्रभाकर सुळसुळे, अशोकराव डेंगळे, लक्ष्मण राठोड , गणेश राठोड, संजय राठोड ,रमेश जाधव,कमलाकर कळकुंबे, सुखदेव कळकुंबे ,गणेश गायकवाड ,बालाजी गायकवाड ,गजानन शेजुळ, नागेश डवले, निवरती साबळे, दत्तात्रय चव्हाण, विठ्ठल टेकाळे ,संभाजीराजे जाधव, ज्ञानेश्वर जाधव विठ्ठल जाधव ,रामचंद्र फुलझाडे,संदीप शिरसागर ,गणेश म्हस्के ,उद्धवराव भुतेकर, कृष्णा दादा डोंगरे ,तुकाराम लकडे, गणेश भुतेकर,देविदास सोमधाने ,परमेश्वर गंडाळ, ज्ञानेश्वर माऊली उबाळे, संदीप उबाळे,भरत उबाळे ,मोहन वाडेकर ,सुदर्शन देवडे ,राजू पवार, उदय तात्या तनपुरे ,लक्ष्मण उंबरे, संदीप काळे ,दत्ता काळे, राम काळे ,ज्ञानेश्वर काळे, तुकाराम खर्जुले, भागवत गिराम, शाळुराम गिराम ,संजय चव्हाण ,लक्ष्मण चव्हाण ,रामदास डुकरे,निरंजन चव्हाण,भागवत काळे ,गजानन काळे, रामकिसन कांयदे ,राम झारखंडे, धनंजय बावणे ,विश्वजीत कापसे ,भरत कापसे, यांच्यासह बुथ प्रमुख शिवदूत गटप्रमुख शिवसैनिक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाजतगाजत प्रवेश

विकास पुरुष अर्जुनराव खोतकर यांच्यावर विश्वास व्यक्त करीत विविध संघटनेचे,पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते वाजतगाजत शिवसेनेत प्रवेश करीत आहेत .देवमूर्ती, पवार तांडा ,प्रभाग क्रमांक तीन (मंठा चौफुली) ,या परिसरातील कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. विशेष म्हणजे कोणतीही अट न ठेवता संकटात साथ देणारा विकासपुरुष नेता म्हणून आम्ही प्रवेश करीत असल्याचे प्रवेश कार्यकर्त्यांनी सांगितले. यावेळी देवमूर्तीचे माजी उपसरपंच उत्तमराव कदम ,सुनील कदम ,विजय कदम, सोहेल शेख ,शेख मोशीन, पवार तांडा येथील अनिल पवार ज्ञानेश्वर आडे, विठ्ठल आडे, राजू पवार, परमेश्वर आडे, निलेश आडे, सतीश आ, संदीप पवार, बळीराम पवार, योगेश हाडे राजू पवार मच्छिंद्र आडे रमेश पवार गजानन पवार ज्ञानेश्वर पवार रामने शराडे प्रकाश आडे राम राठोड किशोर आडे भरत जाधव इत्यादी. मंठा चौफुली येथील बाळू बनसोडे नितीन खंदारे अजय काळे सौरभ थोरात गोपाल भुतेकर अजय डिखुळे गणेश काळे वैभव काळे गणेश लोखंडे शुभम कायदे सोनू गायकवाड वैभव सुरडकर शुभम साळवे संतोष पवार कृष्णा रोकडे आदींचा प्रवेश केलेल्या मध्ये समावेश आहे.

मंगळवारी महारॅलीने भरणार उमेदवारी

मंगळवार दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी महा रॅली काढून महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव पंडितराव खोतकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला जाणार आहे .मामा चौक येथून सिंधी बाजार- फुल बाजार सराफा रोड- कादराबाद -पाणी वेस्ट -मंमादेवी- गांधी चव्हाण- शनी मंदिर मार्गे भाग्यनगर येथे महारॅली चा समारोप सभेने होईल. या महा रॅलीस पदाधिकारी बूथ प्रमुख गट प्रमुख शिवदुत यांच्यासह कार्यकर्त्यांनी व महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन उमेदवार अर्जुनराव खोतकर यांच्यासह संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर ,युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे ,महिला जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे ,शहर प्रमुख विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त, यांनी केले.

संक्षिप्त

पक्षाने निर्णय न घेतल्यास कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेऊन निर्णय घेणार – मा.आ.सुरेशकुमार जेथलिया

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

आपल्या काँग्रेस पक्षाने मला विधानसभेची उमेदवारी नाकारून जो अन्याय केलेला आहे तो येत्या दोन दिवसात दूर न झाल्यास कार्यकर्त्यांच्या भावना समजून निर्णय घेणार असे प्रतिपादन माजी आमदार सुरेश कुमार घेतल्या यांनी आयोजित पदयात्रेनंतर कार्यकर्त्यांना संबोध करताना केले. परतुर विधानसभेची जागा काँग्रेसची असतांना काँग्रेस उमेदवार सुरेशकुमार जेथलिया यांच्यावर अन्याय करीत शिवसेनेला सोडल्याने नाराज कार्यकर्त्यांनी आज भव्य पदयात्रेचे आयोजन करून बैठक घेतली या बैठकीत मार्गदर्शन करताना मा.आ.सुरेश जेथलिया म्हणाले की, दहा वर्षात सत्तेत नसताना अहोरात्र जनतेची कामे करत आलो. तरी आपली हक्काची जागा असताना या ठिकाणी शिवसेनेचा उमेदवार देण्यात आला. आपल्याला विधानसभेची उमेदवारी नाकारून काँग्रेस पक्षांनी माझ्याबरोबरच कार्यकर्त्यांवरही अन्याय केला आहे.त्यामुळे दोन दिवसात काही निर्णय झाला नाही तर आपण ४ तारखेपर्यंत मतदारांच्या कौल पाहून अपक्ष सामोरे जायचे की नाही हे निर्णय घेऊ.ही निवडणूक महत्त्वाची व प्रतिष्ठेची आहे. त्यामुळे तुम्हीच निर्णय घ्या. असे सांगून कार्यकर्त्यांनी कुकर चिन्ह घ्या असे म्हणताच आ. जेथलिया म्हणाले की मी कुकरवर जरी निवडून आलो तरी पंजा सोडणार नाही कारण हा पंजा सर्व जाती धर्माला घेऊन चालणारा काँग्रेस पक्षाचा आहे. मी फक्त तुमच्यासाठी लढणार असून तुम्हीच निर्णय घ्या असेही माजी आमदार सुरेश कुमार जेथलीया यांनी सांगितले. यावेळी परतूर आष्टी मंठा नेर शेवली या ठिकाणाहून आलेल्या कार्यकर्त्यांनी आपले मत व्यक्त केले यावेळी अनेकांना अश्रू अनावर झाले. परतुर येथे भव्य पदयात्रेनंतर बैठकीत बोलताना युवा नेते नितीन जेथलिया म्हणाली की प्रत्येक वेळी आम्हाला संघर्ष करावा लागला. आम्ही परतुरला राहतो जालना औरंगाबाद पुणे मुंबईला राहत नाही या ठिकाणी राहून अहोरात्र जनतेची कामे करतो तरीही पक्षाकडून आम्हाला त्रास होतो व आज उमेदवारी ही नाकारली आम्ही धार्मिक व चारित्र्यसंपन्न आहोत. या निवडणुकीत टक्केवारी खाणाऱ्या लोकप्रतिनिधीला पाडायचं आहे. पक्षाने आपल्यावर अन्याय केला आहे आपल्याच पक्षातील काही काँग्रेस संपवायला निघाले आहेत मात्र काँग्रेस संपणार नाही.यावेळी बैठकीस मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

महाविकास आघाडीच्या वतीने चंद्रकांत दानवे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघ १०३ सर्वत्रिक निवडणूक २०२४ विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीचे उमेदवार मा. आमदार चंद्रकांत पा.दानवे यांचा दि.२५ रोजी उमेद्वारी अर्ज दाखल करण्यात आला. उमेद्वारी अर्ज दाखल करण्यासाठी मतदार संघातील कार्यकर्ते हजारोच्या संख्येने उपस्थित होते. व्यासपीठावर यावेळी महाविकास आघाडी तथा राष्ट्रवादीचे युवा नेतृत्व आमदार रोहित पवार, बीडचे माजी खासदार जयसिंगराव गायकवाड, जालना लोकसभेचे खासदार डॉ कल्याणराव काळे,राजेश टोपे,राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष निसार देशमुख, बदनापूर चे उमेद्वार बबलु चौधरी, काँगेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना उपजिल्हा प्रमुख रमेश पा. गव्हाड, जिल्हाध्यक्षा सुरेखा लहाने, बाळासाहेब वाकुळनिकर, संजय काळबांडे, रामधन कळंबे, कुंडलिक मुझे, ज्ञानेश्वर शिंदे,नवनाथ दौंड, रमेश सपकाळ,आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी रोहित पवार, चंद्रकांत दानवे सह अनेक मान्यवरांची भाषणे झाली, त्यात रोहित पवार हे कार्यकर्त्यांना संबोधित करताना पुढे म्हणाले की, तुमच्या मतदारसंघातील अनेक प्रश्न आजही भेडसावत असून,पिण्याच्या पाण्याची समस्या,ऊस कारखान्याची समस्या,किंवा शेती सिंचनाची व्यवस्था असेल, सत्ताधाऱ्यांनी एवढे वर्षे सत्ता भोगून देखील,या कुठल्याही गोष्टीवर कायमस्वरूपी तोडगा काढला नाही.त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत तुमच्या हक्काच्या माणसाला विधानसभेत पाठवण्यासाठी, कोणत्याही आमिषाला बळी न पडता, मतदान करावे व खूप मोठ्या मताधिक्याने चंद्रकांत दानवे यांना निवडून द्यावे,असे आवाहन केले.

बदनापूर विधानसभा मतदारसंघातील निष्ठावंत शिवसैनिक संतोष सांबरे यांच्या पाठीशी एकवटले

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

दि २६ ऑगस्ट अंबड बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे प्रमुख लोकप्रतिनिधी ,पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी माजी आमदार संतोष सांबरे यांच्या निवासस्थानी ठिय्या देत होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत उभे राहावे असे आवाहन केले बदनापूर विधानसभा मतदारसंघ हा सातत्याने शिवसेनेचा बालेकिल्ला राहत आलेला आहे स्वर्गीय नारायणराव चव्हाण यांनी सलग तीन वेळा तर माजी आमदार संतोष सांबरे यांनी एक वेळा या मतदारसंघावर शिवसेनेचा झेंडा फडकवलेला आहे २०१९ च्या निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीमुळे हा मतदारसंघ भाजपला सोडला त्यावेळीही येथील शिवसैनिकांनी इमाने इतबारे प्रयत्न करून नारायण कुचे यांना निवडून आणले निवडून आल्यानंतर नारायण कुचे कडून मतदारसंघातील एकाही शिवसैनिकाला न्याय मिळाला नाही सातत्याने त्यांनी शिवसैनिकांना गुंतवण्याकरताच प्रयत्न केले २०२४ च्या निवडणुकीत नारायण कुचेचा पराभव करण्याकरता सर्व शिवसैनिक सज्ज झाले असतानाच महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला ही जागा सुटल्याने पुन्हा एकदा या मतदारसंघातील शिवसैनिकांचा हिरमोड झाला आणि त्यांनी संतोष सांबरे यांना या निवडणुकीत मनोज जरांगे पाटील

यांचा पाठिंबा घेऊन अपक्ष उमेदवारी भरण्याचे आवाहन केले या मतदारसंघातील शिवसैनिक अत्यंत इर्षाने पेटला असून या निवडणुकीत नारायण कुचेला पराभूत करण्याकरता प्रचंड मेहनत घेऊ आणि गावागावात जाऊन संतोष सांबरे यांचा प्रचार करून त्यांच्या विजया करता जीवाचं राण करू असल्याचे शिवसैनिकांनी यावेळी बोलून दाखवले माजी आमदार संतोष सांबरे यांनी देखील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या आग्रहाखातर ही निवडणूक लढणार असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना माजी आमदार संतोष सांबरे म्हणाले की बदनापूर विधानसभा मतदारसंघावर मागील वेळी अन्याय झाला आणि इथल्या कडवट निष्ठावंत शिवसैनिकांनी तो सहन करून पक्षाचा आदेश म्हणून युतीच्या उमेदवाराचा प्रचार करून निवडून आणले. राष्ट्रवादीने अतिरेकी आग्रह करून जागा सोडून घेतली जिल्ह्यात तीन मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला मिळावे एवढी ताकद त्यांची नक्कीच नाही बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकावर झालेल्या अन्यायाविरुद्ध निष्ठावंत शिवसैनिक लढा देणार आहेत निष्ठावंत शिवसैनिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या जोरावर बदनापूर विधानसभा मतदारसंघात जिद्दीने निवडणूकला सामोरे जाणारे असून या मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने विजयी होऊ असा विश्वास माजी आमदार संतोष सांबरे यांनी कार्यकर्त्यांना दिला. यावेळी उपजिल्हाप्रमुख हनुमान धांडे, तालुकाप्रमुख अशोक बर्डे, जिल्हा परिषद सदस्य कैलासराव चव्हाण, युवासेना विभागीय सचिव विनायक चोथे, जिल्हा परिषद सदस्य गणेश डोळस, दिनेश काकडे, शिवाजीराव मदन, ताराचंद जाधव, राजू घुसिंगे, उपतालुकाप्रमुख बंडू पागिरे, सिद्धेश्वर उबाळे, कल्याण टकले, संजय जाधव, रामेश्वर फंड, रामसिंग सोळुंके, अर्जुन ठोंबरे, भरत मदन, सिद्धूसिंह जराड, सुशीलकुमार रुपवते, गोवर्धन उगले, अंकुशराव शिंदे, लक्ष्मीकांत मालपाणी, श्रीराम कान्हेरे, किसन खंडेकर, अरुण डोळसे, विठ्ठल आदमाने, गजानन सानप, मुकुंद हुसे, सिताराम धुळे, शैलेश दिवटे, परमेश्वर म्हात्रे, केशव क्षीरसागर, रामभाऊ मसलेकर, अनिस पठाण, गणेश अंभोरे एकनाथ इंगळे गणपत गव्हाड, राजू जऱ्हाड, राहुल जराड, नंदू पुंड, रामेश्वर पारवे विजय जाधव, शाम तिकांडे, श्याम राठोड, रमेश वराडे, लक्ष्मण आढाव, बबनराव डोईफोडे, संभाजी टकले, संतोष बर्गे, सुरेश घोरपडे, सचिन पाय तोडे, प्रेमसिंग शिरे, हिंदू सिंग कोकड, संजय अंभोरे, तपन पडगने, राजू बदर, विठ्ठल बोरडे, बाबासाहेब इंगळे, राम इंगळे, शंकर फुके, रशीद पठाण, जनार्दन जाधव, गजानन पवार, रणधीर पिंपळे, सिताराम वीर, सोमनाथ मस्के, नारायण लोहकरे, शांताराम बोचरे, सुभाष मदन, कृष्णा ओवळेकर, वसीम तांबोळी, महादेव जाधव, लक्ष्मण गव्हाड, विजय जाधव, गणपत दादा भोजने, कडूबा इंगळे, सुजित पांढरे, अमोल बोरुडे, रत्नाकर लोखंडे, अशोक बोरडे, दीपक राजगिरे, रामेश्वर लोखंडे, राजू आटोळे, सतीश चव्हान, अशोक भसंडे, गोरख डोके, शाम तिकांडे, कृष्णा टोपे, बद्रीनाथ मोटकर, योगेश उबाळे, रामा दिवटे, राहुल वाघमारे, प्रल्हादराव डुबल, बाळासाहेब नारळे, हरिभाऊ नारळे, नितेश जाधव, बाबासाहेब वंजारे, साईनाथ काळे, नारायण सांगोळे, सिताराम दिवटे, लक्ष्मण गोडसे, केशर सिंग बमणावत, राहुल घुले, गोकुळ राजळवळ, यांच्यासह पदाधिकारी कार्यकते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आम्ही विकास करणारे तर विरोधक खालच्या पातळीवर जाऊन टिका टिप्पणी करणारे -मा.खा.रावसाहेब दानवे

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

भोकरदन येथे मा केंद्रीय राज्य मंत्री रावसाहेब दानवे व आ संतोष दानवे यांच्या उपस्थितीत भोकरदन तालुक्यातील जेष्ठ कार्यकर्ता सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता सदरील सन्मान सोहळ्यास भोकरदन तालुक्यातील मा खा रावसाहेब दानवे यांना १९८५ पासुन सहकार्य करणारे तथा श्री रावसाहेब दानवे यांना सरपंच ते केंद्रात मंत्री होण्यास मतदान करणारे सहकार्य करणारे भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळेस जेष्ठ कार्यकर्ता सन्मान मेळाव्यास संबोधित करताना मा खा रावसाहेब दानवे पुढे म्हणाले की मतदार संघाचा विकास हा रस्ते वीज पाणी यावर अवलंबून असून कुठलेही नेत्याने दूरदृष्टी ठेवून मतदार संघाचा विकास केला पाहिजे. मला मोदी सरकार मध्ये दहा वर्षे मंत्रीपदावर काम करण्याची संधी मिळाली असता त्या संधीचं सोनं करून मी जालना येथे देशातील पहिला ड्रायपोर्ट मंजूर करून आणला असून त्याचा फायदा उद्योजक व व्यावसायिकांप्रमाणेच शेतकरी बांधवांनाही त्यांचा शेतमाल जालन्यातून थेट विदेशामध्ये निर्यात करण्यासाठी होणार आहे. परंतु आपला शेतमाल ड्रायफूट पर्यंत पोहोचविण्यासाठी दळणवळणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे हीच बाब असून आम्ही मागील दहा वर्षांमध्ये मतदारसंघातील रस्त्यांचा अनुशेष दूर करण्यासाठी सहा हजार कोटी रुपयांच्या रस्त्यांची कामे पूर्णत्वास दिली त्याचा फायदा आज होताना दिसत आहे. जालना येथे देशातील केवळ तिसरे आयसीटी कॉलेज आपण मंजूर करून आणले असून त्याचा जालना जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना फायदा होत आहे. काम सुरू करण्यात येणार आहे. तीन महिन्यापूर्वी झालेली लोकसभेची निवडणूक ही अनेक आघाड्यांवर अत्यंत वेगळी ठरली असून या निवडणुकीचा निकाल हा जालना लोकसभा मतदारसंघाच्या विकासाला खिळ घालणारा ठरला आहे. परंतु आता विधानसभेची निवडणूक आली असून या निवडणुकीमध्ये गाफील न राहता आमदार संतोष पाटील दानवे यांच्या नावासमोरील कमळ चिन्हाचे बटन दाबून विजयी करावे असे आवाहन माजी केंद्रीय राज्य मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.

राज्याच्या सत्ताकारणात परिवर्तन घडवण्यासाठी पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे -डॉ.शर्मा

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जिवनावश्यक वस्तूंचे वाढलेले दर, मोठ्या प्रमाणात बोकाळलेली बेरोजगारी, गुन्हेगारीचे वाढलेले प्रमाण यामुळे राज्यातील महायुती सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. राज्याच्या सत्ताकारणात परिवर्तन घडवून आणण्यासाठी इंडिया महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन काँग्रेस पक्षाचे जालना लोकसभा प्रभारी माजी मंत्री डॉ. पी. सी. शर्मा यांनी आज रविवारी येथे बोलतांना केले.

जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांच्या निवडणुक प्रचाराचे नियोजन करण्यासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक आज रविवारी दुपारी आयोजीत करण्यात आली होते. या बैठकीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे, जालना विधानसभेचे उमेदवार आ. कैलास गोरंट्याल, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भास्करराव अंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, युवानेते अक्षय गोरंट्याल, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष नंदकिशोर जांगडे, कल्याणराव दळे, प्रमोद रत्नपारखे, विनयकुमार कोठारी, संजोग हिवाळे, बदर चाऊस, बाला परदेशी, माजी गटनेते गणेश राऊत, अब्दुल रऊफ परसवाले, अब्दुल रफिक, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष वसंत जाधव, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा नंदाताई पवार, दुर्गेश काठोठीवाले, मनकर्णाताई डांगे, बाबुराव पवार, राम सावंत, दिपक भुरेवाल, दिनकर घेवंदे, किशोर मघाडे, अमेर पाशा, किशोर मगरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना डॉ. शर्मा म्हणाले की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही मुळ पक्षांसह त्यांची चिन्ह बंडखोरांनी पळवून नेल्यानंतर देखील लोकसभा निवडणुकीत नविन चिन्ह असतांना या पक्षांना मिळालेले यश सर्व सामान्य जनतेशी असलेली बांधिलकी अधोरेखीत करणारी आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत देखील इंडिया आघाडी राज्यात सत्तेत येईल असा विश्वास व्यक्त करून राज्यातील महायुती सरकारचे पाय खोलात गेल्यामुळे जाता-जाता त्यांनी लाडकी बहिन योजनेचा डाव टाकून कसाबसा बचाव करण्याचा प्रयत्न केला असला तरी राज्यातील जनता किती जागृत आहे हे लोकसभा निवडणुकीत दिसून आले असून या निवडणुकीत देखील तिच परिस्थिती कायम राहील असा ठाम विश्वास डॉ. पी. सी. शर्मा यांनी यावेळी व्यक्त केला. तत्पुव जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, बाबुराव पवार, संजोग हिवाळे यांची समयोचित भाषणे झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद यांनी केले. संचलन राम सावंत यांनी तर शेवटी गणेश राऊत यांनी आभार मानले. यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर
दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

येरोळ येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीकडून साखर वाटप

तभा वृत्तसेवा,
येरोळ, दि. २८ ऑक्टोबर-

येरोळ येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी च्या वतीने चेअरमन अतुल पाटील गंभीरे यांच्या हस्ते ५७३ शेतकऱ्यांना मोफत साखर वाटप करुन शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्यात आली.

चेअरमन अतुल पाटील-गंभीरे, व्हाईस चेअरमन शंकर वाघमारे ,गटसचिव नवनाथ गिरी, संचालक सुरेश सारसेकर, रामकिशन खटके, अशोक माडजे, श्रीकांत भालेकर, मोहन पाटील, राम पाटील, शंकर गंभीरे, शांताबाई चौसष्ठे,मिराबाई पिचारे, लिपीक गुंडू सिंदाळकर, गोविंद पोद्दार, रमेश कुलकर्णी, बालाजी झटे यांच्या सह शेतकरी सभासद, ग्रामस्थ उपस्थित होते.सध्या रब्बी हंगामातील शेतकऱ्यांची शेती कामे सुरू असून आर्थिक अडचण लक्षात घेऊन चेअरमन अतुल गंभीरे यांच्या हस्ते ५७३ शेतकरी सभासदांना दिवाळी निमित्त प्रत्येकी पाच किलो साखर मोफत वाटप करण्यात आले. शिरूर आनंतपाळ तालुक्यातील इतर सोसायटीने यांचा आदर्श घेण्यासारखा आहे

संक्षिप्त वृत्त

निलंगा येथे २ हजार १६५ अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रशिक्षण

निलंगा, दि. २८ ऑक्टोबर-

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असून प्रत्यक्ष मतदान २० नोव्हेंबर, २०२४ रोजी होणार आहे. यासाठी २३८- निलंगा विधानसभा मतदारसंघात नियुक्त २ हजार १६५ मतदान अधिकारी व कर्मचारी यांचे प्रथम प्रशिक्षण रविवार , २७ ऑक्टोबर २०२४ रोजी दोन सत्रामध्ये निलंगा येथील केतकी संगमेश्वर मंगल कार्यालय येथे घेण्यात आले. जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती वर्षा ठाकुर घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली २३८- निलंगा विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके यांच्या अध्यक्षतेखाली हे प्रशिक्षण पार पडले. पहिल्या सत्रामध्ये १ हजार ८३ व दुसऱ्या सत्रामध्ये १ हजार ८२ मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्याकडील फॉर्म १२ स्विकारण्याची व्यवस्था करण्यात आली होती. २३८- निलंगा विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके यांनी निवडणूक विषयक प्रशिक्षण दिले. तसेच निवडणुकीमध्ये सर्वसाधारण समस्यांचे अनुभव सांगून सर्व मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच २३८- निलंगा विधानसभा मतदारसंघामध्ये मतदान प्रक्रियेत कोणत्याही त्रुटी राहू नयेत, यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प सर्व केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांनी केला. एलईडीव्दारे देण्यात आलेल्या प्रशिक्षणानंतर प्रत्यक्ष ईव्हीएम हाताळण्याचे प्रशिक्षण सर्व प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात आले. प्रशिक्षणात गैरहजर असणाऱ्या प्रशिक्षणार्थ्या विरुध्द लोकप्रतिनिधी कायदा १९५१ चे कलम १३४ नुसार नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके यांनी सांगितले. प्रशिक्षणाच्या वेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रसाद कुलकर्णी, सोमनाथ वाडकर व गोविंद पेद्देवाड, गटविकास अधिकारी सोपानराव अकेले तसेच सर्व नायब तहसीलदार यांची उपस्थिती होती.

कल्याणकारी योजना बंद पाडण्याचा महाविकास आघाडीचा डाव : माने

औसा, दि. २८ ऑक्टोबर-

निवडणूकीच्या निमित्ताने तुमच्याकडे मत मागायला कांही जण येणार आहेत. त्यावेळी त्यांना कोव्हीड सारख्या अडचणीच्या काळात तुम्ही कधी आम्हाला विचारले का ? गोगलगाय प्रादुर्भावाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तुम्ही कधी विचारले का ? आमच्या सुख दु:खात तुम्ही कधी आलात का? तुम्ही १५ वर्ष कुठे होतात असे विचारा. तुम्ही आमच्यासाठी काय काम केले आहे. आणि आता आमच्यासाठी काय करणार आहात म्हणून तुम्ही उमेदवारी घेतली आहे असा जाब विचारा.आणि या होवू घातलेल्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारास त्यांची जागा दाखवा.असे आवाहन करुन महायुती सरकारने सर्व सामान्य व शेतकऱ्यांसाठी आणलेल्या कल्याणकारी योजना बंद पाडण्याचा घाट घातला असल्याची टिका शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी केली आहे.

भाजपाचे उमेदवार आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रचारार्थ देवी हल्लाळी व शिंगनाळ येथे सभा झाली. त्यावेळी ते बोलत होते. आ. अभिमन्यू पवार, शेषेराव मोहिते पाटील, हमभ दत्तात्रय पवार गुरुजी, गुलाबराव मोहिते, व्यंकट मोगरे, जनार्दन पाटील, वसंत मोहिते,तानाजी सुरवसे, सुनील माने, परिक्षीत पवार, डॉ. चैताली परिक्षीत पवार, सरपंच अनिता घंटे, लालासाहेब पाटील, विष्णू मोहिते उपस्थित होते. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने म्हणाले, महायुती सरकारने लाडक्या बहीणीला दिलेले पैसे, दिपावली निमित्त बहिणींची केलेली ओवाळणी.यामागे बहिणीला कुठेतरी आर्थिक आधार देण्याच्या हेतूने आणलेली लाडकी बहीण योजना आहे.गृहिणींच्या प्रपंच्याला आधार ठरणाऱ्या या महत्वकांक्षी योजना बंद पाडण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीकडून करण्यात येत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे सरकार आल्यास महायुतीच्या सरकारने घेतलेले सर्व निर्णय आम्ही रद्द करू म्हणून कॉंग्रेस व उध्दव ठाकरे सांगत फिरत आहेत. म्हणजे महायुतीच्या सरकारची लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांना वीजबिल माफीचा निर्णय, एक रुपयात पीकविमा योजना, सुशिक्षित बेरोजगारांना दिला जाणारा प्रशिक्षण भत्ता अशा अनेक योजना बंद करण्याचा डाव महाविकास आघाडीचा असल्याचा आरोप शिवाजीराव माने यांनी यावेळी बोलताना केला. आ. अभिमन्यू पवार यांच्या कार्याचा आलेख संपूर्ण राज्यात दिसतोय. त्यांना शेतरस्त्याचे जनक म्हणून ओळखले जात आहे. विकासकामे करताना त्यांचा कोणी हात धरू शकत नाही. विकास कसा खेचून आणायचा यामध्ये ते तरबेज आहेत. सर्वाधिक निधी खेचून आणणारे ते महाराष्ट्रातील एकमेव आमदार असून भविष्यात घेतलेल्या योजना पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांना आपल्या आशिर्वादाची गरज आहे.आणि आपण सर्वांनी त्यांना पुन्हा काम करण्याची संधी द्यावी असे आवाहन शिवसेना प्रमुख माने यांनी करीत २०१९ च्या प्रचाराचा शुभारंभ देवी हल्लाळी येथील देवीच्या दर्शनापासून करण्यात आला होता.

शक्तीप्रदर्शनाने क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा,
उदगीर, दि. २८ ऑक्टोबर-

हजारोंचा जनसमुदाय सहभागी असलेल्या भव्यदिव्य रॅलीद्वारे, शहरातील नागरिकांना अभिवादन करीत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे यांनी महायुतीकडून प्रचंड शक्तीप्रदर्शनाने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. आज उदगीर शहरात पार पडलेली रॅली संजय बनसोडे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी अशीच होती असा विश्वास ना. बनसोडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आलेल्या माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केला.

उदगीर विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे यांनी सोमवारी माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी ना.संजय बनसोडे यांच्या पत्नी शिल्पा बनसोडे, माजी आ. गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अफसर शेख, मकरंद सावे, प्रशांत पाटील, खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरत चामले, वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, भाजपाचे तालुकाध्यक्ष शिवशंकर धुप्पे, शहराध्यक्ष मनोज पुदाले, सुधीर भोसले, शिवसेनेचे नेते ॲड. गुलाब पटवारी, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानी, अमोल निडवदे, विजय बनसोडे, अनिल बनसोडे, मयुर बनसोडे, डॉ. कल्पना किणीकर, महानंदा सोनटक्के, दीपाली औटे, अनिता हैबतपुरे, प्रीती पाटील यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस,भाजप, शिवसेना व रिपाईसह घटक पक्षाचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. सुरुवात होण्यापूर्वी ना. बनसोडे यांनी उदागिर बाबांच्या किल्लयात जाऊन दर्शन घेतले. त्यांनतर हजरत सय्यद ख्वाजा बादशाह रहेमतुल्ला आलय दर्गा येथे चादर चढवून प्रार्थना केली. यानंतर श्री गुरु हावगीस्वामी महाराज मठ, श्री शंकरलिंग महाराज मठ संस्थान, विश्वशांती बुद्ध विहार, आदी ठिकाणी जाऊन दर्शन घेतले.

महारॅली मुख्य रस्त्यावरुन सकाळी १० वाजता निघाली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर, छत्रपती शाहु महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला ना. बनसोडे यांनी अभिवादन केले.

यावेळी विविध वेशभूषेतील महिला व पारंपारिक वाद्याने रॅलीची शोभा वाढवली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात ना.संजय बनसोडे यांच्यासह महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी उपस्थितांना संबोधित केले.

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेकडो युवकांचा भाजपात प्रवेश

तभा वृत्तसेवा,
शिरूर अनंतपाळ, दि. २८ ऑक्टोबर-

राज्यातील महायुती सरकारची विकासाची धोरणे आणि निलंगा मतदारसंघाचे नेतृत्व आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्यावर विश्वास ठेवत शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेकडो युवकांनी भाजपात प्रवेश घेतला.शेंद दक्षिण, वांजरखेडा (फकरानपुर) आणि कानेगाव येथील युवकांचा त्यात समावेश आहे.

आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वात शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ नागरिकांना मिळत आहे. त्यामुळे मतदारसंघातील नागरिक त्यांच्या कार्यपद्धतीवर समाधानी आहेत.यामुळेच गेल्या कांही दिवसात हजारो युवक व नागरिकांनी भाजपात प्रवेश घेतला आहे. निलंगा येथील निवासस्थानी हा कार्यक्रम झाला.आ.निलंगेकर यांनी या सर्वांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

पक्षप्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांत शेंद दक्षिण येथील मंगेश मोरे, किशोर मोरे,भागवत शिरसे, अजित मोरे,कृष्णा माने, उद्धव मोरे,शुभम मोरे, माणिक गायकवाड, विशाल बिरादार, जनार्दन कावळे,नारायण माने यांचा समावेश आहे. वांजरखेडा (फकरानपूर) येथील सुधीर सुरवसे, गोविंद सुरवसे, देविदास सुरवसे,बालाजी सुतार, रमाकांत सुरवसे, अण्णाराव सुरवसे, गहिनीनाथ सुरवसे, तुकाराम घोटवाड, अनिल दासरे,ज्ञानोबा दासरे, वसंत दासरे, राजू जाधव, मारोती जाधव, भागवत जाधव, रामकिसन मंदे, आशिष बन्नावार, बाबुराव पवार यांनी भाजपात प्रवेश केला. कानेगाव येथील वामन सुरवसे,संजय सुरवसे, बालाजी शेंडगे, सतीश सुरवसे, दत्तू सुरवसे, माणिक सुरवसे, व्यंकट सुरवसे, विश्वनाथ सुरवसे,विष्णू सुरवसे, नारायण सुरवसे, वसंत सुरवसे, शिवाजी सुरवसे, बिबिसेन सुरवसे, ज्ञानेश्वर सुरवसे, लक्ष्मण आटरगे, गजानन सुरवसे, बालाजी सुरवसे, अर्जुन सुरवसे, दत्ता आटरगे, जनार्दन सुरवसे, माणिक सुरवसे, तुकाराम सुरवसे, विठ्ठल सुरवसे, कचरू सुरवसे, निवृत्ती आटरगे, कचरू सुरवसे, सुरेश राचूरे, खंडू आटरगे, लक्ष्मण बिडवे, नरसिंग आटरगे, गोरबा आटरगे यांनीही भाजपाला समर्थन देत पक्षात प्रवेश घेतला. यावेळी मध्यप्रदेश भाजपाचे राजीव पटेल, जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे,शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष मंगेश पाटील,अनिल शिंदे,गोविंद भंडारकोटे, ब्रह्मानंद शिवनगे उपस्थित होते. विकासकामांसाठी भाजपा शिवाय अन्य कोणताही पर्याय नाही. त्यामुळे युवक भाजपात प्रवेश करत आहेत. त्यांचा पक्षात योग्य तो सन्मान राखला जाईल, असे प्रतिपादन आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

भैय्या आपल्या हक्काचे!
शिरूर अनंतपाळ शहर विविध विकास कामे

निलंगा विधानसभा मतदार संघातून 'परिवर्तन महाशक्ती'ची उमेदवारी लक्ष्मण वंगे यांना जाहीर

तभा वृत्तसेवा,
शिरूर अनंतपाळ, दि. २८ ऑक्टोबर-

शिरूर अनंतपाळ शेतकरी संघटनेचे नेते युगात्मा शरद जोशी यांच्यासोबत काम केलेले तात्विक नेते तसेच शेतकरी चळवळीसाठी लढा देणारे लक्ष्मण वंगे यांना निलंगा विधानसभा मतदारसंघातून परिवर्तन महाशक्तीची उमेदवारी जाहीर झाली आहे. स्वतंत्र भारत पक्षाकडून ते निलंग्याच्या मैदानात उतरत असून शुक्रवारी पुणे येथे स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट व स्वतंत्र भारत पक्षाच्या महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्ष सीमा नरोडे यांनी वंगे यांच्या उमेदवारीची घोषणा केली.

शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांच्यासोबत १९८० पासून शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून लक्ष्मण वंगे यांनी लातूर जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी चळवळ वाढविली. ऊस दराचे आंदोलन, काळी ज्वारी खरेदी करण्यासाठीचे आंदोलन या आंदोलनांसह मराठवाड्यात तसेच लातूर जिल्ह्यात नगदी पीक म्हणून सोयाबीन उत्पादन करण्यासाठी चळवळ राबवणारे वंगे हे शेतकरी संघटनेचे या भागातील एकमेव नेते आहेत. लातूर जिल्ह्यात आज जे सोयाबीनचे नगदी पीक म्हणून घेतले जाते, त्यासाठी वंगे व त्यावेळच्या शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केलेले काम मैलाचा दगड ठरले

आहे. शेतकरी संघटनेच्या उद्योजक आघाडीचे नेतृत्व करताना वंगे यांनी लातूर तसेच मराठवाड्यात नगदी पीक आल्याशिवाय शेतीत भरभराट होणार नाही, हे हेरून सोयाबीन उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जागृती केली, चळवळ निर्माण केली.

कोणत्याही उद्योजकाने त्याकाळी धाडस केले नसताना वंगे यांनी स्वत:ची ५० एकर जमीन विकून सोयाबीनचा प्लांट सुरू केला. लातूर येथे तत्कालीन प्रधानमंत्री व्ही. पी. सिंग, शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांच्या उपस्थितीत संघटनेचा मोठा कार्यक्रम घेतला. नंतरच्या काळात राष्ट्रीय स्तरावर शेतकरी संघटनांच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. ज्येष्ठ समाजसेवकांना हजारे यांच्यासोबत आंदोलनात सहभाग, शेतकरी संघटनेच्या हमीभाव मागणीच्या आंदोलनात तसेच स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी व्हावी, यासाठीच्या आंदोलनात वंगे हे सातत्याने आघाडीवर राहिले. त्यांच्या उमेदवारीने निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी तालुक्यात उत्साह संचारला आहे.

आ. पाटील-निलंगेकर आज दाखल करणार उमेदवारी अर्ज

भाजपाचे विनोद तावडे यांची विशेष उपस्थिती

तभा वृत्तसेवा,
शिरूर अनंतपाळ, दि. २८ ऑक्टोबर-

निलंगा विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार माजीमंत्री आ.संभाजीराव पाटील-निलंगेकर मंगळवारी (दि.२९) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी जेष्ठ नेते भाजपाचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांची उपस्थिती राहणार असून त्यांच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर आशीर्वाद सभेचे आयोजनही करण्यात आले आहे.

या सभेसाठी तीनही तालुक्यातील भजनी मंडळे, गणेश मंडळे, आराधी मंडळे, वारकरी व दुर्गा मंडळे तसेच नागरिक आणि मतदारांना निमंत्रित करण्यात आले आहे. सभेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी आ.निलंगेकर यांनी संपूर्ण मतदारसंघाचे दौरे करून नागरिकांचा प्रत्यक्ष आशीर्वाद घेतला आहे. विविध गावात जन आशीर्वाद सभा,नागरिक व मतदारांचे मेळावे, महिला मेळावे,बचत गटांच्या महिलांचे मेळावे, गणेश मंडळाचे पदाधिकारी तसेच युवक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी संवादाचे कार्यक्रम, व्यापारी,वकील तसेच विविध समाज घटकांसोबत बैठका झालेल्या आहेत.

भाजपाचे राष्ट्रीय मंत्री विनोद तावडे आ. निलंगेकर

निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी तालुक्याचा समावेश असणाऱ्या निलंगा मतदार संघाचा विकास करण्यासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. जनतेच्या आशीर्वादानेच या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळालेली आहे. जनतेने आजपर्यंत अपार प्रेम केले आहे. प्रत्येक कार्यात साथ दिली आहे.यावेळीही पुन्हा एकदा आपली साथ आणि सहकार्य तसेच आशीर्वाद अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजपर्यंत आपण जो विश्वास दाखवला त्या बळावरच ही वाटचाल सुरू असून मंगळवारी होणाऱ्या आशीर्वाद सभेस आपण हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहन महायुतीचे अधिकृत उमेदवार आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले आहे.

बुथप्रमुखांनी संपर्क-संवाद-समाधान या त्रिसुत्रीचा अवलंब करावा

आ.संभाजीराव पाटील-निलंगेकर यांचे आवाहन

तभा वृत्तसेवा
निलंगा, दि. २८ ऑक्टोबर-

निवडणुकीतील विजयासाठी संपर्क-संवाद- समाधान ही त्रिसुत्री महत्त्वाची असून बुथप्रमुखांनी या त्रिसुत्रीचा वापर करत भाजपा महायुतीच्या सरकारने केलेला विकास मतदारांना सांगावा,असे आवाहन माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

निलंगा विधानसभा मतदारसंघातील मदनसुरी,हलगरा व औराद शहाजानी जि.प. गट तसेच निलंगा शहरातील बुथ प्रमुखांच्या विजय संकल्प मेळाव्यात आ.निलंगेकर बोलत होते. मदनसुरी येथील मेळाव्यास प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, मध्यप्रदेश भाजपाचे राजीव पटेल,विधानसभा प्रभारी व्ही. एन.माधव, विधानसभा प्रभारी दगडू सोळुंके,तालुकाध्यक्ष कुमोद लोभे,जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, जिल्हा उपाध्यक्ष शेषेराव ममाळे,बाजार समितीचे सभापती शिवकुमार चिंचनसुरे,जेष्ठ कार्यकर्ते मधुकर माकणीकर,माजी जि.प.सदस्य संतोष वाघमारे,अरविंद पाटील जाजनूरकर,हलगरा येथे मान्यवरांसह नरसिंग बिराजदार,तानाजी बिराजदार,सिद्धेश्वर पवार,मधुकर पाटील,

रियाज सौदागर,लक्ष्मण शेळके,दुष्यंत सगरे, अभिषेक हलगलकर, संजय पाटील,माधव शेळके,नागेंद्र पाटील व औराद येथे डॉ. मल्लिकार्जुन शंकद, व्यंकट गीर,रज्जाक रक्षाळे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर म्हणाले की, बुथप्रमुखांनी मतदार यादीचा बारकाईने अभ्यास करावा. त्यानुसार मतदारांशी संपर्क साधावा. केंद्र आणि राज्यातील सरकारने केलेली विकासकामे मतदारांना सांगावीत.ही कामे सांगताना मतदारांशी विश्वासाने बोला. आपला पक्ष आणि उमेदवार विकासकामे करण्यासाठी सक्षम आहे. याउलट कॉंग्रेसने आजपर्यंत कोणती विकास कामे केली ? हे देखील मतदारांना विचारा. मागील दहा वर्षात केलेली सरकारची कामे तुम्ही मतदारांना सांगितल्यानंतर त्यांच्या शंकांचे निश्चितपणे समाधान होईल.यामुळे विरोधी पक्षाचे मतदारही भाजपाकडे वळतील, असे आ.निलंगेकर म्हणाले. त्यांनी सांगितले की, बुथप्रमुखांनी गाफील न राहता काम करावे. विधानसभा निवडणुकीसाठी प्रत्येक बुथ प्रमुखाने आपले संपूर्ण मतदान करून घ्यावे. त्यानंतरच इतरांचे मतदान करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत.बुथप्रमुखांनी ८० टक्केपेक्षा अधिक मतदान करून घ्यावे, असे आवाहनही आ.निलंगेकर यांनी केले.